# संबोधसहस्त्रपदीद्वारानुक्रमणिका
## ( अध्यायानुक्रमणिका )


| द्वारानुक्रम | | पान नं. |
|---|---|---|
| १ | मंगलाचरण | १ |
| २ | अथ पीठिका | १ |
| ३ | अथ धर्मकरणद्वारमाह ॥१॥ | ४ |
| ४ | अथ पापत्यजनद्वारमाह ॥२॥ | ७ |
| ५ | अथ सम्यक्त्वभजद्वारमाह ॥३॥ | ८ |
| ६ | अथ मिथ्यात्वत्यजनद्वारमाह ॥४॥ | १४ |
| ७ | अथ ज्ञानाभ्यासकरणद्वारमाह ॥५॥ | १७ |
| ८ | अथ शुद्धभावकरणद्वारमाह ॥६॥ | २१ |
| ९ | अथ मनइंद्रियदमनद्वारमाह ॥७॥ | २२ |
| १० | अथ नारीसंगत्यजनद्वारमाह ॥८॥ | २३ |
| ११ | अथ दर्शनाष्टक आर्या | २४ |


# पंचपरमेष्ठीगुणवर्णनादिविषयानुक्रमणिका


| विषय | | पान नं. |
|---|---|---|
| १ | पंचपरमेष्ठीगुणवर्णन | १ |
| २ | जिनस्तुति ( अथ पंचपदी ) | १५ |
| ३ | दानमाहात्म्यवर्णन अभंग | ३५ |
| ४ | स्वर्गवर्णन अभंग | ३६ |
| ५ | पंचकल्याणिकवर्णन अभंग | ३९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | चोवीस तीर्थंकर पदें | ६३ |
| ७ | अरहंताष्टक ( संस्कृत ) | ७७ |
| ८ | जयमाला „ | ८० |
| ९ | आरत्या | ८० |
| १० | शांतिधारा | ९० |
| ११ | विसर्जन | ९० |
| १२ | श्रीगुरुदेवेंद्रकीर्तींची लावणी | ९१ |
| १३ | सरस्वतीस्तोत्र | ९५ |
| १४ | षट्कालवर्णन | ९८ |
| १५ | चोवीसतीर्थंकरस्तुति | १०३ |
| १६ | ओंकार मंगलाचरण | १०९ |
| १७ | आदित्यवारव्रतकथा | ११३ |
| १८ | दशलक्षणिव्रतकथा | १२० |
| १९ | रत्नत्रयव्रतकथा | १३० |
| २० | षोडशकारणव्रतकथा | १३८ |
| २१ | ज्वालामालिनी अष्टक | १५१ |
| २२ | चौदागुणस्थानप्ररूपणा | १५९ |
| २३ | चतुर्विंशति प्ररूपणा | १६२ |
| २४ | विनंतीपर उद्गार | १७२ |
| २५ | संबोधसहस्रपदीपद्यवर्णानुक्रमणिका | |
| २६ | पंचपरमेष्ठीगुणवर्णनादिपद्यवर्णानुक्रमणिका | |
| २७ | शुद्धिपत्रक | |

ॐ नमः सिद्धेभ्यः ।

श्रीब्रह्ममहतिसागरकृत

# संबोधसहस्त्रपदी.

पद १

गातों मी संबोधसहस्त्रपदी ॥ गातों० ॥ ध्रु० ॥
त्रिभुवनतारक श्रीजिन वंदुनि ।
धर्मनीति सुखबोध ॥ सहस्त्रपदी० ॥ १ ॥
भारति गणधर सद्गुरु वंदुनि ।
त्यागुनि कुत्सितबोध ॥ सहस्त्रपदी० ॥ २ ॥
सुरपतिकीर्तिनें[1] बोधुनि केलें ।
महतीचें मनबोध ॥ सहस्त्रपदी० ॥ ३ ॥

अथ पीठिका, पद २

धर्मकथामृतसार । श्रवण करा धर्मकथा० ॥ ध्रु० ॥
अवगुण टाकुनि सद्गुण घ्यावा ।
करणें हाचि विचार ॥ श्रवण करा० ॥ १ ॥
चतुर विवेकी श्रोते जन हो ।
निवडुनि घ्या तुम्हि सार ॥ श्रवण० ॥ २ ॥
महति म्हणतो सकल जनांसी ।
करिजे क्षांति अपार ॥ श्रवण० ॥ ३ ॥

---

१ देवेंद्रकीर्तिनें.

## पद ३

प्राण्या धर्म[1] करीं सार । पाप[2] त्यागीं अनिवार ॥ धृ० ॥
भज सम्यक्त्व[3] तारक । त्यागीं मिथ्यात्व[4] सप्तक ॥ १ ॥
सत्यज्ञानाभ्यास[5] करीं । शुद्धभाव[6] चित्तीं धरीं ॥ २ ॥
करीं मनइंद्रिय[7] दम । त्यागीं नारीसंग[8] काम[9] ॥ ३ ॥
महति म्हणे स्त्रीशरीरीं[10] । शुद्ध नाहीं हें विचारीं ॥ ४ ॥

## पद ४

भावें भज वीतराग[11] । करीं कुदेवाचा[12] त्याग ॥ धृ० ॥
करीं जिनपूजा[13]स्तुति[14] । सद्गुरूची[15] सेवाभक्ति ॥ १ ॥
तप[16] पाळीं सदोदित । करीं जिव्हा[17] वशीभूत ॥ २ ॥
नैर्माल्य[18] हें घेऊं नको । नेमव्रत[19] भंगूं नको ॥ ३ ॥
म्हणे महति ब्रह्मचारी । सप्त व्यसन[20] निवारी ॥ ४ ॥

## पद ५

करीं चैत्यालयादिक[21] । धरीं मानसा[22] विवेक ॥ धृ० ॥
दान वर्जीं[23] कुपात्रासी । देईं दान[24] सत्पात्रासी ॥ १ ॥
त्यागीं रात्रीचें[25] भोजन । नको अगाळीतस्नान[26] ॥ २ ॥
राग[27]द्वेष[28]क्रोध[29] सांडीं । मान[30]माया[31]लोभ[32] खंडीं ॥ ३ ॥
महति म्हणे नरा सार । करीं सफळ[33] शरीर ॥ ४ ॥

## पद ६

गुणिजन[34] संग करीं । योग्य आचार[35] आचरीं ॥ धृ० ॥
सर्वजीवदया[36] पाळीं । सत्यवचन[37] सांभाळीं ॥ १ ॥

परधन नको घेऊं । कुशीलत्व नको सेवूं ॥ २॥
परिग्रह करीं दूर । करीं गृहस्थ आचार ॥ ३ ॥
महति म्हणे ऐसें करीं । तरसिल या संसारीं ॥ ४ ॥

पद ७

चित्तीं वैराग्यासी भज । आशा कुटुंब हें त्यज ॥ध्रु०॥
त्यागीं भोग त्यागीं घर । त्यागीं शोक धरीं धीर ॥१॥
स्नेहटाकीं या देहाचा । करीं त्याग संसाराचा ॥ २ ॥
महति म्हणे चारित्रासी । पाळीं यतिआचारासी ॥ ३ ॥

पद ८

जानि सर्व ही अनित्य । धर्मौषध करीं नित्य ॥ ध्रु० ॥
भावीं भावना व्रताची । हानि करी या कर्माची ॥१॥
नरजन्म दुर्लभ जाण । करीं एकत्वचिंतन ॥ २ ॥
जाय धर्मासी शरण । साधीं समाधिमरण ॥ ३ ॥
महामंत्र जप करीं । मुक्तिसुखासि आदरीं ॥ ४ ॥
महति म्हणे हें बासट । उघडी मुक्तीचें कपाट ॥ ५ ॥

इति पीठिका.

---

या पीठिकेवरून समजतें कीं, श्रीमहतिसागरस्वामींनीं संबोधसहस्रपदीचें बासष्ट द्वार (अधिकार) करण्याचें योजिलें होतें परंतु आठ अध्यायच लिहिलेले बहुधा दृष्टीस पडतात. याचें कारण स्वामींचा स्वर्गवास झाल्यामुळें हा ग्रंथ अपुरा राहिला आहे, असो. आम्हीं हे आठ द्वार श्रीयुत गांधी वीरचंद कोदरजी फलटणकर यांचेंकडून तपासून शुद्ध करून छापिले आहेत.

प्रकाशक.

# अथ धर्मकरणद्वारमाह ॥ १ ॥

पद १।९

धर्माप्रति नित्य करी जो मानव। पूजतील देव तया-
लागीं ॥ धृ० ॥ त्रैलोक्यसंपदा निजांगें घेउनि।
धार्मिकालागुनि प्राप्त होय ॥ १ ॥ कल्पना पूरवी
कल्पतरुवर । होउनि चाकर धार्मिकाचा ॥ २ ॥
धार्मिकाचें काज चिंतामणि करी। कामधेनु घरीं
दासी होय ॥ ३ ॥ महति म्हणतो ज्यानें धर्म केला।
संपत्ती हे त्याला प्राप्त झाली ॥ ४ ॥

पद २।१०

धर्माचेनि सर्व पुत्रपौत्रादिक । वांच्छित पूर्वक सुख
होय ॥ धृ० ॥ मंदिर वाहन द्रव्याचें भंडार। राज्य
अळंकार धर्माचेनि ॥ १ ॥ उत्तमकुळींसी होईल हा
जन्म। इष्टसमागम धर्माचेनि ॥ २ ॥ धर्मवृक्षाचीं
हीं फळ ऐसें होती। सुचवि महति ब्रह्मचारी ॥ ३ ॥

पद ३।११

मेला तरि जिता जाणावा सद्धर्मी। जिता तो अधर्मी
मेल्यातुल्य ॥ धृ० ॥ धार्मिक जिवाचें सफळ
जीवित्त। एकचि मुहूर्त श्रेष्ठ असे ॥ १ ॥ अधर्मि
जीवाचें निष्फळ आयुष्य । कोटाकोटीवर्ष व्यर्थ
असे ॥ २ ॥ महति म्हणतो अधर्मि मानव। जाणावा
गाढव नरामध्यें ॥ ३ ॥

पद ४।१२

द्रव्य उपार्जुनि कुटुंब पोसिती । धर्म न करिती कांहीं एक ॥ ध्रु० ॥ जैसे वनिं पशु चारा उपार्जिति । पाडस पाळिती मोहबळें ॥ १ ॥ धर्म नाहीं तेथें पशु म्हणविला । तैसा नर झाला धर्माविण ॥ २ ॥ धर्म अर्थ काम तिन्ही ही साधिजे । सफळ करींजे नरजन्म ॥ ३ ॥ कणाविण भूस निर्फळ हें जैसें । धर्माविण तैसे अर्थ काम ॥ ४ ॥ धर्मंकरूनियां तरिंजे संसारा । महतिसागरा धर्म तारूं ॥ ५ ॥

पद ५।१३

यत्नेंकरुनि धर्म न करी । तोचि मूर्ख या संसारीं ॥ध्रु०॥
पूर्वीं पुण्यउपार्जिलें । तेव्हां नरदेह पावले ॥ १ ॥
जेविं दुर्लभ कांचन थाळ । त्यांत कालविली धूळ ॥२॥
जेविं श्रेष्ठगजावर । नीच वाही काष्ठभार ॥ ३ ॥
जेविं अमृत प्राप्त केलें । चरण धुवोनि नाशिले ॥ ४ ॥
तैसा नरदेहीं झाला । धर्माविण गमावला ॥ ५ ॥
ब्रह्म महतिसागर म्हणे । धर्म नरदेहीं करणें ॥ ६ ॥

पद ६।१४

प्राप्तधर्म त्यजुनि नरा । भोग वांछिसि कां ॥ प्राप्त० ॥ ध्रु०॥ उपडुनि कल्पतरुवरा । तूं पेरिसि कां धोतरा ॥ मणि सांडोनि बरा । काच भाविसि कां ॥ १ ॥

विकुनि गिरिंद्रसम ईभा। तूं घेसि काय रासभा ॥
दवडुनि विवेकभा। तूं अंध दिससि कां ॥ २ ॥
भवजलधींत नरजनन सुष्ट। त्यजुनि धर्मपोत इष्ट ॥
धरुनियां उपल कनिष्ठ। व्यर्थ बुडसि कां ॥ ३ ॥
महतिपयोधि मतिमूढा। तूं धर्म कां न करसि जडा॥
होउनियां विषयीं वेडा। पाप जोडसि कां॥ प्रास०॥४॥

पद ७।१५

धर्म जो कथिला तीर्थंकराहिन ॥ तोचि तारूं जाण भवजळीं ॥ ध्रु० ॥ उत्तमक्षमादि दयेचें लक्षण ॥ दाहाहि पाळून धर्म घडे ॥ १ ॥ रत्नत्रय आणि सोळाहि कारण ॥ क्रिया तिरूपन धर्मरूप ॥ २ ॥ महतिसागर म्हणे हाचि धर्म ॥ पाळावा उत्तम मानवानें ॥ ३ ॥

पद ८।१६

नियम पाळुनि इंद्रिय दमुनी ॥ समता धरुनी धर्म घडे ॥ ध्रु० ॥ तोचि धर्म सर्व कल्याणकारक ॥ सुगतिदायक हितकारी ॥ १ ॥ मोक्षाचा हा मार्ग धर्म करीं सार ॥ त्यागुनि विकार सकळही ॥ २ ॥ महतिसागर म्हणे ब्रह्मचारी ॥ आराधन करीं या धर्माचें ॥ ३ ॥

धर्मं कुरु मुक्तेः प्रथमद्वारमुद्धाट्य ॥
इति धर्मकरणप्रथमद्वारं ॥ १ ॥

---

१ हत्ती. २ गाढव. ३ दगड. ४ सागर.

## अथ पापत्यजनद्वारमाह ॥ २ ॥

पद १।१७

पापाविना दुजा वैरी । नाहीं त्रैलोक्यामाझारीं ॥ध्रु०॥
पाप दुःखाचें आगर । रोगक्लेशादि भांडार ॥ १ ॥
पाप करुनियां प्राप्ति । श्वभ्रतिर्यंच दुर्गति ॥ २ ॥
म्हणे महतिसागर । प्राण्या पाप त्यागीं दूर ॥ ३ ॥

पद २।१८

पापी जीवाचें जीवित । मरणप्राय या लोकांत ॥ध्रु०॥
पापें जगीं अपकीर्ति । परलोकीं दुःखस्थिति ॥ १ ॥
पुण्यवंत सुख भोगी । मेला तरी जिता जगीं ॥ २ ॥
महति म्हणे पापी नर । भोगी दुःखाचे डोंगर ॥ ३ ॥

पद ३।१९

पापी दरिद्री तो सदा । त्यासी न मिळे संपदा ॥ध्रु०॥
घर धन धान्यराशी । हे न मिळे त्या पाप्यासी ॥१॥
वस्त्र अळंकारादिक । वस्तु न मिळे ते एक ॥ २ ॥
महति म्हणे पापी जीव । भोगी क्लेश दुःख सर्व ॥३॥

पद ४।२०

जिवासी या पुण्य मित्र । पाप शत्रु अपवित्र ॥ ध्रु० ॥
जिवासंगें दोघे जाती । जिवा सुख दुःख देती ॥ १ ॥

ऐसें जाणोनियां नरा । नको बांधूं पापभारा ॥ २ ॥
महति म्हणे शत्रुरूप । दुःख देईल हें पाप ॥ ३ ॥

पद ५।२१

सर्व दारिद्राचें मूळ । पाप खंडीं हें समूळ ॥ ध्रु० ॥
शत्रु या भवीं परभवीं । नरकीं गमन करवी ॥ १ ॥
रोग शोकादि कारण । सर्व कुयोनि निदान ॥ २ ॥
दुःखदायक हें दक्ष । संतांसी हें निंद्य साक्ष ॥ ३ ॥
महति म्हणे नरा तुज । पाप करितां नाहीं लाज ॥४॥

पापं त्यज मुक्तेः द्वितीयद्वारमुद्धाट्य ॥
इति पापत्यजनद्वितीयद्वारं ॥ २ ॥

---

## अथ सम्यक्त्वभजद्वारमाह ॥ ३ ॥

पद १।२२

जिनधर्म गुरुवचन । हेंचि तत्वरूप जाण ॥ ध्रु० ॥
याचें करावें श्रद्धान । मनीं निश्चय आणून ॥ १ ॥
मग सम्यक्त्व उपजे । अष्ट आचारे पाळिजे ॥ २ ॥
त्यागी पंचवीस मळ । होय सम्यक्त्व उज्वळ ॥ ३ ॥
समकिताविण प्राणी । फिरे त्रस स्थावर योनी ॥ ४ ॥
महति म्हणे समकित । हेंचि तारूं त्रैलोक्यांत ॥ ५ ॥

### पद ३।२३

मोक्षाचें जें मूळ सप्ततत्त्व जाण ॥ तयाचें श्रद्धान दर्शन हें ॥ धृ० ॥ पुन्हां निसर्ग हें आणि अधिगम ॥ द्विविध उत्तम सम्यक्त्व हें ॥ १ ॥ पुन्हां उपशम वेदक क्षायिक ॥ त्रिविध तारक सम्यक्त्व हें ॥ २ ॥ महति म्हणतो भेद मिश्रादिक ॥ आहेत अनेक सम्यक्त्वाचे ॥ ३ ॥

### पद ३।२४

द्विविध सम्यक्त्व स्वभावें निसर्ग ॥ प्रबोधें संसर्ग अधिगम ॥ धृ० ॥ लब्धि प्रभावानें आत्म्याचे पासून ॥ उपजे दर्शन निसर्ग हें ॥ १ ॥ जिनागार बिंब मुनि पूजेप्रति ॥ पाहुनि उत्पत्ति निसर्गाची ॥ २ ॥ अधिगम होय गुरूचे बोधानें ॥ शास्त्र श्रवणानें महति म्हणे ॥ ३ ॥

### पद ४।२५

मोहोदय नाहीं तेंच्चि उपशम ॥ मोहक्षय नाम क्षायिक हें ॥ धृ० ॥ अनंतानुबंधी *चारीहि कषाय ॥ मिथ्यात्वादि[१] त्रय सप्त होती ॥ १ ॥ सप्त प्रकृतीचा उदय जो नाहीं ॥ उपशम पाहीं तेच्चि होय ॥ २ ॥ सप्त प्रकृतीचे उदयाचा क्षय ॥ क्षायिक तें होय

---

* क्रोध, मान, माया, लोभ.

१ मिथ्यात्व, सम्यग्मिथ्यात्व, सम्यग्प्रकृतिमिथ्यात्व.

सम्यक्त्व हें ॥ ३ ॥ वेदक उदय ऐका प्रकृतीचा ॥ साही प्रकृतीचा उदय नाहीं ॥ ४ ॥ ऐसें हें सम्यक्त्व कथिलें त्रिविध ॥ सिद्धांत प्रसिद्ध महति म्हणे ॥५॥

पद ५।२६

पाळी हें दर्शन निःशंकितादिक ॥ दोष शंकादिक न पाळिता ॥ध्रु०॥ निःशंकिता होय निर्भय धर्मार्थी ॥ निर्वांच्छाभोगार्थी निःकांक्षिता ॥ १ ॥ निंदा वर्जुनीया निर्विचिकित्सिता ॥ मूढत्व टाकिता अमोढ्य हा ॥ २ ॥ जिनशासनाचे दोष आच्छादन ॥ तो उपगूहन पांचवा हा ॥ ३ ॥ संस्थितिकरण बोधुनि भ्रष्टासि ॥ प्रीति साधर्मीसी वात्सल्य हा ॥ ४ ॥ प्रकाश धर्माचा प्रतापें उत्कृष्ट ॥ प्रभावनोद्भट प्रभाव हा ॥ ५ ॥ दर्शनाचे अष्ट आचार हे पाळीं ॥ अष्ट दोष टाळीं महति म्हणे ॥ ६ ॥

पद ६।२७

त्यागीं पंचवीस दर्शनाचे मळ ॥ सम्यक्त्व निर्मळ मग होय ॥ ध्रु० ॥ अष्टविध मद सँा अनायतन ॥ मूढत्वाचे तीन भेद असती ॥ १ ॥ न पाळितां गुण दर्शनाचे अष्ट ॥ होती मळ अष्ट शंकादिक ॥ २ ॥ महति म्हणतो ऐसे पंचवीस ॥ टाळावे हे दोष दर्शनाचे ॥ ३ ॥

---

१ सम्यगप्रकृतिमिथ्यात्व.

पद ७।२८

अष्टविध मद ज्याचे अंगीं असे ॥ सम्यक्त्व न दिसे तयालागीं ॥ ध्रु० ॥ जातीचा कुळींचा तिजा प्रभूत्वाचा ॥ चतुर्थ रूपाचा अभिमान ॥ १ ॥ ज्ञानाचा बळाचा सातवा तपाचा ॥ आठवा शिल्पीचा अभिमान ॥ २ ॥ जात्यादिक हीन सम्यक्तिव जो झाला ॥ अभिमानी त्याला न माने तो ॥ ३ ॥ अभिमानी ऐसा न पाहे विशुद्धी ॥ जाती कुळ शोधी महति म्हणे ॥ ४ ॥

पद ८।२९

असत्याचें घर षड्विध हें जाण ॥ तें अनायतन म्हणीजेतें ॥ ध्रु० ॥ असत्यदेवाचें वंदन करण ॥ आधार धरण कुदेवाचा ॥ १ ॥ असत्य शास्त्राचें श्रवण करण ॥ आधारें स्थापन कुशास्त्राचें ॥ २ ॥ असत्य गुरूचा उपदेश घेणें ॥ आधारें वर्तन कुगुरूचें ॥ ३ ॥ महति म्हणतो हें षडायतन ॥ सम्यक्ती जीवानें वर्जावें हें ॥ ४ ॥

पद ९।३०

देवशास्त्रगुरु याह्राचे जे गुण ॥ न घेती अज्ञान त्रिमूढ ते ॥ ध्रु० ॥ भावें देवमूढ अर्हंतासि मानी ॥ स्वरूप न जाणे अर्हंताचें ॥ १ ॥ भावे शास्त्रमूढ

जिनशास्त्र ऐके ॥ अर्थ न विलोके त्या शास्त्राचा ॥ २॥
भावे गुरुमूढ गुरुभक्ति करी ॥ वचन न धरी सद्गु-
रूचें ॥ ३ ॥ ऐशा मूढपणें सम्यक्त्व मलीन ॥
अशुद्ध श्रद्धान महति म्हणे ॥ ४ ॥

पद १०।२१

समकितावीन हा प्राणी । संसारसागर न तरे ॥
चवऱ्यासि लक्षामध्यें । फिरतो अनंतकाल फेरे ॥ध्रु०॥
जरी श्रवण करितो नित्य। जिनगुणकीर्तन शास्त्रसत्य॥
जिन कथा कथितो तत्वार्थादिक सूत्र ॥
पाळितो दशविध धर्म ॥ तेरा प्रकारें चारित्र ॥
तप उपवास करोनि ॥ शोकिलें सर्वहि गात्र ॥
भोगुनि फळ धर्माचें ॥ पुनरपि हा भवभवीं फिरे ॥ १ ॥
होउनियां वनवासी जरि ध्यान निश्चळ केलें ॥
तप केलें वर्षाकाळीं बैसुनि वृक्षाखाले ॥
सीतकाळीं सरिता तिरीं राहुनि सीत साहिलें ॥
गिरिशिखरीं उष्णकाळीं जाउनि तप साधीलें ॥
इतुकें करुनि परंतु जीव हा त्रसस्थावरीं फिरे ॥ २ ॥
निगोद स्थावर वनिता विकलेंद्रिय व्यंतरवास ॥
कुभोगभूमी म्लेंच्छ ज्योतिषी भावनवास ॥
द्वितीयादिक षण्नरक असंज्ञीयोनी निवास ॥
इतुक्यां योनी न होती समकितधारी जीवास ॥
महतिसागर म्हणतो समकित हें चुकविल फेरे ॥ ३ ॥

पद ११।३२

दर्शन शुद्ध हा जीवसत्य जाण ॥ दर्शनावांचून जिव पशु ॥ ध्रु० ॥ पाहें हें दर्शन हाती चिंतामणी ॥ प्राप्त तो आंगणीं कल्पवृक्ष ॥ १ ॥ सम्यक्त्वाचे बळें कामधेनु घरीं ॥ होय अनुचरि जीवासि या ॥ २ ॥ सम्यक्त्वी जीवासी राज्यलक्ष्मी सदा ॥ स्वर्गाची संपदा स्वता येते ॥ ३ ॥ दर्शनें करुनि जीव आळंकारी ॥ मुक्ति त्याला वरी महति म्हणे ॥ ४ ॥

पद १२।३३

कोणेही स्थानकी जेथें जो सम्यक्त्वी ॥ लोक ते पूजीती तयालागीं ॥ ध्रु ॥ दर्शनाविण जो जरि साधु झाला ॥ निंदतील त्याला पदोपदी ॥ १ ॥ संसारसागरीं तारक जहाज ॥ धर्मवृक्ष बीज दर्शन हें ॥ २ ॥ सर्व सुखनिधि हे भव्यजीवासी ॥ दुरीत वृक्षासी कुऱ्हाड हे ॥ ३ ॥ ज्ञान चारित्राचें मूळ हें दर्शन ॥ कुकर्म खंडण दर्शन हें ॥ ४ ॥ ऐसें जाणुनीयां दर्शनासी भज ॥ तारील हें तुज महति म्हणे ॥ ५ ॥

सम्यक्त्वं भज मुक्तेः तृतीयद्वारमुद्धाट्य ॥

इति सम्यक्त्वभजतृतीयद्वारं ॥ ३ ॥

# अथ मिथ्यात्वत्यजनद्वारमाह ॥ ४ ॥

पद १।३४

सप्त हें मिथ्यात्व जो जीव आचरी ॥ तो त्रसस्थावरीं फिरे जीव ॥ ध्रु० ॥ प्रथम विनय दुजें मूढमत ॥ तिसरें एकांत मिथ्यात्व हें ॥ १ ॥ चतुर्थ ग्राहित पंचम विपरीत ॥ नैसर्गिकमत षष्ठम हें ॥ २ ॥ सातवें संशय मिथ्यात्व हें सात । निवारीं त्वरीत महति म्हणे ॥ ३ ॥

पद २।३५

विनय मिथ्यात्वी जो प्राणी । सर्व कुदेवांसी मानी ॥ ध्रु० ॥ वंदी हरिहरादिकांसी । नाना यक्ष व्यंतरासी ॥ १ ॥ दर्भ दूर्वादिक तृण । यासी करीतो वंदन ॥ २ ॥ वृक्ष जळासी वंदितो । कांजी अंबील पूजितो ॥ ३ ॥ धेनु सुकर कुकर । यासी वंदितो पामर ॥ ४ ॥ महति म्हणे सर्वांप्रती । वंदीं विनयमिथ्यामती ॥ ५ ॥

पद ३।३६

मूढमिथ्यात्वी अज्ञानी । प्रतिबोधासी न मानी॥ध्रु०॥
जरी पंडितें बोधिला । बोध न लाधे तो त्याला ॥ १॥
न जाणे संसार तारू । धर्म देव शास्त्र गुरु ॥ २ ॥
महति म्हणे मूढाप्रती । नव्हे ज्ञानाची हे गती ॥३॥

पद ४।२७

एकांतिक मिथ्यामती । ज्ञान अन्यथा स्थापिती ॥ध्रु०॥
कोणी बोले जीव नित्य । कोणी बोलती अनित्य ॥१॥
कोणी बोले सत्ता पाहीं । कोणी बोले जीव नाहीं ॥ २॥
कोणी भेद बोलताती । कोणी अभेद सांगती ॥ ३॥
महति म्हणे आवडीन । वदती एकांतिक ज्ञान ॥४॥

पद ५।२८

ग्राहितमिथ्यात्वी मोहवशीभूत ॥ आदरीं धर्मांत बोधिल्यानें ॥ ध्रु० ॥ पुन्हां कुगुरूचे संसर्गापासून ॥ कुदेवालागुन भजतसे ॥ १ ॥ कुगुरूचे मुखें कुशास्त्र ऐकून ॥ करी आचरण कुधर्मांचें ॥ २ ॥ महति म्हणतो संग्रहीत मती ॥ जिनधर्माप्रती न आचरे ॥३॥

पद ६।२९

विपरीत मिथ्यात्वीची । नाहीं शुभधर्मीं रुची ॥ध्रु०॥
आवडेना सुष्टबोध । जैसें ज्वरीतासी दुग्ध ॥ १ ॥
जैसें पाजितां पीयूष । सर्पाचें न जाय विष ॥ २ ॥
तैसी जिनधर्मीं गोडी । विपरीतासी नावडी ॥ ३ ॥
महति म्हणतो उलटी । विपरीत बुद्धी खोटी ॥ ४ ॥

पद ७।४०

निसर्ग मिथ्यात्वी स्वभावेंकरून ॥ तत्वाचें श्रद्धान न आदरी ॥ ध्रु० ॥ जैसा निंबवृक्ष दुधानें सिंचीतां॥

न टाकी कटुतास्वभाव तो ॥ १ ॥ तैसा निसर्गीचा न जाय स्वभाव ॥ तत्वश्रद्धाभाव न आदरी ॥ २ ॥ महति म्हणतो संसारसागरीं ॥ बुडे निरंतरीं नैसर्गिक ॥ ३ ॥

पद ८।४१

संशय मिथ्यात्वी जिन भक्त होती ॥ संशय करिती जिनागमीं ॥ धृ० ॥ निर्ग्रंथाचें तप आचरितां स्त्रीसी॥ आणि सग्रंथासी मुक्ती म्हणती ॥ १ ॥ इत्यादिक बहु संशय करिती ॥ दुष्कृत जोडिती अनिवार ॥२॥ महति म्हणतो संशयिकमती ॥ दुःख तें भोगिती दुर्गतीचें ॥ ३ ॥

पद ९।४२

मिथ्यात्व हें ज्याचे अंगीं। तो न मानी धर्मालागीं॥धृ०
जैसा अंगीं दाटे ज्वर। गोड न लागे साखर ॥ १ ॥
तैसा मानी तो कुधर्म। आवडेना जिनधर्म ॥ २ ॥
महति म्हणे भवार्णवीं। जिवा मिथ्यात्व बुडवीं ॥३॥

पद १०।४३

लोकीं नाहीं पाप मिथ्यात्वा समान ॥ सम्यक्त्वा समान धर्म नाहीं ॥ धृ० ॥ नीचदेवभक्त कुगुरु-सेवक ॥ कुज्ञानपाठक कुमती जो ॥ १ ॥ कुधर्मी होउनी करी कुलपासी ॥ पावे कुगतीसी मिथ्यात्वी तो ॥ २ ॥ महति म्हणतो मिथ्यात्वी जो जीव ॥ भोगी दुःख सर्व कुगतीचें ॥ ३ ॥

पद ११।४४

आचरोनि मिथ्यामत । वरें नाहीं हें जीवित ॥ ध्रु० ॥
वरा सर्पमुखीं हात । वरा अग्नीं झंझापात ॥ १ ॥
वरें डोहांत बूडन । वरें विषाचें भक्षण ॥ २ ॥
महति म्हणे अपघात । वरा पर्वत निःपात ॥ ३ ॥

पद १२।४५

सर्व पापाचें हें मूळ । त्यागीं मिथ्यात्व सकळ ॥ध्रु०॥
दुःखवृक्षाचें हे बीज । श्वभ्र मंदिराची ध्वज ॥ १ ॥
स्वर्ग मोक्षाचे हे वैरी । निंद्य त्रैलोक्यामाझारीं ॥ २॥
महति म्हणे मूढ लोक । आदरीती अविवेक ॥ ३ ॥

मिथ्यात्वं त्यज मुक्तेः चतुर्थद्वारमुद्धाव्य ॥

इति मिथ्यात्वत्यजनचतुर्थद्वारं ॥ ४ ॥

---

## अथ ज्ञानाभ्यासकरणद्वारमाह ॥ ५ ॥

पद १।४६

जिनागम तो निर्दोष । त्याचा करीं तूं अभ्यास॥ध्रु०॥
ज्याचे ठायीं जीवदया । कथिजेली शुभक्रिया ॥१॥
ज्याचे ठायीं खोटा बोध । नाहीं पूर्वापर विरुद्ध ॥ २ ॥
ज्याचे ठायीं कर्मछेद । कथिले मार्गणाचे भेद ॥ ३ ॥
महति म्हणे ते सिद्धांत । सप्त तत्वार्थ सहित ॥ ४ ॥

पद २।४७

ज्ञानाभ्यास पंच स्वाध्याय करुनी। आदरें श्रवणीं ऐकूनियां ॥ धृ० ॥ शास्त्र वांचूनियां ज्ञानाभ्यास होय॥ वाचना स्वाध्याय प्रथम हा ॥ १ ॥ संशय फेडाया प्रश्न जो करीजे ॥ प्रछना जाणिजे स्वाध्याय हा ॥२॥ पाठाचे चिंतनीं लावीं मनलक्षा ॥ तिजा अनुप्रेक्षा स्वाध्याय हा ॥३॥ आम्नाय म्हणीजे पाठाची घोषणा॥ स्वाध्याय तो जाणा चतुर्थ हा ॥४॥ धर्मउपदेश सर्वदा करावा ॥ स्वाध्याय पांचवा महति म्हणे ॥ ५ ॥

पद ३।४८

गुरुमुखें शास्त्र न वाचे। त्याला शुद्धज्ञान कैंचें ॥धृ०॥
कदा न करी जो प्रश्न। त्याला कैंचें शुद्धज्ञान ॥ १ ॥
कदा पाठाचे चिंतनीं। जो न करी तो अज्ञानी॥ २॥
कदा पाठ जो न घोकी। तोचि अज्ञानी या लोकीं॥३॥
न करितां उपदेश । ज्ञान नव्हे तें विशेष ॥ ४ ॥
महति म्हणे श्रवणाविना। कैंची ज्ञानविचारणा ॥५॥

पद ४।४९

जिनकथेचे श्रवणीं। कधीं न ये तो अज्ञानी ॥ धृ० ॥
जरी आणीला कथेसी। निजे टेंकूनि भिंतीसी ॥ १ ॥
जरी बैसोनियां जागे। विकथेच्या गोष्टी सांगे ॥ २ ॥
जरी न बोले वचन। भलतीकडे घाली मन ॥ ३ ॥
जिनागमाचा आदर। श्रवणीं न करी पामर ॥ ४ ॥
महति म्हणे ऐसा नर। त्यासी ज्ञान नव्हे सार ॥५॥

पद ५।५०

ज्ञानाचे आचार अष्टही पाळून ॥ प्रदीप्त तें ज्ञान हृदयीं होये ॥ ध्रु० ॥ गुरु सांगे तैसें उचारी अक्षर ॥ प्रथम आचार जाणिजे हा ॥ १ ॥ गुरु सांगे अर्थ तो सर्व झेलावा ॥ दुसरा जाणावा आचार हा ॥ २ ॥ शब्द अर्थ दोनी संपूर्ण झेलीजे ॥ आचार जाणीजे तिसरा हा ॥ ३ ॥ चतुर्थ पाठ हा घोकी योग्य काळीं ॥ नियम सांभाळी पांचवा हा ॥४॥ षष्टम विनय जोडी हस्त दोन ॥ गुरूचें स्तवन सातवा हा ॥ ५ ॥ अष्टम गुरूचा करी बहुमान । मग होय ज्ञान महति म्हणे ॥६॥

पद ६।५१

प्रमाद हे पंचदश । त्यजुनि करीं ज्ञानाभ्यास ॥ ध्रु०॥
त्यागीं क्रोधादिक चारीं । त्यागीं विकथाही चारीं ॥१॥
पंच इंद्रिय आवरीं । निद्रा स्नेह हे नीवारीं ॥ २ ॥
महति म्हणे मग ज्ञान । तुज होईल प्रसन्न ॥ ३ ॥

पद ७।५२

ज्ञानवंत जीव शुभ । स्वर्ग मुक्तीचा वल्लभ ॥ ध्रु० ॥
ज्ञानहीन या संसारीं । फिरे दुःखाचे सागरीं ॥ १ ॥
जेथें ज्ञान्याचा प्रवेश । तेथें अज्ञानी उदास ॥ २ ॥
ज्ञानी कर्माप्रती तोडी । कर्म अज्ञानी तो जोडी ॥३॥
महति म्हणे ज्ञानी नर । विचारितो सारासार ॥ ४ ॥

पद ८।५३

ज्ञानाचा अभ्यास कराया तत्पर ॥ तपस्वी तो नर नरामध्यें ॥ धृ० ॥ ज्ञानाभ्यास होय मनवचकाय ॥ पंचही इंद्रिय आवरोनी ॥ १ ॥ परम हें तप ज्ञानाचें पठण ॥ इंद्रियदमन ज्यानें होय ॥ २ ॥ महति म्हणे जो ज्ञानी तो आचारी ॥ होय अनाचारी अज्ञानी तो ॥ ३ ॥

पद ९।५४

ज्ञानहीन अविवेकी । धर्म पाप न विलोकी ॥ धृ० ॥
गुण अवगुण चिन्ह । न जाणे तो ज्ञानहीन ॥ १ ॥
योग्य अयोग्य विचार । न जाणे अज्ञानी नर ॥ २ ॥
जैसा जातीचा अंधळा । हस्ती न दिसे त्या डोळां ॥ ३ ॥
महति म्हणे ज्ञानाविण । नर अंधळा तो जाण ॥ ४ ॥

पद १०।५५

निर्मळ गुणाचें निधान हें ज्ञान ॥ तीर्थंकराहिन निवेदिलें ॥ धृ० ॥ सर्व चतुरता ज्ञानाचेपासून ॥ तत्वप्रकाशन ज्ञानाचेनि ॥ १ ॥ मनगज सिंह पापवृक्ष घात ॥ धर्माचें जीवित ज्ञान हेंचि ॥ २ ॥ महति म्हणतो भव्यजनाहिन ॥ करावें पठण ज्ञान सत्य ॥ ३ ॥

सत्य ज्ञानाभ्यासं कुरु मुक्तेः पंचमद्वारमुद्धाट्य ॥

इति ज्ञानाभ्यासकरणपंचमद्वारं ॥ ५ ॥

# अथ शुद्धभावकरणद्वारमाह ॥ ६ ॥

पद १।५६

भावें तप पूजा दान । मुक्ति सुखाचें कारण ॥ ध्रु० ॥
भावाविण पूजादिक । व्यर्थ तप जपादिक ॥ १ ॥
व्यर्थ दीक्षा भावाविण । जैसे शेळीगळां थान ॥ २ ॥
महति म्हणे तूं समज । भाव हाचि मुक्तिबीज ॥ ३ ॥

पद २।५७

भावसहित चारित्र । ज्ञानी आचरी पवित्र ॥ ध्रु० ॥
त्यासी स्वर्गादिक सुख । प्राप्त होय तें सन्मुख ॥ १ ॥
तोचि कर्मछेदकर्ता । तोचि होय मुक्तिभर्ता ॥ २ ॥
महति म्हणे जैसा भाव । तैसें फळ पावे जीव ॥ ३ ॥

पद ३।५८

सुभावानें पुण्य घडे । कुभावानें पाप जुडे ॥ ध्रु० ॥
कुभावानें केला धर्म । तेंचि होय पापकर्म ॥ १ ॥
सुभावानें केलें पाप । तेंचि होय धर्मरूप ॥ २ ॥
महति म्हणे सुभावना । होय धर्माची कल्पना ॥ ३ ॥

पद ४।५९

दानव्रतादिक भावें पुण्यरूप ॥ विषयादि पाप भावाचेनि ॥ ध्रु० ॥ अभावें जो पाप आचरितो जरी ॥ भाव धर्मावरी तोचि धर्मी ॥ १ ॥ अभावें जो धर्म आचरीतो जरी ॥ भाव पापावरी तोचि पापी ॥ २ ॥ धर्माची कल्पना तेचि सुभावना । पापाची कल्पना

कुभावना ॥ ३ ॥ महति म्हणतो धरीं सुभावासी ॥ वृथा कां करिसी देह दंड ॥ ४ ॥

पद ५।६०

धर्माची भावना तारक संसारीं ॥ सर्व सुखकारी जीवासी या ॥ ध्रृ० ॥ स्वर्गद्वारामध्यें जायाची हे वाट ॥ आगळ हे नीट दुर्गतीची ॥ १ ॥ उत्पादिका होय हे रत्नत्रयाची ॥ धर्मअमृताची विहीर हे ॥ २ ॥ महति म्हणतो पापविनाशिका ॥ मुक्तीची दूतिका सुभावना ॥ ३ ॥

शुद्ध भावनां कुरु मुक्तेः षष्ठमद्वारमुद्धाव्य ॥

इति शुद्धभावकरणषष्ठमद्वारं ॥ ६ ॥

---

## अथ मनइंद्रियदमनद्वारमाह ॥ ७ ॥

पद १।६१

मनराजाचे हे पांचही चाकर ॥ इंद्रिय तस्कर पाठविले ॥ ध्रृ० ॥ ते सर्व लोकांसी व्याकुळ करिती ॥ धर्मधन नेती हिरोनियां ॥ १ ॥ वैराग्य खड्गानें मारुनी चोरासी ॥ सद्धर्मधनासी रक्षितो जो ॥ २ ॥ त्यासी स्वर्मोक्षाचें सुखही अखंड ॥ प्राप्त ते उदंड महति म्हणे ॥ ३ ॥

पद २।६२

ज्यानें इंद्रिय जिंतुनी । गुप्त केले नाहीं मनीं ॥ धृ० ॥
जिनमुद्रा हे घेउन । आत्मा ठकविला त्यान ॥ १ ॥
जळो त्याचें दीक्षाघेण । जळो तपआचरण ॥ २ ॥
महति म्हणे अधमान । लज्जा दिधली सोडुन ॥ ३ ॥

पद ३।६२

इंद्रिय तस्कर दुर्धर हे खळ ॥ लुटती निखळ जीवासि या ॥ धृ० ॥ ज्ञानचारित्रादि रत्नांचें भांडार ॥ गुण अळंकार चोर नेती ॥ १ ॥ इंद्रिय चोरासी यतीश्वराहिन ॥ मारिले धरून ध्यानबाणें ॥ २ ॥ रक्षिलेचि ज्यानें रत्नत्रयादिक ॥ धर्मगुणादिक तारक हे ॥ ३ ॥ महति म्हणतो तेचि यतीश्वर ॥ मुक्तीचे भ्रतार सिद्ध झाले ॥ ४ ॥

मनइंद्रियदमनं कुरु मुक्तेः सप्तमद्वारमुद्धाट्य ॥
इति मनइंद्रियदमनसप्तमद्वारं ॥ ७ ॥

---

## अथ नारीसंगत्यजनद्वारमाह ॥ ८ ॥

पद १।६४

बरी नव्हे स्त्री भूतळीं । नरकगृहाची पोवळी ॥ धृ०॥
जैसि कंठिंते सर्पिन । तैसें स्त्रिचे आलिंगन ॥ १ ॥
बरा अग्निचा संसर्ग । बरा नाहीं नारीसंग ॥ २ ॥
महति ह्मणे संगस्त्रीचा । नीट मार्ग कुगतीचा ॥ ३ ॥

अपूर्ण.

# अथ दर्शनाष्टक.

## आर्या.

निःशक होउनि जेव्हां भक्ती ते एकनिष्ठ दृढ जडली ॥
तेव्हां खेचरविद्याप्राप्ती ते अंजनासि त्या घडली ॥ १ ॥
भोगोपभोगकांक्षा त्यजुनी दृढसक्रियासि जे भजली ॥
थोर उपद्रव साहुनि शीळाप्रति ते अनंतमति सजली ॥ २ ॥
निर्विचिकित्सितभावें निंदा त्यजुनी प्रभावतीराणी ॥
दुर्गंधयुक्तमुनिला भजली ते पुरवुनी अशनपाणी ॥ ३ ॥
आगमशास्त्रज्ञानें रेवतिराणी अमोल्य गुणराशी ॥
ब्रह्मादिकबहुरूपी वर्जुनि ते वंदि जैनमुद्रासी ॥ ४ ॥
जिनमुनिमुद्रा जाणुनि अवगुण झांकुनि स्वरूप चोराचें ॥
जिनदत्तानें त्याला गुण सांगितले सम्यक्त्वसाराचे ॥ ५ ॥
त्या वारिषेणमुनिनें बोधुनियां पुष्पडाळ मित्रासी ॥
वैराग्यस्थिति केली दावुनियां निजपुरा कलत्रासी ॥ ६ ॥
त्या विष्णुकुमारानें मुनिजनवात्सल्यभाव जो धरिला ॥
सप्तशतसंयमीचा बळिकृत मरणोपसर्ग तो हरिला ॥ ७ ॥
जिनस्नपन पूजादि प्रभावना शुद्ध जैनधर्माची ॥
केली वज्रकुमारें सत्ता उडवुनि असत्य धर्माची ॥ ८ ॥
या दर्शनाष्टकासी जे नर ऐशा प्रकारचे भजती ॥
महतीसागर ह्मणतो मुक्तिपदीं ते अनुक्रमें सजती ॥ ९ ॥

पब्लिशर—नाना रामचंद्र नाग, मु० लोणंद, जि० सातारा.
प्रिन्टर—रामचंद्र येसू शेडगे, निर्णयसागर छापखाना,
२६–२८ कोलभाट गल्ली, मुंबई.

# पंचपरमेष्ठीगुणवर्णन

## पंचनमस्कारमंत्रमाहात्म्य

### अभंग न १

॥ पंच नमस्कार ॥ ज्याहानें स्मरिले ॥ ते जीव तरिले ॥ भव सिंधु ॥ धृ ॥ तीर्थंकर चक्री ॥ बळदेवादिक ॥ जीव ते अनेक ॥ तरियले ॥ १ ॥ धर्मपुण्यवन्त ॥ महंत सज्जन ॥ करितां स्मरण ॥ तरियले ॥ २ ॥ सिंह मृग सर्प ॥ नकुळ सुकर ॥ सियाळ वानर ॥ तरियले ॥ ३ ॥ नर पशु जीव ॥ भिल्ल गणिकादि ॥ व्याघ्र वृषभादि ॥ तरियले ॥ ४ मातंग सशल्य । हास्ति हंस गृद्ध ॥ जीव हे विविध ॥ तरियले ॥ ५ ॥ दर्दुरादि जीव तरिलें अपार ॥ पंचनमस्कार ॥ स्मरितानि

॥ ६ ॥ महति ह्मणितो ॥ तुटे हा प्रपंच ॥ नमस्कार पंच ॥ स्मारितानि ॥ ७ ॥ छ ॥

## अरहंताचे ४६ गुण

### अभंग नं. २ ( जन्माचे १० अतीशय )

तुज नमु अरहंता ॥ सेचाळीस गुणवन्ता ॥ध्रु॥
आतिशय चवतीस । प्रातिहार्याष्ट विशेष ॥१॥
चारी अनंत प्रमान । ऐसे सेचाळीस गुण २
देहीं नाहीं स्वेदं कदा ॥ देह निर्मळ हे सदा ३
तुझें रुधीर शरीरीं । शुभ्र दिसे दुग्धापरी ४
समचतुरस्राकार ॥ आद्य संस्थान हे सार ५
वज्रवृषभनाराच । आद्य संहनन साच ६
तुझें वचन तारक ॥ प्रियहितामित कारक ७
तुझें तुल्य जगामधी । दुजे रूपँ नाहीं कधी ८
बरास कर्पुरापरी । तुझे सुगंध शरीरी ९
आठअधीक१००८हजार । देहीसुलक्षण सार १०
बळअनंत जन्मताची । दहा आतिशय हेची ११

### अभंग नं. ३ ( केवळज्ञानाचे १० अतीशय )

तुज नमू जिनराजा । परिणिली दिक्षा भाजा ।
मग छद्मस्थ राहुनी । केली घातीकर्महानी १
झालें ज्ञान तें केवळ । तुझें गमन अंतराळ २
देही जीव वेंध नाहीं । कवळा आहारेंहि नाहीं ३
शतयोजन चऊ फेर । सदा सुकाळ हा सार ४
तुज उपसर्ग नाहीं । शरीराची छाया नाहीं ५
चारि मुँख तुज दिसती । सर्व विद्याचा तूं पती
नेत्रीं उन्मेषेंहि नाहीं । नखकेशवृद्धि नाहीं ७
केवळज्ञान झाल्यावरी । दहा अतीशय धारी ८

### अभंग नं. ४

देवकृत १४ अतीशय

तुज नमू जिनेश्वरा । केवळ बोध विभाकरा ॥
स्थान इंद्राचे आज्ञेनें । रचिले कुबेरदेवानें १
सभायुक्त समवश्रृति । देव अतिशय करिती २
तुझें समवशरणीं । सर्वमागधी हे वाणी ३
वैर त्यजुनि मैत्रीभाव । चित्तीं धरिति सर्व जीव

सर्व ऋतूचे जे वृक्ष ॥ फैळ फुल्लित प्रत्यक्ष ॥५॥
भूमि दर्पणा समान । वायु सुगंध तो जाण ६
सर्व जनाहिचे चित्ती । महा आनंदउत्पत्ती ७
भूमि योजन प्रमाण । देव करिती सन्मार्जन ८
मेघ वर्षति गंधोदका । सर्व धान्याढ्य भूमिका ९
चालतानि सात सात । मागें पुढें पद्मास्थित
जेथें जिनपाद पडती । तेथें नवपद्म धरिती
दिसे आकाश[1] निर्मळ। सर्व दिशाही निर्मळ १२
शक्राज्ञेनें सर्वा प्रती । देव पाचारायां जाती १३
धर्मचक्र पुढें आहे । चालता जेथ स्थिर राहे १४
तेथेचि ते समवशृति, देव पाहूनि रचिति १५
देवकृत ऐशा परी । चौदा अतिशय धारी १६
सर्व मिळुनि चौतीस, अतिशयाचा विशेष १७

अभंग नं. ५ ( अष्टप्रातिहार्य )

नमु तुज हिरण्यगर्भा तुज प्रातिहार्य शोभा ।

---

१ ' विकाश , असाही पाठ आहे.

अशोकतरू मेघापरी । पाहता शोक जाय दूरी
तदाश्रित तुझें बिंब । मेघाश्रित सूर्य बिंब ॥२॥
वृक्षाखालीं सिंहासन, जडित शोभती ते तीन ३
मध्य सिंहासनावर, तुझे बिंब ते अधर ॥४॥
तिन्ही छत्र माथ्यावरी, शुभ्र पूर्ण चंद्रापरी ॥५॥
दोहि भागी ते निकट, चामॅर ढाळिति चौसट।६।
मुखांतुनि दिव्यध्वनी । प्रकाशित वेदवाणी ७
माथ्यामागें भामंडळ । तेज जैसे सूर्यबाळ ८
पुष्पवृष्टी गगनाहुनी । देव करीती हर्षुनि ९
साढेबाराकोडी वाद्यें । वाजती दुंदुभी आद्य ॥
अष्ट प्रातिहार्या ऐशा । तुज शोभती जिनेशा ।

## अभंग नं. ६ ( अनंतचतुष्टय )

नमु तुज अरहंता । अनंतचतुष्टययुक्ता ॥
अनंत अलोकाश । तो हि दिसे तुज दृष्टीस ॥१॥
ऐसे अनंत दर्शन ॥ तुजलागी झाले पूर्ण ॥२॥
लोकालोक प्रकाशन । भुत भावी वर्तमान ॥३॥
अनंत हे जाणती पूर्ण ॥ ऐसे तूझे अनंत ज्ञान॥४॥

चक्री इंद्र अहमींद्र ॥ भवनवासी धरणेंद्र ॥५।
याहचे सुख सर्वोत्कृष्ट । जरी होती एकवट ।६।
त्याहून तुज एके समयी, अनंत सुख हे निश्चयी
अहमिंद्रादि पुण्यवंत । वीर्यबळ शक्तिवंत ॥ ८॥
याहाच्या ज्या वीर्य शक्ती, जरी एके ठाई होती॥
त्याहूए तुझे अनंत वीर्य, बळ शक्ति महा धैर्य ॥
हे अनंत चतुष्टय । चवतीस अतीशय॥ ११ ॥
अष्ट प्रातिहार्य जाण । एवं सेचाळीस गुण १२
सेचाळीस गुणवंत । अठरा दोषविरहीत १३
महति म्हणे अरहंत । योग्य आहे त्रैलोक्यांत ॥

## सिद्धाचे ८ गुण

### अभंग नं ७

जेव्हां हरे कर्माष्टक । तेव्हां सिद्ध गुणाष्टक ॥
मोहिनीचा क्षय जेव्हां। क्षायिक सम्यक्त्व तेव्हां
ज्ञानावरणीचा क्षय । तेव्हां ज्ञान केवळ होय ।
हरे दर्शनावरणी । तेव्हां केवळ दर्शनी ॥ ३ ॥
अंतरायाचा क्षय होय ।तेव्हां अनंत शक्ति वीर्य

नामकर्म जेव्हां नाशे । निराकार सूक्ष्म भाषे ॥५
आयु विनाश करून । अगाध तो अवगहन ॥
गोत्र क्षयाचे पासून । होय अगुरुलघुगुण ॥७॥
क्षय होय वेदनीचा । तेव्हां अव्याबाध साचा ॥
महति म्हणे अष्ट कर्म । निवारिल्या मुक्तिधाम।

## अभंग नं. ८

निरंजन ज्योतिरूप, भजा सिद्ध चिन्मयरूप ॥
अमुर्तिक निर्विकार; त्रैलोक्याचें माथ्यावर ॥१॥
जेथें छाया माया प्राण, नाहीं इंद्रिय विषय जाण
जेथें नाहीं स्त्री कुटुंब, नाहीं चंद्र सुर्य बिंब ॥२
जेथें नाहीं रात दीन; नाहीं सज्जन दुर्जन ॥४
महति म्हणें ज्याचें ज्ञान, व्यापक त्रिलोकीं संपूर्ण

## आचार्यांचे ३६ गुण

### अभंग नं. ९

भजा आचार्य ते सूरि । तारक ते भवसागरीं
तप पाळिती विशेष । बाह्याभ्यन्तर द्वादश १

आवश्यक षट् प्रकार । पाळिती जे पंचाचार[1] २
धर्म[2] पाळिती दशधा । गुप्ति पाळिती त्या त्रिधा
महति म्हणे हे छत्तीस । आचार्यांचे गुण विशेष

अभंग नं. १० [ बारा प्रकारचें तप ]


मुक्तिचि हे वांछा । अंतरीं धरूनी ।
सद्भक्ति करूनी । तप कीजे ॥ धृ० ॥
प्रायश्चित[1] करी । विनय[2] आदरी ॥
वैयावृत्य[3] करी । सात्विकाचे ॥ १ ॥
स्वाध्याय[4] व्युत्सर्ग[5] । ध्यान[6] मौन्य शुद्ध ॥
तप हे षड्विध । अभ्यंतर ॥
सामायिक[1] आदी । अवमोदर्य[2] दुजे ।
वस्तुसंख्या[3] कीजे । तीसरे हे ॥ २ ॥
रसपरित्याग[4] । योग्य शय्यासन[5] ॥

---

१ पंचाचार- दर्शनाचार, ज्ञानाचार, चारित्राचार, तपाचार आणि वीर्याचार.

२ दशधर्म- उत्तमक्षमा, उत्तम मार्दव, उत्तम आर्जव, उत्तम सत्य, उत्तम शौच उत्तम संयम, उत्तम तप, उत्तम त्याग उत्तम आकिंचन्य आणि उत्तम ब्रह्मचर्य.

# श्री १०८ आ. शांतिसागर महाराज



जन्म शके १७९४ ज्येष्ठ वद्य ६ सोमवार

बालोद्यान प्रेस, पुणें

कायक्लेश जाण । बाह्य तप ॥ ४ ॥
बारा भेद तप । हे यथाशक्तीनें ॥
पाळीजे युक्तीनें महति म्हणे ॥ ५ ॥

अभंग नं. ११ [ षडावश्यक ]

पाळितो जो आवश्यक । तोचि स्वपर तारक ॥
कृतदोष निवारण । प्रतिक्रमण ते जाण १
कायोत्सर्गध्यान धरी । समता सर्व जीवावरी २
एक जिनेश वंदन । सर्व जिनेश स्तवन ३
शुद्धशास्त्र हे पढिजे । तेचि स्वाध्याय म्हणीजे
महति म्हणे हे षड्‌विध । आवश्यकक्रिया शुद्ध

अभंग नं. १२ ( आचार्यांच्या अष्टमातृका )

अष्ट मातृका विख्याता । धर्मचारित्राच्या माता
ईर्यापथाचें शोधन । तेची ईर्यासमिति जाण १
सत्य शुद्ध प्रिय वदति । तेची जाणा भाषासमिति
अंतराययुक्त आहार । ते एषणासमिति सार ३
घेता टाकिता जीव रक्षण । ते आदान निक्षेपण

जीव रक्षुनी मळक्षपना । कारिति ते प्रतिष्ठापना
आत्मचिंतनि मनस्थिती । तेची जाणा मनोगुप्ती
सोहं शब्दांतर्जल्पन । वचोगुप्ती मौन्य धरून
कायबळ आवरिती । तेची जाणा कायगुप्ती
महति म्हणे मालाष्टक । आचार्य पाळिती नीट

## उपाध्यायाचे २५ गुण

### अभंग नं १३

भजा उपाध्याय सदा । पढती पूर्व ते चवदा ॥
आद्य उत्पादपूर्व ते । दुजे अग्रायणीय ते १
तिजे वीर्यानुप्रवाद । तूर्य अस्तिनास्तिप्रवाद २
ज्ञानप्रवाद पांचवें । सत्यप्रवाद सहावें ३
आत्मप्रवाद सातवें । कर्मप्रवाद आठवें ४
प्रत्याख्यानपूर्व नवम । विद्यानुप्रवाद दशम ५
कल्यान ते अकरावें । प्राणवाद ते बारावे ६
क्रियाविशाळ तेरवा । लोकबिंदुसार चवदवा ७
महति म्हणे चौदापूर्व । पढति उपाध्याय सर्व ८

## अभंग नं. १४

पूर्वांप्रति किति ॥ वस्तुवस्तु प्रती ॥ प्राभृतक किति ॥ सांगितों मी ॥ धृ० ॥ दशवस्तु जाणा ॥ उत्पादपूर्वाचे ॥ अग्रायणीयाचे ॥ चतुर्दश ॥१ अष्टवस्तु पूरू ॥ वीर्यानुप्रवाद ॥ अस्तिनास्तिवाद ॥ अठरा हे ॥ २ ॥ द्वादश हे वस्तु ॥ ज्ञानप्रवादाचे ॥ सत्यप्रवादाचे ॥ द्वादश हे । ३ षोडश वस्तु हे ॥ आत्मप्रवादाचे ॥ कर्मप्रवादाचे ॥ विंशति हे ॥ ४ ॥ प्रत्याख्यान पूर्व ॥ तीस वस्तुभेद ॥ विद्यानुप्रवाद ॥ पंचदश ॥५॥ दश दश वस्तु ॥ शेष चतुर्पूर्वे ॥ बेरीज हे सर्व ॥ कारिजे ते ॥ ६ ॥ वस्तु वस्तु प्रती ॥ विंशति विंशति ॥ प्राभृतक होती ॥ प्रत्येक हे ॥ ७ ॥ पंचोन द्विशत ॥ वस्तुचे प्राभृत ॥ होती नवशत ॥ त्रिसहस्त्र ॥ ८ ॥ वस्तु ऐसे नाम ॥ आध्यायाचे जाण ॥ प्राभृतक जाण ॥ प्रकरण ॥ ९ ॥

अंग एकादशं ॥ पूर्व चतुर्दश ॥ गुण पंचवीस पाठकाचे ॥ १० ॥ पंचवीस गुण ॥ धारी उपाध्याय ॥ त्यांचे वंदा पाय ॥ महति म्हणे ॥११।

अभंग नं. १५ [ विनयाष्टक ]

पाळिति जे विनयाष्टक । अंग पूर्वाचे पाठक ॥
देव शास्त्र धर्म गुरु । दर्किद्वृत्त तपधारु १
या अष्टजनाचा विनय । करिति तेची उपाध्याय
विनययुक्त नवधा भक्ति । करिता श्रुतज्ञानशक्ति
महति म्हणे विनयान । सर्व कार्य सिद्ध जाण

अभंग नं. १६

( अष्टविध ज्ञानाचाराचे दृष्टांत )

अष्टविधाचार ज्ञान । पढा गुरूचे पासून ॥
वसुपाळ वर्णहीन । पढता राहिला अज्ञान १
अर्थहीन पढता गर्ग । अग्निकायिक झाला मग

१. १ आचारांग २ सूत्रांग ३ स्थानांग ४ समवायांग ५ व्याख्याप्रज्ञप्ति ६ ज्ञातृकथांग ७ उपासकाध्ययन ८ अंतकृत अंग ९ अनुत्तरांग १० प्रश्नव्याकरणांग ११ विपाकसूत्रांग

शुद्ध पंचमहाव्रत ॥ पाळितानि मुक्ति प्राप्त ॥१
पंच समीति पाळिती भवबंधाते छेदिति ॥ २ ॥
तिन्ही गुप्तिचें रक्षण ॥ मुक्तिसुखाचे कारण ॥३
म्हणे ब्रह्ममहति लोका । धरा चारित्र हे नौका।

अभंग नं. १९ [ साधुसमाधि ]

मरणादिकाचें । भय निवारण ॥
चित्त समाधान । करिजे ते ॥
जरि प्राप्त झाली । मरण अवस्था ॥
न करावी चिंता । आर्तध्यान ॥ १ ॥
जरि ह्या देहासी । उपसर्ग होय ॥
अशुभ उदय । विचारावा ॥ २ ॥
इष्टाचा वियोग । झाला असे जरी ॥
शोक तो अंतरीं । धरूं नये ॥ ३ ॥
सर्वहि मिळाला । अनिष्टाचा संग ॥
तरि मन भंग। करूं नये ॥ ४ ॥
रोगाचे हि आर्त । न आणावें मनीं ॥
चित्त आत्मध्यानीं । लाविजे ते ॥
महति म्हणीतो । ऐसि हे समाधि ॥
साधुचे संबंधीं । राहतसे ॥ ६ ॥

सांडी शब्द अर्थ दोनी। तोची फिरे दुःख योनी
शिवनंदी अवकाळी; पढता मच्छ झाला जळी
विनय सहित पढता, झाला धरशेन ज्ञाता ॥५
नेम विद्यार्थी पाळिला। चित्र कारज पावला ।६
गुरु निंदे कृष्ण देही, स्वेत नंदी झाला पाही।७
विद्या गुरुशीं न मानी, जगि सुनंदा पापिनी ॥
गुरुशक्र कितीं पुढें। ज्ञान महतिसागर पढें

## साधूचे २८ मूळगुण

### अभंग न. १७

अट्ठावीस मूळगुण ॥ पाळिति ते साधु जन ॥
॥ धृ ॥ दृढ महाव्रत पंच ॥ पाळीति समिति
पंच ॥ १ ॥ पंचइंद्रिय नीरोध ॥ सोळावा तो
लोच शुद्ध ॥ २ ॥ षड्विध ते आवश्यक ॥
तेविसावे निर्वस्त्रक ॥ ३ ॥ निस्नान ते भूमिश-
यन ॥ सविसावे अदंतवन ॥ ४ ॥ उभ्या भुक्ति
एक भुक्ति ॥ अट्ठावीस हे गणती ॥ ५ ॥
महति म्हणे उत्तरगुण ॥ लक्ष चवऱ्यासि जाण॥

### अभंग नं. १८

तेरा प्रकारे चारित्र ॥ सुखकारक पवित्र ॥

# अथ पंचपदी

## जिनस्तुति

### अभंग नं. १ ॥ २० ॥

स्मरा स्मरा निशिदिनिरे जिनेश्वर । स्मरा स्मरा निशिदिनिरे जिनेश्वर स्मरा स्मरा ॥ स्मरा स्मरा मनि धरा धरारे जगत्रयाचा धनिरे ॥ जिनेश्वर स्मरा स्मरा० ॥ धृ० ॥ दशविध धर्म ॥ द्वादशधा व्रत । सद्गुण हे पाळुनिरे । जिनेश्वर स्मरास्मरा ॥ १ ॥ पापाश्रवमद । प्रमादमत्सर ॥ अवगुण हे टाळुनिरे । जिनेश्वर स्मरा स्मरा ॥ २ ॥ महती ह्मणीतो । ज्याला ध्याती । हृदयीं गणधर मुनिरे जिनेश्वर स्मरा स्मरा० ॥ ३ ॥ छ ॥ २ ॥

### अभंग नं. २ ॥ २१ ॥

वाजवीता टाळी ॥ संकट हे टाळी दुष्कर्म हि टाळी । जिनराज ॥ धृ । टाळी हेची वाज

। यमावरती गाजे । एकनिष्ठ भजे जिनराज ॥ १ ॥ टाळीचे हे गुण । टळतील विघ्न । पतित पावन ॥ जिनराज ॥ २॥ वाजउनि टाळी । नामाचे कल्लोळी । भजतये मेळी ॥ जिनराज ॥ ३ ॥ गुरुकृपे टाळीची वाजविती । मुका मुखीं प्राण सखा ॥ जिनराज ॥ ४ ॥

अभंग नं. ३ ॥ २२ ॥

॥ जिनजिन ऐसी वाणी । सर्व सुखाचि हे खाणि ॥ करितां जो जिनघोष । त्यासि कैचे पापदोष ॥ १ ॥ निरंतर रात्रंदिन । करी जिन नामस्मरण ॥ २ ॥ तेथें काळा कैचा रिघ । पापाचाहि होय भंग ॥ ३ ॥ कल्याणकीर्ति गुरुराय । जिनभक्ति दावि सोय ॥ ४ ॥ मुका आनाथ हृदयीं । जिनचरण दृढ ध्यायी ॥ ५ ॥

॥ इति जिननामस्मरणभजनफलं ॥

---

* हे महतीसागराच्या गुरुंचें नांव आहे.

॥ अथ जिनसुपास्तुति ॥
[ भक्तामर काव्य १।२ ]
अभंग नं. ४ ॥ ३३ ॥

देवा आदिजिना मजतारीं। दुस्तर या संसारीं ॥ सख्या सख्यारे दुस्तर या संसारीं ॥ स्तुति हेंची तुज जिनकर्मारी ॥ हें भवसंकट हारी ॥ सख्या सख्यारे हें भवसंकट हारी ॥ देवा। भक्ती इंद्रादिक जे तुज वंदीती । तन्नम्रमौलिमणिकांति ॥ सख्यासख्यारे तन्नम्रमौलिमणिकांति ॥ त्वत्पादद्वयीं लज्जित होती ॥ ज्या परिरवीसि दीपककांति ॥ सख्यासख्यारे ज्या परिरवीसि दीपककांति ॥ ॥ देवा ॥ २ ॥

तुझें पादद्वय सुखकारी। दुरितांध निवारी ॥ सख्यासख्यारे दुरितांध निवारी ॥ जैसी नौका भवसागरीं ॥ बुडतां जनांसि तारी ॥ सख्यासख्यारे बुडत्या जनांसि तारी ॥ देवा ॥ सकल शास्त्र ज्ञानेंकरून ॥ बुद्धि ज्यांनी

प्रविन । सख्यासख्यारे बुद्धि ज्याहाची प्रविन॥ ऐशा सुरवरी तूझें स्तवन केलें भाव धरून सख्यासख्यारे केलें भाव धरून ॥ देवा० ३ ॥ तूझें स्तवने अभिष्ट मिळती । त्रिलोकमानस हरती । सख्यासख्यारे त्रिलोकमानस हरती । म्हणुनी स्तवितो ब्रह्ममहती । तुज लागोनी चित्ती । सख्यासख्यारे तुज लागोनी चित्ती ॥ देवा० ॥ ४ ॥

अभंग न. ५ ॥ २४ ॥

[ भ. का. न. ३ ]

तुझे पायी आदि जिना ॥ इंद्रकरीती अर्चना ॥ धृ ॥ तुझी करावया स्तुती ॥ प्रवर्तली माझी मती ॥ १ ॥ जळी जैसे जे बालक ॥ धरु पाहे जैवातृक ॥ २ ॥ तैसा निर्लज्य मी झालो ॥ तुझे स्तवनी प्रवर्तलो ॥ ३ ॥ बुद्धि विना महति वर्णी ॥ लुब्ध झालों तुझें स्तवनीं ॥ ४ ॥ छ ॥

अभंग नं. ६ ॥ २५ ॥ [भ. का. ४]

देवा तुझे गुण अपार ॥ वर्ण वेना ज्याचा पार ॥ जैसे क्षीराब्धिचे जळ ॥ चंद्रकांति पारि उज्वळ ॥ १ ॥ तैसे शूभ गुण वर्णिता ॥ सिनला वाचस्पती वक्ता ॥ २ ॥ ऐसा सिनला सहस्रफणि ॥ तोचि पाताळिचा धनि ॥ ३ ॥ तुझे वर्णावया गुण ॥ ईतराचा पाडकोण ॥४॥ जैसा भुजबळे आर्णव ॥ कोण तरिल मानव ॥ ५ ॥ तैसी तुझी गुण संपत्ति ॥ कैसा वर्णिल महति ॥ ६ ॥ छ ॥

अभंग नं. ७ ॥ २६ ॥[भ. का. ५]

देवा तुझे गुण वर्णिले न जाय ॥ ज्ञानी सुरराय भांबावले ॥ धृ ॥ तुझे भक्तिस्तव मिहि शक्तिहीन ॥ करितो स्तवन ॥ तुझे आतां ॥ १ ॥ जैसा मृग आत्म ॥ शक्ति न विचारी ॥ धावे सिंहावरी ॥ स्वात्मजार्थी ॥ २ ॥ तैसी तुझी

स्तुति ॥ करितो महति न विचारी शक्ति आपु-
ली मी ॥ ३ ॥ छ ॥

[भ. का ६] अभंग नं. ८ ॥ २७ ॥

वीतरागा तुझे गुण शास्त्रज्ञानी ॥ वाग्बळे करोनी । वर्णिताति ॥ धृ ॥ न जानें मी कांहीं ॥ काव्य कळा छंद ॥ सिद्धांताचे भेद ॥ न जाणे मी ॥ १ ॥ ऐसा वाचा हीन ॥ स्तविन मी तुला ॥ परिज्ञानी मला ॥ हसतील ॥२॥ तुझे भक्तिचेनी ॥ फीटे मुकेपण ॥ करिन स्तवन ॥ निश्चयेंसि ॥ ३ ॥ जैशा अम्रकळया। भाक्षिति कोकीळ ॥ बोलति मंजुळ ॥ चैत्रमासिं ॥ ४ ॥ तैसी तुझी भक्ति ॥ हृदयीं व्यापिली ॥ तेन्हेंवाचा झाली ॥ महतिसी ॥ ५ ॥ छ ॥

[भ. का. ७] अभंग नं. ९ ॥ २८ ॥

स्तवतुझा देवा । न लागता क्षण ॥ पापाचें बंधन ॥ दूर करी ॥ धृ० ॥ पृथ्वीजलतेज । आनि चौथे वात । लक्ष सात सात । योनि

होती ॥ १ ॥ लक्ष सातसात निगोद ते दोन्हीं । वनस्पति योनी । दहा लक्ष ॥ २ ॥ तिन्हि विकलेंद्री । दोन दोन लक्ष ॥ चतुर्दशलक्ष । मानवाच्या । ३ । नरकतिर्यंच । तिसरी देवाक्ष॥ चारिचारिलक्ष । गती तिन्हीं ॥ चवऱ्यासिलक्ष । उत्पत्तिचें स्थान ॥ ज्या पापें करून । फिरे जीव ॥ ५ ॥ ऐसे पापघोर ॥ विनाश पावती ॥ करितानि स्तुति । देवा तूझी ॥ ६ ॥ जैसा सूर्योदयी । निशांध निवारी । तैसे पाप हारी ॥ महतिचे ॥ ७ ॥ छ ॥ ९ ॥

[भ. का. ८] अभंग नं. १० ॥ २९ ॥

आरंभिलें म्या स्तवन । हे नाथा । ऐसी महिमा । तुझी जाणून ॥ विख्यात तवगुण हे बरवे ॥ ते अल्पही । मजकडुनिया न वर्णवे ॥ १ ॥ तुझिया प्रभावें करून । स्तुति हे तुझी ॥ करितों मी अल्पबुद्धीनें ॥ २ ॥ पद्म-

१ नित्य, इतर.

दळि जळबिंदु वसे । तो जैसा । सुंदर मुक्ता-
फळापरि दिसे ॥ ३ ॥ तैसे तुझे सद्गुण भावे ।
हे वर्णिता ॥ संताचें चित्तीं ठसावे ॥ ४ ॥
आतां तूं होउनी सहाई । हे आपुले सुंदर गुण
महतीसि वदवी ॥ ५ ॥ छ ॥

अभंग नं. ११ ॥ ३० ॥ ( भ. का. ९ )

वीतरागा तुझें स्तवन । जगिं निर्दोष पावन
॥ धृ ॥ तुझि कथाहि तारक । जगिं पाप-
निवारक ॥ १ ॥ जैसा सूर्य असता दूरी ।
त्याची प्रभा पृथ्वीवरी ॥ २ ॥ तेव्हें पद्मा करी
सकळ ॥ विकाशित होती कमळ ॥ ३ ॥ दूरी
तैसा तुं शिवलोकीं । तूझि कथा तिहि लोकीं ४
तूझे कथने महती । विकासित झाला चित्तीं ५।

अभंग नं १२ ॥ ३१ ॥

(भ. का. १०)

त्रिभुवन भूषण भूतनाथ तुंचि। निजपद
दायक दिससीरे ॥ त्रिभुवन ॥ धृ ॥ विभुति

अर्थि सद्गुणा करुणीजे । स्तविती निशिदिनीं तुजसीरे ॥ त्रिभुवन० ॥ १ ॥ स्तवुनि तुज जरि रिद्धिवंत जे । ते हि न तुलती तुजसीरे ॥ त्रिभुवन ॥ २ ॥ रिद्धिवंत जगिं अनेक झाले । नसें आश्चर्य त्यासिरे ॥ त्रिभुवन ॥ ३ ॥ आश्रितासि जो स्वतुल्य न करी । प्रभुपण काय त्यासीरे ॥ त्रिभुवन ॥ ४ ॥ महति म्हणे निज आश्रितासि तुची । आत्मतुल्यचि करिसीरे ॥ त्रिभुवन ॥ ५ ॥ छ ॥ १२ ॥

अभंग नं. १३ ॥ ३२ ॥

( भ. का. ११ )

तुज पाहुनि जिनेशा । नेत्र पावति संतोषा ॥ धृ ॥ तुज पाहतां दिन रात्री । पाति न लागे ते नेत्री ॥ १ ॥ तुज वीन जन नेत्र ॥ तृप्त न होति अन्यत्र ॥ २ ॥ क्षीराब्धिचे पय पीवुनी। कोण इछे खारे पाणी ॥ ३ ॥ पाहुनियां तुज प्रती ॥ तोष पावला महती ॥ ४ ॥ छ ॥

अभंग नं. १४ ॥ ३३ ॥
भ. का. १२

देवा तुझे रूप । उत्तम हे जैसे ॥ पृथ्वीवरी तैसे दुजे नाहि ॥ धृ ॥ त्रिभुवनामध्यें । उत्कृष्ट जे अनु ॥ तेची परमानु । म्हणविले ॥ १ ॥ ते सौम्य सुंदर । बहु परमानु ॥ मिळवूनी तनु । तुझि झाली ॥ २ ॥ तेन्हे करोनिया । त्रिलोकि तिलक ॥ जालासि तू एक । रूपवन्त ॥ ३ ॥ मध्यमजघन्य । कुश्चिळ जे अनु ॥ तेन्हे जगी तनु । सर्व होती ॥ ४ ॥ ह्मणोनी त्रिलोकी । रूप तुझे सम ॥ न दिसे उत्तम । महति ह्मणे ।५

अभंग नं १५ ॥ ३४ ॥
[ भ. का. १३ ]

जिनराजा तुझी । मुखकांति जैसी ॥ त्रिभुवनीं तैसी । नाहि कोठे ॥ धृ ॥ नृसुरनागाचे हरति ते नेत्र । पाहतां पवित्र । मुख तुझें ।१। त्रिलोक उपमा ॥ संपूर्ण जितुक्या । जिंतिल्या

तितुक्या । तुझें मुखें ॥ २ ॥ तुझें मुखाप्रती । जागीं सर्वोत्तमा । चंद्राचि उपमा । न शोभते ॥ ३ ॥ तुझे मुख कोठे । चंद्राबिंब कोठे । अंतर हे मोठे । दिसतसे ॥ ४ ॥ दिवसा पळस । पात्राचें समान । चंद्र तो मळिन । कळंकानें ॥ ५ ॥ महति म्हाणितो । तुझें मुखा-पुढें उपमा कोणिकडे ॥ चंद्राचि हे ॥ ६ ॥

अभंग नं. १६ ॥ ३५ ॥

( भ. का. १४ )

त्रैलोक्येश्वरनाथ एक तूं त्रिभुवनीं तव गुण विचरतीरे ॥ त्रैलोक्ये० ॥ धृ ॥ समग्रमंडळ चंद्रकळापारि ॥ शुभ्र तुझे गुण शोभतिरे ॥ ॥ त्रैलोक्ये० ॥ १ ॥ तुज मिश्रित जे जागीं संचरति । कोण निवारिल त्या प्रतिरे ॥ त्रैलोक्ये ॥ २ ॥ इष्ट वस्तुपारि सद्गुण तूझें । हृदयीं धरिती महतिरे ॥ त्रैलोक्ये ॥ ४ ॥

अभंग नं. १७ ॥ ३६ ॥

[ भ. का. १५ ]

नवल काय तूचि सत्य निर्विकार योगी ॥ नवल ॥ धृ ॥ सुरांगना करुनि तुझें चित्त नाहि डोलले । किंचितहि न पावले ॥ स्मर विकारमार्गि ॥ नवल ॥ १ ॥ प्रळयकाळिं अनिळ कदापि । क्षुद्रगिरिसि डोलवी ॥ काय मेरु चळ तेवि । स्थीर शाश्वतांगि ॥ नवल ॥२ महति ह्मणे तूचि धन्य । तुजसमान नाहिं अन्य ॥ मेरुतुल्य अचळपने ॥ ध्यानि तनूत्सर्गीं ॥ नवल ॥ ३ ॥ छ १७ ॥

अभंग नं. १८ ॥ ३७ ॥

(भ. का. १६)

जगत्प्रकाशि तुज समान इतर दीप नाहीं ॥ जगत्प्र ॥ धृ ॥ धूम्ररहित दीप तुज न लगे वाति लावणें । न लगे तेल घालणें ॥ पवन वैरी नाहीं ॥ जगत्प्र० ॥ १ ॥ सत्य तूचि दीप

तुझें प्रभेंकरूनि हे समस्त । जगत्रयप्रकाशयुक्त प्रगट दिशा दाही ॥ जगत्प्र ॥ २॥ महति ह्मणे स्वयं ज्योति ॥ तूचि चिदानंद मूर्ति ॥ पाप अंधकाररराति । तुझें ठाईं नाहि ॥

श्री देवगुरुशास्त्रस्तवन.

अभंन नं. १९ ॥ ३८ ॥

जय जय श्रीजिनराज मुखें वदा । पंच महागुरुराज ॥ धृ ॥ क्षणिक जीवित हे शाश्वत नोहे ॥ नेइल तो यमराज ॥ मुखे ॥ १ ॥ पंचमहागुरु नामस्मरण ॥ भवजळीं हेचि जहाज ॥ मुखें ॥ २ ॥ महति ह्मणीतो मुक्ति-सुखाचें । जेने होइल काज ॥ मुखें ॥ ३ ॥

अभंग नं २० ॥ ३९ ॥

गुरुराज माउलीगे । माय माझे गुरुराज माउलि ॥ धृ ॥ धावत धावत लवकर येइ ॥ वत्सालागि माउलि गे ॥ माय माझे ॥ १ ॥ दासाचे नित संकट हारिसि ॥ कारि कृपेचि

साउलि गे ॥ माय माझे गुरु ॥ २ ॥ महति ह्मणे तुम्हा शरण मी आलों ॥ ये उचलित पाउलि गे ॥ माय माझे ॥ ३ ॥

अभंग नं २१ ॥ ४० ॥

श्रीजिनवाणी वाग्वादिनि तूं उत्तम मति मज देयीवो ॥ श्रीजिन० ॥ धृ ॥ वीणा पुस्तक निजकर धारिणी । हंस वाहनीं येइवो ॥ श्रीजिन० ॥ १ ॥ द्वादशांग तुज भूषण शोभति ॥ प्रसन्न तूं मज होइवो ॥ श्रीजिन० ॥ २ ॥ सुरनर पन्नग गणधर मुनि खग ॥ तुजला स्मरती हृदयीं वो ॥ श्रीजिन ॥ ३ ॥ ब्रह्म महति सन्मति वचनार्थी ॥ शरणागत तव पायी वो ॥ श्रीजिन० ॥ ४ ॥

अभंग नं. २२ ॥ ४१ ॥

सद्गुरु तुजला शरण मि आलों मजवरि कारि तूं अनुकंपा ॥ सद्गुरु ॥ धृ ॥ बोधिसमाधी करुनि शुद्ध तूं । नित्ये दर्शसि स्वात्मरूपा

॥ सद्गुरु ॥ १ ॥ आत्मबोध उपलब्धि करून तूं । निमग्न होसी हर्ष कुपां ॥ सद्गुरु ॥ २ ॥ सनूत्सर्ग मन पवन साधुनि ॥ जानसि परम ब्रह्मरूपा ॥ सद्गुरु ॥ ३ ॥ सर्व साधना गुरुपदीं निश्चयि । प्राप्ति होइल शिवरूपा ॥ सद्गुरु ॥ ४ ॥ निश्चय रत्नत्रय साधक तूं । महतिसि तारक पोतरुपा ॥ सद्गुरु ॥ ५ ॥

अभंग नं. २३ ॥ ४२ ॥

सर्व देवाचाही देव ॥ जिनत्रैलोक्याचा राव ॥ १ ॥ नव्हे रेनुका पार्वती ॥ अंगा येऊनी घुमति ॥ २ ॥ नव्हे मुंजा मानविनी ॥ मान घेती जे रूसोनी ॥ ३ ॥ नव्हे गणेश शुंडाचा ॥ नव्हे मारुति पुच्छाचा ॥ ४ ॥ नव्हे खंडोबा भैरव ॥ रौद्र परि नाभी देव ॥ ५ ॥ नव्हे योगिनी चवसट ॥ मद्य मांसासी लंपट ॥ ६॥ सर्व देव येती जाती ॥ पुन्य करुनी सेवक होती ॥ ७॥ जिन पायी चित्त जडे ॥ तेव्हां

सर्व पुण्य घडे ॥ ८ ॥ महति म्हणे धरा मनीं ॥ भजा मोक्षाचा हा धनी ॥ ९ ॥

अभंग नं २४ ॥ ४३ ॥

जरी प्राण्या तूं वांछिसी मोक्ष ॥ तरी श्री जिन मार्गीं लावी लक्ष ॥ १ ॥ सर्व दोषा रहित जिनदेव ॥ त्याची भक्ति तूं करि मन भाव ॥ २ ॥ शुद्ध धर्मादि सत्य पथ दावी ॥ तोचि सद्गुरु लीनपणें सेवी । ३ । अनुकंपा रसान्वित शास्त्र ॥ चित्तिं धरी तूं जिनागम सूत्र ४ जिनभजनि जो संतसमुदाय । शरण होवोनी त्याचे सेवी पाय ॥ ५ ॥ त्यागि हिंसादि पंच पाप थोर । पंचवीस कषाय करी दूर ॥ ६ ॥ मन इंद्रिय निग्रह करी । गुणीजनाचा संग आदरी ॥ ७ ॥ अति सौजन्य धरुनी जनीं । दान तप वैराग्य भावी मनीं ॥ ८ ॥ ब्रह्म महतीसागर बोले । मग प्राण्या तुज मुक्ति माळ घाले ॥ ९ ॥

अभंग नं. २५ ॥ ४४ ॥

जारे जिन पुजसीरे। तरी मनोवांछीत पावसीरे धृ. त्यागुनि दुर्गती। हरुनी वीपत्ती। संपत्ती भोगसीरे ॥ १ ॥ पुण्य उपार्जुनी। पाप निवारुनी। रोग विदारसीरे ॥ २ ॥ मिळउनी कीर्ति। महिमा या जनीं। स्वर्गती लाधसीरे ॥ ३ ॥ महतीसागर। ह्मणे जिनपूजा। तारक तुजसीरे ४

अभंग नं. २६ ॥ ४५ ॥

अहो यारे। श्रावकजनहो यारे ॥ शुद्ध करुनि हृदयारे ॥ धरोनिया विनयारे ॥ एउनि जिन निलयारे ॥ मुक्तिपति जिन वंदन करुनि। जाति अघ विलयारे ॥ अहो यारे ॥ धृ० ॥ आहो कारे ॥ मिथ्यात्वमति निटकारे ॥ जिन-धर्मामृत घिटकारे ॥ मर्ण तजा लटकारे ॥ नेम व्रतासि अटकारे ॥ दानशील तप साधन करुनि दुर्योनिचा सुटकारे ॥ अहो यारे ॥ १ ॥ आहो थारे ॥ जिनस्वरूपि मन थारे ॥ अन्य कुदेव

वृथारे ॥ जानुनिया सुपथारे ॥ त्यागुनिया-
विकथारे ॥ मानसि सारासार विचारुनि ॥
पांहा मुक्तिपथारे ॥ आहो० ॥ २ ॥ आहो
जारे ॥ सद्गतिसि तुम्हि जारे ॥ दृढसमकितासि
भजारे ॥ श्रीजिनदेवपुजारे ॥ सद्गुरु वचनि
भजारे ॥ विषय कषाया सर्वहि वर्जुनि ॥ आत्म
ध्यानि निजारे ॥ आहो यारे ॥ ३ ॥
आहो तारे ॥ श्रीजिन भवजळि तारे ॥ पाळा
समिति व्रतारे ॥ होइल शिववनितारे ॥ ब्रह्म-
महति वदतारे ॥ रघुनाथपुरास्थित शांति-
जिनाधिप ॥ नाशीति दुरितारे ॥ अहो
यारे ॥ ४ ॥

अभंग नं. २७ ॥ ४६ ॥

दृढ ध्यानी जिनेश्वर ॥ मेरु तुल्य राहे स्थिर ॥
॥ घृ ॥ आत्मस्वरूपी हे मन ॥ लावुनिया
धरी मौन ॥ १ ॥ सर्व विकार वर्जुन ॥ करी
आत्म्याचे दर्शन ॥ २ ॥ जाणे आत्मरूपी

खुण ॥ तेची झाले आत्मज्ञान ॥ ३ ॥ आत्म-स्वरूपी मिळाला ॥ आत्मचारित्र लाधला ॥ ४ ॥ महति म्हणे हा निश्चय ॥ आत्मा रत्न त्रय होय ॥ ५ ॥

अभंग नं. २८ ॥ ४७ ॥

तुझे नामे जिनपति ॥ पाप शत्रु दूर होती ॥ धृ ॥ तुज शरण जे येती ॥ भवसिंधू ते तरती ॥ १ तुझे स्तवनी नाशे विष ॥ विघ्न पावती विनाश ॥ २ ॥ नामे टळे पीडाकाळ ॥ शांति पावे दावानळ ॥ ३ ॥ महति म्हणे तुझी स्तुती ॥ नित्य सौख्याचि हे स्थिती ॥४॥

अभंग नं २९ ॥ ४८ ॥

जिननामाचि महिमा मोठी । जिव तरले कोटाकोटी ॥ धृ ॥ नामें अंजना तस्कर झाला मुक्तिचा भ्रतार ॥ १ ॥ नामें सेठ सुदर्शन । सूळी झालें सिंहासन ॥ २ ॥ नामें राय तो श्रीपाल । सिंधु तरीला तत्काळ ॥ ३ ॥ नामे

रामचंद्र राणी । अग्निकुंड झालें पाणी ॥ ४ ॥
नामें तरले बहुत । नाहीं त्याहीची गणीत ।५।
ऐसे जाणोनीया घरी । जिननाम हें अंतरीं ।६।
महति ह्मणे जिनाजिन। नित्य राहो हेंचि ध्यान ७

अभंग नं. ३० ॥४९॥

जिन जिन जिन जिन तीर्थेशा ।
वीतरागा परमेशा ॥ १० ॥
जिनराजा जय जिनराजा ॥
प्राणसख्या श्रीजिनराजा ॥ १० ॥
जिन जिन जिन जिन भजा वाणी ॥
पातकाची होईल धुनी ॥ १० ॥
जिन जिन जिन जिन भजा वाचे ॥
सार्थक होईल जन्माचे ॥ १० ॥
जिन जिन जिन जिन ऐसे भजन ॥
झाले महतीसी पावन ॥ १० ॥

सूचना— एक एक चरण दहा दहा वेळ ह्मणून नृत्य करावें.

## दानमाहात्म्यवर्णन

अभंग नं. १ ॥ ५० ॥

त्रिविध पात्रासी । दान जे करिती ॥ फल ते भोगिती । त्रिविध हे ॥ उत्तम पात्रासि । जरि दान देती ॥ सुखते भोगिती । तिन पल्ल्य ॥ १ ॥ मध्यम पात्रासी । करिति जे दान ॥ तया पल्ल्य दोन ॥ सुख होय ॥ २ ॥ दान जे करिति । जघन्य पात्रासी ॥ सुखते तयासी एक पल्ल्य ॥ ३ भोगोनिया सुख । हे भोग सुमीचे ॥ मग ते स्वर्गीचें । सुख होय ॥ ४ ॥ कुपात्र दानाने । कुभोग सुमीते ॥ घडे मान वातें । महति म्हणे ॥ ५ ॥

अभंग नं. २ ॥ ५१ ॥

दान देति सुपात्रासी । सुष्टभोगभूमि त्यासि ॥ धृ ॥ कल्पतरु घरोघर । दश प्रकारें उदार ॥ १ ॥ महासुख ते भोगिती । दुःख कदां न जाणती ॥ २ ॥ होय स्वर्गाचि संपदा । तेथें न

मिळे आपदा ॥ ३ ॥ महति ह्मणे हे उत्तमा । ऐशी दानाचि महिमा ॥ ४ ॥

अभंग नं. ३ ॥ ५२ ॥

धन्य धन्य ते सुपात्र । धन्य दाता तो पवित्र ॥धृ॥ अठ्ठाविस मूळगुण । तप धर्म रत्न तीन ॥ १ ॥ याचे करी जो पाळन । तेचि सत्पात्र पावन ॥ २ ॥ अलुब्धता श्रद्धा भक्ति । ज्ञान दया शांति शक्ति ॥ ३ ॥ सप्त गुण हे ज्याचे अंगीं । तोचि सुष्ट दाता जगीं ॥ ४ ॥ ऐसे दातृ पात्र दान । पंचाश्चर्यांचें कारण ॥ ५ ॥ महति ह्मणे सत्पात्राचि । धन्य धन्य माहिमा साची ॥ ६ ॥

## स्वर्गवर्णन

अभंग नं. १ ॥ ५३ ॥

सुख आनत स्वर्गींतो । देव होवोनी भोगीतो

---

१. १० वे महाशुक्र १२ वे सहस्रार, १५ वे आरण, या स्वर्गांतील थोडें कमजास्त अशाच प्रकारें वर्णन असल्यामुळें तीन अभंग छापले नाहींत.

।धृ। सप्तधातु विवर्जित । काया साडेतीन हस्त ॥१॥ वीससागर आयुष्य। शुक्ल लेश्या ते विशेष ॥ २ ॥ पक्ष होती जेव्हां वीस तेव्हां घेतसे उच्छवास ॥ ३ ॥ विससहस्त्र वत्सर । झाल्या मानस आहार ॥ ४ ॥ अवधि विक्रीया सहित । बळ रिद्धि सिद्धि प्राप्त ॥ ५ ॥ महती म्हणे धर्म फल । सुख होय हे सकळ ॥ ६ ॥

अभंग नं. २ ॥ ५४ ॥

सोळावें स्वर्गीं सुखखाणीं । देव भोगीतो विमानीं ॥ धृ ॥ आयु बावीस सागर। तीन हस्त ते शरीर॥ १ ॥ वर्ष बावीस हजार झाल्या मानस आहार ॥ २ ॥ पक्ष झालिया बावीस । घेतो किंचित उच्छवास ॥ ३ ॥ भोग मानसिक नीट । शुक्ल लेश्या ते उत्कृष्ट ॥ ४ ॥ अवधि विक्रिया सहित । षष्ठ नरक पर्यंत ॥ ५ ॥ महति म्हणे धर्म सार । ऐसा सुखाचा दातार ॥ ६ ॥

अभंग नं. ३ ॥ ५५ ॥

ग्रैवेयकं[1] उपरीम । भोगदिव्र सुखा श्रम ॥ धृ ॥
एकतीस अब्धिस्थिती । तनु द्विहस्त उन्नती
॥ १ ॥ पक्ष होती एकतीस । तेव्हां घेतसे
उच्छ्वास ॥ २ ॥ वर्ष एकतीस हजार । झाल्या
मानस आहार ॥ ३ ॥ तेज विक्रीया अवधी ।
पावे बळ रिद्धि सिद्धि ॥ ४ ॥ सदोदित ब्रम्ह-
चारी । सुख भोगी निरंतरी ॥ ५ ॥ महती
म्हणे ऐसे सुख ॥ तपो बळाने सन्मुख ॥ ६ ॥

अभंग नं. ४ ॥ ५२ ॥

( सर्वार्थसिद्धि[2] )

सुख सर्वार्थ सिद्धिचे । भोगी अहमींद्रपदाचे
॥ धृ ॥ आयु तेत्तीस सागर । हस्त उन्नत

---

१. आद्य व मध्य ग्रैवेयकाचें पूर्ण सुख अशाच प्रकारचें, थोडे कमजास्त, असल्यामुळें दोन अभंग छापले नाहींत.

२. विजय, वैजयंत, जयंत, अपराजित, या चार विमानांतील अहमींद्राचें वर्णन साधारण असेच असल्यामुळें चार अभंग छापले नाहींत.

शरीर ।१। पक्ष झालिया तेत्तीस। घेतो किंचित उच्छ्वास ।२। वर्ष तेत्तीस हजार । झाल्या मानस आहार ।३। प्रविचार विवर्जित ब्रह्मचारी सदोदित ।४। बल तेज विक्रियायुक्त। अवधि लोकनाडिगत । ५ । रत्नत्रयानें महती । अहमिंद्राची विभूति ॥ ६ ॥

## पंचकल्याणिकवर्णन.

अभंग नं. १ ॥ ५६ ॥

स्वामि सोळा स्वप्न रात्रिं । पाहिलें म्यां आज नेत्रीं ॥धृ॥ गजेंद्र वृषभसिंह । लक्ष्मी स्नानाचा उत्साह ॥१॥ पुष्पाचिया माळायुग्म । चंद्रसूर्य मत्स्य-युग्म॥२॥ जळपूर्णकुंभ दोन। सर सिंधु सिंहासन ॥३॥ देवविमान पाताळ। रत्नराशि अग्निज्वाळ ॥ ४ ॥ सोळा स्वप्न हें पाहुनी । गज प्रवेशला वदनीं ॥ ५ ॥ सर्व स्वप्नाची फळश्रुती । राजा सांगे राणीप्रती ॥ ६ ॥ तुझे उदरीं तीर्थंकर । होइल मुक्तीचा भर्तार ॥७॥ म्हणे महती ब्रम्ह-चारी । तोचि तारु भव सागरीं ॥ ८ ॥

अभंग नं. २ ॥ ३७ ॥

छप्पन कुमारी सेवीति । तीर्थंकर माते प्रती ॥ धृ ॥ कोन्ही झाडीती आंगण । कोन्ही सडा-सारवण ॥ १ ॥ कोन्ही देती दातवन । कोन्ही न्हानिति जळान ॥ २ ॥ कोन्ही देती त्या तांबुळ । कोन्ही आणती त्या जळ ॥ ३ ॥ कोन्ही दळति कांडति । कोन्ही भांडे वस्त्र धूति ॥ ४ ॥ कोन्ही रांधिति प्रकार । कोन्ही घाली अलंकार ॥ ५ ॥ कोन्ही छत्र धरिती शिरीं । कोन्ही ढाळती चवरी ॥ ६ ॥ जिन मातेस जागवी । कथा सांगुनिया देवी ॥ ७ ॥ कोन्ही मंगळिक गाति । कोन्ही काव्यार्थ पुसति । ८। महति म्हणे नवमास । पूर्ण झाले त्या गर्भास ॥ ९ ॥

॥ भजन ॥

जिनराज गर्भि आला। आनंदें जय जय बोला ॥ जय बोला आदीश्वर । स्वामीचा जय ॥

अर्हत्परमेष्ठि स्मरण । जय जय श्रीजिनराज ॥

( तीर्थंकर मातेचा स्त्रियांस उपदेश )

॥ अभंग नं. ४ ॥ ५९ ॥

संसाराची रीती सार तुम्ही ऐका ॥ आचरी बायका तेची धन्य ॥ धृ ॥ झाडीगे अंगीचें मीपण तूंपण ॥ कर्मांसि झाडून दूर टाकी ॥ १ ॥ टाकोनी गर्वांसि मनिं शांति धरा ॥ सांडि व्यभिचारा शुद्ध होई ॥ २ ॥ अंतर सारवी देहकरि शुद्ध ॥ मनांतील क्रोध घासोनीया ॥ ३ ॥ कपट बीजांसि दळून टाकजे ॥ कांडण कांडिजे द्वैत धान ॥ ४ ॥ ऐशा घराचारा जे नार वर्तली ॥ बुडता तरली भव कूपीं ॥ ५ ॥ महती म्हणीतो ऐसी नारवर्ती ॥ त्याहिचीच कीर्ती दिगंतरीं ॥ ६ ॥

अभंग नं. ३ ॥ ५८ ॥

इंद्राचे मुकुट लवले । सिंहासन कंपित झाले ॥
जिन जन्म जाणुनि सर्व । उत्सवास सुरपति आले ।

।इं.धृ। इंद्राचें आज्ञें करून। शचिने कृत्रिम बाळा
ठेउनी माते पासीं । घेऊनी उत्तम बाळा ॥
आणूनि इंद्राहातीं । दिधले ते सुकुमाळ ॥
कुंजरारूढ तो इंद्र। घेऊनि अंकित बाळ ॥इं. १॥
नेऊनि मेरु शिखरीं । पांडूका शीळे उपरी ॥
बाळक स्थापुनि मग ते । जाऊनि क्षिरसागरीं॥
अष्टाधिक सहस्र एक। कळशासि भरोनि वारी॥
आणुनि बाळा वरितें। ढाळिती इंद्र स्वकरीं॥इं.२
विधियुक्त न्हवन करोनि ।श्रृंगारुनि बाळक
पुजिले ॥ अतिशय बाळपणीचे। दशगुण करुनि
स्तविले ॥ आणूनी बाळक मग ते। जननीं
जवळी दिधले ॥ नृत्य कळा महति करोनि
स्वस्थानीं सुरपती गेले ॥ इंद्राचे॥ ३ ॥

नं. ॥ ५ ॥ ६० ॥ ( पाळणा )

जो जो जो जो रे जिनपती। निजबाळा
निगुती। निद्रा लागूं दे ।स्वरूपी। धरुनी
ध्यानस्थिती ॥ जो जो ॥ धृ ॥ आदी षण्मास।

धनदान । इंद्राचे आज्ञान । जन्म नगरीते । रचीली । द्वादश योजन । जो जो ॥ १ घेउनि इंद्राचा । आदेश । करोनि साहस । श्यादिक षट्देवी । त्या आल्या । गर्भ शोधायास । जो जो ॥ २ ॥ आदि गर्भाचे । षण्मास । पुढे नव. मास । रत्नादिक वृष्टि । आंगणी । त्रिकाळि विशेष । जो जो ॥ ३ ॥ पश्चिम रात्रीतें । मातेसी । सोळा स्वप्न जाले । तीर्थंकर स्वामी । जननीचे । जठरी संचरीलें । जो जो ॥ ४ ॥ छप्पन कूमारी । मातेसी । बहुधा सेवा करिती । जाले नवमास । संपूर्ण । जन्मला जिनपती । जो जो ॥ ५ ॥ इंद्रादिक देव । जाणोनि ऐरावत । घेऊनी । आले जन्मपुरीं । लागोनि । शचि धाडिली सदानें । जो जो ॥ ६ ॥ मोहनी मातेसी । घालोनी । बाळक उचलोनी । शचिनें इंद्राचे । जवळी । दीधले आणोनी । जो जो ॥ ७ ॥ इंद्र हस्तिवरी । बसऊनी । मेरू शिखरीं नेले । जन्मा-

भिषेक । करोनि । बाळक आणिले । जो जो ॥ ८ ॥ जवळी जननीचे । बाळक। देवोनी कव-तुक । इंद्र गेलासे । स्वर्गासी । करोनी नाटक। जो जो ॥ ९ ॥ पाळना आनला । शिल्पान । कुशळत्व करून । सुवर्ण पाठाचा । संपूर्ण । जाडिले पंचरत्न । जो जो ॥ १० ॥ च्याऱ्ही कळश । माचवे । वैडुर्याचे बरवे । पाठ्यावर मोर । सोडिले । सारस हंस नवे । जो जो ॥ ११ ॥ इंद्र नीळाच्या । दांडिया । सुवर्ण साकळिया । पाळणा लांबविला मंदीरी । तेंजे लोपे सूर्यां । जो जो ॥ १२ ॥ चंद्रोपक बरतां। जरतारी । मोत्याची झालरी । खेळणे बांधिले । साजिरें । पाळण्या ऊपरीं । जो जो ॥ १३ ॥ बाळा अंगीचे । वसन । नाना परिभूषण । तेज फाकले । विस्तीर्ण । लोपे सूर्य किरण । जो जो ॥ १४ ॥ बाळक पाळणी । पहुडले । यश विस्तारीलें । एउनि खगवनिता । देवता । बाळक

वंदिलें जो जो ॥ १५ ॥ सुवर्ण सूत्राची । ते दोरी । घेउनियां करी । बाळा हलविती । कुमारी । मुग्धा प्रौढा नारी । जो जो । १६ । गाउनियां गीत । युवती । आळी पुरवीति । पाहुन मातेसी । आनंद । होत असे चित्तीं ॥ जो जो ॥ १७ ॥ जिनवर पाळणा । जे गाती । तया पुत्र प्राप्ती । निश्चयि होईल ॥ मंगळ । वदतो ब्रह्ममहति । जो जो ॥ १८ ॥ इति पाळणा समाप्त ॥

अंभग नं.६ ॥ ६२ ॥

छकडक बचड कच कडवो । माझ छकडक बचड छकड ॥ धृ ॥ मळमुत्र रहीत तनु कोमल ज्याची । त्रिभुवनि हे बहु सुगडवो । माझ छकडक ॥ १ ॥ अंगुष्ट चोखितो बाळक तान । होय उतान उबडवो । माझ छकडक ॥ २ ॥ क्षण रांगे क्षण बसुनी रमतो । क्षण एक हार्षित मुखडवो माझ छकडक ॥ ३ ॥ देव कुमारां संगे रमतो । क्षण वस्त्र क्षण उघडवो ।

एक पडतो । पाउल टाके लंगडावो । माझ छकडक ॥ ५ ॥ जन वल्लभ हित कारक वचन । बाळक बोले बुबडवो । माझ छकडक ॥ ६ ॥ वज्र वृषभ नाराच शरीरहि । समचतुस्र रुपडवो । माझ छकडक. ॥ ७ ॥ दश आतिशय युत उद्‌भवताचि । अनंत बळ हें भोढवो । माझ छकडक ॥ ८ ॥ महति म्हणे जिनमाता बाळक । लाडवी घेउनि मुकडवो । माझ छकडक ॥ ९ ॥

॥ भजन ॥

जिनराज हा उद्भवला । आनंदे जय जय बोला जय बोला आदिनाथ स्वामी की जय ॥ अर्हत्परमेष्टि स्मरण ॥ जय जय श्री जिन राज ॥ २ ॥

अभंग नं. ७ ॥ ६२ ॥ ( चक्रीवर्णन )

नृपाचा हा धर्म । क्षेत्राचे रक्षण ॥ शत्रुचे खंडन ॥ करिजे तें ॥ धृ ॥ दुष्टाचा निग्रह । सुष्टाचे पाळन ॥ पाप निर्दाळन । करितें जें ॥ १ ॥

संग्रामाचें ठाईं । न सरति मागें ॥ वचनाचा भंग । न करिती ॥ २ ॥ ऐसि या नीतीनें । प्रजासि रक्षिती ॥ धर्मी ते नृपती । महति म्हणे ॥ ३ ॥

अभंग नं.८ ॥ ६४ ॥

पृथ्वी साधोनिया ॥ प्रभु आला जेव्हां ॥ आनंदीला तेव्हां नगरलोक ॥ धृ ॥ गुढ्या उभारील्या सर्व घरोघरीं । तोरण ते द्वारीं ॥ बांधियेलें ॥ १ ॥ आनंदाचीं वाद्यें ॥ बहूत वाजती ॥ वस्त्रादिक देती ॥ याचकासी ॥ २ ॥ महति ह्मणितो ॥ सकळ जनाची ॥ धर्मावरी रुची ॥ जाली असे ॥ ३ ॥

अभंग नं.९ ॥ ६५ ॥ ( चाक्रिवैभव )

नव निधान संपदा ॥ चक्रवर्ती भोगी सदा ॥ धृ ॥ वस्त्र देतो पद्मनिधी ॥ स्वर्ण देतो शंख निधी ॥ १ ॥ जैसा काळ तैसी वाद्यें ॥ काळनिधी देतो साद्ये ॥ २ ॥ महाकाळनिधी पूर्ण ॥

देतो विविध भाजन ॥ ३ ॥ शय्यासन मंदिरादी । देतो नैसर्पाख्य निधी ॥ ४ ॥ मानवाख्य निधी शस्त्र ॥ देतो आयुध विचित्र ॥ ५ ॥ पिंगलाख्य निधीपूर्ण ॥ देतो दिव्य आभारण ॥ ६ ॥ सर्व रत्नाख्य निधान ॥ देतो माणीकादी रत्न ॥ ७ ॥ अष्टादशं धान्यादिक ॥ देतो निधी तो पांडुक ॥ ८ ॥ महति म्हणे नव निधी ॥ चक्रवर्तीचे संबंधी ॥ ९ ॥

अभंग नं.१० ॥ ६६ ॥

षट् खंड पृथ्वीचा । राजा चक्रवर्ती । तयाची संपत्ती थोर असे ॥ धृ ॥ ज्याचे गज शेना ॥ लक्ष चवऱ्यांसी ॥ रथ चवऱ्यांसी लक्ष होती ॥ १ ॥ तुरंग जयाचें । अष्टादश कोटी ॥ चवऱ्यांसी कोटि पायदळ ॥ २ ॥ आदी संहनन ॥ प्रथम संस्थान ॥ वपु स्वर्ण वर्ण ॥ ज्याची असे

१- पांडुक हा निधी जाण । देतो विविध भोजन ॥ असाही पाठ आहे.

॥ ३ ॥ बत्तीस सहस्त्र ॥ कुळवंती भार्या ॥ म्लेंछात्मज भार्या ॥ तितुक्याची ॥ ४ ॥ खगा-त्मज स्त्रीया। बत्तीस सहस्त्र ॥ शान्नव सहस्त्र ॥ सर्व स्त्रिया ॥ ५ ॥ देश सर्व जाणा ॥ बत्तीस हजार ॥ पुर बाहात्तर ॥ सहस्त्र ॥ ६ ॥ शहा-न्नव कोटि ॥ ग्राम ते मोजावे ॥ छप्पन जाणावे ॥ अंतर्द्वीप ॥ ७ ॥ द्रोण मुख्य जाणा ॥ एकोन पन्नास ॥ सहस्त्र संख्यास गणी जेते ॥ ८ ॥ पत्तन सहस्त्र ॥ ते आठ्ठे चाळीस ॥ सहस्त्र षोडश खेट असति ॥ ९ चवदा सहस्त्र ॥ संवा हन जान ॥ रंधन भाजन कोटी । एक ॥ १० ॥ गोकुळ कळप ॥ जाणा तीन कोटी ॥ एक लक्ष कोटी ॥ हल जाणा ॥ ११ ॥ कुक्षी वास जाणा ॥ सप्त शत सार ॥ सवीस हजार ॥ रत्नाकर ॥ १२ ॥ दुर्गाटवी जाणा ॥ अठ्ठाविस हजार ॥ आठरा हजार ॥ म्लेंछ राजा ॥ १३ ॥ गन बद्ध देव ॥ रत्नादि रक्षक ॥ सोळासहस्त्रकगणिजेते

॥ १४ ॥ मुकुट बंधते ॥ क्षिति पति सर्व ॥ बत्तीस हजार ओळंगनी ॥ १५ ॥ दिनप्रती नित्य ॥ ज्याचे घरीं अन्न ॥ चार कोटी मन ॥ लागतसे ॥ १६ ॥ लवन ते नित्य दश लक्ष मण ॥ लागे प्रतीदीन ॥ ज्याच घरीं ॥ १७ ॥ चक्राधिपतीची ऐसि ही विभूती ॥ वदतो महती संक्षेपे हे ॥ १८ ॥

अभंग नं. ११ । ६७ । [ श्रीनेमिनाथ वर्णन ]

त्रिजगीं एक बळी । नेमी तूंची ॥ धृ ॥ क्रिडा करितां सकळ स्त्रीयांशी । आणिली हारी जळीं । ॥ नेमी० ॥ १ ॥ नाग शय्यासनीं धनु टंकारुनि । फुंकिली शंख नळी ॥ नेमी० ॥ २ ॥ क्रोध कराया कारण तुजसी । कोणी केली सळी ॥ नेमी० ॥ ३ ॥ चाल तूं निजगृहीं तारीं तूं आम्हां या संसारजळीं ॥ नेमी० ॥ ४ ॥ महति म्हाणितो यापरी नेमिसी । स्तावितो कृष्ण बळी ॥ नेमी तूंची ॥ ५ ॥

## अभंग नं. १२ ॥ ६८ ॥

निर्बळी तो बळकरी बळिष्टासी। पावे मरणासी ॥ तात्काळ तो ॥ धृ ॥ जैसी सिंहावरी धावे ती हरिणी ॥ तात्काळ ती हानी होय तिची ॥ १ ॥ जैसा मंडुक हा सर्पावरी धावे ॥ मरणासी पावे तात्काळ तो ॥ २ ॥ वैरी जो बलाढ्य तयासी प्रसिद्ध ॥ सोडावा विरोध महति म्हणे ॥ ३ ॥

## अभंग नं. १३ ॥ ६९ ॥

चालिला नेमिराय ॥ परणावया ॥ धृ ॥ सुरनर किन्नर आणि विद्याधर । आले सर्वही राय ॥ परणाव० ॥ १ ॥ बहुविध वाद्ये आंगनीं वाजती । सुस्वर किन्नरी गाय ॥ परणा० ॥ २ ॥ समुद्रविजय कुलभूषण शोभे । सुरवर वंदिती पाय ॥ ३ ॥ परणा० ॥ माथा मुकुट करी कंकन शोभे । सुंदर सावळी काय ॥ परणा० ॥ ४ ॥ गुणभूषणांकित त्रिजगीं सुंदर । महतिसी

सुखदाय ॥ परणा० ॥ ५ ॥

अभंग नं. १४ ॥ ७० ॥

महावीरबल–वर्णन

ज्याची अनंत हे बाळपणी शक्ती ॥ तयासी वंदिती शत इंद्र ॥ धृ ॥ एका कळसाचे धारे करोनीया ॥ जाति वाहोनीया पर्वत हे ॥ १ ॥ ऐशा धारा आठ अधिक हजार ॥ साहे जिनेश्वर जन्मताची ।२। तीर्थंकर सत्य तिन्हि लोकीं वळी ॥ वंदावा त्रिकाळीं महति म्हणे ॥ ३ ॥

अभंग नं. १५ ॥ ७१ ॥

बाराअनुप्रेक्षा

अनुप्रेक्षेचें चिंतन ॥ दृढवैराग्यकारण ॥ धृ ॥ स्वात्मस्वरूप हे नित्य ॥ सर्व देहादि अनित्य ॥ १ ॥ जिन धर्म गुरुविन ॥ सर्व अशरण्य जाण ।२॥ पंचप्रकारे संसार ॥ चतुर्गति दुःखाकार ॥ ३ ॥ कर्ता भोक्ता एकलाचि ॥ अन्य देहादिक हेचि ॥ ४ ॥ देह अशुचि हे जाण ॥

आश्रव पापाचें कारण ॥ ५ ॥ संवररुंधि पाप द्वारा ॥ तोडी कर्मासि निर्जरा ॥ ६ ॥ लोक सुखदुःखस्थान॥ दुर्लभ रत्नत्रय जाण ॥ ७ ॥ धर्म वांछित देणार ॥ म्हणे महतिसागर ॥ ८॥

अभंग नं १६ ॥ ७२ ॥

अध्रुवानुप्रेक्षा

आयुष्य इंद्रिय शरीर यौवन । कुटुंबादि धन अनित्य हे ॥ धृ० ॥ जैसे काग नेत्र आणि विद्युल्लता न धरी स्थिरता क्षणभरी ॥ १ ॥ जेवी गजकर्ण उदक लहरी । स्थिर क्षणभरी न राहे ते ॥ २ ॥ तैसे इंद्रचक्री । खग हळ धर ॥ याहाचे शरिर । न राहिले ॥ ३ ॥ ऐसे देहादिक जाणोनि अनित्य ॥ भजा मुक्ति नित्य महति म्हणे ॥ ४ ॥

अभंग नं.१७ ॥ ७३ ॥

एकत्वानुप्रेक्षा

प्राणि एकलाचि अंतीं । कोणी न येति सांगाती

॥ धृ ॥ एकलाचि पापसंगीं । दुर्गतिचें दुःख भोगी ॥ १ ॥ एकलाचि पुण्य करी ॥ स्वर्ग-सुखासी आदरी । २ । एकलाची कर्म तोडी । मुक्ति सुखालागीं जोडी ॥ ३ ॥ महति ह्मणे जिवा-प्रति । पाप पुण्य हे सांगाती ॥ ४ ॥

अभंग नं. १८ ॥ ७४ ॥

अशुच्यनुप्रेक्षा

अपवित्र हें शरीर । सप्त धातुचे असार ॥ धृ० ॥ अस्थी शीरा मांस रक्त । चर्मा करोनि वेष्ठीत ॥ १ ॥ रोम रेत सप्त धातु । सर्व अमंगळ वस्तु ॥ २ ॥ मळ मुत्राचे कोठार सर्व रोगांचे मंदीर ॥ ३ ॥ महति ह्मणे हे विचारी । सदां भज मुक्ति नारी ॥ ४ ॥

अभंग नं. १९ ॥ ७५ ॥

आश्रवानुप्रेक्षा

पाप कर्मांचें हे कारण आश्रव । जोडोनिया जीव दुःख भोगी ॥ धृ ॥ पंच हें मिथ्यात्व

बारा अविरती । दुःख दायी होती, जीवा-सीया ॥ १ ॥ योग हे पंधरा आणि पंच-वीस । कषाय, विशेष दुःख देती ॥ २ ॥ महति ह्मणीतो, द्वार सत्तावन । चारित्र तपान, निरोधावें ॥ ३ ॥

अभंग नं. २० ॥ ७६ ॥

निर्जरानुप्रेक्षा

कर्माची निर्जरा संसार तारक । दुष्कर्म हारक मुक्तिहेतु ॥ धृ ॥ अनुप्रेक्षा बारा चिंतुनीया मनीं । बावीस जिंकुनि, परीषह ॥ १ ॥ दश-विध धर्म चारित्र हे तेरा । पाळोनि निर्जरा, होत असे ॥ २ ॥ महति ह्मणतो, कर्माची निर्जरा । मोक्षाचें मंदीरा नेत असे ॥ ३ ॥

अभंग नं.२१ ॥ ७७

लोकानुप्रेक्षा

त्रैलोक्य हा नित्य, षड् द्रव्य भरीत । सुख दुःख युक्त, अनादी हा ॥ धृ ॥ अधोलोकीं पापी दुःख

तें भोगीती । सप्त श्वभ्राप्रति जावोनींया । १ ॥ मध्यलोकीं पुण्यपाप आचरोनी । सुखदुःख दोन्ही, भोगी जीव ॥ २ ॥ उर्ध्वलोकीं सुख, पुण्य आचरोनी । स्वर्गासी जावोनी, भोगी जीव ॥ ३ ॥ त्रैलोक्याचे माथा, मुक्तिचें हें स्थान । भजावे भक्तींनें महति म्हणें ॥ ४ ॥

अभंग नं.२२ ॥ ७८ ॥

जगत्प्रियाचा वियोग । होय दुःखाचा संयोग ॥ धृ. ॥ कोमाविले जनक मुख । माते लागीं जालें दुःख ॥ १ ॥ हा हा करुनी युवती । अंग भुवरी टाकिती ॥ २ ॥ नाना विलाप करून । शोक करिती सज्जन ॥ ३ ॥ शोक पाहोनयिा तंवे । संबोधिलें जिनराये ॥ ४ ॥ महति म्हणें वियोगाचें । दुःख सोसवेना साचे ॥ ५ ॥

अभंग नं.२३ ॥ ७९ ॥

धन्य धन्य जिनपती । तुज त्रिलोक वंदीति

॥ धृ ॥ धन्य धन्य वीतरागा । चित्तिं धरिलें वैरागा ॥ १ ॥ तुझि सेवा जे करीति । त्याचें पाप न राहाती ॥ २ ॥ महति ह्मणे तूजाविण । नाहिं त्रिलोकीं तारण ॥ ३ ॥

भजन नं. २४ ॥ ८० ॥

जिनराज दीक्षित झाला । आनंदें जय जय बोला ॥ १० ॥ अर्हत्परमेष्ठिस्मरण । जय जय श्री जिनराज ॥ ३ ॥

शार्दूल वि० नं. २५ ॥ ८१ ॥

आयुच्या तिनि सातवे प्रकृतिही छत्तीस त्या नव्हवे। दाहावे गुणिं सूक्ष्म लोभ हरुनी सोळाहि त्या बारवे ॥ ऐशा ह्या प्रकृती त्रिषष्टी हनुनी आरूढला तेरवे ॥ दोषाष्टादश बेगळा जिनपती जाला तदा वैभवें ॥ १०२ ॥

भजन नं. २५ ॥ ८२ ॥

जिनराज केवळि जाला । आनंदें जय जय बोला ॥ १० ॥ जय बोला आदिनाथ स्वामाची

जय । अर्हत्परमेष्टिस्मरण ॥ जय जय श्रीजिनराज ॥ ४ ॥

## अभंग नं. २६ ॥ ८३ ॥

( वृषभनाथाचें समवशरणांतील मुनिसंख्या )

वृषभ जिनाचे समवशरणीं ॥ गणधरज्ञानी, चवऱ्यासी ॥ धृ ॥ पन्नासाधिक सत्तेताळीशत ॥ इतुके प्रमित पूर्वधर ॥ १ ॥ पन्नासाधिक एकेताळीशत । शिक्षकगणीत ॥ जानिजे हें ॥ २ ॥ अवधिज्ञानी, तें ॥ नवचि हजार ॥ विंशति हजार ॥ केवळि ते ॥ ३ ॥ षट्शत आगळे ॥ विंशति हजार ॥ वैक्रियकसार ॥ मुनिजन ॥ ४ ॥ द्वादश सहस्त्र, सातशे पन्नास ॥ मनःपर्ययास ॥ गणि जे ते ॥ ५ ॥ इतुकेची जाणा वादीहि केवळी ॥ अंतःकृत्केवळी ॥ शत असति ॥ ६ ॥ संतत केवळी ॥ जाणा चवऱ्यासी ॥ मेळ चवऱ्यासी ॥ सहस्त्र हा ॥ ७ ॥ आर्जिकांची संख्या ॥ साढे तीन लक्ष ॥ जाणावि

प्रतक्ष ॥ सर्व मेळी ॥ ८ ॥ श्रावकाचि संख्या ॥ आहे तीन लक्ष ॥ जाणा पंचलक्ष ॥ श्राविका त्या ॥ ९ ॥ समवशरणीं ॥ ऐसी हे विभुति ॥ वाछितो महती ॥ ब्रह्मचारी ॥ १० ॥

॥ छंद वसंत तिलका ॥

लक्षैक पूर्व त्ररि देश त्रिशारिताची ॥ ते एकमास उरली स्थिति आयुष्याची ॥ केले विसर्जन तदा समवसृतीला ॥ कैलासमाद्रिरित्ररी वृषभेश गेला ॥ १३४ ॥

( १महावीराचे समवशरणांतलि मुनी संख्या )

अभंग नं. २७ ॥ ८४ ॥

महावीराचे ते ॥ अकरा गणेशा तीनशे मुनीश पूर्वधर ॥ धृ० ॥ शिक्षक ते मुनी ॥ नव्यानव शत ॥ त्रयोदश शत अवधिज्ञानी ॥ १ ॥

१- अजितनाथापासून पार्श्वनाथापर्यंत २२ तीर्थंकरांचें समवशरणांत कमी जास्त प्रमाणांत अशाच तऱ्हेची संख्या असल्यामुळें २२ अभंग छापले नाहींत.

मनःपर्ययी ते ॥ मुनि पंचशत ॥ जाणा सप्त-
शत केवळी ते ॥ २ ॥ वैक्रियक ऋद्धि ॥ मुनि
नवशत ॥ वादिचार शत ॥ गणिजे ते ॥ ३ ॥
मुनि तिन जाणा ॥ अंतकृत केवली ॥ संतत
केवली मुनि तीन ॥ ४ ॥ सर्व मुनि मेळा ॥
चवदा हजार ॥ छत्तीस हजार ॥ अर्जिका त्या
॥ ५ ॥ श्रावकाचि संख्या ॥ जाणा एक लक्ष ॥
श्राविका त्रिलक्ष ॥ महति म्हणे ॥ ६ ॥

छंद भुजंगप्रयात नं. २८ ॥ ८५ ॥

तनुत्सर्ग योगासनीं एकमासी ॥ धरी ध्यान तो
स्वात्मरूपी मनासी ॥ जिनाधीश ऐशापरी
निश्चयानें ॥ करी शेष कर्मांचि हानी बळानें
॥ १३५ ॥

छंद शार्दूल विक्रिड नं. २९ ॥ ८६ ॥

तेरावे गुणि त्या शुभ प्रकृति ही बाहत्तरी
क्षेपिल्या । चौदावे गुणि शेष त्या प्रकृति ही
तेराहि संहारिल्या ॥ ऐशा ह्या प्रकृती समग्र

मिळुनी पंच्यांशि नांवारुनी । गेला माघवदी चतुर्दशि दिनीं मुक्तिपदा लागुनी ॥ १२६ ॥

छंद भुजंगप्रयात नं. ३० ॥ ८७ ॥

लघु पंचवर्ण स्थितीमध्य मुक्ति । जिनेंद्रासि चाली निराकार मूर्ती ॥ वसूकर्म हाणोनि अष्टागुणासी । तदा पावला केवळी सिद्धवासी ॥ १२७ ॥

भजन ३१ ॥ ८८ ॥

जिनराज शिवपदि गेला आनंदे जय जय बोला ॥ १० ॥ जय बोला वृषभनाथस्वामीची जय ॥ अर्हत्परमेष्ठिस्मरण ॥ जय जय श्रीजिनराज

छंद द्रुतविलंबित नं. ३२ ॥ ८९ ॥

मलयखेड सुकेशरि विष्टरीं ॥ अधिप भारति गच्छपति सुरी ॥ सुगुरु जो मज वासव कीर्तिहि ॥ वदवि भारति देउन उक्ति, ही ॥ १४३ ॥ प्रथम ते दशलाक्षणीची कथा ॥ वदविली बहू आग्रहि सत्कथा ॥ व्रतकथा मग

षोडश कारणी ॥ वदविली गुरुनें मज तारणी ॥ १४४ ॥

छंद-मालिनी नं. ३३ ॥ ९० ॥

महति जलनिधीनें पंच कल्याणिकाची । शुभ कथिली कथा हे पूर्ण त्या उत्सवाची ॥ पठिति कथिति भावे ऐकिति कीर्तनातें। मनुज सुकृति तेची सौख्य लाभे तयाते ॥ १४६ ॥

छंद- इंद्रवज्र नं. ३४ ॥ ९१ ॥

बाळापुरी नाभिज मंदिरा ते ॥ यमाग्निसेंदु शकाब्द पाते ॥ माघांधचातुर्दशि जीववारी ॥ केली कथा हे परिपूर्ण सारी ॥ १४७ ॥ द्वाषष्ठि संस्थान विलोकुनी हे ॥ तीर्थंकराची रचिली कथा हे ॥ संक्षेपे संदीग्ध हि वर्णिली जे ॥ श्रोते तुम्ही क्षांति समग्र कीजे ॥ १४८ ॥

---

१- श्री आदिनाथ पंचकल्याणिकोत्सव कथेचें समग्र पुस्तक वेगळे छापलें आहे तें प्रत्येकानें एक वेळ अवश्य वाचावें.

२- शके १७३२

# अथ महतिकृत चोविस तीर्थंकर पदें.

पद नं. १ ॥ ९२ ॥

नाभी नृपात्मज तीर्थ पती। वंदिन वृषभ युगादिपती । धृ० । साकेतापुरी अवतरला । मरुदेवी कुमी उद्भवला ॥ नाभी ० ॥ १ ॥ पूर्व लक्ष चौऱ्यासी जिवी । उन्नत शर शत गांडिवी । ॥ नाभी० ॥ २ ॥ हाटक तेज दिसे तनुचे । लांछन शोभे वृषभाचे ॥ नाभी० ॥ ३ ॥ कैलास गिरिवर शीव झाला । महति वंदीतसे त्याला ॥ नाभी० ॥ ४ ॥

पद नं. २ ॥ ९३ ॥

जीतशत्रु सुत अजित जिनेश्वर । तूं मज भव जळीं तारीरे ॥ धृ० ॥ वनिता नगरी उद्भवलासी । विजया देवी उदरींरे ॥ जीत० ॥ १ ॥ शोभे तव पदीं चिन्ह गजाचें । कनक कांती तव

शरीरीरे ॥ जीत० ॥ २ ॥ साडे चारशें धनु तनु आयु । पूर्व लक्ष बाहात्तरीरे ॥ जीत० ॥ ३ ॥ त्यागुनिया तूं परिग्रहासी । झाला संमय धारीरे ॥ जीत० ॥ ४ ॥ घातीय क्षपुनी केवळ ज्ञानी । छेताळीस गुणधारीरे ॥ जीत० ॥ ५ ॥ भव्य जिवाप्रती बोधुनी गेला । सम्मेदाचल शिखरीरे ॥ जीत० ॥ ६ ॥ अष्ट कर्म निवारुनी तुवां । परनिली शिवरमणीरे ॥ जीत० ॥ ७ ॥ महति ह्मणे मज शक्ति देइ तुं । विनंती हे अवधारीरे ॥ जीत० ॥ ८ ॥

पद नं. ३ ॥ ९४ ॥

वंदीन मी तो दृढनृप नंदन । तीर्थपति जिन संभवरे ॥ धृ० ॥ राणी सुषेना उदरी ज्याचा । सावस्तीपुरी उद्भवरे ॥ वंदी० १ ॥ साठ लक्ष पूर्व स्थिति ज्याची । शोभे लांछनी सैंधवरे ॥ ॥ वंदी ॥ २ ॥ काया उन्नत चाप चतुःशत ।

१ घोडा.

सुवर्ण वर्णवपु त्रैमवरे ॥ वंदी० ॥ ३ जिंकुनी कर्मबळी सम्मेदाचली । झाला मुक्तिपति शिवरे ॥ वंदी ॥ ४ ॥ महति म्हणीते ज्याचे स्मरणें । तरला जाईल हा भवरे ॥ ५ ॥

पद नं. ४ ॥ ९५ ॥

संवर सुत अभिनंदन जिनपती । स्मरतो मी तुज अंतरीरे ॥ धृ ॥ सिद्धार्थाकुशी उद्भवलासी शुद्ध अयोध्या नगरीरे ॥ संवर ॥ १ ॥ स्थिति पंचास लक्ष पूर्व तुज । हाटक वर्ण शरीररे ॥ संवर ॥ २ ॥ साडेतीनशेंशतक[1]मुके उन्नत । वानर लांछन धारीरे ॥ संबर ॥ ३ ॥ कर्म जिंकुनि मुक्तिसी गेला । सम्मेदाचल शिखरीरे संबर ॥ ४ ॥ शाश्वत सुख हें महतिस देउनी । तारी या भवसागरीरे ॥ संबर ॥ ५ ॥

पद नं. ५ ॥ ९६ ॥

मेघरथाचा नंदन । वंदीन मी सुमति जिन ।धृ।

---

१ धनुष्य.

जन्म नगरीं वनीता । ज्याची सुमंगला माता ॥ १ ॥ ज्याची सुवर्णवर्ण तनु । उंची तीन शत धनु ॥ २ ॥ लक्ष पूर्व हे चाळीस । ज्याचे संपूर्ण आयुष्य ॥ ३ ॥ गेला सम्मेदाचलासी । कोक चिन्ह तो मुक्तिसी ॥ ४ ॥ महति म्हणे ते शाश्वत । सुख पावला आनंत ॥ ५ ॥

पद नं. ६ ॥ ९७ ॥

वंदीन मी पद्मविभू तुजरे ॥ धृ ॥ कौसंबीपुरी उद्भवलासी । सुसीमा देहजरे ॥ वंदी ॥ १ ॥ अडिचशें तनु धनु । कुंकुमवर्णा वरूणात्मजरे ॥ वंदी ॥ २ ॥ पूर्व लक्ष तीस आयु तुजसी । लांछन पंकजरे ॥ वंदी ॥ ३ ॥ महती म्हणीतो सम्मेदाचली । मुक्ति स्त्री तुजरे ॥ वंदी ॥ ४ ॥

॥ पद नं.७ ॥ ९८ ॥

सुपार्श्व जिनेशा स्मरता अंतरीं । या भव सागरीं तारील तो ॥ धृ ॥ वाराणसीपुरी सुप्रतिष्ठ पिता पृथ्वीदेवी माता जयालागी ॥१॥

वीसलक्ष पूर्व जयाचें आयुष्य । दोनशें धनुष्य काया उंची ॥ २ ॥ हरीत वर्णांग स्वस्तीक लांछन । कर्माचें खंडण केलें ज्यानें ॥ ३ ॥ महति म्हणीतो सम्मेदशिखरीं । ज्यानें मुक्ति-नारी परणिली ॥ ४ ॥

पद नं. ८ ॥ ९९ ॥

चंद्रप्रभचरणी । मन माझें ॥ धृ० ॥ चंद्रपुरी महासेन पिता जया । सुलक्ष्मणा जननी ॥ मन ॥ १ ॥ उंची दिडशें धनु तनु ज्याची । कांती इंदु किरणी ॥ मन ॥ २ ॥ दश लक्ष-मीत पूर्व जयाची । आयुची गणनी ॥ मन ॥ ३ ॥ सम्मेदाचलीं परणिली ज्यानें । शाश्वत शिवरमणी ॥ मन ॥ ४ ॥ महति म्हणीतो चंद्रचिन्हजिन वन्ही भव गहनी ॥ मन ॥ ५ ॥

पद नं. ९ ॥ १०० ॥

सुग्रीवाचा जो नंदन । वंदा पुष्पदंत जिन ॥ धृ० ॥ झाला काकिंदी नगरी । जयरामाचें

उदरीं ॥ १ ॥ श्वेतवर्ण ज्याची तनु । उंची एकशेंत धनु ॥ २ ॥ आयु दोन लक्ष पूर्व । चिन्ह मक्कर अपूर्व ॥ ३ ॥ ज्यानें सम्मेद शिखरीं । परणिली मुक्तिनारी ॥ ४ ॥ महति म्हणें निराकारी । खेळे सुखाचे सागरीं ॥ ५ ॥

पद नं. १० ॥ १०१ ॥

वंदु दृढरथ नंदन रे । शीतल तीर्थपती जिन रे ॥ धृ ॥ झाला भिद्दिलपुर नगरीं । सुनंदा देवीचे उदरीं ॥ वंदु ॥ १ ॥ काया कार्मुक नेंवद उंची । लक्ष पूर्व स्थिती ज्याची ॥ वंदु ॥ २ ॥ हाटकवर्ण शरीरीं तो । श्रीवत्सांकित शोभतो ॥ वंदु ॥ ३ ॥ सम्मेदाचलीं तो गेला । कर्मविवर्जुनि शिव झाला ॥ वंदु ॥ ४ ॥ महति म्हणें शिवरमणीसी । शाश्वत भोगी सुखारासी ॥ वंदु ॥ ५ ॥

पद नं. ॥ ११ ॥ १०२ ॥

वंदु श्रेयांस श्री जीन । विष्णुभुपाचा नंदन

॥ धृ ॥ ज्याचा जन्म सिंहपुरी । झाला विमला उदरीं ॥ १ ॥ सुवर्णवर्ण तनु ज्याची । ऐंशी धनुष्य ते उंची ॥ २ ॥ लक्ष त्र्याऐंशी वर्ष । त्याचें जाणावें आयुष्य ॥ ३ ॥ ज्यासी सम्मेदपर्वती । झाली असे मुक्ति प्राप्ती ॥ ४ ॥ महति म्हणे सिद्ध झाला । सुख सागरीं मिळाला ॥ ५ ॥

पद नं. १२ ॥ १०३ ॥

वंदा वसुपूज्यात्मज । महिशाक्र जिनराज ॥ धृ० ॥ जन्मलासे चंपापुरी । जयादेवीचे उदरीं ॥ १ ॥ वर्ष बहात्तरी लक्ष । ज्याचें आयुष्य प्रत्यक्ष ॥ २ ॥ उंची धनुष्य सत्तरी । कुंकुमवर्ण तो शरीरी ॥ ३ ॥ बाळ तप ज्यानें केलें । अष्ट कर्मासी खंडिलें ॥ ४ ॥ महति म्हणे मुक्ति ज्यासी । झाली चंपानगरासी ॥ ५ ॥

पद नं. १३ ॥ १०४ ॥

कृतवर्माचा नंदन । वंदीन मी विमल जिन ॥

धृ ॥ झाला कपीला नगरी । शामा देवीचे उदरीं ॥ १ ॥ सुवर्ण वर्ण ज्याची तनु । उंची असे साँठि धनु ॥ २ ॥ साठी लक्ष वर्षायुषी । सूकराचें चिन्ह ज्यासी ॥ ३ ॥ कर्म खंडुनी मुक्तिसी । गेला सम्मेदाचलासी ॥ ४ ॥ महति म्हणें मुक्ति संग सुख भोगी तो अभंग ॥ ५ ॥

पद नं. १४ ॥ १०४ ॥

सिंहसेनात्मज अनंत श्री जिन । तयाच्या चरण वंदिन मी ॥ धृ ॥ अयोध्या नगरी सुर्यादेवी कुसी । आलासे जन्मासी स्वर्गाहुनी ॥ १ ॥ तीस लक्ष वर्षें जयाचें आयुष्य । पन्नास धनुष्य काया उंची ॥ २ ॥ सुवर्ण वर्ण तनु श्येघाचें लांछन । कर्माचें खंडण केलें ज्यानें ॥ ३ ॥ सम्मेदशिखरीं मुक्तिसी तो गेला । सद्भावें वंदिला महति म्हणें ॥ ४ ॥

पद नं. १५ ॥ १०५ ॥

भानुराजाचा नंदन । वंदीन मी धर्म जिन ॥

धृ ॥ ज्याची माता ते सुप्रभा । काया ज्याची कांचनाभा ॥ १ ॥ पंचेताळीस ते धनु । उंची असे ज्याची तनु ॥ २ ॥ दहा लक्ष वर्षायुसी । वज्र चिन्ह शोभे ज्यासी ॥ ३ ॥ महति म्हणें ज्यासी मुक्ति । झाली सम्मेद पर्वती ॥ ४ ॥

पद नं. १६ ॥ १०६ ॥

शांती जिनवंदा । त्यजुनी प्रपंच धंदा ॥ शांती ॥ धृ ॥ हस्तनागपुरी विश्वसेन सुत । ऐरा देवी नंदा ॥ शांती ॥ १ ॥ चाळीस धनु उंची काया ज्याची । सुवर्णवर्ण गुणकंदा ॥ शांती ॥ २ ॥ एक लक्ष वर्ष स्थिती जयाची । मृगचिन्हांकित पादा ॥ शांती ॥ ३ ॥ कामचक्री पद पाउनी ज्यानें । त्यजीलें सर्व द्वंदा ॥ शांती ॥ ४ ॥ सम्मेदाचळीं महति मुक्तिचे । पावे सुख आनंदा ॥ शांती ॥ ५ ॥

पद नं. १७ ॥ १०७ ॥

सूरसेन सुत कुंथु जिनेश्वर । ध्यातो मी तुज

निशीदिनीरे ॥ धृ० ॥ हस्तीनागपुरी उद्भव नगरीं । श्रीमती तव जननीरे ॥ सुर. ॥ १ ॥ पंचतीस धनु उन्नत तव तनु । दिसे कांचन वर्णिरे । सुर. ॥ २ ॥ वर्ष पंचैनऊ सहस्र आयु । आहे तुज अजा लांछनीरे ॥ सुर. ॥ ३ ॥ कामचक्री पद पाउनी संपद । सर्वही साधिली धरणीरे ॥ सुर. ॥ ४ ॥ सम्मेदाचळी अंतकाळीं । परणिली शिवरमणीरे ॥ सुर. । ५ । देई अनंत सुख शाश्वत सुंदर । मागें महति वर्णिरे ॥ सुर. ॥ ६ ॥

पद नं. १८ ॥ १०८ ॥

मन हें निशिदिनी निशिदिनी । राहो अरहेश्वर चरणीं ॥ ध ॥ हस्तनागपुरीं तात सुदर्शन । सुमित्रसेना जननी ॥ मन ॥ १ ॥ चाप तीस उंची काया ज्याची । दिसे कांचन वर्णी ॥ मन ॥ २ ॥ सहस्र वर्षें चौऱ्यांशी आयु । ज्याचे मीन लांछनी ॥ मन ॥ ३ ॥

षट्खंड भूमिका साधिली ज्यानें । कामचक्री होऊनि ॥ मन ॥ ४ ॥ सम्मेदपर्वतीं, कर्मखंडुनी । परणिली शिवरमणी ॥ मन ॥ ५ ॥ अनंत सुख स्थिती पाहुनी। महति केली संसृती हानी ॥ मन ॥ ६ ॥

पद नं. १९ ॥ १०९ ॥

वंदीन मल्ली जिना । कुंभ भूप नंदना ॥ धृ ॥ मिथुलानगरीं उद्भवलासी । सुप्रभादेवी नंदन ॥ वंदी. ॥ १ ॥ पंचाविंशती कार्मुक उन्नत। सुवर्ण विभांकित तना ॥ वंदी. ॥ २ ॥ स्थिती पंचावनसहस्र वर्षें । तुजला घट लांछना ॥ वंदी. ॥ ३ ॥ सम्मेदाचलीं मुक्ति पावला। महति सौख्य कारणा ॥ वंदी. ॥ ४ ॥

पद नं. २० ॥ ११० ॥

तो मुनिसुव्रत जिनवंदा । त्यागुनी सर्वही गृह धंदा ॥ धृ० ॥ राजग्रही सौमित्र पिता । ज्यासी पद्मावती मात ॥ तो मुनी. ॥ १ ॥ उन्नत दिसे

वीस धनु । ज्या घननीळवर्ण तनु ॥ तो मुनी ॥ २ ॥ तीस सहस्त्र वर्षे जिवी । कच्छ चिन्ह ओ ज्ञानरवी ॥ तो मुनि ॥ ३ ॥ सम्मेदाचळीं शिव झाला । महति स्मरतो मनीं त्याला ॥ तो मुनिसुव्रत० ॥ ४ ॥

पद नं. २१ ॥ १११ ॥

श्रीनमीनाथ जिनेश्वर वंदीन विजयसेन नृप- नंदनरे ॥ धृ ॥ वप्रावती कुशी मथुरापुरीसी । अवतरला जगतारणरे ॥ श्री ॥ १ ॥ चाप पंचदश उन्नत ज्याची ॥ हेमवर्ण तनु पावनरे ॥ श्री ॥ २ ॥ ज्याची स्थिती दशसहस्त्र वत्सर । चरणीं निलोत्पल लांछनरे ॥ श्री ॥ ३ ॥ सम्मेदाचळीं मुक्तिसी गेला । महतिसी तो उद्धारणरे ॥ श्री ॥ ४ ॥

पद नं. २२ ॥ ११२ ॥

सिंधुविजय सुत नेमी जिनेश्वर । शिवात्मज म्या वंदीला ॥ धृ ॥ यदुकुलमंडण जगदुद्धारण

रण । सुरिपुरि नगरीं अवतरला ॥ सिंधु ॥ १ ॥ उन्नत दशधनु मेघवर्ण तनु । वर्षे सहस्त्र स्थिती ज्याला ॥ सिंधु ॥ २ ॥ बाळपणीं तप साधन करुनी । केवळ ज्ञानी तो झाला सिंधु ॥ ३ ॥ महति म्हणितो गिरनारिवरीं । शंखचिन्ह ते शिव झाला ॥ सिंधु ॥ ४ ॥

पद नं २३ ॥ ११३ ॥

वंदीन पार्श्वजिना । अश्वसेन नंदना ॥ ध्रु ॥ वारानसीपुरीं वामा उदरीं । झाला फणी-लांछना ॥ वंदी. ॥ १ ॥ शतवर्षे स्थिती नव-कर उन्नती । शोभे नीळसमतना ॥ वंदी. ॥ ॥ २ महति म्हणितो सम्मेदाचळीं । मुक्तिपद पावना ॥ वंदी. ॥ ३ ॥

पद २४ वें ॥ ११४ ॥

सिद्धार्थरायाचा पुत्र तो सन्मति । वंदा जिन-पति महावीर ॥ धृ ॥ कांचनवर्णी जो कुंडलपु-रीसीं । त्रिशलाचे कुशीं उद्भविला ॥ १ ॥

वर्ष बहात्तर जयाची संस्थिति । कायेची उन्नति सत हस्त ॥ ॥ २ ॥ सिंहलांछनासी पावा-पुरीं प्रति । झाली असे मुक्ति महति म्हणे ॥ ३ ॥

इति श्री ब्रह्ममहतीसागरकृत
चोवीस तीर्थंकर पदें समाप्त.



श्रीब्रह्ममहतीसागरकृत-

# अरहंताष्टक.

आव्हयाम्यहमर्हंतं स्थापयामि जिनेश्वरं ।
सन्निधीकरणं पूजावसरे प्रकरोम्यहम् ॥

ॐ ऱ्हीं अर्हं परब्रह्मन् अनंतानंतज्ञानशक्ते श्री जिनेश्वर देव अत्रावतरावतर संवौषट्, अत्र तिष्ठ तिष्ठ ठः ठः स्थापनं, अत्र मम सन्निहितो भव भव वषट् सन्निधीकरणम् ॥

सिंधुनिर्जरापगादितीर्थजैः सुनिर्मलैः ।
शीतलैः सुगंधयुक्ततापहारकैर्जलैः ॥
षट्समुद्रसद्गुणाढ्यसर्वदोषवर्जितम् ।
श्रीजिनेश्वरं यजामि घातिकर्मतर्जितम् ॥ १ ॥

ॐ ऱ्हीं अर्हं परब्रह्मणे अनंतानंतज्ञानशक्तये श्री जिनेश्वरदेवाय जन्ममृत्युविनाशाय जलं निर्वपामीति स्वाहा ॥

कुंकुमादिसौरभैः सुहेमवर्णकेशरैः ।
मिश्रितैः सुशीतलैः सुगंधचंदनैर्वरैः ॥ षट्. ॥

ॐ ह्रीं अर्हं परब्रह्मणे अनंतानंतज्ञानशक्तये श्री जिनेश्वरदेवाय संसारातापविनाशनाय चंदनं निर्वपामीति स्वाहा।

औषधीशतुल्यशुभ्रतंदुलैस्तुषोज्झितैः।
सत्कमोदशालिजैरखंडितैः सुवासितैः॥ षट्०

ॐ ह्रीं अर्हं परब्रह्मणे अनंतानंतज्ञानशक्तये श्री जिनेश्वरदेवाय अक्षयपदप्राप्ता अक्षतं निर्वपामीति स्वाहा।

पारिजातमल्लिकासुचंपकादिवृक्षजैः।
लुब्धभृंगपुष्पकैः सरोजमोगरादिजैः॥षट्०॥

ॐ ह्रीं अर्हं परब्रह्मणे अनंतानंतज्ञानशक्तये श्री जिनेश्वरदेवाय कामबाणनिवारणाय पुष्पं निर्वपामीति स्वाहा।

तंदुलोद्भवान्नदुग्धशर्करादिनिर्मितैः।
व्यंजनादिभक्षकैः सुवर्णपात्रसंस्थितैः॥षट्०॥

ॐ ह्रीं अर्हं परब्रह्मणे अनंतानंतज्ञानशक्तये श्री जिनेश्वरदेवाय क्षुधारोगनिवारणाय चरुं निर्वपामीति स्वाहा।

विश्वबोधकारकै स्तमोवितानहारकैः।
हेमवर्णवत्प्रकाशकैः सुरत्नदीपकैः॥ षट्० ॥

ॐ ह्रीं अर्हं परब्रह्मणे अनंतानंतज्ञानशक्तये श्री जिनेश्वरदेवाय मोहांधकारनिवारणाय दीपं निर्वपामीति स्वाहा।

देवदारुचंदनादिसद्दशांगचूर्णकैः ।
शीघ्रधुमकारकैः सुगंधपूर्णधूपकैः ॥ षट० ॥

ॐ ह्रीं अर्हं परब्रह्मणे, अनंतानंतज्ञानशक्तये श्री जिनेश्वरदेवाय अष्टकर्मदहनाय धूपं निर्वपामीति स्वाहा ।

नारिकेरचोचमोचकंम्रकैः सुनिर्मलैः ।
मातुलिंगदाडिमादिपक्वजातसत्फलैः ॥षट०

ॐ ह्रीं अर्हं परब्रह्मणे, अनंतानंतज्ञानशक्तये श्री जिनेश्वरदेवाय मोक्षफलप्राप्ताय फलं निर्वपामीति स्वाहा ।

वारिगंधतंदुलादिशुद्धनिर्मलाष्टकैः ।
शक्रकीर्तिसेवको महत्यपांधिरर्घकैः ॥ षट० ॥

ॐ ह्रीं अर्हं परब्रह्मणे, अनंतानंतज्ञानशक्तये श्री जिनेश्वरदेवाय अनर्घ्यपदप्राप्ताय अर्घ्यं निर्वपामीति स्वाहा ।

कर्ता यो धर्मतीर्थस्य जिनो भव्याब्जभास्करः ।
सुरेंद्रवृंदवंद्यांघ्रिः तस्मै पुष्पांजलिं क्षिपेत्, पु. ॥
कल्याणं विजयो भद्रं, चिंतितार्थमनोरथम् ।
वीतरागप्रसादेन, सर्वेऽप्यर्था भवन्तु ते ॥ इ. ॥

## अथ जयमाला.

### ( मंगल आरति )

अर्हतो नामधेयं जगन्मंगलं । कापि किंचिद् भयं नास्ति यच्चिंतनात् । क्षुद्रदेवोपसर्गापहं कामदं । तत्सुखग्रामदं विघ्नशांत्यै भजे ॥ १ ॥ नाभिजं चाजितं श्रीजिनं संभवं, कीशचिन्हं तथा मंगलादेहजं । पद्मचिन्हं सुपार्श्वं मह[illegible] नजं पुष्पदंतं सुनंदांगभूतं भजे ॥ २ ॥ विष्णुभुजं वासुपूज्यं सुरामांगजं सिंहसेनात्मजं धर्मनाथं जिनं ॥ शांतिनाथं च कुंथुं सुमित्रांगजं कुंभराजात्मजं कच्छपाकं भजे ॥ ३ ॥ श्रीनमिं नेमिनाथं च वामासुतं चांतिमं सन्मतिं वर्धमानाभिधं ॥ वीरनाथं महावीरसंज्ञं महत्याव्हयं पंचनामान्वितं तं भजे ॥ ४ ॥

## ॥ अथ अरहंत आरति ॥

जयदेव जयदेव जयजिन अरहंता। भवजल तारक हारक मुनि मानसचिंता ॥ सेचाळिसं गुणवंता

ुक्तीश्रीकांता। आरति ओवाळिन मी भावे ओवा-
ळिन मी तुजला भगवंता । धृ । वपुनिर्मळधिरो-
वळ प्रस्वेदरहितां। संहनन संस्थान प्रथमोत्तम
तहिता ॥ अद्वयरूपक तारक वल्लभ वचनोक्ता।
सौरभ सौलक्षणता अनत बळयुक्ता ॥ जय देव
जयदेव• ॥ १ ॥ उपसर्गप्राणीवधमुक्तिप्रवि-
हीना । योजनशत सौभिक्षित सुरवर्त्मगमना ॥
चतुराननाविद्याधिपअछायधरणा । विगतोन्मष-
वर्जितनखकचाविस्तरणा ॥ जय देव जयदेव
॥ २ ॥ तूझें समवशरणीं मागधि भाषोक्ति।
सर्व ऋतुचे वृक्ष फल फुल्लित होति ॥ सर्व
जिवासी मैत्री रत्नमय जगति॥ सुगंधवायु महके
जन आनंदीति ॥ जयदेव जयदेव• ॥ ३ ॥
एकयोजन भूमि सुर सन्मार्जीती । गंधोदकवृ-
ष्टीते धाराधर करिती ॥ तूझे पादन्यासी सुर–
पद्म धरिती । दिव्नभ निर्मल सकळ धान्यान्वित
जगति ॥ जयदेव जयदेव• ॥ पाचारण करिती

सुर सकळहि देवासि । धर्मसुचक्र जेथें गमन-
स्थिरतासि ॥ पाहुनि तेथें येती समवशरणासी।
हे अतिशय चौतीस शोभती तुजपाशीं ॥ जय
देव जयदेव० ॥ ५ ॥ अशोकवृक्षाखालीं सिंहा-
सन तीन्ही । त्यावर शोभसि अधर चतुरांगुळ
गगनीं ॥ चउसट चामर ढळति वरछत्र तीन्ही ।
भामंडळ विराजे तमहारक तरणी ॥ जयदेव
जयदेव० ॥ ६ ॥ प्रकाशकारक तूझी दिव्य–
ध्वनि गर्जे पुष्पसुवृष्टी करिती सुरदुंदुभि वाजे ॥
ज्ञान दर्शन सौख्ये वीर्यांमित साजे । महति
सागर नित्य रत भजनी तूझे जयदेव जयदेव०
॥ ७ ॥

## अथ वीतराग आरति.

जयदेवा वीतरागा । दोषविवर्जितांगा । आरति
ओवाळीन तुज निःसंगसंगा । जयदेवा० ॥ धृ ॥
अक्षया जन्महीना । नाहि तुजला । स्वेद
विस्मया वेगळा तुं । नाहि विषाद खेद । जय
देवा० ॥ १ ॥ जरा रति रोष नाहीं । भाहि

चिंतानुराग । निद्रा प्रमोह नाहीं । नाहि शरीरीं रोग । जयदेवा० ॥ २ ॥ उन्माद भय नाहीं । नाहीं क्षुधा पिपास । दूर तुज पासूनी हे । गेले अठरा दोष । जयदेवा० ॥ ३ ॥ देवेंद्र– कीर्तीचे । कृपें तुझी हि भक्ती । महतीसागराचे दृढ लाधली चित्तीं । जयदेवा० ॥ ४ ॥

## अथ जिनेश्वरमंगल आरति

घेउनि धवलाक्षतपुष्पा । पात्री उजळुनिया दीपा ॥ मंगलआरति जगदीशा । वोवाळिन तुज परमेशा ॥१॥ जनक तूचि मज जननी तू । मम चित्तां-बुजतरणी तू ॥ मित्र तूची मज बंधू तू । ज्ञानदयाचा सिंधू तू ॥ २ ॥ सग्दुरु तूचि मज विद्या तू॥ दुर करि माझी अविद्या तू ॥ विघ्न निवारक देव हि तू । दाता त्राता सर्व हि तू ३ नाथाहो जिन नाथाहो । तव चरणीं मम माथाहो ॥ देवाहो जिन देवाहो । आटवि भव-जळ ठेवाहो ॥ ४ ॥ राजाहो जिन राजाहो । हरवी दुर्गति भाजाहो ॥ स्वामी हो जिन

स्वामी हो । चित्त असो तव नामी हो ॥ ५ ॥
तुजविण तारक मज कोणी । न दिसे पाहता
जग तीन्हीं ॥ महति विनवी तुजलागी ।
देई सद्गति मजलागी ॥ ६ ॥ देई सद्गति मज-
लागी । देई सद्गति मजलागी ॥ देई सद्गति
मजलागी । देई सद्गति मजलागी ॥ ७ ॥
जिन राजा जय जिन राजा । प्राणसख्या
श्रीजिनराजा ॥ जिन राजा जय जिन राजा ।
प्राणसख्या श्रीजिनराजा ॥ ८ ॥ देई सद्गति
मजलागी । देई सद्गति मजलागी ॥ देई
सद्गति मजलागी । देई सद्गति मजलागी ॥९॥
जिन जिन जिन जिन तीर्थेशा । वीतरागा
परमेशा ॥ जिन जिन जिन जिन तीर्थेशा ।
वीतरागा परमेशा ॥ १० ॥ देई सद्गति मज–
लागी । देई सद्गति मजलागी ॥ देई सद्गति
मजलागी । देई सद्गति मजलागी ॥ ११ ॥
अर्हत परमेष्ठि स्मरण जय जय श्रीजिनराजा ॥
तुभ्यं नमोस्तु । तुभ्यं नमोस्तु । तुभ्यं नमोस्तु ।

# अथ ओंकार आरति.

जयदेव जयदेव जय ओंकार प्रणवा । शिवपद कारक तारक भवजलनिधि नावा ॥ यंत्र मंत्र शास्त्र व्यापक तूं सर्वा ॥ आरति वोवाळिन मी भावें वोवाळिन मी पदपंचक भावा ॥ जय धृ. ॥ चवतिस अतिशय प्रातीहार्याष्टधारी ॥ दर्शनचित सुखवीर्या अनंत हे चारी ॥ सेहेचाळिस गुणधारक अठरा दोषारी ॥ प्रथम महागुरु पद हे घातीकर्मारी ॥ १ ॥ अष्टगुणान्वित, जन्मविवर्जित निर्गुण अदिकारी ॥ छायामायावर्जित जोति अशरीरी ॥ शिवपदनायक दायक शाश्वत शिवनारी ॥ द्वितीय महागुरु पद हे कर्माष्टकहारी ॥ २ ॥ द्वादशविधतप, षड्विध आवश्यक क्रीया ॥ पंचाचार त्रीगुप्ति त्रीपद् दशधर्म ठाया ॥ आचरती गुण छत्तिस तेची आचार्या ॥ तृतिय महागुरु पद हे आचार्या सूर्या ॥ ३ ॥ एकादशविधअंग चवदा हे

पूर्व ॥ इतुके नित्य पढीती श्रुतशास्त्र सर्व ॥ पंचेविस गुणधारी पाठक अपूर्व ॥ चतुर्थ महा-गुरु पद हें हारवि दुर्भव ॥ ४ ॥ व्रतें, समिती, इंद्रियनिरोध लोच अस्नान ॥ आवश्यक निर्वस्त्रक आणि अदंतधावन, ऐकभुक्ति, भूमिशैय्या, उभेभोजन ॥ अठ्ठाविस गुणधारी ऐसे गुरुपूर्ण ॥ ५ ॥ अरहंत अशरीर दोचे आद्याक्षर दोन्हीं ॥ आचार्य उपाध्याय मुनि, आद्याक्षर तीन्ही ॥ पंचाद्याक्षर मिळुनि ओंकारवार्णा ॥ महतिसागर म्हणीतो जपता सत्पद निर्वाणी ।६।

## अथ षोडशकारण आरति

जयजय षोडशकारण, सुखकारण, भवसिंधु–तारण ॥ आरति ओवाळु भावसु मन उल्हासु अर्हत्पदपावन ॥ जयजय ॥ ध्रु ॥ दर्शन विशुद्धि प्रथम ॥ पाळि उत्तम ॥ धरि विनय-भाव ॥ वर्जुनिया अतिचारासी ॥ शीळव्रतासि ॥ धरि भवाब्धिनाव ॥ तारक० ॥ १ ॥

अभ्यासि श्रुतज्ञान जे । उपदेशिजे ॥ धारि
वैराग्य चित्ति । दान देई यथा शक्तिन ॥
पात्र पाहून । तप पाळी जे युक्ति ॥ तारक०
॥ २ ॥ आठवि सत्साधुसमाधि । सांडि उपाधि ॥
करि सेवा साधुची । भक्ति करी जिनदेवाची ॥
भावे गुरुची । अनेकांत श्रुतिची ॥ तारक० ॥
३ ॥ तत्वपदादिक आगम । भज सप्रेम ॥
षडावश्यकक्रिया । प्रभावना जिनशासनी ॥
सत्प्रवचनी । करि वात्सल्य दया ॥ तारक० ॥
४ ॥ जो गुण षोडश पाळुन । करि पूजन ॥
तोचि मुक्तिचा धनी । महतिसागर वर्णितो ॥
मनिं इच्छितो । सिद्धपदा लागुनी ॥
तारक० ॥ ५ ॥

## अथ रविवारव्रत आरति.

जयदेवा पार्श्वेशा । रविव्रत महिमेशा ॥ आरती
ओंवाळीन । तुजलागी तीर्थेशा ॥ जय० ॥
१ ॥ रविव्रत जे करिती । शुद्ध भावें आचरती ॥

त्याहासी पुण्याचे । फळ वांछित होती ।। जय. ॥ २ ॥ व्रत आचरितां । तुझें स्मरण करितां ॥ संकट पावलीचे । नाग पतीचे वनिता ॥ जय॰ ॥ ३ ॥ प्रसन्न पद्मीनी । गुणधरा लागुनी ॥ जाणोनि भक्त तुझा । दिली वैभव खाणी ॥ जय॰ ॥ ४ ॥ जाणोनि तुझें पायी । म्या ठेविली डोई ॥ महतीसागराला । तूंची प्रसन्न होई ॥ जयदेवा पार्श्वेशा । रविव्रत महिमेशा ॥ ५ ॥ आरती ओंवाळीन । तुजलागीं तीर्थेशा ॥

॥ छंद वसंततिलका ॥

दध्युज्वलाक्षतमनोहरपुष्पदीपैः । पात्रार्पितं प्रति दिशं महतादरेण ॥ त्रैलोक्यमंगलसुखालयकाम-दोहमारार्तिकं तव विभोरवतारयामि ॥ १ ॥

मंगलार्तिकावतरणं करोमि स्वाहा ।

## अथ रविवारव्रत आरति.

॥ जय जय जय जय जय श्री पार्श्वेशा ॥ रवि-वारव्रतकर्त्यां राक्षिसि तूं दासा ॥ आरती ओंवा-

ळीतों तुजला जगदीशा ॥ सौख्य मजला देई तोडी भवपाशा ॥ जय ॥ धृ० ॥ रवीवार व्रत जे करीती ॥ शुद्धांतःकरणानें तुजला आठ-विती ॥ त्यांचे पुण्याची न करवे गणती ॥ इच्छित त्यांचे सारे परिपूर्ण होती ॥ १ ॥ जय० ॥ रविवाराचें ऐसे व्रत आचरितां ॥ सद्भावानें तूझें पदपंकज स्मरतां ॥ संकटांतुन नागपतीची वनिता ॥ मुक्त होऊन पावे लोकीं सघनता ॥ २ ॥ जय० ॥ तुझ्या दयेनें प्रसन्न पद्मिनी ॥ होती झाली गुणधरा लागुनी अभीष्ट वर त्यास देऊनी ॥ अंतर्धान पावे कृतार्थ करूनी ॥ जय० ॥ ३ ॥ ह्यास्तव देवा नमितो तुझें हे चरण ॥ महतीसागर नामा व्हावा उद्धरण ॥ दीनानाथांचे करिशी रक्षण ॥ रक्षक माझा दुसरा तुजवीण कोण ॥ जय० ॥ ४

## अथ गुरु आरति

महतिसागर आरति करितो ॥ प्रेमें सद्भावे ॥ निशिनि चरण, तुमचें माझ्या हृदयीं असावे

॥ ध्रु ॥ सद्बोदाची जोती उजळुनी तुजला वोवाळु ॥ तुजविण आणिक कवणासी मी नाहीं आताळू ॥ १ ॥ त्रैलोक्याची संपत्ति सारी, चरणि मज वाटे ॥ सद्गुरुकृपा होता भवजल, सहजचि मग आटे ॥ २ ॥ दिल-सुखाच्या दृष्टीमाजीं ॥ तूंचि भरलासी, जिकडे तिकडे पाहतां सद्गुरु ॥ पूर्ण अविनाशी ॥ ४ ॥ महतीसागर आरति ॥ करितो प्रेमें सद्भावें, निशिदिनीं चरण तुझें ॥ माझ्या हृदयीं असावें ॥ ४ ॥

## अथ शांतिधारा

ततो जिनेंद्रपादाते वारिधारां निपातये ।
भृंगारनालिकोद्भूतां जिनमल्लोकशांतये ॥१॥
॥ शांतिधारात्रयं दद्यात् ॥

## ॥ अथ विसर्जनं ॥

संपूजकानां प्रतिपालकानां यतींद्रसामान्य-तपोधनानाम् ॥ देशस्य राष्ट्रस्य पुरस्य राज्ञः ।
करोतु शांतिं भगवान् जिनेंद्रः ॥ १ ॥

अशोकवृक्षः सुरपुष्पवृष्टिः । दिव्यध्वनिश्चामर-
मासनं च ॥ भामंडलं दुंदुभिरातपत्रं । सत्प्रा-
तिहार्याणि जिनेश्वराणां ॥ २ ॥

॥ छंद श्रग्धरा ॥

क्षेमं सर्वप्रजानां प्रभवतु बलवान् धार्मिको
भूमिपालः । काले काले च सम्यक् वर्षतु मघवा
व्याधयो यांतु नाशं । दुर्भिक्षं चौरमारी क्षण–
मपि जगतां मास्म भूज्जीवलोके । जैनेंद्रं धर्म-
चक्रं प्रभवतु सततं सर्वसौख्यप्रदायि ॥ ३ ॥

प्रध्वस्तघातिकर्माणः केवलज्ञानभास्कराः ।
कुर्वंतु जगतः शांतिं वृषभाद्या जिनेश्वराः ।४।

आहुता ये पुरा देवा लब्धभागा यथाक्रमम् ।
ते जिनाभ्यर्चनं कृत्वा सर्वे यांतु यथास्थितिं ।५।
आव्हाननं न जानामि नैव जानामि पूजनं ।
विसर्जनं न जानामि त्वं सिद्धपरमेश्वर ॥ ६ ॥
मंत्रहीनं क्रियाहीनं द्रव्यहीनं कृतं मया ।
तत्सर्वं पूर्णतामेतु त्वत्प्रसादाज्जिनप्रभो ॥ ७ ॥

अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम ।
तस्मात् कारुण्यभावेन रक्ष रक्ष जिनेश्वर ॥ ८ ॥
रक्ष रक्ष परमेश्वर । तुभ्यं नमोस्तु । तुभ्यं नमोस्तु ॥ तुभ्यं नमोस्तु ॥

## श्रीगुरु देवेंद्रकीर्तींची लावणी.

मलयखेडसिंहासनपति जनतारक सन्मूर्त्ति ।
पंचमकाळीं अवतरला श्रीमुनिशक्रकीर्ति ॥ धृ ॥
तौलव देशामध्ये शोभे लवनपुरी टीका ।
श्रेष्ठि असे पायापा त्याची वनिता नेमाका ॥
तिचे उदरीं उद्भवला जो ताराया लोकां ।
बाळदशा मग गेली असतां पाहे विवेकां ॥
धर्मचंद्र भट्टारक पदिं तो करि सेवा भक्ति ॥
पंचम० ॥ १ ॥ नानापरिचे नाममाला व्याकरणादिक । छंदशास्त्र अलंकार काव्यादिक तर्क ॥ त्रिलोकसार, गोमटसार ज्ञान आत्मिक ।
द्रव्यसंग्रह पद तत्वादिक आगम बहुतेक ॥
गुरुप्रसादें सर्वहि जाली ज्ञानव्युत्पात्ति ॥ पंचम०

श्री महतीसागर यांचे गुरुवर्य भट्टारक श्री देवेंद्रकीर्ती (दंडी)

यांचे परंपरेंतील आत्मानुभवी पट्टाचार्य **श्री देवेंद्रकीर्ती**

(कालुरामजी) महाराज, कारंजा.



जन्म सं. १८५९, पट्टारोहण १८७९, स्वर्गवास १९४१.

बालोद्यान प्रेस, पुणें

अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम ।
तस्मात् कारुण्यभावेन रक्ष रक्ष जिनेश्वर ॥ ८ ॥
रक्ष रक्ष परमेश्वर । तुभ्यं नमोस्तु । तुभ्यं नमोस्तु ॥ तुभ्यं नमोस्तु ॥

## श्रीगुरु देवेंद्रकीर्तीची लावणी.

मलयखेडसिंहासनपति जनतारक सन्मूर्त्ति ।
पंचमकाळीं अवतरला श्रीमुनिशक्रकीर्ति ॥ धृ ॥
तौलव देशामध्ये शोभे लवनपुरी टीका ।
श्रेष्ठि असे पायापा त्याची वनिता नेमाका ॥
तिचे उदरीं उद्भवला जो ताराया लोकां ।
बाळदशा मग गेली असतां पाहे विवेकां ॥
धर्मचंद्र भट्टारक पदिं तो करि सेवा- भक्ति ॥
पंचम० ॥ १ ॥ नानापरिचे नाममाळा व्याकरणादिक । छंदशास्त्र अलंकार काव्यादिक तर्क ॥ त्रिलोकसार, गोमटसार ज्ञान आत्मिक । द्रव्यसंग्रह पद तत्वादिक आगम बहुतेक ॥
गुरुप्रसादें सर्वहि जाली ज्ञानव्युत्पात्ति ॥ पंचम०

॥ २ ॥ ब्रह्मचारी तो कुशळ कविगुणसागर जाणून । मुहूर्त पाहुनि चतुर्विध श्री संघ मिळवून । उत्सव करुनि कळश ढाळुनि निज-पदिं सद्गुरून ॥ स्थापुनिया भट्टारक केला जनानंदपूर्ण । बळात्कार गणनायक नामें देवेंद्र-कीर्ति ॥ पंचम० ॥ ३ ॥ धर्मचंद्र पदांबुज तरणी जाला उद्योत । लोपलें पाखंड कुत्सित मत हे खद्योत ॥ नैयायिक चार्वाक मिमांसक सौगत वेदांत ॥ वैशेषिक जैमिनिक चंद्रिका ह्या झाल्या गुप्त ॥ निशि अज्ञान दवडुनि हरली मिथ्यातमभ्रांति ॥ पंचम० ॥ ४ ॥ कवित्व करुनि कथिला ज्यानें पूजादिक धर्म । बोधुनिया जन मार्गी लाविला दिधले व्रत नेम ॥ हारुनि पंडीत वादी ज्यासि भजति सत्प्रेम ॥ देशविदेश विजयी होउनि सज्जन विश्राम ॥ करोनिया जिनयात्रा उदास जाला तो चित्तिं ॥ पंचमका० ॥ निर्मळ आत्मतत्व जाणुनि

तपस्वी झाला ॥ सकळहि मोहकर्मजनित हा विकल्प सांडिला ॥ मनपवन चित्पर्वत याचा एक मेळ केला ॥ बाह्याभ्यंतर परिग्रह हा उडोनिया गेला ॥ सिरड ग्राभोचानीं बैसुनि कारि संयमवृत्ति ॥ पंचमका० ॥ ६ ॥ वस्त्र रहित नग्नमुद्रा पद्मासन युक्त ॥ धूळि करोनि धूसर दीशे दीगंबर शांत ॥ आत्मस्वरूपी मन लाऊनी वचन करी गुप्त ॥ निश्चळ काया केली ते सत्तपा करुनि तप्त ॥ मृगादि वनचर विस्मय करुनि पाहाया येती ॥ पंचमका० ॥ ७ ॥ चित्ताचा व्यापार एकेठायीं आवरोनी ॥ इंद्रिय नगरीं उद्वस करूनी महाधैर्य धरूनी ॥ समता पर्वतदरीमध्यें पद्मासनि. बसुनि ॥ श्वासोच्छ्वास वायु कोंडला स्थिर गमनागमनीं ॥ आत्मसन्मुख दृष्टि ठेविली मुक्तीचे अर्थीं ॥ पंचमका० ॥ ८ ॥ शून्य मंदिरीं वस्ती ज्याची दशदिक्प्रावर्ण ॥ सदानंद संतोषघन हे तपवर्तन पूर्ण ॥

क्षांति वल्लभा सर्व जिवाशी मैत्री विस्तीर्ण ॥ आत्मस्वरूपीं चिंतनज्याचें हें सुख संपूर्ण ॥ अनशन घेऊनि सदैव कारितो ध्यानामृतभुक्ति ॥ पंचमका० ॥ ९ ॥ समाधिसाधुनि धर्मध्यानीं देह विसर्जीला । देवगतीशीं जाउनि उत्तम देव तो जाला ॥ भक्तजनांचें वांछित सर्वहि पुरवूं लागला । जन दूर दूरचे येति पादुका वंदावयाला ॥ महतीसागर म्हणितो धन्ये गुरुपद संप्राप्ति ॥ पंचम० ॥ १० ॥

## अथ सरस्वती स्तोत्र

श्रीमन्मंगलमूर्ति श्रीजिनविभु घातिरिपु जिंकिला । रागद्वेष त्यजुनि विष्टरवरि दिव्य-ध्वनी बोलला ॥ ती वाणि जिनशास्त्रि वर्णिली वरी आकार मांडोनिते । ज्याला वाहन हंस मस्तकिं तुरा ग्रीवे मणीदामते ॥ १ ॥

जैसीं अन्य मतित वर्णनविधी तैशीच जैनागर्मी । हा संदेह मनांत अन्हुरयनी जालो बहू मी श्रमी ॥ तेव्हां श्रीविबुधेंद्रकीर्ति गुरु हा प्रश्नोत्तरी बोलिला । जैसे किर्ण रवि प्रकाश करिता रात्र्यंधनु हर्षला ॥ २ ॥ आतां हास्य करावया तलमली चिंता मनीं वर्तिली । तेव्हां श्रीवृषकीर्ति दाखवितसे श्रीभारती माउली ॥ त्या पादाब्जपरी सुशब्दनुचरी जैनाब्धि भ्रमरापरी । नाना शास्त्र विचार सार शिकवी हे माय वागेश्वरी ॥ ३ ॥ आतां श्रोतेनरा सुनिश्चय करा संदेह वेगी तजा । ज्याला नम्रत नित्य द्वादश सभा तो देव भावें भजा ॥ आकाशे सम अंतरिक्ष जिन हा मेघापरी शोभला । ढलति चौसट चामरे कतिपयः विद्युल्लता झाकील्या ॥ ४ ॥ श्रीभव्य जिव तेच हंससम हा न्हाला मनानंदते । सम्यक्त्वावरी निश्चयासि रतला माथा तुरा हाचि ते ॥

मुक्तिचे गुण आठ रत्नसम हे ग्रीवे मणीदामते। ऐसा भव्य पुरुष हंससम हा नृत्या करी स्वच्छते ॥ ५ ॥ श्रीअर्हत्सुख निर्गतश्चवरदा भव्या जित्रा रूढली। च्यान्ही योग चतुर्भुजा रुत, विणा अमृतपात्रा धरी ॥ चौथे हस्तकिं माळ हे चतुभुजा या या परी शोभली । मुक्तिची द्युति ही सरस्वती दिसे विद्वज्जनीं वर्णिली ॥ ६ ॥ श्रीमुक्तिरमनी ज्या क्षय नसे भव्यावरी मोहिली । तिन्हे हे वरमाळ देउनि मला तूझ्या गृहीं धाडिली ॥ तीचा संग करा-वया विधी कसी पोषि असे या करी । ते तु आइक सत्वरें तनमनें वाचें विभु उच्चरी ॥ ७ ॥ तेव्हां नर्तन हा करी सीववधु पाहावया सत्वरी। तंतु वाजवि हे त्रिलोकीं सुचना भव्यास हे नोवरी ॥ मुक्तिचा पति जो घडे तससीरी अमृत सिंचीन भी । तेव्हां त्यास वरील हे शिववधु होईल ना तो श्रमी ॥ ८ ॥ ऐसी तूं

वरदायिनी मज मुखि कृपांबु घालि त्वरी। तूं बुद्धि मजलागि नित्य रतली ते जाय देशांतरी॥ तुझी स्तूति करील कोन कविते नाची दिसे मेदिनी। या लागि उगलाचि राहे ह्मणतो देवेंद्रकीर्ति मुनि॥ ९॥

॥ इति शारदामास्तवन संपूर्ण ॥ श्रीरस्तु ॥

## ॥ अथ षट्कालवर्णनं ॥

॥ छंद ॥ शार्दूलविक्रिड ॥

ज्योतिश्चक्र समान काळ फिरतो राहाट कुंभापरी। नित्ये जो भरतांतरी फिरतसे ऐरावताभीतरी॥ तो काळ द्विविधा तु जाण अवसर्पिणीहि उत्सर्पिणी। कोटाकोटि दशाब्धि काळ गणिजे द्वीकाळ तद्वीगुणी॥

छंद दोधक ॥

भरतांतरि काळ विचार जसा। नित वर्ततसे

१– हें वर्णन श्री आदिनाथ पंचकल्याणिकोत्सवांतील आहे.

फिरे ॥ अभिधान तु षट्विध ऐक बरे । २ । सुखमा सुखमादिम काळ असे । द्वितिये सुखमा अभिधान असे ॥ सुखमा दुखमा अभिधान तिजे । दुखमा सुखमा हि चतुर्थ सजे ॥ ३ ॥ दुखमा अभिधान सुपंचम हे । दुखमा दुखमा वद षष्टम हे । मनुज स्तिति उन्नति काळ समी ॥ गति वेगळी वेगळी सांगिन मी ॥ ४ ॥

॥ छंद शिखरिणी ॥

चतुःकोटाकोटी चलधि पहिला काळ गणिजे ।
त्रिपल्ये त्या काळीं स्थिति बरि नरांची हि वदिजे॥
त्रिकोशाचे उंची नर शरिर रोगा रहित जे। तिजे
घस्ती बोरा प्रमित करिती ते अशन जे ॥ ५॥

छंद ( चामर )

निहार रोग शोक वर्ज्य आर्य युग्म नांदती ॥
दश प्रकार कल्पवृक्ष गेहि गेहि राहती ॥

ऋजु स्वभावि सर्व लोक सौख्य खाणि भोगिती।
सुभोगभूमिचे सुखांत काळ ते गमाविती ॥ ६॥

॥ छंद मालिनी ॥

जनक सुत कळेना भोगभूमि नराते । प्रसवति
सुत कन्या लागुनी आयु अंते ॥ नुतन युगळ
ते एकोन पन्नास दीना । स्वय तरुणपणाते
पावती सत्य जाणा ॥ ७ ॥ तरुण युगळ
तेची कामिनी भर्तृ होती । प्रसवति युगळासी
ते पुन्हां आयु अंती ॥ मरति मग शिकीनें
जांभळी देउनिया । अनुभविति सुखासी
स्वर्गीते जाउनिया ॥ ८ ॥

॥ छंद प्रमाणिका ॥

शरीर कर्पुरापरी । जळून जाय सत्वरीं ॥ न दुःख
कोन्हि जाणती । ये आदि काळी हे रिती ॥ ९

॥ छंद शिखरिणी ॥

त्रिकोटा कोट्यब्धी द्वितीय सुखमाची स्थिति
असे ॥ नरायु द्वीपल्यें शरिर उचि कोशद्वय

असें प्रमाणे ब्याहाडे द्वितिय दिनिं आहार करिती ॥ पुढें जाणा तेथें वरकड असे आदिल रिती ॥ १० ॥

॥ शार्दूलविक्रिड ॥

कोटाकोटि समुद्र दोन तिसरें काळाचि जाणा स्थिती । पल्हा एक नरस्थिती नृतनुची क्रोशाचि ते उन्नती ॥ नित्यें भोजन आवळ्या प्रमित ते मर्त्यें करीती सदा । ऐशी हे रिति शेष जें उरलि तें पूर्वि प्रमाणें वदा ॥ ११ ॥

॥ छंद मनोरमा ॥

काळ हा तिजा सर्व भोगिला । अंति पल्य तो एक ऊरला ॥ पल्ह्यभागि त्या आठवें बरें । होति ते चतुर्दिग् मनू बरें ॥ १२ ॥

॥ छंद द्रुतविलंबित ॥

प्रतिश्रुती मनु आदिम जाणिजे । द्वितिय सन्मति तो मनु मानिजे ॥ तृतिय नाम क्षमंकर ते वदा । मग चतुर्थ क्षमंधर सौख्यदां १३

॥छंद शार्दुल विक्रीड ॥

जाला पंचम तो सिमंकर मनू सीमंधरः षष्टमा । सप्ता वा विमलादिवाहन मनू तो चक्षुमान- ष्टमा । येशस्वी नवमाभिचंद्र दशमां चंद्राभ एकादश । बारवा मरुदेव तो प्रसनाजित्तो तेरवा मन्विश ॥ १४ ॥ चौदावा मनु नाभिराज बरवा प्रख्यात जाला तवें । हा मा धिग्गिति दंड तो करितसे सर्व प्रजासी तवें ॥ कोटी पूर्व तयाचि जाण बरवी आयु स्थिति ते असे । काया ज्याचि उची धनुष्यहि सवा पाचाशताची असे ॥ १५ ॥

॥ छंद इंद्रवज्रा ॥

तया नृपाची मरुदेवि राणी । ते शीळवंती गुण रत्नखाणी ॥ साकेत नामें नगरीं सुखेशी । ते नांदती दंपति पुण्यराशी ॥ १६ ॥

# अथ चोवीस तीर्थंकर स्तुति.

छंद शार्दूलविक्रीडित.

श्रीमन्नाभिपिता जयासि जननी नामें मरुदेविते ।
चौऱ्यांशी मित लक्ष पूर्व सुखकृत् स्थिती जया देहिते ॥
[1]साकेता नगरी प्रती उपजला स्वर्ण[2] द्युती शोभला ।
चापें पंचशतें तनूच जिन हा आदिप्रभू वंदिला ॥ १ ॥
ज्याचा तात जितारि भूप विजया देवी सुमाता असे ।
लक्षे पूर्व बहात्तरी स्थिति जया चिन्हें गजाचें दिसे ॥
साडेचारशि चाप उन्नत तनू स्वर्णद्युती शोभतो ।
जन्मीला विनितापुरीं[3] अजित जो त्यालागि मी वंदितों
पीता ज्यासि असे दृढाख्य नृप तो माता सुषेणा असे ।
श्रावस्ति नगरीसी उत्पत्ति जया काया धनू चारशें ॥
षष्टीलक्ष[4] सुपूर्व संस्थिति जया स्वर्णाचि कांती दिसे ।
ऐसा संभव अश्वचिन्ह जिन जो त्याला भि वंदीतसे ।३।
ज्याला संवरभूप तात जननी सिद्धार्थ देवी असे ।
सार्धत्रशित[5] चाप उन्नत तनू स्वर्णाचि कांती दिसे ॥

---

१- अयोध्या. २- सोन्याप्रमाणें ज्याची कांति आहे.
३- अयोध्या. ४- साठ लाख. ५- साडेतीनशें धनुष्य.

पंचाशत्[1] प्रमलक्ष पूर्व जिवि जो झाला अयोध्यापुरी ।
कप्यंकी अभिनंदनेश जिन तो म्यां वंदिला सत्वरी ।४।
ज्याला मेघरथाख्य तात जननी सुमंगळा देविते ।
काया ज्याचि उची धनू त्रिशत[३००] ते स्वर्णापरी कांतिते ॥
आयू चाळिसलक्ष पूर्व हि जया सच्चक्रवाकांकि तो ।
जन्मोला विनितापुरीसि सुमति त्यालागि मी वंदितों ॥
ज्याचा तात वरूण भूपति तया माता सुसीमा असे ।
कौशांबी नगरीसी उद्भव जया आरक्त[2] कांती दिसे ।
काया उंच अडीचशे धनु तिसा लक्षाचि पूर्व स्थिती ।
पद्माचे पदि चिन्ह पद्मविभू जो वंदीन मी त्याप्रती ॥ ६ ॥
ज्याला भूपती सुप्रतिष्ठ[3] साविता[4] सावित्रि पृथ्वी असे ।
ज्याची जन्मपुरी बनारसी जया[5] पालाश कांती दिसे ।
आयु विंशति[२०] लक्ष पूर्वहि उची काया धनु दोनशे ।
स्वस्तीकांक पदीं सुपार्श्व जिन जो त्याला मी वंदीतसे ॥ ७
ज्याचा तात महादिसेन जननी सूलक्ष्मणा देविते ।
ज्याची उत्पति चंद्रपूरिसि जया चंद्रापरी कांतिते ॥
ज्याचे आयुष लक्षपूर्व दशही काया धनू दीडशें ।
तो चंद्रप्रभ चंद्राचिन्ह जिन जो त्याला मि वंदीतसे ॥ ८ ॥

१ पन्नासलक्ष पूर्व. २ लाल वर्ण. ३ पिता. ४ माता. ५ हरीत वर्ण.

पीता सुग्रिव भूपती जयरमा माता जयाची असे।
काकंदी नगरि प्रती उपजला जो श्वेतवर्णी दिसे ॥
आयू दोनसुलक्ष पूर्वहि तनू उंची धनू एकसे।
तिर्थेसि मकरांक[1] पुष्परद[2] जो त्याला मि वंदीतसे ।९।
ज्याला तात असे दृढादिरथ तो माता सुनंदा असे।
ज्याची उत्पति भिद्दिलापूरि असे स्वर्णाचि कांती दिसे ॥
काया ज्याचि उचीहि नव्वद धनू लक्षैक पूर्वस्थिती।
श्रीवृक्षांकित[3] शीतलेश जिन जो वंदीन मी त्याप्रती १०
विष्णु भूपति तात ज्यासि विमला देवी सुमाता असे।
ज्याची उत्पति सिंहपूरिसि असे स्वर्णाचि कांती दिसे ॥
चौऱ्यांसी मित लक्ष वर्ष जिविजो गात्रोच्चचापें असी।
तो श्रेयस गंडकांक[4] जिन जो म्या वंदीला मानसी ११
ज्याला श्रीवसुपूज्य भूप सविता माता जया देवि ते।
चम्पापूरिसि उत्पतीहि तनुची कांती सुवर्णाचि ते ॥
लक्षे वर्ष बहात्तरी स्थिति तनू उंची धनू सत्तरी।
अंकी माहिष[5] वासुपूज्य जिन जो वंदीन तो सत्वरी १२
पीता तो कृतवर्म ज्यासि जननी श्यामाभिधा ते सती।
कंपीला नगरीप्रती उपजला देहाचि हेमद्युती[6] ॥

---

१- मगर चिन्हानें युक्त. २. पुष्पदंत. ३. कल्पवृक्ष. ४. गेंड्याच्या लांछनानें युक्त. ५ रेडा. ६ सोन्या प्रमाणें कांति.

आयू साठि सुलक्षवर्ष तनुत साठी धनुष्यें उची।
ऐसा सूकर चिन्ह जो विमल तो म्यां वंदिला सद्रुची।
साकेतापुरि सिंहसेन नृपती पीता जयाचा असे।
सूर्यदेवि जयाप्रती जननि ते जो स्वर्ण वर्णी दिसे ॥
आयू तीससुलक्ष वर्ष तनुते पन्नास चापे उची।
सेधा[1] चिन्ह जया अनंत जिन जो तत्पादिं माझी रुची
श्रीमद्रत्नपुरीसि भानु सविता माता जया सूप्रभा ॥
पंचेचाळिस चाप उच्च तनुची स्वर्णापरी ती प्रभा।
दाहा लक्ष सुवर्ष आयुष जया वज्रांक ते पत्कजीं[2]।
ऐसा धर्मजिनेश तो निशिदिनीं माझें असो हृत्कजी[3] ॥
ज्याचा तात सुविश्वसेन जननी ऐरा जयाची असे।
काया उन्नत ज्याचि चाळिस धनू ते हेमवर्णी दिसे ॥
हस्तिनागपुरी मृगांकि[4] उपजे जो लक्ष वर्षायुषी।
ऐसा तीर्थपकाम चक्रिपदिं जो वंदीन त्या शांतिशी ॥
ज्याला श्री सुरसेन भूप सविता माता श्रीकांता असे।
हस्तीनागपुरीसि उत्पति जया हेमाभ काया दिसे ॥
ज्याची उन्नति पंचतीस धनुते छागांकि[5] तो शोभला ॥
आयूवर्ष सहस्र पंचनवती[९५] तो कुंथु म्यां वंदिला ।१७।

१- सायाळ. २- पाय हेंच कमल. ३- मनरूपी कमळ. ४-हरिण लांछनयुक्त. ५- बकऱ्याच्या लांछनानें युक्त.

ज्याचा तात सुदर्शनेश जननी ती मित्रसेना असे ॥
हस्तीनागपुरी अनंगरुपि जो चक्रेश झाला असे ॥
जो चौऱ्यांसि सहस्र वर्ष जिवि जो त्रिंशद्धनुष्योन्नती[३०]
मत्स्यांकी अरनाथ हेमनिभ जो वंदीन मी त्याप्रती। १८॥
श्रीमत्कुंभ पिता प्रभावति सती माता जयाची असे ॥
काया उन्नत [२५]पंचविंशति धनू ते स्वर्ण वर्णी दिसे ॥
ते पंचावन सत्सहस्रहि जया संवत्सराची स्थिती ।
जन्मीला मिथिले [१]घटांकी जिन त्या वंदीन मल्लीप्रती ।१९
ज्याचा तात सुमित्र भूपति असे सावित्रि पद्मावती ।
चापे वीस उची कुशाग्रपुरिसी झाली जया उत्पती ॥
आयू तीस सहस्र वर्षहि जया मेघाची [२]कांती दिसे ।
[३]कूर्मांकी मुनिसुव्रताख्य जिन जो त्याला मि वंदीतसे।
ज्यालागी वियर्यादिसेन सविता सावित्री वप्रावती ।
कायाते धनु पंधरा उचि जया शोभे सुवर्ण द्युती ॥
दाहा वर्ष सहस्र आयु मिथिला पूरी प्रती उत्पती ।
ऐसा उत्पल[४] चिन्ह धारि नमि जो वंदीन मी त्या प्रती
पीता ज्यासि असे समुद्रविजये माता शिवादेविते ।
ज्याचा देह असे दहा धनु उची वर्षं सहस्रायुते ॥

---

१- कलश चिन्हानें युक्त. २- श्यामवर्ण ३- कांसवाचें चिन्हानें युक्त. ४- निळें कमळ.

ज्याची जन्मपुरी सुरी पुरि जया मेघाचि कांती दिसे ॥
शंखाचे पदि चिन्ह नेमि जिन जो त्याला मि वंदीतसे।
ज्याला भूपति अश्वसेन सविता सावित्री वामा असे।
ज्याचें आयुशताब्द हस्तनवते उच्चत्व देहीं असे ॥
ज्याची जन्मपुरी बनारसि असे जो नीळवर्णी दिसे ॥
नागाचे पदि चिन्ह पार्श्व विभु जो त्याला मि वंदीतसे।
सिद्धार्थाभिध तात ज्यासि जननी सत्रीशला देविते।
शोभे उन्नति सप्त हस्त तनुची स्वर्णापरी कांतिते ॥
ज्याचा उद्भव कुंडलापुरि असे वर्षायु बाहात्तरी।
सिंहाचें पदि चिन्ह वीर जिन जो म्यां वंदिला सत्वरी।



# अथ ओंकार मंगलाचरण.

॥ छंद अनुष्टुप ॥

ओंकारं बिंदुसंयुक्तं । नित्यं ध्यायंति योगिनः ।
कामदं मोक्षदं चैव । ओंकाराय नमो नमः ॥१॥

॥ छंद भुजंगप्रयात ॥

महावीर देवासि निर्वाण झालें । तयानंतरें केवळी तीन झाले ॥ मुनी गौतमादी सुधर्माख्य जंबू । तया वंदिता स्वल्प होये भवांबू ॥ २ ॥

॥ छंद वसंततिलका ॥

श्रीविष्णुनंदि अपराजित मित्रयोगी । वंदीतसे मि श्रुत केवळीशी प्रसंगीं ॥ गोवर्धनाख्यमुनि-नायक भद्रबाहो । वंदीतसे मि दश पूर्वधरा प्रतीहो ॥ ३ ॥ सत्प्रोष्ठिलाख्य जयसौख्य सुनागसेन । सिद्धार्थ बुद्धिलि विशाख्य सुध-र्मसेन ॥ श्रीगंगदेव विजये धृतिषेण क्षेत्रीं । एकादशांगधर हे नमितो सुमंत्री ॥ ४ ॥ नक्षत्र पांडु जयपालक कंसयोगी । श्रीभद्रबाहु

ध्रुवसेन सुभद्रयोगी ॥ लोहाख्यसूरियशभद्र· मुनीश्वरासी। वंदीतसे मि जिनसेनपुरस्सराशी ५

॥ छंद भुजंगप्रयात ॥

साक्षाद्विदेहस्थ जिनेश्वराला। जावोनि ज्यान्हें प्रणिपात केला॥ त्या कुंदकुंदाख्य कवी- श्वराशी। मी वंदितों ज्ञानविभाकराशी ॥ ६ ॥ ज्याची कलंकातित शुद्ध वाचा ॥ ज्या वाग्- बळें खुंटलि बौद्धवाचा ॥ झाला कवी जो अकलंक नामा । त्याचे पदासी करितो प्रणामा ॥ ७ ॥ ज्याची समंताश्रित भद्रवाणी। मिथ्यात्वनीवारक धर्मखाणी ॥ स्वयंभु संस्तावक सत्कवींद्रा । मी वंदितों त्याचि समंतभद्रा ॥८॥ गुरू नेमिचंद्राख्य विद्यादिनंदी । प्रभाचंद्र आणी मुनी पद्मनंदी ॥ कवी श्रेष्ठ हे ग्रंथकर्ते विशेषी। नमस्कारितो मी तयांचे पदासी ॥९॥

॥ छंद वसंततिलका ॥

ज्ञानार्णवादि कथिता शुभचंद्र वाग्मी। त्याचे

पदाब्जयुगला प्रति वंदितो मी ॥ ज्याची बहू
सुगम संस्कृत आगमोक्ती । तो वंदिला सकल
कीर्ति सुबोधमूर्ती ॥ १० ॥

॥ भुजंगप्रयात ॥

बलात्कार कालोग्रसेनाख्यदेशीं । चतुर्धांगणा-
श्रीत जे ज्ञानराशी ॥ कवी होत आले सुधर्म
प्रकाशी । नमस्कारितो मी तयाचे पदासी ११
झाला कवी जो श्रुतपारगामी । चारित्रधारी
स्थिर आत्मकामीं ॥ ज्याचे प्रसादें मति
लाधलों मी । त्या शुक्रकीर्ति प्रति वंदितों मी॥

॥ छंद वसंततिलका ॥

ज्याहा प्रती त्रिजग सर्वहि वंदिताहे। ते देव
शास्त्र गुरु म्यां कवि वंदिले हे ॥ हे मंगलाप्रती
करीत असोत सर्वे । या कीर्तनीं अशुभ विघ्न
हरोत सर्वे ॥ १२ ॥

॥ छंद मालिनी ॥

सुकृतचयविकाशी मोक्षमार्गप्रकाशी । सकल-

सुगुणराशी पापमिथ्यात्वनाशी ॥ कुनयकुमतिहारी सर्वकल्याणकारी । जिनकथित कथा हे भव्यसंबोधकारी ॥ १४ ॥

॥ छंद वसंततिलका ॥

सर्वज्ञ तो प्रथम मूळ कथेसि कर्ता । त्या उत्तरासि कथिता गणनाथ वेत्ता ॥ कर्ता प्रती गणपती प्रति उत्तरातें । त्यानंतरें कविजनें कथिली कथातें ॥ १५ ॥ व्याख्यान हें वदत पूर्व कथानुसारें । श्रोते तुम्ही श्रवण हे करिजे विचारें ॥ सर्व जनाहि मन सावध तें करावें । जिनादि पंचपरमेष्ठि मुखीं वदावें ॥ १६ ॥

* ॐ नमः सिद्धेभ्यः *

# ॥ आदित्यवारव्रतकथा ॥

उपजाति.

वंदोनिया पार्श्वविभू पदाला ।
त्यानंतरे वंदुनि शारदाला ॥
वंदोनि भावें गुरुपादुकाला ।
रवीकथा सांगिन भाविकाला ॥ १ ॥

॥ शार्दूलविक्रीडित ॥

काशीदेश बरा तयांत नगरी वाणारशी शोभली ।
तेथीचा महिपाल नाम नृपती नीती जयाची भली ॥
श्रेष्ठी तो मतिसागराख्य वसतो कोटीध्वजाचा धनी ।
त्याची स्त्री गुणसुंदरी मन तिचें सद्धर्मआराधनी ॥ २॥

॥ स्वागता ॥

सप्त आत्मज तिचे उदराशी, षट्सुतासि वनिता गुणराशी
सातव्या गुणधरा लघुबाळा, ज्ञान व्युत्पति विवेक विशाळा

॥ इंद्रवज्रा ॥

आला गुणाब्धी मुनि तो वनासी ।
ऐकोनि राजा सकळां जनांसीं ॥

जावोनिया सद्गुरु वंदिलासे ।
सद्धर्मवृद्धी मुनि बोलिलासे ॥ ४ ॥

॥ द्रुतविलंबित ॥

धर्म ऐकुनि तवे गुणसुंदरी, हस्त जोडुनि वदे महतादरीं ।
कोऽ. एक मजला व्रत देइजे, तो वदे मुनि रविव्रत घेइजे ॥

॥ इंद्रवज्रा ॥

आषाढ शुक्लांतिम पासुनीया ।
नवार्कवारा करि मोजुनीया ॥
पंचामृताचे स्नपनें करीजे ।
पार्श्वप्रभूपूजन तें करीजे ॥ ६ ॥

॥ वसंततिलका ॥

गोधूमपिष्ट फलसंयुत दीपिकातें ।
अर्ची वरें पढुनिया जयमालिकातें ॥
हे अर्चना नवहि वर्ष करी व्रताची ।
आरंभ उद्यम मती त्यज दुष्कृताची ॥ ७ ॥
आद्ये संवत्सरि उपोषण ते करीजे ।
अंबील घे लवण वर्जुनि दूसरी जे ॥
संवत्सरीं तृतिय एकलठान युक्ती ।
भावे चतुर्थविधि हे करि कांजिभुक्ती ॥ ८ ॥
घे तक्रभात बरवा विधिपंचमीतें ।
एकासनें लवणवर्जित षष्ठमीतें ॥

भुक्ती करी त्यजुनि गोरस सातवीतें ।
शुष्कान्न भक्षि विधि हे करि आठवीतें ॥९॥
एकासनासि करणें नवमी विधी हे ।
ऐसें करी तु नववत्सर सारथी हे ॥
आणीक एक विधि लागत अर्कवारीं ।
एकाशिती करि उपोषण दुर्भवारी ॥१०॥
भक्षी अलोनि अथवा करि एकठाना ।
एकाशिती फळ नवा घरिं देइ दाना ॥
उद्यापनासि करणें व्रतपूर्ण जेव्हां ।
तें पंचरंगि करि मंडळ तूर्ण तेव्हां ॥ ११ ॥
वार्गंध पुष्प बहुधा चरु सत्फळानें ।
द्रव्याष्टधा करि तु अर्चन निर्मळानें ॥
आणोनिया नवनवा उपकर्णकातें ।
मंत्रोक्त पूजन करी जिनपादुकातें ॥ १२ ॥

॥ इंद्रवज्रा ॥

मानोनिया संघ चतुर्विधातें ।
सत्पात्रिं दे दान चतुर्विधातें ॥
सांगीतलें याहुनि फार कीजे ।
शक्ती नसे तो व्रत दून कीजे ॥ १३ ॥
ते सुंदरी हे विधि ऐकुनीया ।
सांगे स्वगेहाप्रति येउनीया ॥

श्रेष्ठी जुगुप्सा करि त्या व्रताची ।
झाली तदा प्राप्ति दरिद्रताची ॥ १४ ॥
दरिद्रदुःखें सुत पीडिताती ।
मातापित्यालागुनि पूसताती ॥
जाओनि आह्मी परदेश पाहूं ।
पोटार्थ पूरे तया गांवि राहूं ॥ १५ ॥
ऐसें पुसोनी सुत ते निघाले ।
कलत्र तें घेउनि आपुलालें ॥
साकेतनामें नगरासि आले ।
जिनादिदत्ता--गृहिं राहिजेले ॥ १६ ॥
कुक्षी भरीती सुत त्या स्थळासी ।
हे तो कथा राहिलि या स्थळासी ॥
वाणारसीसी मुनिराज आला ।
वंदोनि माता पुसिती तयाला ॥ १७ ॥
म्यां कोणतें पाप गरिष्ट केलें ।
हें सांगणें कां मज दुःख झालें ॥
योगी वदे सद्व्रत निंदनानें ।
दरिद्र आलें तुज दुष्कृतानें ॥ १८ ॥
॥ वसंततिलका ॥
घेऊनिया रविव्रता विधियुक्त केलें ।
तेणेंकरोनि धन पूर्ण घरासि आलें ॥

ते सप्तबंधु वसती वधुयुक्त जेथें ।
कष्टें करोनि भरिती उदरासि तेथें ॥ १९ ॥

॥ मालिनी ॥

गुणधर वनिं गेला मेळवीलें तृणाला ।
विसरुनि वनिं दंता भार आणी घराला ॥
क्षुधित वदनिं मागे भोजनालागि देई ।
अनुजवधु वदे तैं दंत घेओनि येई ॥ २० ॥
फिरुनि गहनिं पाहे वेष्टिला दंत नागें ।
विनवि अहिवरासी हस्त जोडोनि मागें ॥
जिनभजन करी तो त्रासुनीया स्वकर्मा ।
वदत तव तयासी येऊनी देवि पद्मा ॥२१॥

॥ वसंततिलका ॥

घे स्वर्णदंत मणिहारहि पार्श्वबिंबा ।
भावें पदार्चन करी न करी विलंबा ॥
घेओनि ते तंव कुमार घरासि आला ।
ते मानिती सकळ बंधु विशेष त्याला ॥२२॥
झाले धनाढ्य करुनी जिनधाम सुष्टा ।
श्रीसंघयुक्त करिती यजनप्रतिष्ठा ॥
पाचारुनी नृप तया पुसितो तदा हे ।
कोठें तुम्हांसि धन सांपडलें वदा हें ॥२३॥

॥ मालिनी ॥

सकलगुणधरानें व्यक्त केलें नृपासी ।
 नृपति तव वदे त्या धन्य तूं पुण्यराशी ॥
मग सुगुणधरासी दीलि कन्या नृपानें ।
 स्वजन मिळवुनी तें लग्न केलें विधिनें ॥२४॥
वसन भुषण लक्ष्मी दीधली दासदासी ।
 कितिक दिवस तेथें राहुनीया नृपासी ॥
पुसुनि तव निघाले पितृगांवासि गेले ।
 स्वजनकजननींचे पादपद्मा नमीलें ॥२५॥
द्विगुण धन व्रतानें प्राप्त झालें तयासी ।
 उजवनि मग केली पूर्ण होतां व्रतासी ॥
बहुत यश जयाचें व्यापिलें मेदिनीसी ।
 व्रत शिल तप दानें पावले स्वर्गवासी ॥२६॥

॥ स्वागता ॥

त्या स्थळीं सुख भोगुनि भक्तिसी ।
 जाति दोत्रिभवाप्रति मुक्तिसी ॥
शक्रकीर्ति गुरू मज भेटला ।
 तो कृपा करुनी वदवी मला ॥ २७ ॥
हे कथा महती-जलधी वदे ।
 ऐकितां सुजना सुख ठाव दे ॥
आग्रहा करि पूतळसंघवी ।

त्यास्तवें काथिली अतिलाघवी ॥ २८ ॥
रिद्धिपूरि शिवांगजधामनी ।
* शाक [३]वन्हि [२]यमाद्रि[७] निशामणी[१] ॥
मास भाद्रव शुक्ल सुपंचमी ।
अर्कवारिं कथा करि पूर्ण मी ॥ २९ ॥

इति श्री रविवारव्रतकथा संपूर्ण.



* शके १७२३.

# ॥ अथ दशलक्षणीव्रतकथा ॥

॥ ओवी ॥

जय जयाजी जिननाथमणी। वर्धमान तूं त्रैलोक्य धनी।
समवशरणीं अनंत कीरणी। ज्ञानतरणी उगवला ॥१॥
नमन जिनवदजा जननी। अर्थशब्द रत्नाची खानी।
निर्थकशब्द ज्ञानरसनी। बुद्धिदायिनी वदवी तूं ॥२॥
नमन माझें मुनिवरा। चवदाशें त्रिपण गणधरा॥
मनःपर्ययज्ञानी परिकरा। जेवि सहस्त्र करा उद्योत ॥३॥
आतां नमु स्वगुरुसमर्था। तुह्मि ज्ञाते कृत्स्न पदार्था॥
मज कृपा कीजे अनाथनाथा। ज्ञानदाता व्हावेजी ॥४॥
दशलक्षणीव्रत थोर। त्याची कथा जेवि मानसरोवर॥
श्रोते हो तुह्मि राजहंस चतुर। मुक्ताहार करावा ॥५॥
उघडोनिया श्रवणद्वार। सारशब्द हाची करा मुक्ताहार॥
तेन्हें संतुष्ट हृदयमंदीर। क्षुधा दुस्तर पळवावी ॥६॥
तेवि कथा हे सुखकार। विपळ कथितो इचा प्रकार॥
श्रोते भाविक व्हावे सादर। गिरा मधुर ऐकावी ॥७॥
जंबूद्वीपामाजीं भरतक्षेत्र। त्यांत देश मगध पवित्र॥
तत्संबधि राजगृह विचित्र। महानगर शोभले ॥ ८ ॥
तेथिचा श्रेणिक नृपती। तयाचि चेलना नामें युवति॥
रूप सौभाग्य जेवि रती। कि जैसि भारती ज्ञानवंत ॥९॥

ऐसी ते शीळवंत दमिनी। काम कुंभि विध्वंशनी ॥ जिनधर्म आचरे निशिदिनीं। समकित मनी आल्हाद ॥ दान पूजा तप भावना। निशि दिवा भाविति अंतःकरणा चेतउनि सम्यक्त्व हुताशना। मिथ्यात्वकानना जाळिती यापरी नृप आणि चेलना युगळ, धर्मन्यायें राज्य कारिति निर्मळ ॥ पूजाते रक्षिति जेवि आत्मबाळ। कारि निमुळें दुष्टाचें ॥१२॥ एके दिनीं नृपसभागारी। वनरक्षक आला तये अवसरीं ॥ पुष्पफळ नानापरी। घेऊनि स्वकरी आला हो ॥१३॥ नृपासन्निध उभा राहुनी। पुष्पें फळें पुढें ठेऊनि ॥ वनमाळीं नृपाते नमस्कारुनी। वृत्तांत वचनी सांगतसे ॥१४॥ आहो नृपा विपुळाद्रि नगावरी समवशरण आगमन परी॥ केलीं महावीर तीर्थंकरी। तेन्हें गीरि शोभला ॥१५॥ ऐकितां वनरक्षक शब्द। श्रेणिका हृदयीं दाटला आनंद ॥ चातका जेवि प्राप्त घण बिंद ॥ तेवि आनंद नृपाला ॥ १६ ॥ तव वन रक्षका कारण। देउनी पंचांग प्रावर्ण ॥ सप्त पांड पुढें जाउन। परोक्षवंदन केलें हो ॥१७॥ मग आनंदभेरि देउनी। राजा चालिला सहपरिवार जनीं ॥ एउनीया समवशरणीं। त्रैलोक्याग्रमणी वंदिला ॥१८॥ मग मानव कोष्टकाभीतरी। श्रेणिक बैसला ते अवसरी॥ तत्व पदार्थ वस्तु सुवरी। श्रवणमंदिरीं ठेविल्या ॥ १९ ॥

मग जोडोनिया द्वय पाणी, विनवितसे स्वामी लागुनी ॥
ज्ञानधारका कथा सांगावि रसनी, दशलाक्षणी धर्माची ॥
कवने प्रेरिले धर्मव्रत बीज। दशशाखाचा वृक्ष सहज ॥
कवने वाढविला आत्मकाज। कवन त्याज फळप्राप्ति ॥
ऐसा सर्वसभादर्शित प्रश्न केला, समस्तासि आनंद जाला
मग वीर जिन मधुर बोलिला। ऐका नृपाळा श्रेणिका ॥
धर्ममद शंखादिया सहित। कवने वाढविला आत्महीत ॥
काय कवना फळ जालें प्राप्त। तो कथावृत्तांत सांगतों ॥
धातकीखंडा भीतरीं। विशाळ नामें नगरी ॥
नृप प्रियंकर जेवि वज्री। अमरपुरीं नांदतो ॥२४॥
प्रियंकरा नामें नृपांगना। स्वरूपे जेवि सुरांगना ॥
कीं त्रिपुर रिपुची अंगना। तेवि दामिना नृपाचि ॥२५॥
ऐसे प्रियंकर आणि प्रियंकरा। दोघे नांदति पुण्यानुसारा ॥
अमोलवस्तु द्रव्यभांडारा। गाणित प्रकारा नसेचि ॥२६॥
जिनधर्म कारिति प्रचुर। जो त्रिभुवनामाजि सार ॥
आनि दया सर्व जीवावर। परमार्थि तत्पर दोघेहि २७
या दोघाचिया पासुनी। मृगांकलेखा नामें नंदिनी ॥
जालि स्वरूपें सद्गुनी। सौभाग्यखानि कन्याते ॥२८॥
आणि मतिशेखर नामें नृपमंत्री, शशिप्रभा नामें तयाची स्त्री
कमळशेना नामें तत्पुत्री। इंद्रवक्त्री जन्मली ॥२९॥
गुणशेखर नामें श्रेष्ठी। त्याचि वधु शीळप्रभा गोरटी ॥

कन्या झाली तिचे पोटीं। मदनवगो नाम ठेविलें ॥३०॥
तेच नगरीं विशाळ। वसे लक्ष भद्रतराळ ॥
तद्वधु चंद्रवदना गुणमाळ। स्वरूप सरळ तियेचें ॥३१॥
तिचे कुसि कन्या जालि सकुमार। रोहिनी नामें सुंदर ॥
ऐशा ह्याच्या द्विकुमारि चतुर। स्नेहें तत्पर एकचि ।३२।
धर्मावरी प्रीति थोर। समकीत पाळिति सार ॥
व्रतनिगम दृढतर। मंत्र नवकार गणिति त्या ॥३३॥
एकाठायीं विद्याभ्यास। चवघिहि केला हव्यास ॥
तव आला वसंतमास। वन विशेष शोभलें ॥३४॥
विटपी तें आलें पुष्पफळ। सुगंध महके परिमळ ॥
झुंकार करिति अळिकुळ। स्वर कोकिळ बोभाति ॥३५॥
नानाशब्दें पक्षि बोलती। नानापरी शिखि नृत्य करिति
ययापरि अटव्य शोभति। संतोष चित्तिं पहातां ॥३६॥
तव चवघीहि त्या कुमारी। निज सवितासि पृच्छा करि।
क्रिडा करावया वनांतरीं। आज्ञा वैखरी वदावि ॥३७॥
ऐस्या जनकासि पुसुनी। सखि समुह मिळोनि ॥
क्रिडार्थी गमन केलें वनीं। हर्ष मनीं अतिथोर ॥३८॥
सुस्वर गायन करिती। नृत्य सह हावभाव दाविति ॥
क्षणेक डोह्यारि यांत बैसती। नाना क्रिडति कन्यका ॥
अनेक क्रिडा करूनी। पहावया निघाल्या वनीं ॥
तव वृक्षातळिं देखिला मुनी। तपतरणी आगळा ।४०।

तो वसंतसेन नामें ऋषि । समकीत ज्ञान चारित्र संस्सी ।
धर्मधुरंधर शीळ विशेषी । आत्मध्यानासी आरूढ ।४१।
ऐसा तपस्वी देखुनी । कन्यका हर्षित मनीं ॥
मग नमोस्तु त्रिशुद्ध करुनी, धर्मश्रवणीं बैसिल्या ।।४२।।
जोडोनिया द्वेपाणी । कुमारि करिती प्रश्न रसनीं ॥
स्त्रीलिंगछेद जेन्हें करुनी । ते व्रतश्रवणीं सांगावें ।।४३।।
तव मधुरगिरा मुनिवर । वदता झाला कृपासागर ।
दशलाक्षणीव्रत प्रकार । उपमा थोर जयाचि ।४४।।
हें व्रत सर्वांत श्रेष्ठ । प्राप्ती मनवांछित फळ इष्ट ॥
यन्हें हरति भवाब्धिकष्ट । स्वर्ग निकट यन्हें व्रते ।।४५।।
कुमारि म्हणे ऋषि दयाळा, हे व्रतविधि कथिजे निर्मळा।।
तव मुनि वदे रसाळा । ऐका विचक्षा नंदिनी ।।४६।।
उत्तम भाद्रवमास । स्वेत पक्षे पंचमी दिवस ॥
तद्दिनि ह्या व्रताचा हर्ष, चित्तिं विशेष धोजावा ।४७।
जाउनि जिननिकेतनीं । कुंकुम सडे घालुनी ॥
मौक्तिके चौक भरुनी । शोभा बरवि करावी ।४८।
स्थापावे चतुर्विंशतिजिन, मग यंत्र आणावें स्वर्णादि करुन
त्यावरि दश पंकोळिका काढुन । मध्य दशगुण लिहावे ॥
ते कथितो दशगुण । कर्णी ठेवा यत्नें करुण ॥
प्रथम उत्तम क्षमा लक्षण । दुजे मार्दव जानिजे ।।५०।।
तिजे आर्जव मनीं आनावें । चौथें सत्य वदावें ॥

पांचवें शौच पाळावें । षष्टम जाणावें संयम ॥५१॥
सातवें तप लक्षण । आठवे त्याग जाण ॥
नवमे गुण आकिंचन । ब्रह्मचर्य जाण दहावा ॥५२॥
दश पंकोळिका भीतरीं । हे दशलक्षण स्थापन करी ॥
प्रदक्षणा देऊनि सुपरी । अष्टप्रकारी पूजावें ॥५३॥ आदि पूजावा जिनवर । भावसहित दृढतर ॥ मग शास्त्र पूजावें सादर । यंत्र नंतर पूजावे ॥५४॥ अष्टद्रव्य आनुन । जळ गंधाक्षत सुमन ॥ नैवेद्य दीपधूप फलजान । मंत्रोच्चारण करावे ॥५५॥ पुष्पांजली जाप जयमाला । भावे पढाव्या निर्मळा । देवळ मंगळ गितनृत्य कळा । उत्सव सबळा करावा ॥५६॥ एकांतर उपवास । शीळ पाळावे विशेष ॥ सचित्त वस्तु त्यागास । दुरि आरंभास करावे ॥ ५७ ॥ वस्तुचि संख्या करि। राग द्वेष डंभ परिहरी ॥ तोडाव्या कषाय च्यारही । तन मन वैखरी शुद्ध करावी ।५८। धर्मध्यानीं यथापरी । तुह्मि व्रत पुजावें सुंदरी ॥ दश वर्ष पर्यंत सुपरी । मग उजवन वरी करावी ॥ ॥ ५९ ॥ विधि ऐक उद्यापणाची जिनगृही अभिशेक करावा शुची ॥

वान अनावि दश दश परिची, दश खाजे दशाचि मोदक।
ऐसें दश परिचे पक्कान्न । नारि केळादि फळ दश गुण ॥
दश दश आणावें उपकर्ण, घंटा तोरण जंगट पै ॥६१॥
कळश भृंगारी विशाल । पिंग।.नि चंद्रोपकर गुणमाळ ॥
चमर ध्वजा सुतारिका भामंडळ, दश दश निर्मळ आनावें
कत्र.ळि आनि पुस्तक । जपमाळादि वस्तु अनेक ॥
आरती आणि धूपारति दशक, चंदन चोख आनावें ६३
ऐसा दश दश प्रकार । मिळवावा सर्व विस्तार ॥
हें न घडे तरि विधि सत्वर । शक्तिसार करावी ॥६४॥
श्रीसंघसहित करावें पूजन। ऐसे परि हे विधिपूर्ण ॥
ऐकुनी दुहिता हर्षवदन, व्रत जान घेतले ॥६५॥
मग आल्या स्वगृहाप्रती । व्रत केलें यथायुक्ति ॥
उद्यापन केलें सारशक्ती धर्मचित्ति वानला ॥६६॥
ऐसा कीतिक दीन धर्मसंयोग, भोगिला मनवांछित सुख-
भोग ॥ मग साधिले समाधिमरण योग । तेन्ह स्त्रीलिंग
छेदिलें ॥६७॥ महाशुक्रनामें त्रिदिव । तेथें चवघेहि
जाले महद्धिक देव। स्वरूप आनि दिव्य वैभव। पुन्या-
स्तव अवतरेल ॥६८॥ अमरगिरि नामें प्रथम ॥ दुजा
अमरचुल नाम ॥ तृतीय देवप्रभ उत्तम । पद्मसारथी
नामें चवथा पै ॥६९॥ देवि सहित अपार । सुख
भोगिति अमर ॥ विमानिं बैसुनि जिनवर । मुनि गण-

धर वंदिति ।७०। अकृत्रिम जिनसदन ॥ यात्रा करिती भावें स्वमन । बहुत काळ स्वर्गसुख भोगुन। मग तेथुन चविन्नले ।७१। माळव देशा माझारीं । उज्जनि नामें नगरी। थूळभद्र नृप राज्य करी ॥ लक्ष्मीमती नारी तयाचि ।७२। रूप सुंदर सौभाग्य। उभयता जिन-धर्म करिति संयोग्य । जीवदया चित्तानुरागें । समता वेगें पाळिति ।७३॥ या राणीचि उदरीं ते देव अवतरले च्यान्ही । प्रथम पूर्ण कुमर रुपरी। नाम स्वर्वेश्वरी ठेविले ॥७४॥ द्वितीय देवराज जयवंत। तृतीय गुण-चंद्र नामें सुत ॥ चवथा पद्मकुमार विख्यात। चवघे स्वरूपवंत शोभती ।७५। विनयसहित जिनधर्म करीति। न्हवन पूजासह भावभक्ति ॥ स्तवन स्तोत्र नाना युक्ति । सद्धर्मि वस्ति ज्याहाची ॥७६॥ तव नंदन नगरिचा नरेश। हून राजा नामें प्रतापविशेष॥ तिलकसुंदरी जाया तयास। धर्म सरस करिती ते ॥७७॥ तिचे उदरीं चव-घिहि दुहिता। जन्मल्या अतिरूपवंता॥ कमळावती नामें प्रथमता। ब्राह्मी दुहिता दुजि पै ॥७८॥ तृतीय कुवारी जेवी इंदुवगात्री। कुंकुनामें चवथी पुत्री॥ त्या चवघे अनुजे विवेकसूत्री। कुरंगनेत्रीं परणिल्या॥ मग पुण्यानुक्रमें सुख भोगितां। थूलभद्रा वैराग्य जालें चित्ता॥ आकाश पटळ मेघदर्शिता। अथीर तत्वतां

देखिलें ॥८०॥ नृप ह्मणे जेवि हा बळाहक । तेवि हें राज्यसंपदा कौतुक ॥ सैंधव द्विरद रथ अनेक ॥ संसार-सुख अथीर हे ॥८१॥ धन कन कंदर्प हे जेवि अभ्र । ऐसे जाणुनीया धूळभद्र ॥ दिक्षा घेउनी योगींद्र । जाला सत्वर आत्मकाज ॥८२॥ मग ते त्यान्हीहि पुत्र । राज्य करिती स्वतंत्र ॥ जिनधर्म आचारिति पवित्र । नवकार मंत्र गुणिती ते ॥८३॥ धर्मफळें राज्यवैभव । गज तुरंग सिबिका स्वमेव ॥ गृहिं जाले पुत्रोद्भव । बहुत उत्सव तव केला ॥८४॥ ऐसे कितिक दिवस उदारपने । राज्य भोगिले नितिनें ॥ मग संसार अथिर जाणुन । वैराग्य मनिं उद्भवला ॥८५॥ शाळभद्र गुरु-पासी । जाउनी घेतले संयमासी ॥ त्यान्हीहि बंधु तापसी । एके सरसे जाले पैं ॥८६॥ गुरुपासि करिति ज्ञानपठन । जप तप संयमध्यान ॥ ध्यानबळें केलें कर्मखंडन केवलज्ञान उपजले ॥८७॥ जाले प्रकाश ज्ञानकेवळी । तेन्हें लोकालोक भासति सकळी ॥ उपमा न साहे कोट्यार्कमेळी । जेवि होळि खद्योत ॥८८॥ हृदइ उगवले ज्ञान चंडांश । विहार करिति देश विदेश ॥ भव्य जीवातें देति उपदेश । धर्म प्रकाश करिति ॥८९॥ शुक्लध्यानीं लाउनी मन । समाधिमरण साधुन ॥ अष्ट कर्मा वेगळे होऊन । मुक्ति दामिन परणिली ॥९०॥

सिद्ध जाले वसु गुणवंत । अनंत सौख्य भोगिति विषया रहित । माया काया विकार वर्जीत । ऐसे स्वरूप प्राप्त व्रत फळे ॥९१॥ म्हनुनि व्रत दशलाक्षणी । आचरावें समस्त जनीं ॥ जेन्हे होय सुखाचि खानी । त्रिभुवन तारणी हें व्रत ।९२। कुंदकुंदान्वय जिनजागछपति । पट्टाचार्य देवेंद्रकीर्ति ॥ तच्छिष्य बहु अल्पमति । ब्रह्ममहतिसागर ॥९३॥ गुरुकृपें केली कथा उक्ती । श्रोते कराचि श्रवणयुक्ति ॥ तेन्हें सर्व दोषाघ हरती । परि निर्वृत्ति लाधे पै ।९४॥

॥ इति श्री दशलक्षणीव्रतकथा समाप्त. ॥



# ॥ अथ रत्नत्रयव्रतकथा ॥

॥ छंद द्रुतविलंबित ॥

जिनमनीं नमनीं भज मल्लिहा ।
विगति कुगति कुंभज मल्लि हा ॥
भजिन जे जिनजे प्रति अंतरीं ।
अकळजे कळजे तिस तंतरी ॥१॥
मग नमूं गणमूनिहि सर्वही ।
गुरुपदीं रुपदी सति सर्वही ॥
तव दया वदया त्रिमणीं कथा ।
श्रवणिं ते वनि ते नृधरा कथा ॥२॥

॥ छंद मनोरमा ॥

जंबुनाम हे द्वीपजे भले ।
प्राग्विदेह तें क्षेत्र शोभलें ॥
कच्छ देश तो धार्मिकी वसे ।
त्यांत वीत शोकापुरि त्रसे ॥३॥

॥ छंद इंद्रवज्रा ॥

तेथील तो वैश्रवण क्षितीशि ।
धर्मार्थिं तेन्हें हरिला रतीश ॥
न्यायी बळी सर्व नृपांत मानी ।
रक्षी प्रजा आत्मसुतासमानि ॥ ४ ॥

एक वेळ नृप जाय वनाला ।
योगि वंदुनि करि स्तवनाला ॥
सद्व्रता कथि ह्मणे श्रवणाला ।
तो मुनी वदत वेश्रवनाला ॥ ५ ॥

॥ छंद वसंततिलका ॥

ऐके नृपा मि तुज सांगतसे व्रतासी ।
रत्नत्रया सह विधी करि सद्व्रतासी ॥
तो शुक्ल भाद्रपदमास सुबारसीते ।
एकासने तु करि हर्षित वेरसीते ॥ ६ ॥
यानंतरे त्रिउपवास बरें करावें ।
आरंभजे सदनि उद्यम ते हरावे ॥
श्रीमज्जिनस्नपन ते प्रथमे करजि ।
अष्टांग दर्शन पुजा मग ते करीजे ॥७॥
ते मोक्ष वृक्ष बिज दर्शन साक्ष आहे ।
तीर्थंकरादि पद पावन सौख्य आहे ॥
ज्या दर्शनें करुनि भूषित मानवी तो ।
ते मुक्तिवेग करुणी वरि मानवी तो ॥८॥
शंकादि दोष हरुनी प्रथमा गुणासी ।
पूजा निशंकित करी हत दुर्गुणासी ॥
निःकांक्षित यज दुजे त्यज भोगकांक्षा ॥
धर्मार्थकारण गुणास्तव ठेवि कांक्षा ॥९॥

निर्विचिकिच्छित तिजे हरुनी चिकित्सा ।
  रुग्मुक्त देखुनि [1]मनीं न करी चिकित्सा ॥
यानंतर गुण चतुर्थ अमूढत्व टाकी ।
  असत्य देव गुरु शास्त्र सुभावटाकी ॥१०॥
आच्छादनेंसु जिनशासनीं दोषसारा ।
  हा पांचवा गुणकरी करुणा पसारा ॥
मिथ्यात्व बुद्धि कुतपादिक दुष्ट माहा ।
  त्यातें सुबुद्धि करणें गुण षष्ट माहा ॥११॥
साधर्मि जाणुनि जिवा प्रितियुक्त होई ।
  वात्सल्य सप्तम गुणा प्रतियुक्त होई ॥
शास्त्रादि दान तप पूजन गीत व्याख्या ।
  हा आठवा गुणकरी प्रगटार्थ व्याख्या ॥१२॥

॥ छंद स्वागता ॥

दर्शनाष्ट विध हे पूजने त्या ।
  ज्ञान अष्ट मग ते पूजने त्या ॥
ज्ञान ते प्रकटि लोक अलोके ।
  ज्ञान लोचनिं सदा अवलोके ॥१३॥
आत्मभू वदनिं उद्भवले जे ।
  सुष्ट दुष्ट प्रथ जानवले जे ॥

---

१- 'मुनि' असाही पाठ आहे.

द्रव्य तत्वपद अर्थविचारा ।
यासि नित्य पठिजे सुविचारा ॥१४॥
व्यंजनासह सुवर्ण वदीजे ।
शुद्ध हा प्रथम अंग वदीजे ॥
सर्व अर्थ सह शास्त्र पढीजे ।
हा दुजा गुणसु अर्थ पढीजे ॥ १५ ॥
शब्द अर्थ उभये सहभाषी ।
हा तिजा गुण तु उत्तम भाषी ॥
टाळिजे ति अवकाळ पढीता ।
तुर्य अंग धरि शास्त्र पढीता ॥ १६॥
नेमयुक्त पढिजे जिनवाचा ।
पांचवा गुणकरी शुभ वाचा ॥
षष्टमे विनययुक्त बसावें ।
शुद्धशास्त्र मग तें परिसावें ॥१७॥
सातवें सिकवि जो गुरुपाठा ।
कीर्ति त्याची वदने मुखपाठा ॥
पुस्तकासि बहुमान करावा ।
आठवा गुण सुभक्ति करावा ॥१८॥
॥ छंद मालिनी ॥
वसुविध यजने हे ज्ञान जे अंगयाचें ।
यज मग गुण तेरा शुद्ध चारित्र याचें ॥

प्रकटित इहलोकीं देवलोकीं न लाभे ॥
नर दृढ धारि त्याला पाळिता मुक्ति लाभे ॥१९॥
जिनवर मुनिमुख्ये आदरीले तयासी ।
दृढतर तु भवाब्धी मध्य हे पोतयासी ॥
प्रथमगुण अहिंसा रक्षिजे जीवजाती ।
द्वितियगुण सुसत्ये पाळितां पापजाती ।२०।
तृतिय गुण अचोरी सांडिजे तस्करजि ।
शिळ गुण चवथा हा ब्रह्मचर्या धरीजे ॥
कलुश हरण ऐसे ग्रंथ ते दूर टाकी ।
व्रत करि दृढ मोठें पंचमे लोभ टाकी ॥२१॥
अचळ धारि मनातें ध्यानसंयुक्त होइ ।
कुवचन दुर सांडी मौन्यसंयुक्त होइ ॥
अति परिसह होतां गोप्यकायास रक्षी ।
दृढ मनिं यज ऐस्या ह्या त्रिधा गुप्ति रक्षी ॥
मग शुभ समितीच्या पंच अंगा पूजावें ।
प्रथम समिति ईर्या पंथ शोधीत जावें ॥
द्वितिय समिति भाषा बोलिजे शुद्ध वानी ।
दुषन रहित घेई प्राशुकाहार पानि ॥२३॥
तृतिय समिति हेची एषणानाम आहे ।
चवथि समिति ते आदानानिक्षेप नाहे ॥
स्त्रनिकट उपकर्णा पाळि शौचा निमित्ये ।

समिति धारि तु अंति हे प्रतिष्टापनाते ॥२४॥

॥ छंद जविन ॥

यापरी त्रिरत्न हे त्रिलोकिं सार जाणुनी ।
वारि चंदनादि हे वसु प्रकार आनुनी ॥
अर्चनें त्रिवासरीं त्रिकाळ शुद्ध सद्विधी ।
पाडवांहि अर्चुनी तु दान दे चतुर्विधी ॥२५॥

॥ छंद मनोरमा ॥

पारणें करी वीधि या परी ।
माघ चैत्र ही अर्चया परी ॥
हे त्रिमास संवत्सरा प्रती ।
पूजने तिन्हीं वत्सरा प्रती ॥ २६ ॥

॥ छंद वसंततिलका ॥

उद्यापनासि मग सद्विधिनें करावें ।
शक्ती विना व्रत पुन्हां द्विगुने करावे ॥
हा ऐकुनी विधि नृपें व्रत आदरीलें ।
वंदूनि योगि वचना हृदईं धरीलें ॥२७॥

॥ छंद मंडन ॥

यापरी गृहिं एउनी मग पूजिले व्रत वीधिनें
द्रव्य तें बहु वेंचुनी उजविल्ले व्रत वीधिंनं ॥
कोन्हि एक सुवासरी तडितेवट क्षय दर्शुनी ।
आदरी नृप संयमासि अनित्य संसृति दर्शुनी ॥२८॥

॥ छंद वसंततिलका ॥

चारित्र सत्तपबळे अहामिंद्र लोकीं ।
भोगी विमान अपराजित उर्द्धलोकीं ॥
तेत्तीस सागर सुखस्थिति भोगुनिया ।
तो औंतरे सुमनुजा कृति लागुनिया ॥२९॥

॥ छंद स्वागता ॥

वंग देसि मिथुळानगरी ते ।
कुंभनाम नृपती नगरीतें ॥
सुप्रभावति सुराणि तयाते ।
शीळवंति अति पाळि दयाते ॥ ३० ॥
देव तो चउनीथा कुपीतीचे ।
जन्मला जिनपती कृपितीचे ।।
मल्लिनाथ अभिधान तयासी ।
जन्मताचि सुचले मघव्यासी ॥३१॥

॥ छंद वसंततिलका ॥

जन्मोत्सवासि करुनी मग इंद्र गेले ।
तारुण्य एत समयीं लघु बाल्य गेले ।
श्रृंगार हार करुणी तरुणावयासी ॥
तो चालिला जिनवधू परणावयासी ॥३२॥
शोभा तदा नगरिची अति देखुनीया ।
जाली भवस्मृति हि पूर्विल चिंतनीया ॥

शोभा विमान अपराजित भोगिले ते ।
ऐसेंचि हे बहूभविं सुख भोगिलें ते ॥ २३ ॥
हें भोगिलें सुख बहू तरि तृप्ति नाहीं ।
जे इंधनें करुनि वन्हिसि तृप्ति नाहीं ।
राज्यें कुटुंब वपु चंचळ जानुनीया ॥
वैराग्य निर्मळ तदा मनिं आनुनीया ॥२४॥
चारित्र तें गहनिं जाउनि आदरीलें ।
ध्यानप्रभें अशुभ कर्म तमा हरीलें ॥
तो ज्ञान केवळ दिवा हृदयीं उदेला ।
देवें तदा रचियिलें समवश्रुतीला ॥ २५ ॥
देशाटना करुनिया जग बोधिले ते ।
ते शेषकर्म हतुनी शिव साधिले ते ॥
तो मल्लिनाथ जिन मुक्तिसि पावला हे ।
तेथें चतुष्टय अनंतहि पावला हे ॥ २६ ॥
रत्नत्रयव्रत वधू नर जे करीती ।
ते जन्म सांडुनि सुमुक्ति सुखा धरीती ॥
हें मुक्तिसौख्यपद अंतरी आठऊनी ।
देवेंद्रकीर्तिपद अंतरिं आठऊनी ॥ २७ ॥
रत्नत्रयव्रतकथा प्रथमोक्त सांगे ।
बुद्धी विना महतिसागर वर्णि सांगे ॥

जे ऐकति पठति सांगति धर्मअर्था ।
ते भाग्य युक्त सुख पावति धर्मअर्थी ॥ ३८ ॥

॥ इति श्री रत्नत्रयव्रतकथा समाप्त ॥

## ॥ अथ षोडशकारणव्रतकथा ॥

॥ छंद शिखरिणी ॥

जिनाधीशा देवा महति जिन तूं अंतिलमणी ।
प्रभा फाके जेवी समवशरणी ते दिनमणी ॥
कृपाब्धी दातारा तव पदिं असे मुक्तिरमणी ।
प्रभू ऐसा होसी म्हनउनि तुला चिंति मि मनीं ॥१॥

॥ छंद वंसस्थ ॥

प्रणम्य भावें करि मी गिरा तुते
मि मागितों शुद्ध मतीगिरा तुते ॥

चतुर्थ सुज्ञानि गणाधिशा नमी ॥
सुरेंद्रकीर्ति गुरुपादुका नमी ॥ २ ॥
कृपे जयाचे निकथा व्रताचि हे ।
श्रुती धरा शोडशकारणाचि हे ॥
महाराष्ट्रभाषा श्रवणे कराचि हे ।
सुभव्यलोकीं सुमने धरावि हे ॥ ३ ॥

॥ छंद स्वागता ॥

श्रोतयासी विनवी द्वयपानी ।
भावना श्रवण जे पयपानी ॥
हेचि प्राशन करा जिनवानी ।
शुद्ध चित्त करुनी तनवानी ॥ ४ ॥

॥ छंद शार्दूलविक्रिडित ॥

जंबूद्वीपविशाळ त्यांत भरत क्षेत्रोत्तमांतभले ।
नामें मागधदेश त्यांत पुर हें राजगृही शोभलें ॥
राजा तेथिल धर्मनीति करितो हेमप्रभा हा भला ।
रानी ते विजया सुशीळवतिचा अयेव तो शोभला ५

॥ छंद मनोरमा ॥

प्रोहिता महासर्म नाम हे ।
तत्प्रियंवदा नारि नाम हे ॥
धर्मशिळ जे देवनंदिनी ।
तीजपासुनी जाली नंदिनी ॥ ६ ॥

नाम तीज कंकाळभैरवी ।
कृष्ण जैसि ते अस्त तोरवी ॥
रक्तलोचनें थोर मस्तकें ।
शुष्क दीसती पादहस्तकें ॥ ७ ॥
जेवि रापभी कंठ घोरतो ।
पोटदंतही वोष्ट थोर तो ॥
क्रोधवंति ते रूपहीन ते ॥
फार दीन ते गुणहीन ते ॥ ८ ॥
पाहतां जिये पोहितांतरी ।
दुःख फार तें जेवि कातरी ॥
कोन पाप म्यां केलें आदरी ।
त्यास्तवे स्तुती ऐसि उदरी ॥ ९ ॥
मातृअंतरी दुःख यापरी ।
दोघेहि जने दुःखितापरी ॥
काळ क्रमिती धर्मवासरी ॥
योगि तो गृहीं एक वासरी ॥ १० ॥
उत्तरी तवे भावरी प्रती ।
पाहिले तया चारणा प्रती ।
हर्ष अंतरी प्राहितामती ।
अंबु घेऊनी त्या मुनी प्रती ॥ ११ ॥

॥ छंद वसंत तिलका ॥

सत्तिष्ठ तिष्ठ वदुनी पडगाहिले ते ।
भावे त्रिशुद्धि मग दानहि आर्पिलेते ॥
नीरंतराय मुनि होउनि बैसिलासे ।
पृछार्थि प्रोहित सु, सन्मुख बैसलासे ॥१२॥
तो जोडुनि कर वदे रुपिला विलासे ।
पाग्दुःकृतासि वदने सुतिच्या विलासे ॥
काशास्तवे कुरूप हे कळवा विलासे ।
या नंतरे अमितसागर बोलिलासे ॥१३॥

॥ छंद शार्दूल विक्रीड ॥

ऐके माळव देश त्यात बरवी नामे पुरी उज्जनी
जैसी शोभतसे पुरंदर पुरी वस्तीसते सज्जनी ॥
तेथे तो महिपाळ जो नृपतया वेगावती सुंदरी ।
विशालाक्षि सुनाम पुत्रि मग ते जाली तिचे ऊदरी ॥

॥ छंद भुजंग प्रयात ॥

बहूरूपवंती असे ते कुमारी ।
अती चंचळा मारहाची न मारी ॥
धने योवने फारजे मातली ते ।
गुणे हीन नीर्लज्यने व्यापलीते ॥१५॥

॥ छंद जीवन ॥

कोन्हि एकवासरी गवाक्षमार्गि बैसुनी ।

कन्यका शुभाननी दिशासि पाहे तोषुनी ।
तेचि वेळि ये तपस्वि तद्गृहासि सादरे ।
भावरी करुनि जाय काननासि आदरे ॥१६॥
पुत्रिने तदा तया मुनीश्वरासि दर्षुनी ।
थूकीली तयावरी कुपापरासि हर्षुनी ॥
तो मुनि क्षमाकरी कुबुद्धि जेन्ह ताडिली ।
हे नृपानि पाहुनि सुतां स्वपानि ताडिली ।१७॥
दुष्ट पुत्रिचा नरेंद्र कोप अंतरी करी ।
थोर पापिनी तु होसि अंति जैसि कूकरी ॥
त्या नृपे जळानि योगि अंग भूतले करी ।
भावभक्तिनें सुयोगि पाद अर्चने करी ॥१८॥
ज्ञानसूर्य हा तपस्वियासि वंदिजे भवी ।
पुण्यराशिया जीवा भवाब्धि पोत या भवी ॥
ऐसि भक्ति पाहताचि पुत्रि लाजिली मनीं ।
निंदुनी स्वआपनासि साधु भाविला मनी ॥१९॥

छंद इंद्रवज्रा

तो वंदिला सद्गुरु शुद्धभावे ।
संबोधिली ते गुरुणे स्वभावे ॥
भक्ती करी ते मग त्या गुरूची ।
कर्मक्षयार्थी तिज धर्मरूची ॥२०॥
तेथूनि ते पुत्रि चविन्हलीते ।
हे पुत्रि तुझ्या गृहीं जन्मलीते ॥

भोगाविना दुःकृत ते चुकेना ।
सम्यक्त्व धर्माविन ते चुकेना ॥२१॥
पूर्वील पापास्रव हे कुरूपी ।
हे सद्व्रते पावल सत्स्वरूपी ॥
या नंतरे षोडशकारणासी ।
दिल्हे तिला सद्गती कारणासी ॥२२॥
॥ छंद जीवन ॥
ऐक पुत्रि सांगतो व्रतासि वीधिजो बरा ।
श्रावणी मास कृष्णपक्ष पाडवा बरा ।
तद्दिनि व्रतासि घेई शुद्ध भावि अंतरी ।
श्री फळानि पूजने सुजैन मंदिरांतरी ॥२३॥
॥ छंद वसंत तिलका ॥
एकांतरासि उपवासहिते करावे ।
द्वात्रिंशदनि व्रत उत्तम आचरावे ॥
आरंभ जो सचित त्यागहि वस्तु संख्या ।
पृथ्वीशया करि तवे गमनाचि संख्या ॥२४॥
॥ छंद इंद्रवज्रा ॥
रुप्यार्जुनादी मग यंत्र आनी ।
जे कर्णिका शुद्ध तिलागि आनि ॥
पंकोळिका षोडश त्यात लीहा ।
त्या भावना षोडश त्यात लीहा ॥२५॥

॥ छंद वसंत तिलका ॥

त्या भावना श्रवन तू कारे सद्विशुद्धि ।
चित्ती धरी प्रथम उत्तम दृग्विशुद्धि ॥
मिथ्यात्व वर्जुनि मनी समतासि भावि ।
सम्यक्त्व सत्य वचने हृदयासि भावी ॥२६॥

॥ छंद मालिनी ॥

सुतप समकितासी ज्ञान चारित्र यासी ।
विनय धरि दुजी हे भावना हृदयासी ॥
शिळगुण अतिचारा वर्जुनि पाळिजे ते ।
तृतियसुगुण हाची दुर्गुणा टाळिजे ते ॥ २७॥
वसुविध उपयोगाभ्यास शास्त्रे करीजे ।
दृढ धरि तु चतुर्थी भावना अंतरीजे॥
अथिर शरिर भोगा जान अभ्राश्रमी हे ।
म्हनुनि समयाचिंति भावना पंचमी हे ॥२८॥

॥ छंद जीवन ॥

ऐक षष्ठि भावना सुपात्रि दे चतुर्विधी ।
औषधा भयान्न शास्त्र हे चतुर्विधी ।
द्वादशप्रकार सत्तपासि पाळि शक्तिने ।
भावना हे सातवी तु ठेवि चित्ति भक्तिने २९
साहुनी उपद्रवासी चित्ति मंत्र आठवी ।
लाउनी समाधि ध्यान भावना हे आठवी ॥

कुष्टरोगि सन्मुनीचि भक्ति शुश्रुषा करी ।
औषधा करोनि शुद्ध योगि पुद्गला करी ॥२०॥
यान व्हा गुणासि भाव शुद्ध अंतरीं धरी ।
या गुणा करोनि अंतिं आपनासि उद्धरी ॥
या त्रिलोकिं निर्मळा जिनेश्वराची भक्ति हे ।
भावना दशावि जाण पाळि सार युक्ति हे ।२१।

॥ छंद स्वागता ॥

दान मान गुरुभक्ति करावी ।
भावना धरि मनीं अकरावी ॥
भक्ति हे बहुश्रुतीसि तु रक्षी ।
भावना हृदइं बारवि रक्षी ॥२२॥
द्रव्यतत्व पद आगमवानी ।
अंगपूर्व सह हे जिनवाणी ॥
या प्रति कारि तु भक्ति सुभावी ।
भावना स्वमनिं तेरवि भावी ॥२३॥

॥ छंद शार्दूलविक्रीडि ॥

साम्ये, सुप्रतिकर्मण स्तुति, धरी युत्सर्ग, हे वंदना, ।
प्रत्याख्यान, सहीत षड्गुणि तया भक्ती करी वंदना ॥
चौदावा गुण हाचि जाण मग तुं पंचादशावा करी ।
उत्सावे जिनशासना प्रति बरें मार्गप्रभावा करी ।२४।

॥ छंद द्रुतविलंबित ॥

सुतपसाधन योगि करी स्वता ।
प्रवचनोसि करी करवी स्वता ॥
करि तु वत्सल भावरुपी गुणा ।
धरि तुं मानसि शोडशव्या गुणा ॥२५॥

॥ छंद स्वागता ॥

अंग हे लिहुनि षोडशयंत्रा ।
मंत्र अष्ट विधिनें पुजि यंत्रा ॥
मास एक पूजने शिळमार्गे ।
यावरी उजवने विधिमार्गे ॥ २६ ॥
उत्सवोसि जिनगेह करावें ।
संघयुक्त न्हवनासि करावें ॥
अर्चनें उपरि यंत्र सुवीधी ।
ऊपकर्ण करि षोडशवीधी ॥२७॥

॥ छंद तोटक ॥

सहमोदकखाद्य सुधारस हे ।
अतिपक्क सुअन्न षड्रस हे ।
फळ दाडिम जंबिर सूरस हे ॥
स्वय मीळवि षोडश षोडश हे ॥२८॥

॥ छंद वसंततिलका ॥

विस्तारि षोडश वरें उपकर्ण ऐसे ।
कंसाळ ताळ कळसा जिनगेहिं ऐसें ॥
भृंगारि आनि जंगटादिक झालरीसी ।
चंद्रोपकादिक सुधूपादिप प्रकासी ॥३९॥
पिंगानि कर्पुर अखंड सुगंध सारे ।
कुष्मांगरा सहित ते उपकर्ण सारे ॥
सद्भावयुक्त मग लेउनि धौतवस्त्रा ।
दानान्न दे अभय औषध आनि शास्त्रा ॥४०॥

॥ छंद मंडना ॥

उत्सवे जिनशासनासि करि प्रकाश तुं यापरी ।
माघचैत्र सुनिर्मळा करि वर्ष षोडश ज्यापरी ॥
शक्ति हे जरि नाहि यासि दुने व्रतासि करी तवे ।
ना घडे तरि एक दोन हि पंच भाति करी तवे ॥४१॥

॥ छंद मालिनी ॥

मुनिवचन सुभावें ऐकुनी त्या व्रतासी ।
गुरुपद नमुनिया घे कुमारी व्रतासी ॥
मग मुनि निज ठाया जाउनीया हितासी ।
तव कुमरी व्रतासी चालवी ते हितासी ॥ ४२॥

॥ छंद स्वागता ॥

आचरुनि व्रत हें उजवलिं ।

या व्रतानि दुरिता उडवीले ।
नारिलिंग सरले सुरवासी ॥
शोळव्या मिळविले त्रिदिवासी ॥४३॥

॥ छंद सवई ॥

अच्युतनामा तया त्रिवासी पुरंदर होउनि भोगि सुखासी
देवविमानिं शची सह आयुस बाविस सागर भोगि सुखासी ॥
द्वीप सुजंबु तयांत विदेह सुक्षेत्र तयामधि देश सुजाणा ।
नाम तया अमरावति अंतरिं गंधबपत्तन उत्तम जाना ॥

॥ छंद शार्दूलविक्रीड ॥

तेथें तो नृपति श्रीमंदर तया राणी महादेविते ।
भावें श्रीजिनधर्म चित्तिं गुरु जो निर्ग्रंथ त्या भाविते ॥
स्वर्गापासुनि देव तो चउनिया रानीचिया उदरीं ।
जाला तीर्थंकर प्रताप बलि तो रानीचिया उदरीं ।४५।

॥ छंद इंद्रवज्रा ॥

तो पुत्र जीवंधर नाम त्यासी ।
वैराग्य तो उद्भवला मनासी ॥
घेऊनीया संयमभार योगा ।
तो शुक्लध्यानीं तप साधि योगा ॥४६॥

॥ छंद सवई ॥

ज्ञान सुकेवळ उद्भवले मग ते समवश्रुति जालि तयासी।
द्वादशवीधि सभा सविचार सुतत्व पदादिक जाण तयासी
देश विदेश विहार तदा करुनी जग बोधुनि सत्पथि केले।
अष्टहि कर्म मतंग विभांडुनी सिद्धपदासि तदावस केले ॥
अष्टगुणासह पाउनि मुक्तिसि सौख्य अनंत अपारहि तेथें
ज्ञान अनंत सुवीर्य अनंतहि दर्शन पाहि अपारहि तेथें ॥
ते अचल स्थिति देइ मला तुज मागतसे मि अखंड सुखासि ॥
षोडशकारण जे करिती व्रत ते जीव पावति मुक्ति-सुखासी ॥ ४८ ॥

॥ छंद उपेंद्रवज्रा ॥

जे आर्यखंडांतहि जाण ऐसे ।
जाले जिनाधीशहि सर्व ऐसे ॥
ह्या भावना षोडश आचरुनी ।
जालेति तीर्थंकर त्या करुनी ॥ ४९ ॥
श्रीकुंदकुंदान्वय गच्छराजा ।
देवेंद्रकीर्ति सुरिपट्टराजा ॥
तो ज्ञान मार्तंड करी प्रकासा ।
लोकासि धर्माध्व करी प्रकासा ।५०।

॥ छंद स्वागता ॥

तोचि आश्रय मला फळलासे ।
　　सद्विवेक हृदयीं कळलासे ॥
त्यास्तवे व्रतकथा मग सांगे ।
　　वर्णि तो महतिसागर सांगे ॥ ५१ ॥
ऐकती पठति सांगति भावें ।
　　चित्तिं ठेउनि तवे स्थिरभावें ॥
आचरीति व्रत हें नरनारी ।
　　वश्य तत्पर तया शिवनारी ॥ ५२ ॥

॥ इति षोडशकारणव्रतकथा समाप्त ॥

श्रीब्रह्महतीसागरकृत्-

## ॥ श्रीज्वालामालिनी अष्टक प्रारंभः ॥

श्रीग्लौंप्रभेशजिनपत्कजसेविकां हि ।
शामाख्ययक्षसुयुतां पदपद्मयुग्मां ॥
चक्राधिपादिमनुजैः खलु वंद्यमाना- ।
माह्वाननादिविधिनात्र समर्चयेऽहम् ॥

ॐ आं क्रों ऱ्हीं श्रीं शामयक्षज्वालामालिनि देवि आगच्छ आगच्छ संवौषट् स्वाहा । आव्हाननं स्थापनं सन्निधिकरणम्

देवगंगादि तीर्थोदकैर्निर्मलैः ।
हेमपात्रस्थितैः शीतलैः सौरभैः ॥
तां शिखामालिनीं संयजेऽहं मुदा ।
भक्तियुक्मानवानामभीष्टप्रदां ॥ १ ॥

ॐ आं क्रों ऱ्हीं विजयाख्यज्वालामालिनीदेव्यै ॥जलं०॥

चंदनाद्यैः केशराद्यन्वितैः शीतलैः ।
गंधलुब्धालिभिस्तापसंहारकैः ॥ २ ॥
तां सिखा० ॥ गंधम् ॥

शालिजैरक्षितैर्भूरिखंडोज्झितैः ।
कुंदचंद्रावदातैर्मनोज्ञैर्वरैः ॥ ३ ॥
॥ तां शिखा० ॥ अक्षतं० ॥

पारिजातैः सरोजैः सुगंधान्वितैः ।
कामदर्पापहारैः प्रसूनोत्करैः ॥ ४ ॥
॥ तां शिखा० ॥ पुष्पं. ॥
शुद्धपक्वान्नशाल्योदनैः पायसैः ।
खर्जुरैर्मोदकैर्भूरिनैवेद्यकैः ॥ ५ ॥
॥ तां शिखा. ॥ नैवेद्यं ॥
आज्यकर्पूरजैरुत्तमैर्दीपकैः ।
ध्वस्तमोहांधकारैर्जगद्द्योतकैः ॥ ६ ॥
॥ तां शिखा० ॥ दीपं ॥
धूपसद्धैर्दशांगैः सुगुर्वादिभिः ।
मंदसौरभ्यगंधैर्द्विरेफाकुलैः ॥ ७ ॥
॥ तां शिखा० ॥ धूपं ॥
नालिकेराम्रजंब्वादिरंभाफलैः ।
सत्फलौघै रसालैः कपित्थादिभिः ॥ ८ ॥
॥ तां शिखा० ॥ फलं ॥
शिल्पिनिर्मापितैश्चापि देवांगजैः ।
पट्टकूलादिभिश्चाथदिव्यांबरैः ॥ ९ ॥
॥ तां शिखा० ॥ सद्वस्त्रं ॥
स्वर्णरत्नाश्रितैः षोडशालंकृतै-
र्मुद्रिकामेखलाशेखरासुम्मुखैः ॥ १० ॥
॥ तां शिखा० ॥ षोडशाभरणं ॥
सजलाद्यष्टभेदान्वितैरर्घ्यकैः ।

शक्रकीर्तीश्वर्णी महत्यम्बुधिः । ११ ॥
॥ तां शिखा० ॥ अर्घ्यं ॥

## अथ स्तवनम्

बालेंदुभालरुचिरालकवेणियुक्ते ।
कर्णांतलोचनसुमौक्तिकसग्विलासे ॥
कौमारि चंद्रजिनपुंगवभक्तियुक्ते ॥
श्रीज्वालिनी प्रतिदिनं ननु रक्ष देवि ॥१॥
राकेंदुबिंबरुचिशोभितदिव्यगात्रे ।
राजीवपत्रनिभपादसुरागहस्ते ॥
रामाजनैर्विधृतदर्पणचामराद्ये । श्री ज्वा० ।
भास्वच्छिखानलविराजितमौलियुक्ते ।
नानामणिप्रचिताभरणैश्च युक्ते ॥
सारंगशोभिनयनांचितसुविलासे । श्रीज्वा. ॥
सिंहद्विपेंद्रकटि पूर्णशशांकवर्णे ।
पाशाभयाख्यफलहस्तमनोहरांगे ॥
कोदंडचक्रझषपाणि त्रिशूलहस्ते । श्रीज्वा० ।
यक्षेशदक्षविजयाख्यमनोहरांगे ।
विद्याधरैर्नरसुरैर्नमितांघ्रियुग्मे ॥
कर्णावतंसनवरत्नविभूषितांगे । श्रीज्वा० ।
भृंगारतालवरदर्पणचामरादि-
स्रक्चंदनादिनवरत्नविभूषितांगे ।

१ दैत्यास्थितापरिजनैः करकंजयुग्मे । श्रीज्वा० ।
चंद्राख्यसागरसुवर्णितशोभिवृद्धे ।
पुर्य्यंतसिंहनिलये महिपाधिरूढे ॥
कामार्थदायिकलधौतविभूषितांगे ।
श्रीज्वालिनि प्रतिदिनं ननु रक्ष देवि ॥ ८ ॥

॥ इति स्तवनम् ॥

मंत्र— ओं आं क्रौं ह्रीं ऐं श्रीज्वालाशालिनि देवि मम पूजकस्य सर्वविघ्नोपशांतिं कुरु कुरु स्वाहा ॥ जाप्यं ९ तथा १०८ दीयताम् ॥

या सत्साम्राज्यलक्ष्मीकृदपि सुखकरी पुत्रपौत्रप्रदात्री ॥
या लोकातंकहर्त्री दुरितभयहरा भक्तसंतोषकर्त्री ॥
या क्षुद्रोपद्रवादिप्रहरणकुशला पूर्णशुभ्रांशुवक्त्रा ॥
सा ज्वालामालिनी नोऽनिशमखिलमनोवांछितार्थान्ददातु

॥ इत्याशीर्वादः ॥

## अथ जयमाला

विधुविभोर्जिनशासनरंजनां, सकलसंकटभंजनकारिकां ॥
नरखगासुरवंदितपत्कजां, प्रवरयक्षिणिमादरतः स्तुवे ॥१॥
चंद्रप्रभजिनशासनरक्षां, ज्वालामालिन्याह्वयदक्षां ॥
श्यामयक्षवनितां विबुधानीं, मायुधयुक्तवसूत्तमपाणिं ॥२॥
दक्षिणकरसुधृतत्रिशूलां, द्वितीयकराग्रे चक्रविशालाम् ॥

१ " दैत्यादिदेवसुसेविपदपद्मयुग्मे ,, संशोधित पाठ.

तृतीयकरस्थितभूषितबाणां, सव्यचतुर्थकराभयदानां ॥
पाशमच्छचापोत्तरपाणिं, मातुलिंगबाणाष्टमपाणिं ॥
मस्तकवन्हिशिखात्रयगाढां, कुंजरसममहिषाधिपरूढां ॥
दुष्टोपद्रवहरणसुवीरां, भूतपिशाचनिवारणधीरां ॥
मंत्रतंत्रवरसाध्यसमग्रां, शंबरीशबहुरूपकृतोग्रां ॥५॥
व्याघ्रगजादिभयापहविद्यां, नानारोगविनाशनवैद्यां ॥
सर्पाद्यखिलविषापहवल्लीं, चोरकिरातप्रहरणपल्लिं ॥६॥
बालदिवाकरसमदेहाभां, मस्तकमणिमयशेखरशोभां ॥
पूर्णनिशाकरसन्निभवक्त्रां, कार्मुकतिलभ्रकुटिकजनेत्रां ॥७॥
अपांगविलोकनकंपितकालां, कुंकुमरेखाभूषितभालां ॥
बिंबसमाधरनासिकसरलां, कुंडलशोभितकर्णसुयुगलां ॥८॥
पद्मदलोपमयुग्मकपोलां, कंठविराजितसुंदरमालां ॥
शुंडालारिनिभोदरशोभां, कुचतटघटसमवररुचिराभां ॥९॥
कंकणमुद्रान्वितकरलंबां, चारुजघनकटिनाभिनितंबां ॥
अंगसुलक्षणयुक्तपवित्रां, सर्वाभरणालंकृतगात्रां ॥१०॥
जैनसुधर्मस्थापनकुशलां, मिथ्यामोहनिवारणविपुलां ॥
भव्यकुमुदबोधकशशिबिंबां, भाक्तिकजनतारकजगदंबां ॥

घत्ता—

शशिविभोञ्जिनबिंबाशिरोधृतां, सुगुणमालिकया समयाक्षिणीं
सुरपकीर्तिपदांबुजषट्पदो, महतिसागरजाड्यमतिर्यजे ॥
॥ अर्घ्यं ॥

## ॥ अथ ज्वालामालिनी आरती ॥

आरति ओवाळिन तुजला, ज्वालामालिनि देवि।
नाम तुझें महकाळि दुसरे, जपति मानव भावें ॥
षोडशविद्यादेविमध्यें तुं, अष्टम विद्यादेवि।
नानाविघ्न निवारि माझें, विनति हे परिसावि।ध्रुव।
मस्तकिं चंद्रप्रभजिनमुर्त्ति, शोभतसे बरवी।
पुद्गलकांति प्रकाशे जैसा, उगवे रवि गगनीं ॥
मिथ्या माया मोहतमासि, तात्काळिंच हरवि।
शरण मि तुजला आलों आतां, वांछित माझें पुरवि
॥ आरति ॥१॥
तुझें मस्तकिं रत्नजडित हे, मुकुटाचि शोभा।
नाकिं बेसर कुंडल कर्णि, शोभति तपनाभा ॥
उदर तुझें अति सुंदर जेवि, कदळि तरुभागा।
दिव्यरूप तूं दिससि जैसि, कल्पोद्भवरंभा ॥२॥
श्रीजिनशासन पाळनदक्षा, मिथ्यामत हरणा।
धर्मविकाशक शत्रुविनाशक, संकटभय कदना।
कुत्सित वारु वारुणि कुशला, रोहिणि पतिवदना।

शक्रकीर्तिपदसेवक महति, सागरकृत भजना ॥


## ॥ अथ विसर्जनम् ॥

शुभ्राक्षतप्रसवसंकुलरत्नदीपै--
माणिक्यरत्नमयकांचनभाजनस्थैः ॥
श्रीज्वालिनीचरणतामरसद्वयाग्रे ।
सन्मंगलार्तिकमहं त्ववतारयामि ॥
मंगलार्तिकावतरणं करोमि स्वाहा ॥ १ ॥

श्रीज्वालामालिनीदेव्यां कृत्वाव्हनादिपूजनम् ।
समस्तलोकशांतिधारात्रयं दद्यात् ॥ २ ॥

वीतरागपदाब्जसेवकदैत्यदुर्भदहारिणी ।
ईतिभीतिनिवारिणी क्षितिवर्तिसज्जनरक्षिणी ॥
शीतभाःप्रभनाथयक्षि ! मनोरथं मम पूरय ।
भूतसंकुलघातकृन्ममदुःखमंबु निवारय ॥ ३ ॥
पाशशूलसुमीनचक्रधनुष्यबाणसमस्तका ।
ईहितार्थदमातुर्लिंगफलाष्टका तनुहस्तका ॥
त्वं जगज्जननीत्यहं शरणागतोऽस्मि निरंतरं ।
प्रार्थयामि सदा सुखं मम देहि देवि परं परम् ।४।
देवि ये तव पादपद्मयुगं भजंति मनोमुदा ।
तेऽखिलं सुखमाप्नुवंति सुभक्तियुक्तजनास्सदा ॥
चारुशोभननाम ते हृदि ये स्मरंति हि सर्वदा ।

तत्सुभव्यशरीरिणां जगदंबिके त्वमभीष्टदा ॥५॥
ज्वालिनि क्षितिपालिनि प्रणमामि पंकजलोचने ।
लीलया परिपालयाखिललोकसंकटमोचने ॥
भाक्तिकैः कृतचारुपंचविधामृताद्यभिषेचने ।
पुष्पवृष्टिमहं करोमि सुशोभितांगविरोचने ॥ ६ ॥
पापलेपनरूपराक्षसप्रविनाशके गुणांबुधे ॥
चापलाक्षि ममापराधमपाकुरुष्व कृपानिधे ।
पाहि देवि हितोपकृत्सतिर्यग्विधूढधरातले ॥
वर्ततां तव सत्कृपासु सदा मया रतिशीतले ॥ ७ ॥
जय जय जगदंबे । ज्वालिनि स्पष्टबिंबे ॥
गजगमनविलंबे । नागयुक्ते नितंबे ॥ ८ ॥
हतधनुजगदंबे । बालखंडेंदुबिंबे ॥
जननयनिकरं मे । पाहि भक्तावलंबे ॥ ९ ॥



## ॥ चौदागुणस्थानप्ररूपणा ॥

### मिथ्यात्वगुणस्थान (छंद वसंततिलका)

आहारकद्वयविवर्जित योग तेरा ।
कुज्ञान तिन्हिहि असंयम आर्तरौद्रा ॥
मिथ्यात्वि दर्शनहि चक्षु अचक्षु दोन्ही ।
त्या शेषही प्ररुपणा भग सर्व मानी ॥१॥

### सासादन ( छंद वसंततिलका )

तेजप्रभंजन[1] विवर्जित काय चारी ।
अभव्य सूक्ष्म विन जीव समास सारी ॥
मिथ्यात्व पंच विन आश्रवखेषु [५०] जाणा ।
मिथ्यात्ववद्गुणि दुजे भग सर्व माना ॥२॥

### मिश्र ( छंद शार्दूलविक्रीडित )

मिश्रस्थेत्रस पचमेंद्रिय मनोवागष्ट औदारिकी ।
कायावैक्रियकाख्य कायमिळुनी [10] दिग्योग या स्थानकी ।
संज्ञी भव्य कषाय एकविस ह्याऽनंतानुबंधी विना ।
दृक्कैवल्य विना आहार उरल्या मिथ्यात्ववत् त्या म्हणा ।

### अव्रत असंयम (छंद शार्दूलविक्रीडित)

सुत्रिज्ञानहि आर्तरौद्रद्वय हे ध्यानार्क चौथे गुणी ।

---

१ अग्नि व वायु.

जाणा क्षायिक वेदकोपशम हे सम्यक्त्व संख्या तिन्हीं ।
कायेंद्रीय कषाय दृग्भविक हे संज्ञीहि मिश्रापरी ।
जाणाव्या मग शेष त्या प्ररूपणा मिथ्यागुणाचे परी ॥

## देशव्रत ( छंद शार्दूलविक्रीडित )

तिर्यग्मर्त्य उदारिकांग मनवाग्योगांक[१] संख्यास्थित ।
आद्याष्टोन कषाय सप्तदश हे ते संयतासंयत ॥
लेश्याही शुभ तीन देशविरते आहारमिश्रापरी ।
जाणा सर्वहि शेष त्या प्ररुपणा चौथे गुणाचे परी ॥५॥

## प्रमत्तविरत ( छंद श्रग्धरा )

षष्ठेस्थानीं प्रमत्ते नरगति मनवाकाय औदारिकाख्ये ।
आणि आहारिकाख्य द्विमिळुनि अकरा योग जाणा प्रतक्षे
सूक्ष्माद्या नोकषाया [१२]त्रिकुमितहि चतुर्ज्ञान सत्संयम त्री
आर्त त्री धर्म चाऱ्ही मग सकळ जसे पंचमस्थानमात्री ॥

## अप्रमत्त ( छंद वसंततिलका )

नृज्ञान संयम कषाय जसें प्रमत्ती ।
तेची तसेंचि तितुके गुणि अप्रमत्ती ॥
सद्धयान धर्म असना विन तीन संज्ञा ।
त्या शेष देशविरता सम जाण सुज्ञा ॥७॥

## अपूर्वकरण ( छंद वसंततिलका )

आद्य द्विसंयम अपूर्वकराभिधानी ।
क्षायीक औपशम हे समकीत दोन्हीं ॥
ध्यानैक शूक्लसु पृथक्त्वही शुक्ललेश्या ।
त्या अप्रमत्तसम सर्वहि जाण शेषा ॥ ८ ॥

अनिवृत्तिकरण ( छंद आर्या )

अनिवृत्तिकरण नवमे, संज्वलन वेद कषाय नग[१] संख्या ।
मिथुन परिग्रह संज्ञा शेषचि ते अपूर्वकरण समाख्या ॥

सूक्ष्मलोभ [ छंद चामर ]

सूक्ष्मसांपरायिके हि वेदमार्गणा विना ।
एकची कषाय सूक्ष्मलोभ नाम सद्गुणा ॥
हांचि नाम संयमैक संज्ञ[१] एकची गणा ।
शेष त्या अपूर्वकर्ण तुल्य हि परूपणा ॥१०॥

उपशांतमोह ( छंद आर्या )

उपशांतकषायगुणे, एक यथाख्यात संयम निशल्य ।
कषाय संज्ञा वर्जुनि मग सर्व हि जाण दशमगुणतुल्य ॥

क्षीणकषाय ( छंद आर्या )

क्षीणकषाये क्षायिक पृथक्त्व एकत्व हे × द्वय ध्यान ।
मग शेष मार्गणा त्या उपशांतकषायसम जाण ॥१२॥

१- संज्ञा. × " क्षीणकषाये क्षायिक चारित्र एकत्व हे इक ध्यान ,,
( संशोधित पाठ )

## सयोगकेवली ( छंद स्रग्धरा )

तेरावें स्थानीं सत्यानुभय सुमनवाक्कार्मणौदारिकाख्ये।
ऐसे हे सप्तयोग प्रमित हि मग ते ज्ञानदृक्केवलाख्ये ॥
सर्वाहार द्वय प्राण बळ वचन कायायु उच्छ्वास चार्‍ही।
सत्‍यून ध्यानसूक्ष्मक्रिय मग उरल्या बारव्या तुल्य सारी।

## अयोगकेवलि ( छंद शार्दूलविक्रीडित )

चौदावे हि अयोगकेवलिगुणे पर्याप्ति लेश्या नसे।
योगप्रत्यय सर्व वर्जुनि [1]अनाआहार आयु दिसे ॥
शुक्लध्यान हि एकची व्युपरतक्रीयानिवर्तीनि जें।
तेरावे गुणतुल्य रूप उरलें ते सर्व हि जाणिजे ॥१४॥

## ॥ अथ चतुर्विंशतिप्ररूपणा ॥

### छंद शार्दूलविक्रीडित

श्रीमन्नेमिजिनेंद्र सद्गुणमणी भूपाढ्यरूपाप्रति।
वाग्देविप्रति आगमीक मुनि जो त्या नेमिचंद्राप्रति ॥
वंदोनि स्वगुरू दया गुणनिधी देवेंद्रकीर्तिप्रति।
जीवाच्या हि [2]निरूपना मि वदतों संख्या चतुर्विंशती ॥

### छंद भुजंगप्रयात

[1]गती [2]इंद्रियें [3]कांय [4]योगाख्य [5]वेद।

---

१ विना. २ प्ररूपणा.

[६]कषायाख्यहि [७]ज्ञान [८]संयेम भेद ॥
[९]दृगाख्याहि [१०]लेश्याख्यहि [११]भावकाख्ये *
[१२]सुसम्यक्त्व [१३]संज्ञीहि [१४]आहारकाख्ये ॥२॥
[१५]गुणस्थान [१६]जीवसमास प्रयोग ।
[१७]सुपर्याप्तिहि [१८]प्राण [१९]संज्ञोपयोग[२०] ॥
तथा [२१]ध्यानही [२२]प्रत्यये× [२३]जातिसंख्या ।
तथा [२४]कूलकोटीचि ही लक्षसंख्या ॥ ३ ॥

## ४ गती व ५ इंद्रियें [छंद भुजंगप्रयात]

गती देव मानुष्य तिर्यंच नामा ।
चतुर्थीहि ते नारकी दुःखधामा ॥
तथा इंद्रियें पंचधा एक बे त्री ।
चतुःपंच हे पांचवे पंचसूत्री ॥ ४ ॥

स्वामी महारजांच्या इंद्रियप्ररूपणेपर्यंतच्याच कविता मिळा-
ल्या; पुढील कविता न मिळाल्यामुळें कायमार्गणे-
पासूनच्या कविता आमचे बंधु खुशालचंद कोद-
रजी यांचे मदतीनें तयार करून प्रकरण पूर्ण
केलें आहे.

---

* भव्यत्व. × आस्रव

## षट्काय ( आर्या )

प्थ्वी सलील अग्नी, वायु वनस्पती तसेंच त्रसकाय ।
षट्काय असें कथिले, स्मरुनी श्रीमहति सद्गुरूपाय ॥

## पंधरा योग ( आर्या )

सत्यासत्यचि उभय, अनुभय मन चार वचन चार तसे
तनुयोग सप्त कथितों, अनुक्रमें ते असति जैसे ॥
औदारिक वैक्रीयिक आहारककाययोग त्रय असति ।
तैसेचि मिश्रत्रय ते सप्तम कार्माणयोग वदत श्रुती ॥

## वेद ३ ( द्रुतविलंबित )

पुरुषवेद असे प्रथम श्रुतीं ।
युवतिवेद दुजा जिन बोलती ॥
तृतियवेद नपूंसक यापरी ।
असती तीनच वेद मनीं धरी ॥

## कषाय २५ ( अभंग )

क्रोध मान माया लोभ मुख्य चार ।
भेद चार चार प्रत्येकाचे ॥
अनंतानुबंधी प्रथम कषाय ॥
अप्रत्याख्यानी होय दूसराची ।
प्रत्याख्यानि तीजा संज्वलन चवथा ।
चारानें गुणीता षोडश हे ॥

हास्य रत्यरति शोक भय जुगुप्सा ।
वेदत्रय मीळतां भेद नऊ ॥
षोडश कषाय नऊ नोकषाय ।
करीती अपाय जीवासी या ॥

## ज्ञानाचे ८ भेद ( आर्या )

कुमति कुश्रुती कुअवधी सुमति सुश्रुति सुअवधि हेचि सहा
मनःपर्यय केवल हे सर्व मिळुनि ज्ञानभेद अष्ट पहा ॥

## संयमाचे ७ भेद ( आर्या )

प्रथम असंयम भेदचि, संयमासंयम दुजाचि तो माना ।
सामायिकाख्य तिसरा छेदोपस्थापना चतुर्थ गणा ॥
परिहारविशुद्धि पंचम सूक्ष्मसांपराय षष्ठमाचि जाणा ।
यथाख्यात सप्तम हे संयम यापरि तुम्ही मनीं आणा ॥

## दर्शनाचे ४ भेद ( आर्या )

चक्षू अचक्षु अवधी, केवल दर्शन जिनागमीं चार ।
श्रीजिनविभुनें कथिलें, मनुजाते नित्य चित्तिं अवधार ॥

## लेश्येचे ६ भेद ( आर्या )

कृष्ण नील कापोताचि लेश्यात्रय ह्या अशूभची माना ।
पित पद्म शुक्ल ह्या शुभ सर्व मिळुनि षट् अशा तुम्ही जाणा।

## भव्यत्व २ भेद [ ओवी ]

भव्या रुचे जिनवचन, अभव्या न रुचे जाण।
भव्याभव्य भेद दोन, जैनागमीं कथियले ॥

सम्यक्त्वाचे ६ भेद ( छंद उपजाति )

मिथ्यात्व सासादन मिश्र तीजे।
चतुर्थ त्या औपशमा म्हणांजे ॥
क्षायोपशामिक हि पंचमाख्य।
सम्यक्त्व ते षष्ठम क्षायिकाख्य ॥

आर्या

षड्विध सम्यक्त्वामधें प्रथमत्रय त्याज्य ते तुम्हीं समजा।
शेषत्रय ग्राह्यचि ते मुक्तीचें बीजकी मनीं उमजा ॥

संज्ञी व आहारक यांचे दोन दोन भेद (आर्या)

संज्ञि असंज्ञि ऐसे संज्ञित्वाचेचि भेद द्वय असती।
आहारक अनाहारक भेदद्वय हे आहारकीं वदती ॥

गुणस्थानें १४ ( चाल– चंद्रकांतराजाची )

प्रथमस्थान मिथ्यात्व दुजे सासादन मिश्र तिजे।
चतूर्थ अव्रत पंचमाणुव्रत प्रमत्त षष्ठम जे ॥
अप्रमत्त सातवें आठवें जाण अपूर्वकरण।
नवेमानिवृत्ति सूक्ष्मलोभ ते दशम गुणस्थान ॥
अकरावें उपशांतमोह द्वादशम क्षीणमोह।

सयोगकेवली तेरमस्थानीं ज्ञानपूर्ण होय ॥
चतुर्दशम अयोगकेवली परम गुणस्थान ।
लघूपंचवर्ण स्थिति ज्याचि सांगे जिनवचन ॥

## जीवसमास १९ ( आर्या )

भू जल पावक मारुत नित्य इतर ते निगोद द्वय जाण ।
प्रत्येकिं सूक्ष्मबादर भेदानें सर्व द्वादशाचि मान ॥
साधारण[1] प्रत्येकही[2] वनस्पती भेद द्वय जिनें कथिले ।
बे ते चऊ इंद्री ते विकलत्रय नाम हेंच किं दिधलें ॥
संज्ञी[3] असंज्ञि[4] ऐसे भेदद्वय असति पंचइंद्रींत ।
कथिले एकोणिस हे जीवसमासही असे जिनश्रुतिंत ॥

## षट् पर्याप्ति ( आर्या )

आहार शरिर इंद्रिय, तैसे उच्छ्वास श्वास वचन मन ।
याते षट्पर्याप्ति वदति जैनागमांत सूज्ञजन ॥

## दश प्राण ( आर्या )

इंद्रिय पांच तेवी तीन मनो वचन काय बल प्राण ।
श्वासोच्छ्वासायू द्वय प्राण असे सर्व होति दश जाण ॥

## चार संज्ञा ( वसंततिलका )

आहार आद्य असुनी भय ती द्वितिय ।

---

१ सप्रतिष्ठितप्रत्येक, २ अप्रतिष्ठितप्रत्येक, ३ मनसहित, ४ मनरहित

मैथून ती तिजि परिग्रह होय तूर्य ॥
संज्ञा तुरीय कथिल्या जिनआगमांत ।
स्वाध्याय नित्य करि ठेवुन चित्त शांत ॥

द्वादश उपयोग ( अनुष्टुप् )

ज्ञानोपयोग ते आठ चार दर्शन जाणिजे ।
सर्वोपयोग हे बारा वर्णिले आगमांत जे ॥

ध्यान १६ ( शार्दूलविक्रीडित )

ध्यानीं चार प्रमूख भेद कथिले आद्यार्त रौद्रद्वया ।
त्यागा वाइट मार्गदर्शक अशीं जी नेति दुःखालया ॥
धर्मध्यान सुमार्गदायक तिजे अंतीम शुक्लोत्तम ।
मोक्षाकारण हेंच सत्य वदतें सच्छास्त्र जैनागम ॥

आर्तध्यानाचे भेद ४ ( दिंडी )

इष्टवियोगज प्रथम आर्तध्यान ।
अनिष्टसंयोगज तेवि दुजें मान ॥
होय तिसरें तें पिडाचिंतवन ।
चतुर्थचि ते नीदानबंध जाण ॥

रौद्रध्यानाचे ४ भेद ( अनुष्टुप् )

हिंसानंद मृषानंद चौर्यानंद असे तिजे ।
चौथें परिग्रहानंद रौद्रीं हे चार जाणिजे ॥

## धर्मध्यानाचे भेद ४ (आर्या)

आज्ञा अपाय तैसे विपाक संस्थान विचय हे चार ।
धर्मध्यानाचे श्रुतीं कथिले जे असती सुगतिदातार ॥

## शुक्लध्यानाचे ४ भेद (चाल-भारतका डंका)

भेद पृथक्त्ववितर्कविचार असे पहिला शुक्लध्यानीं ।
तेवि दुजा एकत्ववितर्का विचार ऐसा भेद गणी ॥
सूक्ष्मक्रियाप्रतिपाती तिसरा भेद शुक्लध्यानीं होय ।
व्युपरतक्रियानिवर्ति अंतिम भेद शुक्लध्यानीं तुर्य ॥

## आश्रव ५७ भेद अभंग

पंच हे मिथ्यात्व बारा अविरती ।
कषाय ते होती पंचवीस ॥
योग ते पंधरा सर्व सत्तावन ।
आश्रवा कारण जाणावेचि ॥
मिथ्यात्व द्विविध गृहीतागृहीत ।
गृहीताचे होत पंच भेद ॥
एकांत विनय विपरीत संशय ।
अज्ञान तें होय पंचमकी ॥
जाणोनि मिथ्यात्व आश्रवाचें मूळ ।
करा त्या निर्मूळ त्वरीतची ॥
हनन करणें षट्काय जीवांचें ।

मन इंद्रियांचें अदमन ॥
ऐशा द्वादश ह्या होती अविरती ।
दुःख बहु देती जीवासी या ॥
भेद कषायाचे तसेचि योगाचे ।
कथिले पूर्वीचे जाणावेचि ॥

## चौऱ्यांशी लक्ष जाती

चाल- ख्यालांत दंग असती

भू वारि अग्निकाय । तैसेचि वायुकाय ॥
नित्येतरहि निगोद । प्रति सात लाख भेद ॥
तैशा वनस्पतींत । दशलक्ष जाति होत ॥
द्वय तीन चार अक्ष । प्रति दोन दोन लक्ष ॥
पशु नारकी तदेव । असती अखील देव ॥
प्रति चार लक्ष जाती । चौदा नृलाख वदती ॥
एकूण सर्व जाती । चौऱ्यांशी लाख गणती ॥
सर्वज्ञ बोलतात । ठेवा दया तयांत ॥
नरदेह सर्वश्रेष्ठ । जगिं तोचि होय श्रेष्ठ ॥
या देहिं साध्य मोक्ष । म्हणुनी तुं राहि दक्ष ॥

## १९९॥ लक्ष कोटी कुल [शार्दूलविक्रीडित]

जाणा बाविस लाख कोटि गणती पृथ्वीकुलाची अशी ।

वार्कायी कुल सात तीन इतुकी त्या अग्निकायी तशी ।
वायूकायिं तसेंच सात कुलही अर्हत्प्रभू बोलती ॥
संख्याट्ठाविस वृक्षकायिं कुल ज्या शास्त्रीं तयातें नुती ॥

आर्या


द्वींद्रिय कुलसंख्या सात तशी आठ तीन अक्षकुल ।
तुर्येंद्रिय कुल नव ती कथिली जैनागमीं असे सकल ॥
पंचाक्ष पशुकुलांची त्रेचाळिस अर्ध अधिक संख्या ती ।
साडेबारा जलचर कुल ऐसी लक्षकोटी हो गणती ॥
थलचर कुल एकोणिस नभचर कुल लक्षकोटि बारा ती ।
नारककुल संख्या श्रुतीं परमेष्ठी पंचविंशती वदती ॥
सुरकुल षड्विंशति नरकुल चौदालक्षकोटी एकुण ती ।
शत अधिक नव्वदाधिक साडेनव लक्षकोटि कुलगणती ॥

॥ इति चतुर्विंशतिप्ररूपणा समाप्त ॥

स्वामी महाराज व गुणचंद्र यांचे विषयी त्यांचे परमभक्त
भिवबा कासार यांचे विनंतीपर उद्गार—

## विनंती ( चाल— लावणीची )

जेर्जर मी दुखण्यांत मला गुरुछायेची बंडी ।
कृपाकरुन अंगांत घातली हरली भवथंडी ।।ध्रु।।
पापशैत्य शमनार्थ शोधिला निजगृह आधारु ।
सांपडले गुणचंद्र चरणवर समर्थ महतिगुरू ।२।
विनवित श्रीगुरु लागि दिनावर छाया पूर्ण करूं ।
मी अनाथ तळमळे धावगा धाव आतां सद्गुरू ३
त्रिभुवनीं न कुणि सखा कि माझा घेइल कैवारु
मायबाप तूं समर्थ महती त्रिलोकीं आधारू ।४।
तव शिष्या गुणचंद्र नाम जो केवळ कल्पतरू ।
त्या चरणीं म्या मिठी घातली त्रिऋणं शुद्ध करु
नामें न कुणि वाया गेला हा साक्षात्कारु ।
ब्रीद आपलें जाईल महाराज कीर्ती जगीं थोरु
गुरुचरणीं मन सदा काळ त्या काय करिल लंडी
कृपाकरुन अंगांत घातली हरली भवथंडी ।।७।।



फलटण येथील श्री आदिनाथ मंदिरांतील शास्त्रसभेचा फोटो शके १८५७

बालोद्यान प्रेस, पुणें

# संबोधसहस्रपदी–पद्यवर्णानुक्रमणिका.


| पद्यवर्णानुक्रम | पान | पद्यवर्णानुक्रम | पान |
|---|---|---|---|
| १ अष्टविध मद ज्याचे | ११ | ३१ निसर्गमिथ्यात्वी | १५ |
| २ असत्याचें घर | ११ | ३२ निःशंक होउनि जेव्हां | २४ |
| ३ आचरोनि मिथ्यामत | १७ | ३३ पापाविना दुजा वैरी | ७ |
| ४ इंद्रियतस्कर | २३ | ३४ पापीजीवाचें जीवित | ७ |
| ५ एकांतिक मिथ्यामती | १५ | ३५ पापी दरिद्री तो सदा | ७ |
| ६ करीं चैत्यालयादिक | २ | ३६ पाळी हें दर्शन | १० |
| ७ कोणेही स्थानकी | १३ | ३७ प्रमाद हे पंचदश | १९ |
| ८ गातों मी संबोध | १ | ३८ प्राण्या धर्म करी सार | २ |
| ९ गुणिजनसंग करीं | २ | ३९ प्रासधर्म त्यजुनि | ५ |
| १० गुरुमुखें शास्त्र | १८ | ४० बरी नव्हे स्त्री भूतलीं | २३ |
| ११ ग्राहित मिथ्यात्वी | १५ | ४१ भावसहित चारित्र | २१ |
| १२ चित्तीं वैराग्यासी भज | ३ | ४२ भावें तप पूजा दान | २१ |
| १३ जानि सर्वही अनित्य | ३ | ४३ भावें भज वीतराग | २ |
| १४ जिवासी या पुण्यमित्र | ७ | ४४ मनराजाचे हे | २२ |
| १५ जिनधर्म गुरु | ८ | ४५ मिथ्यात्व हें ज्याचें अंगीं | १६ |
| १६ जिनागम तो निर्दोष | १७ | ४६ मूढमिथ्यात्वी अज्ञानी | १४ |
| १७ जिनकथेचें श्रवणीं | १८ | ४७ मेला तरि जिता | ४ |
| १८ ज्यानें इंद्रिय जितुनी | २३ | ४८ मोहोदय नाहीं | ९ |
| १९ दर्शनशुद्ध हा जीव | १३ | ४९ मोक्षाचें जें मूळ | ९ |
| २० दानव्रतादिक भावें | २१ | ५० यत्नें करुनि धर्म | ५ |
| २१ देवशास्त्रगुरु | ११ | ५१ त्यागी पंचवीस | १० |
| २२ द्रव्य उपार्जुनि | ५ | ५२ लोकीं नाहीं पाप | १६ |
| २३ द्विविध सम्यक्त्व | ९ | ५३ विनयमिथ्यात्वी जो | १४ |
| २४ धर्मकथामृतसार | १ | ५४ विपरीत मिथ्यात्वीची | १५ |
| २५ धर्म जो कथिला | ६ | ५५ समकिता विन हा | १२ |
| २६ धर्माची भावना | २२ | ५६ सर्व दारिद्र्याचें मूळ | ८ |
| २७ धर्माचेनि सर्व | ४ | ५७ सर्व पापाचें हें मूळ | १७ |
| २८ धर्माप्रति नित्य करीं | ४ | ५८ सप्त हे मिथ्यात्व | १४ |
| २९ निर्मळ गुणाचे | २० | ५९ संशय मिथ्यात्वी | १६ |
| ३० नियम पाळुनि | ६ | ६० सुभावानें पुण्य घडे | २१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ६१ ज्ञानवंत जीव शुभ | १९ | ६४ ज्ञानाचे आचार | १९ |
| ६२ ज्ञानहीन अविवेकी | २० | ६५ ज्ञानाभ्यास पंच | १८ |
| ६३ ज्ञानाचा अभ्यास | २० | | |


## पंचपरमेष्ठीगुणवर्णनादि पद्यवर्णानुक्रमणिका.


| पद्यवर्णानुक्रम | पान | पद्यवर्णानुक्रम | पान |
|---|---|---|---|
| १ अठ्ठावीस मूळगुण | १३ | २५ जगत्प्रियाचा वियोग | ५६ |
| २ अष्टमातृका विख्याता | ९ | २६ जरी प्राण्या तूं वांछिसी | ३० |
| ३ अष्टविधाचार ज्ञान | १२ | २७ जरी जिन पुजसी रे | ३१ |
| ४ अपवित्र हें शरीर | ५४ | २८ जयदेव जयदेव | ८० |
| ५ अनुप्रेक्षेचें चिंतन | ५२ | २९ जयदेवा वीतरागा | ८२ |
| ६ अर्हतो नामधेयं | ८० | ३० जयदेव जयदेव | ८५ |
| ७ अहो यारे श्रावकजन | ३१ | ३१ जयजयाजी | १२० |
| ८ आरंभिलें म्या | २१ | ३२ जयजय षोडश | ८६ |
| ९ आयुष्य इंद्रिय | ५३ | ३३ जयदेवा पार्श्वेशा | ८७ |
| १० आयुष्या तिनि सातवें | ५७ | ३४ जयजयजयजय | ८८ |
| ११ आहारकद्वयविवर्जित | १५१ | ३५ जयजय श्रीजिन | २७ |
| १२ आव्हयाम्यहमर्हंतं | ७७ | ३६ जिनराज गर्भि आला | ४० |
| १३ ओंकारं बिंदुसंयुक्तं | १०९ | ३७ जिन जिन ऐसी वाणी | १६ |
| १४ इद्राचें मुकुट | ४१ | ३८ जिननामाचि महिमा | ३३ |
| १५ कर्मांची निर्जरा | ५५ | ३९ जिन जिन जिन | ३४ |
| १६ कृतवर्मांचा नंदन | ६९ | ४० जिनराज तुझी मुख | २४ |
| १७ गुरुराज माउली गे | २७ | ४१ जिनराज हा उद्ध. | ४६ |
| १८ ग्रैवेयक उपरीम | ३८ | ४२ जिनराज दीक्षित | ५७ |
| १९ घेउनि धवलाक्षत | ८३ | ४३ जिनराज केवळि | ५७ |
| २० चालिला नेमिराय | ५१ | ४४ जिनराज शिवपादिं | ६१ |
| २१ चंद्रप्रभचरणीं | ६७ | ४५ जिनमनीं न मनीं | १३० |
| २२ छकडकघचड | ४५ | ४६ जिनाधीशा देवा | १२८ |
| २३ छप्पन कुमारी | ४० | ४७ जीतशत्रुसुत | ६३ |
| ४२जगत्प्रकाशी तुज | २६ | ४८ जेव्हां हरे कर्माष्टक | ६ |

| वर्णानुक्रम | पान |
|---|---|
| ४९ जो जो जो जो रे | ४२ |
| ५० ज्योतिश्चक्रसमान | ९८ |
| ५१ ज्याचा अनंत हे | ५२ |
| ५२ ततो जिनेंद्रपादाते | ९० |
| ५३ तनुत्सर्ग योगासनीं | ६० |
| ५४ त्रिजगीं एक बळी | ५० |
| ५५ त्रिभुवन भूषण | २२ |
| ५६ त्रिविध पात्रासी | ३५ |
| ५७ तुज नमु अरहंता | २ |
| ५८ तुज नमू जिनराजा | ३ |
| ५९ तुज नमू जिनेश्वरा | ३ |
| ६० तुज पाहुनि जिनेशा | २३ |
| ६१ तुझे पायीं आदि जिना | १८ |
| ६२ तुझे नामें जिनपती | ३३ |
| ६३ तेरा प्रकारें चारित्र | १३ |
| ६४ तेरावे गुणि त्या शुभ | ६० |
| ६५ त्रैलोक्य हा नित्य | ५५ |
| ६६ त्रैलोक्येश्वरनाथ | २५ |
| ६७ तो मुनिसुव्रताजिन | ७३ |
| ६८ दध्युज्वलाक्षत | ८८ |
| ६९ दान देती सुपात्रासी | ३५ |
| ७० देवा तुझे रूप | २४ |
| ७१ देवा आदि जिना | १७ |
| ७२ देवा तुझे गुण | १९ |
| ७३ देवा तुझे गुण | १९ |
| ७४ दृढध्यानीं जिनेश्वर | ३२ |
| ७५ धन्य धन्य जिनपती | ५६ |
| ७६ धन्य धन्य ते सुपात्र | ३६ |
| ७७ नमु तुज अरहंता | ५ |
| ७८ नमु तुज हिरण्य० | ४ |
| ७९ नवनिधान संपदा | ४७ |

| वर्णानुक्रम | पान |
|---|---|
| ८० नवल काय तूंचि | २६ |
| ८१ नाभी नृपात्मज | ६३ |
| ८२ निर्बळी तो बळकरी | ५१ |
| ८३ निरंजन ज्योतिरूप | ७ |
| ८४ नृपाचा हा धर्म | ४६ |
| ८५ पापकर्मांचें हें | ५४ |
| ८६ पाळिति जे विनया० | १२ |
| ८७ पाळितो जो आवश्यक | ९ |
| ८८ पूर्वाप्रति किति | ११ |
| ८९ पृथ्वी साधोनिया | ४७ |
| ९० पंच नमस्कार | १ |
| ९१ प्राणि एकलाचि अंतीं | ५३ |
| ९२ बाळापुरीं नाभिज | ६२ |
| ९३ भजा आचार्य ते सूरि | ७ |
| ९४ भजा उपाध्याय सदा | १० |
| ९५ भानुराजाचा नंदन | ७० |
| ९६ मन हें निशिदिनीं | ७२ |
| ९७ मरणादिकांचें भय | १४ |
| ९८ मळयखेड सिंहा० | ९२ |
| ९९ मलयखेड सूके० | ६१ |
| १०० महति जलनिधीनें | ६२ |
| १०१ महतिसागर आ० | ८९ |
| १०२ महावीराचे ते | ५९ |
| १०३ मुक्तिचि हे वांछा | ८ |
| १०४ मेघरथाचा नंदन | ६५ |
| १०५ लघुपंचवर्ण | ६१ |
| १०६ लक्षैक पूर्व | ५९ |
| १०७ वाजवीतो टाळी | १५ |
| १०८ वीतरागा तुझे गुण | २० |
| १०९ वीतरागा तुझे | २२ |
| ११० वंदीन मी दृढ० | ६४ |

| पद्यवर्णानुक्रम | पान |
|---|---|
| ११० वंदीन मी पद्मविभू | ६६ |
| १११ वंदीन पार्श्वजिना | ७५ |
| ११२ वंदा वसुपूज्यात्मज | ६९ |
| ११३ वंदीन मल्लीजिना | ७३ |
| ११४ वंदु दृढरथ | ६८ |
| ११५ वंदु श्रेयांस श्रीजिन | ६८ |
| ११६ वंदोनिया पार्श्वविभू | ११३ |
| ११७ वृषभजिनाचे सम० | ५८ |
| ११८ शांतीजिन वंदा | ७१ |
| ११९ षट्खंड पृथ्वीचा | ४८ |
| १२० सद्गुरु तुजला | २८ |
| १२१ सर्व देवांचाही देव | २९ |
| १२२ सिंधुविजयसुत | ७४ |
| १२३ सिद्धार्थरायाचा पुत्र | ७५ |
| १२४ सिंहसेनात्मज | ७० |
| १२५ सुख आनत स्वर्गी तो | ३६ |
| १२६ सुख सर्वार्थसिद्धीचें | ३८ |
| १२७ सुग्रीवाचा जो नंदन | ६७ |
| १२८ सुपार्श्वजिनेशा | ६६ |
| १२९ सूरसेन सुत कुंथु | ७१ |
| १३० सोळावें स्वर्गी | ३७ |
| १३१ संपूजकांना | ९० |
| १३२ संवरसुत | ६५ |
| १३३ संसाराची रीती | ४१ |
| १३४ स्मरा स्मरा निशिदिनिं | १५ |
| १३५ स्तव तुझा देवा | २० |
| १३६ स्वामि सोळा स्वप्न रात्रिं | ३९ |
| १३७ श्रीजिनवाणी | २८ |
| १३८ श्रीनमिनाथजिने | ७४ |
| १३९ श्रीमन्मंगल मूर्ति | ९५ |
| १४० श्रीमन्नाभिपिता | १०३ |
| १४१ श्रीमल्लीप्रभेशजिन | १५१ |
| १४२ श्रीमन्नेमिजिनेंद्र | १५९ |


## शुद्धिपत्रक

### ( संबोधसहस्रपदी )

| अ. नं. | अशुद्ध | शुद्ध | ओळ | पान |
|---|---|---|---|---|
| १ | मानसा | मानसीं | १४ | २ |
| २ | भं ार | भांडार | १२ | ४ |
| ३ | प्रबोधं संसर्ग | प्रबोधसंसर्ग | ९ | ९ |
| ४ | जिनकथा | जिनागम | ९ | १२ |
| ५ | शोकिलें | शोधिले | ११ | १२ |
| ६ | पाटाचे | पाठाची | १२ | १८ |

| अ. नं. | अशुद्ध | शुद्ध | ओळ | पान |
|---|---|---|---|---|
| ७ | ज्ञान्याचा | ज्ञानीचा | १९ | १९ |
| ८ | काय | कार्य | २ | २० |
| ९ | इंद्रिय | इंद्रियें | ३ | २० |

सू.- जेथें जेथें " महति म्हणतो ,, असा पाठ असेल तेथें तेथें " महति म्हणितो ,, असें वाचावें.

## पंचपरमेष्ठीगुणवर्णनादि

| अ. नं. | अशुद्ध | शुद्ध | ओळ | पान |
|---|---|---|---|---|
| १ | अलोकाश | अलोकाकाश | १४ | ५ |
| २ | त्याहूण | त्याहून | ६ | ६ |
| ३ | सामायिक | अनशन | ११ | ८ |
| ४ | पात्राचें | पत्राचें | ५ | २५ |
| ५ | चळ | चळे | ८ | २६ |
| ६ | माउलि | गाउलि | १६ | २७ |
| ७ | सनूत्सर्ग | तनूत्सर्ग | ३ | २९ |
| ८ | मर्ण | मार्ग | १४ | ३१ |
| ९ | ( माझ छकडक ॥४॥ उभे राहतो क्षण ) | | १८ | ४५ |
| १० | सहस्त्र | सहस्त्र ते | ५ | ४९ |
| ११ | गणेशा | गणेश | १२ | ५९ |
| १२ | चाली | जाली | ५ | ६१ |
| १३ | जीवावरी | जीवचारी | १० | ६२ |
| १४ | श्रीवत्सांकित | श्रीवृक्षांकित | ११ | ६८ |
| १५ | सुखारासी | सुखरासी | १५ | ६८ |
| १६ | यथायुषी | वर्षायुषी | ३ | ७० |
| १७ | जन्ममृत्यु | जन्मजरामृत्यु | १३ | ७७ |
| १८ | अक्षयपद्प्राप्ता | अक्षयपद्प्राप्ताय | ६ | ७८ |
| १९ | नारिकेर | नारिकेल | ५ | ७९ |
| २० | विष्णुभुजं | विष्णुजं | ८ | ८० |
| २१ | नेमिनाथ | नेमिनाथं | ११ | ८० |
| २२ | निशिनि | निशिदिनिं | १७ | ८९ |
| २३ | सद्बोदाची | सद्बोधाची | १ | ९० |
| २४ | वदतों मि तसा ॥ अवसर्पिणि षड्विध काळ | | १६ | ९८ |

| अ. नं. | अशुद्ध | शुद्ध | ओळ | पान |
|---|---|---|---|---|
| २५ | श्रेयस | श्री.श्रेयस | १२ | १०५ |
| २६ | द्मिनी | दामिनी | १ | १२१ |
| २७ | धर्मसद् शंखाद्रिया | धर्मदम दश खांद्रिया | ७ | १२२ |
| २८ | इंद्रवक्त्री | इंदुवक्त्री | २० | १२२ |
| २९ | मद्नवगो | मद्नवेगा | १ | १२३ |
| ३० | संस्वी | संरसी | १ | १२४ |
| ३१ | चंद्रोपकर | चंद्रोपक | ४ | १२६ |
| ३२ | इंदुवगात्री | इंदुवक्त्री | १८ | १२७ |
| ३३ | खधोत | खद्योत | १७ | १२८ |
| ३४ | रुग्मुक्त | रुग्युक्त | २ | १३२ |
| ३५ | कृष्टन | कृष्ण | २ | १४० |
| ३६ | स्तुती | सुती | १२ | १४० |
| ३७ | प्राहिताप्रती | प्रोहिताप्रती | १९ | १४० |
| ३८ | पाग्दुःकृतासी | प्राग्दुःकृतासी | ७ | १४१ |
| ३९ | आवणी | आवणीक | ९ | १४३ |
| ४० | औषधा | दान औषधा | १७ | १४४ |
| ४१ | यान व्हा | या नवा | ३ | १४५ |
| ४२ | कृष्मागरा | कृष्णागरा | ६ | १४७ |
| ४३ | त्रिवासी | त्रिदिवासी | ५ | १४८ |
| ४४ | ज्ञाग | ज्ञान | ३ | १५० |
| ४५ | चंद्नाद्यैः | चंदनैः | १४ | १५१ |
| ४६ | रक्षितैः | रक्षते | १७ | १५१ |
| ४७ | नवेद्यकैः | नैवेद्यकैः | ५ | १५२ |
| ४८ | सुग्मुखैः | सुख्मुखैः | २० | १५२ |
| ४९ | विबुधानी, | विबुधानी- | १९ | १५४ |
| ५० | सुसेविपद्पद्मयुग्मे | गणसेवितपादपद्मे | २१ | १५४ |
| ५१ | तुं | तूं | ४ | १५६ |
| ५२ | जेवि | जेंवि | १३ | १५६ |
| ५३ | रोहिणि पति० | रोहिणिपति० | १७ | १५६ |
| ५४ | महति, | महति- | १ | १५७ |
| ५५ | राक्षसप्रविनाशके | राक्षसनाशके | ६ | १५८ |
| ५६ | गुणांबुधे | सुगुणांबुधे | ७ | १५८ |

| अ. नं. | अशुद्ध | शुद्ध | ओळ | पान |
|---|---|---|---|---|
| ५७ | मपांकुरुत्व | मपाकुरुत्व | ८ | १५८ |
| ५८ | त्सतिर्यग्विधूड | स तिरोबभूव | ९ | १५८ |
| ५९ | ते | सकल ते | ७ | १६४ |
| ६० | मनुजाते | मनुजा ते | १६ | १६५ |
| ६१ | श्रेष्ठ | इष्ट | १७ | १७० |

---

श्री. ब्र. ब्रह्मय्यास्वामी ( बाळाप्पा ) यांचेकडून मिळालेलें

# पद्य.

धुंडा हो तुम्हीं धुंडा आत्मस्वरूपीं धुंडा ।।
संतसमागमें निशिदिनिं राहुनि अहंपणा डोई मुंडा हो
तुम्हीं मुंडा ।। आत्मस्वरूपीं धुंडा हो० ।। १ ।।
द्वैताचें वस्त्र फेडुनि टाका ।। शांतिपितांबर गुंडा हो
तुम्हीं गुंडा ।। आत्मस्वरूपीं धुंडा० ।। २ ।।
अनुभवकिल्ली घेउनि हातीं ।। उडवुनि द्वैताचा कोंडा
हो तुम्हीं कोंडा ।। आत्मस्वरूपीं धुंडा० ।। ३ ।।
महति म्हणे सुख सत्य सेवुनी ।। नका करुं गडबड-
गुंडा हो तुम्हीं गुंडा ।। आत्मस्वरूपीं धुंडा० ।।४।।

---

# जैन कीर्तनोपयोगीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीआदिनाथपंचकल्याणिकोत्सवादि | ८६ |
| २ | पूजासमुच्चय भाग १ ला | ८४ |
| ३ | सुभाषितावलि | ८४ |
| ४ | श्री ब्र. महतिसागरचरितकाव्य | ८२ |
| ५ | श्रीनलचरित्र | ८८ |
| ६ | पंचपरमेष्ठिगुणवर्णनादि | ८२ |
| ७ | रत्नत्रयस्वरूप | ८८६ |
| ८ | चोवीसतीर्थंकरस्तुति | ८८६ |
| ९ | महतिकाव्यकुंज | ८१० |

मिळण्याचा पत्ता—

**वीरचंद कोदरजी गांधी**

**मु. पो. फलटण ( सातारा )**

---

हें पुस्तक " श्री महावीर-प्रेस, नातेपुतें येथें छापून श्रीमान् शेठ वीरचंद कोदरजी गांधी यांनीं फलटण येथें प्रसिद्ध केलें.

॥ ॐ नमः सिद्धं ॥

श्रीब्रह्ममहतिसागर विरचित.

# श्रीआदिनाथ पंचकल्याणिकोत्सव कथा.

हें पुस्तक स्व. सौ. धर्मपत्नि कंकुबाई इचे स्मरणार्थ वीरचंद कोदरजी गांधी फलटणकर यांनीं सांगली येथें श्रीमहावीर प्रेसमध्यें छापिलें. शके १८५१

आवृत्ति १ ली. ] [ प्रति १०००

किंमत ६ आणे.

# श्रीमहावीरस्वामी
# अतिशय क्षेत्र दहिगांव.

हे क्षेत्र सोलापूर जिल्ह्यांतील माळशिरस तालुक्यांत आहे. फलटणपासून २० मैलावर व बारामतीपासून १६ मैलावर आहे. येथें दरसाल कार्त्तिक वद्य ५ स पालखी व वद्य ७ स फारच सुंदर व प्रेक्षणीय रथ निघत असतो, त्यावेळी फलटण, नातेपुते, आकलूज, म्हसवड, बारामती, वडगांव, वगैरे आसपासचे गांवची यात्रा सुमारे एक हजारावर जमून भजनपूजन, कीर्तन वगैरेनी मोठा धार्मिक उत्सव होत असतो. येथें दोन जिनमंदिरें व एक अतिशय उंच व भव्य असा मानस्तम्भ आहे. मानस्तम्भाला अभिषेक पांच वर्षांनी होत असतो. येथील भुयार हे फार मोठें व पाहण्यासारखे आहे. वऱ्हाडप्रांतातील कारंजाजवळील सिद्दुरजनपुरचे श्री ब्र० महतिसागर महाराज हे सुमारे १२५ वर्षापूर्वी या प्रांतांत आले व इकडील लोकांचे अज्ञान नाहीसे करून धर्म जागृती केली. महाराजांचा स्वर्गवास श्रीक्षेत्र दहीगांव येथें १७५४ कार्त्तिक वद्य २ रोजीं झाला. तेव्हांपासून ही यात्रा त्यांच्या स्मारकरूपानं भरत असते. तरी सर्व धर्मबांधवानी ह्या क्षेत्रांतील भव्य जिनप्रतिमेचे दर्शन घेऊन पुण्यलाभ करून घ्यावा.

आपला नम्र,

**वीरचंद कोदरजी गांधी, फलटण.**



गांधी वीरचंद कोदरजी फलटण.

वीसाहुंमड गोत्र खेरजेश्वर मुळसंघ सरस्वती गच्छ बलात्कार गण वडी शाखा गुजराथेंत गाव इडर कुंदकुंदाचार्यान्वय आमन.

## स्व. सौ. कुंकुबाईचा पितृपक्षाकडील.

# ०: वंशवृक्ष. ०:

दोसी रेवाजी [ मुक्काम बारामती. ]

सुरचंद फुलचंद

| |

पानाचंद वीरचंद

भार्या सकुबाई ०

|

जमना मैना चीमा गंगु कंकु

० | ० | |

तलकचंद हीरु फुलु माणेक माणिकचंद

| |

[मुले आणि मुली][मुले आणि मुली][कुमारी, मुलगा.]

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १८ | ११ | सप्ता | सप्ता |
| २० | १३ | राणिच | राणिचे |
| ,, | १६ | पंचाश्चार्य | पंचाश्चर्य |
| २१ | १६ | जन्मभूमि | जन्मस्थान |
| २३ | १४ | सूर्यसममत्स्य | सूर्यमत्स्य |
| २५ | ११ | दिन | दिनें |
| २७ | ४ | आत्मालंकानि | आत्मालंकरणानि |
| २७ | १० | गभास्थिय | गर्भसंस्थिताय |
| २९ | ५ | श्चयदि | श्यादि |
| ,, | १५ | तत्फल | तत्फलजन |
| ३५ | ५ | प्रसावाली | प्रसवली |
| ३९ | १ | नीरजना | नीरंजना |
| ,, | ७ | मृदांग | मृदंग |
| ,, | १२ | पातिकहेर | पातिक हरे |
| ४१ | १ | सह सशत | सहस शत |
| ,, | १७ | प्रमाणा | प्रणामा |
| ४२ | २ | बाळा | बाळ |
| ,, | २ | बामवाचें | वासवाचे |
| ,, | १५ | घालेनियां | घालोनिया |
| ४४ | १२ | ते | तो |
| ,, | १४ | लावले | लवले |

# शुद्धिपत्रक ( श्री वृषभनाथ पंचकल्याणिक कथा. )

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १ | ४ | वृषभनाथ. | श्रीवृषभनाथ. |
| १ | ९ | माकेता | साकेता. |
| २ | ६ | शाभे. | शोभे. |
| ३ | १२ | प्रमादें. | प्रसादें. |
| ४ | ७ | साधक. | धारक. |
| ५ | १२ | जंवा. | जंघा. |
| ९ | ७ | अशरण्य. | सर्वअशरण्य. |
| १० | १ | गुणाते. | गुणतें. |
| १२ | ६ | क्रिया. | क्रिया. |
| १३ | १० | इंद्राचे. | इंद्राचें सोंग. |
| १४ | १४ | दितिये. | द्वितिये. |
| १५ | ७ | त्रिपले. | त्रिपल्ये. |
| १७ | १४ | पूर्व. | पूर्वि. |
| १८ | १ | हो | ह्या |
| १८ | १ | भागिला. | भोगिला. |
| ११ | ,, | उरला. | ऊरला. |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ४६ | ४ | जपत | जपन जपत |
| ४७ | ३ | षण्णास | षण्मास |
| ४९ | १० | वदिले | वंदिले |
| ५० | १२ | वसुनी | बसुनी |
| ५२ | ७ | बाळाक्रिडा | बाळक्रिडा |
| ५३ | १ | धाले | जाले |
| ,, | ११ | सहारकारी | संहारकारी |
| ,, | १४ | खडन | खंडन |
| ,, | १६ | करिते | करिती |
| ५४ | ६ | व्यापली संप्रजासी | व्यापलीसे प्रजासी |
| ५८ | १ | पेसी | पेखीं |
| ,, | ४ | उरलिते | सरलिते |
| ५९ | १ | रूषी | ऋषीं |
| ५९ | ११ | ह्मणे | ह्मणे तुजविण |
| ६० | २ | सुरबलहत | सुखलहत |
| ,, | १२ | सेविना | सेविता |
| ,, | १६ | देवतपास्वि | देव तपस्वि |
| ६३ | ४ | हवन | न्हवन |
| ,, | ,, | प्र– | प्रतिमा |
| ,, | ७ | स्वस्यच | स्वास्यच |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
| --- | --- | --- | --- |
| ६४ | १५ | णारिवरी | रसणारि |
| ६५ | ६ (नंतर) | | तिणिकि तिणिकि तिणि तिणि तिणि फेरी ॥ ४ ॥ |
| ६६ | — | अरहंत | जय अरहंत भव-भयहंत |
| ६८ | २ | वंद | वंदे |
| ६९ | ६ | हा | जिहा |
| ७० | ३ | श्रणि | श्रेणि |
| ८० | ६ | जणुनी | जाणुनी |
| ८३ | ७ | प्रम अमी चापृत | प्रेम अमी(चाखत) पीयत. |
| ८४ | १५ [नंतर] | ॐ ऱ्हीं केवल ज्ञान संप्राप्ताय श्री-वृषभदेवाय ॥ जलं ॥ इत्यादि | |
| ८६ | ९ | रद | दर |
| ९२ | ११ | आल | आला |
| ,, | ,, | खड | खंड |
| १०१ | ३ | नति हिरदे | नहि भीजे |
| ,, | ५ | भागी | मांगी |
| १०२ | १६ | कैलास द्रिरि | कैलास सद्गिरि |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| १०३ | ८ | वारुनी | नावारुनी |
| ,, | १० | पंचमी | पंच्यांशीं |
| १०४ | ४ | वामन | वामन वाल्मीक |
| ,, | ७ | संस्थान | संहनन |
| १०६ | ६ | शिला | शिता |
| १०८ | २ | मेरणं | मरणं |
| ,, | ६ | अवगण | अवगहण |
| ,, | १२ | सरारा | सरीरा |
| ,, | १५ | वनय | वयन |
| १०९ | ३ | बाराणता | बाराणंता |
| ,, | १२ | तचणा परणाहि | तच्छनयर णहि |
| ११० | १ | एहि | णहि |
| ,, | १० | सुमह | सुमइ |
| ११२ | ४ | कान्हो | कीन्हो |
| ११३ | १० | यरचक्र० | नख केश शक्र रत्वि-तवतहां |
| ११६ | २ | तहा | तदा |
| ,, | ३ | ० | [श्लोक १४६ पुरवणी] |
| ,, | ५ | भ्राते | पाते (शके १७३२) |
| ,, | ८ | विलाकुनी | विलोकुनी |

| पृष्ठ | ओळ | अशुध्द | शुध्द |
|---|---|---|---|
| ,, | ,, | तुझी | तुह्मी |
| ११७ | ३ | नाचं | नाचे |
| ,, | १४ | जीभ | जीभ |
| ११८ | १ | अवर किवर | अवकीबर |
| ११८ | ३ | थनेर | धनेश |
| १२२ | १२ | विष्टभुजं | विष्णुजं |
| १२३ | १४ | कार | करि |
| १२७ | ६ | जिनेंदं | जैनेंद्र |
| ,, | ९ | कवंतु | कुर्वंतु |
| ,, | १२ | जानामि | न जानामि |



# मंगलाचरण शुद्धिपत्र.

| पृष्ट | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | ५ | तृमि: | तृभि: |
| २ | १३ | वाग्बी | वाग्मी |
| ३ | ७ | साघलो | लाघलो |
| ३ | १४ | गुणराशी | सुगुणराशी |
| ४ | १४ | नामस्मरण | पंच महागुरु नामस्मरण |



# पुरवणी शुद्धीपत्र.

| पृष्ट | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ४ | ७ | तयाचे | तयाते |

# सरस्वती स्तोत्र शुध्दि.

| पृष्ट | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १ | ७ | श्रीत्रिसुधेंद्र | श्रीविबुधेंद्र |
| १ | ९ | रात्रींधनु | रात्र्यंधनु |
| २ | १ | मुनिश्चय | सुनिश्चय |
| २ | १ | वेगीतजा | वेगी तजा |



जन्म श्रावण व० ८ श. १७५१




मृत्यु मार्गशीर्ष शु० १ शा० १८१४

श्री. महतीसागर यांचा फोटो नसल्या-
मुळें वैराग्यमूर्ती बाल ब्रह्मचारी
हीराचंद आमोलीक फलटण नीवासी
यांचा फोटो दिला आहे.
तरी भव्य जीवानी ती वैराग्य मूर्ती
लक्षात आणून आत्म कल्याण
करून घ्यावें.

# प्रस्तावना.

**श्रीब्रम्हमहतिसागर** यानी चोवीस तीर्थंकराचें पंचकल्याणीकोत्सव वेगवेगळें मराठी भाषेंत कविताबद्ध कथा रूपानें केलेलें आहेत. त्याचप्रमाणें संबोधसहस्त्रपदी, षोडशकारण, रविवार इत्यादि व्रतकथा, दशधर्म, वगैरे बरेंच मराठी वाङ्मय केलें आहे. त्यापैकीं हें **आदिनाथपंचकल्याणीकोत्सव** सौ. **कंकुबाई** भ्र० **वीरचंद कोदरजी** इच्या स्मरणार्थ छापून प्रसिद्ध केलें आहे. या पुस्तकांत हस्तदोषामुळें व प्रुफ तपासण्याच्या हयगयीमुळें बरेंच दोष राहिलें आहेत. त्याबद्दल शुद्धिपत्र सदर पुस्तकांत जोडलें आहे, त्यावरून पुस्तक शुद्धकरून स्वाध्याय करावा व आणखी कोठें अशुद्ध आढळून आल्यास शुद्ध करून कळवावें. ह्मणजे पुढील आवृत्तींत सुधारण्यांत येईल. या पुस्तकाविषयीं लोकांची अभिरुची दिसून आल्यास इतर वाङ्मय ही छापून काढण्याचा विचार आहे.

**फलटण,**
मिति. मार्गशीर्ष
वद्य ४ वीर संवत
२४५६

आपला नम्र,

**वीरचंद कोदरजी गांधी.**

ज्याची कळंकातित शुद्ध वाचा ।
ज्या वाग्बळे खुंटालि बौध्यवाचा ॥
जाला कवी जो अकळंक नामा ।
त्याचे पदासी करितो प्रणामा ॥ ६ ॥

ज्याची समंता श्रित भद्रवाणी ।
मिथ्यात्व निवारक धर्म खानि ॥
स्वयंभु संस्तावकसत्कवींद्रा ।
मी वंदितो त्याचि समंतभद्रा ॥ ७ ॥

गुरू नेमिचंद्राख्य विद्यादिनंदी ।
प्रभाचंद्र आनी मुनि पद्मनंदी ॥
कवीश्रेष्ठ  हे ग्रंथकर्ते विशेषी ।
नमस्कार करितो मी तयाचे पदासी ॥ ८ ॥

ज्ञानार्णवादि कथिता शुभचंद्र वाग्वी ।
त्याचे पदाब्ज युगला प्रति वंदितो मी ॥
ज्याची बहू सुगम संकृत आगमोक्ती ।
तो वंदिला सकलकीर्ति सुबोधमूर्ति ॥ ९ ॥

बलात्कार कालेग्र सेनाख्य देशी ।
चतुर्धा गणार्थीत जे ज्ञानराशी ॥
कवी होत आले सुधर्म प्रकाशी ।
नमस्कारितो मी तयाचे पदासी ॥ १० ॥

जाला कवी जो श्रुतपारगामी ।
चारित्रधारी स्थिर आत्मकामी ॥
ज्याचे प्रसादे मति साधलो मी ।
त्या शक्रकीर्ति प्रति वंदितो मी ॥ ११ ॥

ज्या हा प्रती त्रिजग सर्व हि वंदिता हे ।
ते देव शास्त्रगुरुम्या कवि वंदिले हे ॥
हे मंगला प्राति करीत असोत सर्वे ।
या कीर्तमी अशुभ विघ्न हरोत सर्वे ॥ १२ ॥

सुकृतचय विकाशी मोक्ष मार्ग प्रकाशी ।
सकळ गुणराशी पाप मिथ्यत्व नाशी ॥
कुनय कुमति हारी सर्व कल्याणकारी ।
जिन कथित कथा हे भव्यसंबोध कारी ॥१३॥

सर्वज्ञ तो प्रथम मूळ कथेसि कर्ता ।
त्या उत्तराशि कथिता गणनाथ वेत्ता ॥
कर्ता प्रती गणपती प्रति उत्तराते ।
त्या नंतरे कविजने कथिली कथाते ॥ १४ ॥

व्याख्यान हे वदत पूर्व कथानुसारे ।
श्रोते तुह्मी श्रवण हे करिजे विचारे ॥
सर्वे जनाहि मन सावध ते करावे ।
जिनादि पंच परमेष्ठि मुखी वदावे ॥ १५ ॥

॥ पद ॥

जय जय श्रीजिनराज मुख्ये वदा ।
पंच महागुरु राज ॥ धृ. ॥
क्षणिक जीवीतहे । शाश्वत नव्हे नेइल तो यमराज ॥
मुखे वदा पंच महागुरुराज । जय. जय. ॥ १ ॥
नामस्मरण । भवजाल होचि जहाज ॥
मुख्यवदा ॥ पंच० ॥ २ ॥
महती ह्मनिती । मुक्ति सुखाचे ।

ज्याने होईल काज ॥ मुख्ये० ॥ ३ ॥

॥ महा गुरुस्मर. ॥

प्रथम महागुरु स्मरण । जय जय श्रीजिनराज ॥ १ ॥
द्वितीय महागुरु स्मरण । जय जय श्रीसिद्धनाथ ॥२॥
तृतीय महागुरु स्मरण । जय जय श्रीआचार्य ॥३॥
चतुर्थं महागुरु स्मरण । जय जय श्रीउपाध्याय ॥४॥
पंचम महागुरु स्मरण । जय जय श्रीसर्वसाधू ॥५॥

॥ अथ न्यास : ॥

मस्तके हस्तन्यासः । जय जय श्रीजिनराज ॥१॥
कंठे हस्तन्यासः। जय जय श्रीसिद्धनाथ ॥ २ ॥
हृदये हस्तन्यासः । जय जय श्रीआचार्य ॥ ३ ॥
कटौ हस्तन्यासः। जय जय श्रीउपाध्याय ॥४॥
पादे हस्तन्यासः । जय जय श्रीसर्वसाधू ॥५ ॥

॥ इति मंगलाचरण समाप्त. ॥

# अथ सरस्वती स्तोत्र.

श्रीमन्मंगलमूर्ति श्रीजिनविभु घातिरिपू जिंकिला।
रागद्वेष तजुनि विष्टरवरि दिव्यध्वनी बोलला ॥
ते वानि जिनशास्त्र वर्णिलि बरी आकार मांडोनिते ।
ज्याला वाहन हंस मस्तकि तुरा ग्रिवेमणि दामते ॥१॥

जैसी अन्य मतित वर्णनविधी तशीच जैनागमी ।
हा संदेह मनांत अन्हुरयनी जालो बहू मी श्रमी ॥
तेव्हा श्रीविभुधेंद्र किर्ति गुरुहा प्रश्नोतरी बोलिला ।
जैसे किर्ण रवि प्रकाश करिता रात्रें धनु हर्शला ॥२॥

आता हास्य कराव्या तलमली चिंता मनीं वर्तिली ।
तेव्हा श्रीवृषकिर्ति दाखविनिसे श्री भारती माउली ॥
त्या पादाब्जपरी सुशाहनुचरा जैनाब्धि भ्रमरा परी ।
नानाशास्त्र विचार सार शिकवी हे माय वागेश्वरी ॥३॥

आता श्रोतेनरा मुनिश्चयकरा संदेह वेगीत जा ।
ज्वाला नम्रत नित्य द्वादश सभा तो देव भावे भजा ॥
आकाशे सम अंतरिक्ष जिनहा मेघापरी शोभला ।
ढलति चौसट चामरेकपति यः विद्युल्लता झाकील्या ।३।

श्रीभव्य जिव तेच हंस समहा न्हाला मना नंदते ।
सम्यक्तावरी निश्चयामि रतला माथा तुरा हाचिते ॥
मुक्तिचे गुण आठ रत्नसमहे श्रीविमणी दामते ।
ऐसा भव्य पुरुष हंस समहा नृत्यकरि स्वच्छते ॥५॥

श्रीअर्हत्मुख निर्गतश्चवरदा भव्या जिवा रूढली ।
च्यान्ही योग चतुर्भुजाश्रुत विना अंमृत पात्राधरी ॥
चौथे हस्ताकि माल हेच नुभुजा या या परी शोभली ।
मुक्तिची द्युतिही सरस्वती दिसे विद्वज्जनी वर्णिली ॥६॥

श्रीमुक्तिरमनी जयाक्षय नशे भव्या वरी मोहली ।
तिन्हे हे वरमाल देउनि मला तुझ्या गृही धाडिली ॥
तिचा संग करावया विधी कसी पोथि असे या करी ।
ते तु आइक सत्वरे तनमनें वाचे विभु उच्चरी ॥७॥

तेव्हा नर्तन हा करी सविवधु पाहावया सत्वरी ।
तंतु वाजवि हे त्रिलोकी सुषना भव्यास हे नोवरी ॥
मुक्तिचा पति जो घडे तमसीरी अंमृत सिंचिन मी ।
तेव्हा त्यास वरील हे शिववधु होईल ना तोश्रमी ॥८॥

ऐसी तू वरदायनी मज मुखि कृपांबु घालि त्वरी ।
तू बुद्धि मजलागि नित्य रतलीं ते जाय देशांतरी ॥
तुझी स्तुति करील कोन कविते नाची दिसे मेदनी ।
या लागि उगलाचि राहे ह्मणतो देवेंद्र किर्ति मुनि ॥९॥

॥ इति शारदामातास्तवम संपूर्णम्. ॥ श्रीरस्तु. ॥

## पुरवणी.

खालील मजकूर ११६ पानातील आहे.

॥ छंद मालिनी ॥

महति जलनिधीनें पंचकल्यानिकाची ।
शुभ कथिली कथा हे पूर्ण त्या उत्सवाची ॥
पठिति कथिति भावे ऐकिती कीर्तनाते ।
मनुज सुकृति तेची सौख्य लाभे तयाचे ॥१४६॥

॥ ॐ नमः सिद्धं ॥

श्रीमद्‌भट्टारकदेवेंद्रकीर्तिप्रियशिष्य-

ब्रह्ममहतिसागर विरचिता

वृषभनाथपंचकल्याणिकोत्सव

# कथा.

॥ छंद ॥ शार्दूलविक्रिड ॥

श्रीमन्नाभि पिता जयासि जननी नामे मरूदेवितें ।
चौऱ्यासीमितलक्ष पूर्वसुखकृतस्थीती जयां देहितें ॥
साकेता नगरीं प्रति उपजला स्वर्णद्युती शोभला ।
चापे पंचशते तनूच्च जिन हा आदीप्रभू वंदिला ॥ १ ॥

॥ पद ॥

नाभिनृपात्मज तीर्थपती ॥ वंदिन वृषभ युगादिपती ॥ धृ० ॥ साकेतापुरी अवतरला ॥ मरुदेवी कुशी उद्भवला ॥ १ ॥ लक्षपूर्ण चवऱ्यासि जिवी ॥ उन्नत शरशत गांडिवी ॥ २ ॥ हाटक तेज दिसे तनुचें ॥ लांछन शोभे वृषभाचें ॥ ३ ॥ कैलासगिरिवरि शिव झाला ॥ महती वंदितसे त्याला ॥ ४ ॥

॥ शार्दूलविक्रिड ॥

वीणा पुस्तक घेउनी निजकरी
हंसासनीं बैसली ॥
जे कुंदेंदुतुषार हार धवला
शुक्लांबरी शोभली ॥
ब्रह्मा विष्णु महेश आदिकरुनि
देवाहिनें वंदिली ॥
ग्रंथार्थी मतिदायिनी म्हणुनि म्यां
ते भारती वंदिली ॥ २ ॥

॥ पद ॥

श्रीजिनवाणी वाग्वादिनि तूं उत्तम मति मज देयीवो ॥ श्रीजिन० ॥ धृ० ॥ वीणा पुस्तक निजकर धारिणी ॥ हंस वाहनीं येइवो ॥ श्रीजिन० ॥ १ ॥ द्वादशांग तुज भूषण शोभति ॥ प्रसन्न तूं मज होइवो ॥ श्रीजिन० ॥ २ ॥ सुरनर पन्नग गणधर मुनि खग ॥ तुजला स्मरती हृदयीं वो ॥ श्रीजिन ॥ ३ ॥ ब्रह्म महति सन्मति वचनार्थी ॥ शरणागत तव पायीं वो ॥ श्रीजिन० ॥ ४ ॥

॥ शार्दूलविक्रिड ॥

ज्ञानाचा उदधी दयानिधि जसा जो सद्गुरू भेटला ।
सारासार विचार सर्व कळला ज्याचें प्रमादें मला ॥
ऐसी सद्गुरुची अगाध महिमा जाणोनिया अंतरीं ।
ग्रंथारंभीं सुरेंद्रकीर्ति गुरु जो म्यां वंदिला सत्वरीं ॥ ३ ॥

॥ पद राग भैरव चरचरी ॥

सद्गुरु तुजला शरण मि आलों मजवरि करि तूं

अनुकंपा ॥ सद्गुरु ॥ ध्रु ॥ बोधिसमाधी करुनि शुद्ध तूं ॥ नित्ये दर्शसि स्वात्मरूपा ॥ सद्गुरु. ॥ १ ॥ आत्मबोध उपलब्धि करूनतूं ॥ निमग्न होसी हर्षे कुपां ॥सद्गुरु. ॥ २ ॥ तनूत्सर्ग मन पवन साधुनि ॥ जानसि परम ब्रह्मरूपा ॥ सद्गुरु ॥ ३ ॥ सर्व साधना गुरुपदी निश्चयि ॥ प्राप्ति होइल शिवरूपा ॥ सद्गुरु ॥ ४ ॥ निश्चय रत्नत्रय साधक तूं ॥ महतिसि तारक पोतरुपा ॥ सद्गुरु. ॥ ५ ॥

॥ छंद इंद्रवज्रा ॥

श्रोते तुह्मी ग्राहक सद्गुणाचे ।
मी संक्षिपें सांगतसे सुखाचें ॥
हे पंचकल्याणिक उत्सवाची ।
ऐका कथा आदिजिनेश्वराची ॥ ४ ॥

॥ पद ॥

धर्म कथामृत सार ॥ श्रवणकरा ॥

धर्म कथामृत सार ॥ धृ० ॥

अवगुण टाकुनी सद्गुण घ्यावा ॥ करणें हाचि विचार ॥ श्रवण० ॥ १ ॥ चतुर विवेकी श्रोतेजनहो ॥ निवडुनि घ्या तुह्मी सार ॥ श्रवण० ॥ २ ॥ महति ह्मणितो सकळजनासी ॥ करि जे क्षांति अपार ॥ श्रवणकरा० ॥ ३ ॥

॥ छंद ॥ उपजाति

जैवर्म राजा पहिलें भवीं जो ।
महाबळाख्ये भवि दूसरे जो ॥
सौधर्म नाकीं ललितांग नामे ॥
जाला असे देव तिजे विरामे ॥ ५ ॥
सद्वज्रजंघाख्य चतुर्थ जन्मीं ।
तो पंचमे उत्तम भोगभूमी ।
ईशान नाकीं भवि षष्टमे हि ।
तो देव जाला श्रिधराख्य पाही ॥ ६ ॥
सुवीधि राजा भवि सातवे तो ।
अच्यूत नाकीं सुर आठवे तो ॥

होत्रोनिया बाविस सिंधु सौख्य ।
भोगतिसे सम्मितिने प्रतक्ष ॥ ७ ॥

॥ अभंग ॥

सोळाव्रें स्वर्गीं सुखखाणीं । देव भोगीतो विमानीं ॥ धृ.
आयु बावीस सागर । तीन हस्त ते शरीर ॥ १ ॥
वर्ष बावीस हजार । जाल्या मानस आहार ॥ २ ॥
पक्ष जालिया बावीस । घेतो किंचित उच्छ्वास ॥ ३ ॥
भोग मानसिक निट । शुक्ल लेश्या ते उत्कृष्ट ॥ ४ ॥
अवधि विक्रिया सहित । षष्ठ नरक पर्यंत ॥ ५ ॥
महति ह्मणे धर्म सार । ऐसा सुखाचा दातार ॥ ६ ॥

॥ छंद शार्दूल विक्रीड ॥

जंबूद्वीप तयांत तो सुरगिरी सूदर्शनाख्यें असे ॥
त्याचें पूर्वदिशीं विदेह बरवे सत्क्षेत्र शोभीतसे ॥
नामें देश सुपुष्कलावति पुरी ते पुंडरीकीणिजे ॥
तेथें तो जिन वज्रसेन नृपती राणी श्रिकांता सजे ॥ ८ ॥

सोळावे त्रिदिवाहुनीं चउनियां देव श्रिकांता कुशी ।
जाला पुत्र सुवज्रनाभि वरवा संपूर्ण दीर्घायुषी ॥
एके वेळि विराग आणुनि मनीं तो वज्रसेन प्रभू ॥
पुत्रातें निजराज्य देउनि तवें दिक्षीत जाला स्वभू ॥ ९ ॥

॥ छंद द्रुतविलंबित ॥

वज्रसेन जिनराज तपो बळें ॥
घाति कर्म हरितां सुमनोबळें ॥
ज्ञान केवल सुमुद्भवलें तदा ॥
देश देश सुविहार करीं तदां ॥ १० ॥

॥ छंद वसंततिलका ॥

तो चक्रवर्ति पद पाउनि वज्रनाभी ॥
षट्खंड साधुनि चतुर्दश रत्नलाभी ॥
षट्सैन्ययुक्त नवधा निधिचें प्रभावें ॥
तो राज्यधर्म नितिनें करितो स्वभावें ॥ ११

॥ अभंग ॥

धर्म जो कथिला । तिर्थंकराहिनें ॥
तोचि तारू जाण ॥ भवजळीं ॥ धृ ॥
उत्तम क्षमादि दयाचें लक्षण ॥
दाहाहि पाळुन धर्म घडे ॥ १ ॥
रत्नत्रय आणि । सोळाहि कारण ॥
क्रिया तिरुपन । धर्मरुप ॥ २ ॥
महति सागर । ह्मणे हाचि धर्म ॥
पाळावा उत्तम ॥ मानवानें ॥ ३ ॥

॥ छंद जीवन [ चामर ]

या परी बहुत काळ राज्यसौख्य भोगुनि ।
एक वेळीं वज्रनाभि रूप पाहि दर्पणीं ॥
एक शुभ्र केश मस्तकीं स्वदृष्टिं देखिला ॥
भाषिलें मनीं कृतांत दूत हाचि पातला ॥ १२ ॥

॥ छंद ॥ शार्दूलविक्रिड ॥

तेव्हां चिंति अनित्यता अशरणा संसार एकत्वता ॥

अन्यत्वा अशुचीहि आश्रव तथा ते संवरा तत्वता ॥
चिंती निर्जरता त्रिलोक हृदयीं सद्बोधि दुर्लभही ॥
धर्म द्वादश भावना स्वमनि ह्या भावीतसे सर्व ही ॥१३॥

॥ अभंग ॥

अनुप्रेक्षेचें चिंतन ॥ दृढवैराग्यकाररण ॥ धृ ॥
स्वात्मस्वरूप हे नित्य ॥ सर्व देहादि अनित्य ॥१॥
जिन धर्म गुरुविन ॥ अशरण्य जाण ॥ २ ॥
पंचप्रकारें संसार ॥ चतुर्गति दुःखाकार ॥ ३ ॥
कर्ता भोक्ता एकलाचि ॥ अन्य देहादिक हेचि ॥४॥
देह अशुचि हे जाण ॥ आश्रव पापाचें कारण ॥५॥
संवररुंधि पापद्वारा ॥ तोडी कर्मासि निर्जरा ॥६॥
लोक सुखदुःखस्थान ॥ दुर्लभ रत्नत्रय जाण ॥७॥
धर्म वांछित देणार ॥ ह्मणे महतिसागर ॥ ८ ॥

॥ छंद शिखरिणी ॥

अनुप्रेक्षा बारा स्मरुनि मनि वैराग्य जननी ॥
पित्या तिर्थेशाचे समवशरणी जाउनि वनी ॥

तदा दीक्षा अंगीकृत करुनिया मूल गुणाते ॥
स्वता पाळीतो हे अनुसरुनि अठ्ठाविस हिते ॥१४॥

॥ उक्तंच अडिल्ला ॥

पंचमहाव्रतसार धार मनमे लियो ॥
पंचसमति सुविभेद विचारण मन दियो ॥
तीन गुपति मन लाय महातप जे करे ॥
ते मुनि भव दधि पार होय शिव सुखवरे ॥१॥

॥ अभंग ॥

तेरा प्रकारे चारित्र ॥ सुखकारक पवित्र ॥ धृ ॥
शुद्ध पंचमहाव्रत ॥ पाळितानि मुक्ति प्राप्त ॥१॥
पंच समिति पाळिती ॥ भवबंधाते छेदिति ॥२॥
तिन्ही गुप्तिचें रक्षण ॥ मुक्तिसुखाचें कारण ॥३॥
म्हणे ब्रह्ममहति लोका । धरा चारित्र हे नौका ॥४॥

॥ छंद स्वागता ॥

संग वर्जितहि निश्चळ वाणी ॥
उष्णकाळीं गिरि मस्तकि ध्यानि ॥

सीतकाळि सरिता तिरि राहे ॥
वृष्टिकाळी व्रिटपाताळि साहे ॥ १५ ॥

॥ छंद चामर ॥

त्रिकाळ योगवन्हिने कुकर्मकाष्ट जाळितो ॥
द्वादश प्रकार तो तपासि शुद्ध पाळितो ॥
आदि दर्शनाचि शुद्धिता स्वचित्ति आणुनी ॥
षोडश प्रकार भावितो सुभावना मनीं ॥ १६ ॥

॥ चाल आरतीची ॥

तारक षोडश कारण । सुखकारण ॥
प्राण्या चित्ति तु धरि । तिर्थंकर पद पावन ॥
जेणे करून ॥ त्याचें पालन करी ॥ तारक० ॥धृ॥
दर्शन विशुद्धि प्रथम ॥ पाळि उत्तम ॥
धरि विनयभाव ॥ वर्जुनिया अतिचारासी ॥
शीळ व्रतासि । धरि भवाब्धिनाव ॥ तारक ०॥ १ ॥
अभ्यासि श्रुतज्ञान जे । उपदेशिजे ॥
धरि वैराग्य चित्ति । दान देई यथा शक्तिन ॥

पात्र पाहून । तप पाळी जे युक्ति ॥ तारक०॥ २ ॥
आठवि सत्साधु समाधी । सांडि उपाधि ॥
करि सेवा साधुची । भक्ति करी जिनदेवाची ॥
भावे गुरुची । अनेकांत श्रुतिची ॥ तारक०॥ ३ ॥
तत्व पदादिक आगम । भज सत्प्रेम ॥
षडावश्यक क्रिया । प्रभावना जिनशासनी ॥
सत्प्रवचनी । करि वात्सल्य दया ॥ तारक०॥ ४ ॥
जो गुण षोडश पाळुन । करि पूजन ॥
तोचि मुक्तिचा धनी । महति सागर वर्णितो ॥
मनि इछितो । सिद्धपदा लागुनी ॥ तारक०॥ ५ ॥

॥ शार्दूलविक्रिड ॥

श्रीतीर्थंकर नामबंध पडला ह्या भावना भावुनी ।
तेव्हां अंति समाधि साधुनि मनी सल्लेखना आणुनि ॥
गेला प्राण शरीर सांडुनि तवे सर्वार्थ सिद्धिप्रती ।
जाला तो अहमींद्र तेथिल बरी भोगीत सौख्यास्थिति १७

॥ अभंग ॥

सुख सर्वार्थ सिद्धिचे । भोगी अहमींद्रपदाचे ॥धृ॥
आयु तेत्तीस सागर । हस्त उन्नत शरीर ॥ १
पक्ष जालिया तेत्तिस । घेतो किंचित उच्छ्वास ॥ २
वर्ष तेत्तिस हज़ार । जाल्या मानस आहार ॥ ३
प्रविचार विवर्जित । ब्रह्मचारी सदोदित ॥ ४
बल तेज विक्रिययुक्त । अवधि लोक नाडिगत ॥ ५
रत्नत्रयानें महती । अहमिंद्राची विभूति ॥ ६

। विधि ॥

सौधर्म ईशान सनत्कुमार माहेंद्र याचहु इंद्राचें सजवणें, इंद्रस्थापना करणें, इंद्राणीचें सोंग देणें, मग कथेस उभे राहणें ॥

॥ छंद ॥ उपजाति

हें सौख्य भोगुनि पुढें जिव या सुराचा ।
औतार घेइल सुखें वृषभेश्वराचा ॥

वर्णीतसे मि रचना सहभूमिका तें ।
तूं श्रेणिका । श्रवणि ऐक पुढें कथातें ॥ १८ ॥

॥ छंद ॥ शार्दूलविक्रिड ॥

ज्योतिश्चक्र समान काळ फिरतो राहाट कुंभापरी ।
नित्ये जो भरतांतरी फिरतसे ऐरावताभीतरी ॥
तो काळ द्विविधा तु जाण अवसर्पिणीहि उत्सर्पिणी ।
कोटाकोटि दशाब्धि काळ गणिजे ई काळतत् द्वीगुणी ॥

॥ छंद दोधक ॥

भरतांतरि काळ विचार जसा ।
नित वर्ततसे वदतों मि तसा ॥
अवसर्प्पिणि षड्विध काळ फिरे ।
अभिधान तु षड्विध ऐक बरे ॥ २० ॥
सुखमा सुखमादिम काळ असे ।
दितिये सुखमा अभिधान असे ॥
सुखमा दुखमा अभिधान तिजे ।
दुखमा सुखमा हि चतुर्थ सजे ॥ २१ ॥

दुखमा अभिधान सुपंचम हे ।
दुखमा दुखमा वद षष्टम हे ।
मनुज स्थिति उन्नति काळ समी ॥
गति वेगळि वेगळी सांगिन मी ॥ २२ ॥

॥ छंद शिखरिणी ॥

चतुःकोटाकोटी जलधि पहिला काळ गणिजे ।
त्रिपल्ये त्या काळीं स्थिति बरि नरांची हि वदिजे ॥
त्रिकोशाचे उंची नर शरिर रोगा रहित जे ।
तिजे घस्ती बोरा प्रमित करिती ते अशन जे ॥२३॥

॥ छंद [ चामर ]

निहार रोग शोक वर्ज्य आर्य युग्म नांदती ।
दश प्रकार कल्पवृक्ष गेहि गेहि राहती ॥
ऋजु स्वभावि सर्व लोक सौख्य खाणि भोगिती ।
सुभोग भूमिचे सुखांत काळ ते गमाविती ॥ २४ ॥

॥ छंद मालिनी ॥

जनक सुत कळेना भोग भूमी नराते ।
प्रसवति सुत कन्या लागुनी आयु अंते ॥
नुतन युगळ ते एकोन पन्नास दीना ।
स्वय तरुणपणाते पावती सत्य जाणा ॥ २५ ॥
तरुण युगळ तेची कामिनी भर्तृ होती ।
प्रसवति युगळासी ते पुन्हां आयु अंती ॥
मरति मग शिंकीनें जांभळी देउनिया ।
अनुभविति सुखासी स्वर्गिते जाउनिया ॥ २६ ॥

॥ छंद प्रमाणिका ॥

शरीर कर्पुरा परी ।
जळून जाय सत्वरीं ।
न दुःख कोंन्हि जाणती ।
ये आदि काळि हे रिती ॥ २७ ॥

॥ अभंग ॥

दान देति सुपात्रासीं । सुष्ट भोग भूमि त्यासि ॥धृ०॥

कल्प तरु घरोघर । दश प्रकारें ऊदार ॥ १ ॥
महा सुख ते भोगिती । दुःख कदां न जाणती ॥२॥
होय स्वर्गाचि संपदा । तेथें न मिळें आपदा ॥ ३ ॥
महति ह्मणे हे उत्तमा । ऐशी दानाचि महिमा ॥ ४ ॥

॥ छंद शिखरिणी ॥

त्रिकोटा कोटयब्धी द्वितीय सुखमाची स्थिति असे ॥
नरायु त्रीपल्यें शरिर उचि कोशद्वय असें ॥
प्रमाणे व्याहाडे द्वितिय दिनि आहार कारिती ॥
पुढें जाणा तेथें वरकड असे आदिल रिती ॥ २८ ॥

॥ शार्दूलविक्रिड ॥

कोटा कोटि समुद्र दोन तिसरें काळाचि जाणा स्थिती
पल्ला एक नरस्थिती नृतनुची क्रोशाचि ते उन्नती ॥
नित्यें भोजन आवळ्या प्रमित ते मर्त्यें करीती सदा ।
ऐशी हे रिति शेष जें उरलि तें पूर्व प्रमाणें वदा २९

॥ छंद मनोरमा ॥

काळ हो तिजा सर्व भागिला। अंति पल्य तो एक उरला
पल्यभागि त्या आठवें बरें। होति ते चतुर्दिग् मनू बरें ३०

॥ छंद द्रुतविलंबित ॥

प्रतिश्रुती मनु आदिम जाणिजे ।
द्वितिय सन्मति तो मनु मानिजे ।
तृतिय नाम क्षमंकर ते वदा ।
मग चतुर्थ क्षमंधर सौख्यदां ॥ ३१ ॥

॥ छंद शार्दूल विक्रीड ॥

जाला पंचम तो सिमंकर मनू सीमंधरः षष्टमा ।
सप्ता वा विमलादिवाहन मनू तो चक्षुमानष्टमा ।
येशस्वी नवमाभिचंद्र दशवा चंद्राभ एकादश ।
बारावा मरुदेव तो प्रसनजित्तो तेरवा मान्विश ॥ ३२ ॥
चौदावा मनु नाभिराज बरवा प्रख्यात जाला तवें ।
हा मा धिग्गिति दंड तो करितसे सर्व प्रजासी तवें ।

कोटी पूर्व तयाचि जाण बरवी आयु स्थिती ते असे ।
काया ज्याचि उची धनुष्यहि सवा पाचाशताची असे२३

॥ छंद इंद्रवज्रा ॥

तया नृपाची मरुदेवि राणी ।
ते शीळवंती गुण रत्न खाणी ॥
साकेत नामें नगरीं सुखेशी ।
ते नांदती दंपति पुण्यराशी ॥ २४ ॥

॥ विधि ॥

राज्याचें सोंग वैभवाकरून वाद्याचे गजरे, देवाचे रचनेपुढें, घेऊन येणें, देवाची वंदना करुन राज्यानें रचनेपुढें एके बाजूशी मनुष्यामध्यें मोठे चवरंगावर लोढ गादिसहित बसणें ज्यास राज्याचें सोंग देल्ले त्याचे स्त्रीस राणी करून राज्याचे बरोबर एकीकडे स्त्रियांमध्यें बसावेिणें.

॥ अभंग ॥

धर्माप्रति निर्त्यें । करी जो मानव ॥
पूजतील देव । तयालागीं ॥ धृ ॥
त्रैलोक्य संपदा । निजांगीं येऊनी ॥
धार्मिका लागोनि । प्राप्त होय ॥ १ ॥
कल्पना पूरवी । कल्पतरुवर ॥
होऊनि चाकर । धार्मिकाचा ॥ २ ॥
धार्मिकाचें काज । चिंतामणी करी ॥
कामधेनु घरीं । दासि होय ॥ ३ ॥
महति म्हाणितो । ज्यान्हें धर्म केला ॥
संपत्ति हे त्याला । प्राप्त झाली ॥ ४ ॥

॥ छंद ॥ शार्दूलविक्रिड ॥

षण्मासा उपरीं अमर्त्य चऊनी या राणिच्र गर्भि तो ।
श्रीतीर्थंकर औतरील इतुकें जाणोनियां इंद्र तो ॥
सांगे वैश्रवणासि जाऊनि रची त्या जन्म पूरीस ही ।
पंचाश्चार्य सुरत्न वृष्टि करि तू षण्मास नौ मासही ॥ ३५

॥ विधि ॥

कुबेराचे सांगानें येऊन राजाचे राणीचे चत्रंग- गावरून साहा हात लांबी साडेचार हात रुंदी सेंदरीची मंडपी काडच्या गेऊन देणें रत्नवृष्टि अक्षत टाकणें, गंधोदक सिंचविणें, अबीर गुलाल उडविणें, मग कुबेरानें जाणें.

॥ छंद शिखरिणी ॥

विबुधपातीचि आज्ञा घेउनीया श्रिदानें ।
रचिली नगरि तीर्थेशाचि या जन्मठाणें ॥
जन सुखकर बारा योजनें लंबमाना ।
अति रुचिर दिसे नौ योजनें रुंदि जाणा ॥२६॥

॥ छंद [ चामर ]

त्रिकाळ रत्नवृष्टि नित्य दुंदुभिहि वाजतो ।
सुवारि बिंदु वृष्टि आणि पुष्पवृष्टि वर्षतो ॥
जयादिशब्द गर्जना सुपंचवृष्टि ह्या सदा ।
कुबेर तो करी जिनेश जन्मभूमिकी मुदा ॥ २७ ॥

॥ विधि ॥

स्त्रियामधून वसनभूषणयुक्त सुंदर, साहा स्त्रिया उत्तरून त्याह्मास षट्देवता कल्पणें, त्या षट्देवतानें रचनेपुढें एऊन दर्शनाचे साहा श्लोक वेगळे वेगळे म्हणून जिनमातेची प्रशंसाकरून मातेजवळ एऊन मातेजवळून डाबल घेऊन त्यामध्यें साहि जणीनें जग जरा दशांग ठेऊन वर ते झाकण घालून माते-पासी देणें मग त्या साहिजणीनें मातेपासी बसणें.

॥ छंद शार्दूल विक्रीड ॥

इंद्राचा उपदेश घेउनि शिरीं श्रीआदिषट्देविनें ।
गर्भासी मग शोधिलें जननिचे सौगंध सद्रव्युनें ॥
श्रीशोभा करि लज्ज्याही धृति करी धारिष्ट किर्ति स्तुती ।
बुद्धी बोध सुलक्ष्मि वैभव करी षट्देवि ह्या सेविती ॥
राणी निद्रित जालि सौख्य शयनीं रात्रीं पलंगीं मुदा ।
सोळा स्वप्नहि पाहिले मग तिन्हें पश्चिम रात्रीं तदा ॥
प्रातर्भेरि सुनाद ऐकुनि तवे जागृत होऊानिया ।
काया निर्मळता करोनि करिते सामायिकादिक्रिया ३९

॥ छंद स्वागता ॥

भूषणाभरण लेउनि राणी ।
चित्ति हर्ष धरुनि सुख मानी ॥
भूपसान्निध सखींसह आली ।
अर्ध आसनिं नृपें बसवीली ॥ ४० ॥

॥ छंद चामर ॥

कामिनी वदे नृपासि आज रात्रीं म्या भले ।
स्वप्न षोडश प्रकार वारणादि दर्शिले ॥
याचि हे फलश्रुती विचारुनी स्वमानसी ।
स्वामि सांगणें मला कृपा करोनि हे कसी ॥ ४१ ॥

॥ अभंग ॥

स्वामि सोळा स्वप्न रात्रि । पाहिले म्या आज नेत्रीं ॥धृ॥
गजेंद्र वृषभसिंह । लक्ष्मी स्नानाचा उत्साह ॥ १ ॥
पुष्पाचिया माळायुग्म । चंद्रसूर्य सम मत्स्ययुग्म॥२॥
जळपूर्णकुंभ दोन । सर सिंधु सिंहासन ॥ ३ ॥
देवविमान पाताळ । रत्नराशि अग्निज्वाळा ॥ ४ ॥

सोळा स्वप्न हे पाहुनी । गज प्रवेशला वदनीं ॥ ५ ॥
सर्व स्वप्नाची फळश्रुती । राजा सांगे राणीप्रती ॥६॥
तुझे उदरीं तीर्थंकर । होइल मुक्तिचा भर्तार ॥ ७ ॥
म्हणे महति ब्रम्हचारी । तोचि तारु भव सागरीं ॥८॥

॥ सवया एकतिसा ॥

गजतै महंतनंद वृषभतै राजवाहक ।
हरितै बलिष्ठ्योर, रमा लक्ष्मीवानजू ॥
तीर्थंकर तार माल शशि तै शरमकार ।
रवीतै अग्यानहार मीन सुखदानजू ॥
कुंभतै निधानवंत सरतै सुचिन्हधार ।
सागरतै ग्यान पीठतै त्रिलोक मानजू ॥
भोगी सुग्यानथकी भौमगेह ग्यानतिन ।
मणीतै सुगुणधार वन्हिकर्म हानजू ॥ १

॥ छंद वसंततिलका ॥

ज्ञानीं विलोकुनि नृपें मग दामिनीसी ।
स्वप्नाचि हे फळश्रुति कथिली विशेषी ॥

राणी तुझे उदरिं होइल तीर्थराजा ।
कर्माप्रती जितुनि साधिल मोक्ष काजा ॥४२॥

॥ छंद प्रमाणिका ॥

फळश्रुतीसि ऐकुनी । प्रमोद युक्त दामिनी ।
उठे नृपासनाहुनी । गृहासि जाय तत्क्षणीं ॥४३॥

॥ विधि ॥

गर्भोत्सवाचि अक्षत पडतेवेळीं डबल्याचें झांकण उघडून त्यामध्यें राणीनें लघुप्रतिमा ठेऊन झांकण बसवणें, त्यावर स्त्रियाहिनें अक्षता टाकणें.

॥ छंद स्रग्धरा ॥

सुष्टू आषाढमासीं सुघटि शुभदिन द्वीतिया वद्य पक्षे ।
सद्वेळे सुष्टुयोगें शुभकरण तदा उत्तराषाढ ऋक्षे ॥
आयू तेत्तीस सिंधू अविरत सुख हे भोगुनी पूर्ण साचे ।
आला सर्वार्थसिद्धीहुनि सुर चउनी गर्भि त्या दामिनीचे

जिनराज गर्भी आला। आनंदें जय जय बोला।
जय बोला आदीश्वर। स्वामीची जय॥
अर्हत्परमेष्ठि स्मरण। जय जय श्रीजिनराज॥

॥ अभंग ॥

मग कथा करणाऱ्यानें बसणें मग इंद्रानें येऊन डाबल आणि दुसरी प्रतिमा जळवटांत स्थापून अभिषेक करणें, अष्टक देणें, मग केवळि गादीस अष्टक देऊन सवा रुपाया संघपूजा करणें त्याचें अर्धें आचारजीस देणें, त्याचे अर्धें ब्रह्मजीस देणें, त्याचे अर्धें पंडितास देणें, त्याचे अर्धें भाटास देणें, त्याचे अर्धें पुजाऱ्यास देणें. ॥

॥ छंद शार्दूल विक्रीड ॥

श्रीमद्‌गर्भवतीं जिनस्य जननीं संस्थाप्य भर्त्रान्वितां।
पीठे स्नानविलेपनार्चनविधौ वस्त्रादिसद्‌गौरवे॥
इंद्रोऽहं निजभूषणानि विदधे यज्ञोपवीतं स्रजं।
मुद्रा कंकणमेखला च मुकुटं तीर्थेश गर्भोत्सवे॥१॥

पीठस्थापनं । पीठप्रक्षालनं ॥
पीठार्चनं । श्रीकारलेखनं ॥
श्रीयंत्रार्चनं । श्रीवर्णे गर्भस्थितप्रतिमानिवेशनं ।
इंद्रस्थापनं । आत्मालंकानिच ॥

॥ अथाष्टक ॥

सिंधुनिर्जगापगादि तीर्थजैः सुनिर्मलैः ।
शीतलैः सुगंधयुक्ततापहारकैर्जलैः ॥
आदिधर्मतीर्थकारकं सुनाभिनंदनं ॥
गर्भसंस्थितं यजामि पापतापकंदन ॥
ॐ ह्रीं मरुदेवीगर्भस्थिताय वृषभदेवाय ॥जलं॥ ॥१॥
कुंकुमादिसौरभैः सुहेमवर्णकेशरैः ॥
मिश्रितैःसुशीतलैः सुगंधचंदनैर्वरैः ॥
आदिधर्म० ॥ गंध ॥ २ ॥
औषधीशतुल्यशुभ्रतंडुलैस्तुषोज्झितैः ॥
सत्कमोदशालिजैरखंडितैः-सुवासितैः ॥
आदिधर्म० ॥ अक्षतं ॥ ३ ॥
पारिजातमाल्लिका सुचंपकादि वृक्षजैः ॥

लुब्धभृंगपुष्पकैः सरोजमोगरादिजैः ॥
आदिधर्म० ॥ पुष्पं ॥ ४ ॥
तंदुलोद्भवान्नदुग्धशर्करादिनिर्मितैः ॥
व्यंजनादिभक्तकैःसुवर्णपात्रसंस्थितैः ॥
आदिधर्म० ॥ चरुं ॥ ५ ॥
विश्वबोधकारकैस्तमोवितानहारकैः ॥
हेमवर्णवत्प्रकाशकैः सुरत्नदीपकैः ॥
आदिधर्म० ॥ दीपं ॥ ६ ॥
देवदारुचंदनादिसद्दशांगचूर्णकैः ॥
शीघ्रधूमकारकैः सुगंधपूर्णधूपकैः ॥
आदिधर्म० ॥ धुपं ॥ ७ ॥
नारिकेलचोचमोचकम्रकैः सुनिर्मलैः ॥
मातुलिंगदाडिमादिपक्वजातसत्फलैः ॥
आदि धर्म० ॥ फलं ॥ ८ ॥
वारिगंधतंदुलादिशुद्धनिर्मलाष्टकैः ॥
शक्रकीर्तिसेवको महत्यपांधिरर्घकैः ॥
आदिधर्म० ॥ अर्घं ॥ ९ ॥
कर्ता यो धर्मतीर्थस्य जिनो भव्याब्जभास्करः ॥

सुरेंद्रवृंदवंद्यांघ्रि तस्मै पुष्पांजलिं क्षिपेत् ॥ पुष्पांजलि॥१॥
कल्याणं विजयो भद्रं चिंतितार्थं मनोरथं ॥
वीतरागप्रसादेन सर्वेऽप्यर्था भवंतु ते ॥इत्याशीर्वादः॥

॥ अथ जयमाला ॥

देवीभिःश्र्यादिभिःषड्भिःकृतं यद्गर्भशोधनं ॥
तद्गर्भस्थं जिनाधीशं संस्तुवे जयमालया ॥ १ ॥
पश्चिमगात्रौ श्रीजिनजननी ॥ स्वप्नषोडश दर्शित नयनी ॥ प्रथम स्वप्न गज शुभ्र पवित्र ॥ उन्नत तत्फल महंत पुत्र ॥ २ ॥ द्वितिय स्वप्न गोनाथसार ॥ तत्फलधारक वैराग्यभार ॥ तृतीय स्वप्न वर सिंहवीर ॥ भवति पुत्र बलअनंतधीर ॥ ३ ॥ तूर्य स्वप्न वरलक्ष्मी स्नान ॥ तत्फल अनंत लक्ष्मीवान ॥ पंचम स्वप्न सुपुष्पमाळ ॥ तत्फलतीर्थंकर विशाळ ॥४॥
षष्टम स्वप्नशशीसीतकार ॥ तत्फलजनआल्हादकार ॥ सप्तम स्वप्न रविगशिधार ॥ तत्फल अज्ञान हार ॥५॥ अष्टम स्वप्नझषयुग्मदर्शि ॥ तत्फलअनंत सुखभोगराशी नवम स्वप्न घटयुग्मसार॥तत्फलनवविधविधानसार॥६॥

दशमस्वप्न सरोवरवीक्षण॥तत्फलअष्टोत्तरसहस्त्रलक्षण॥
एकादशमसमुद्रसार॥तत्फलकेवळबोध अपार ॥ ७ ॥
द्वादशमविष्टर शोभमान ॥ तत्फल भुवनत्रयवंद्यमान ॥
त्रयोदशमस्वप्न सुरविमान॥तत्फल विमान सुरच्यवमान
स्वप्नचतुर्दशमनागसद्म ॥ तत्फल बोधत्रय युक्तजन्म ॥
स्वप्नपंचदशमरत्नराशी ॥ तत्फलतनुजगुणाग्रराशी॥९॥
षोडसवन्हि शिखाविशाळ ॥तत्फल दहति कर्माष्टजाल॥
राज्ञीपृच्छति कथयतिभूप॥फलमाकर्ण्य संतोषमाप॥१०॥
भुवनालय सुरव्यंतरेंद्र ॥ ज्योतिषवासीकल्पामरेंद्र ।
आगच्छंति नृपाःसकलत्र ॥ गर्भोत्सवमपि कुर्वंति तत्र॥११॥

॥ घत्ता ॥

चतुर्णिकायदेवेंद्रैर्या माता पूजिता परा ॥
सा महत्यर्घ्यनापूज्या जिनेशगर्भधारिणी ॥ १२ ॥ अर्घं

॥ विधी ॥

यानंतर केवळी गादीस अष्टक देऊन संघ पूजा करून राजा राणीस पाटीं बसवून इंद्रानें वस्त्र द्यावेत

॥ अथ नृत्य ॥

जिन जिन जिन जिन तीर्थेशा ॥
वीतरागा परमेशा ॥ १० ॥
जिनराजा जय जिन राजा ॥
प्राणसख्या श्रीजिनराजा ॥ १० ॥
जिन जिन जिन जिन भजा वाणी ॥
पातकाची होईल धुनी ॥ १० ॥
जिन जिन जिन जिन भजा वाचे ॥
सार्थक होईल जन्माचे ॥ १० ॥
जिन जिन जिन जिन ऐसे भजन ॥
झाले महतीसी पावन ॥ १० ॥

इत्यादिक भजन सहित नृत्य करून इंद्राहिने जावे मग कथेस उभे राहावे ॥

॥ छंद वसंततिलका ॥

घंटादिनाद हरिविष्टर कंपनादि ॥
जाणोनि गर्भ सुचना सुर, वासवादि ॥

चातुर्निकाय निजवाहनि रुढ जाले ॥
कल्याणिकासि वधुयुक्त मिळोनि आले॥ ४५ ॥

॥ मालिनी ॥

जिन जनक जिनांचा वंदुनि वासवानें ॥
स्नपवुनि पुजिले ते वस्त्र सद्भूषणानें ॥
जननि निकट देवी छप्पन स्थापुनीया ॥
सुरपति मग गेले स्वास्पदा लागुनीया ॥ ४६ ॥

॥ विधि ॥

स्त्रियां मधून वसन भूषणयुक्त सुंदर आठ स्त्रिया उठवून त्याहास दिक्कुमारी कल्पिणें, त्या दिक्कुमारीनें रचने पुढे येऊन वंदून मातेचि प्रशंसा करून माते पाशी बसणें ॥

॥ छंद स्वागता ॥

भूप चित्तिं मग हर्षित जाला ॥
गीत नृत्य सह उत्सव केला ॥

राणिची बहु विधी परिसेवा ॥
दिक्कुमारि करिती शुभभावा ॥ ४७ ॥

॥ छंद इंद्रवज्रा ॥

काव्यार्थ देवी जननीसि पूसे ॥
उत्कृष्ट सर्वांमधि कोण दीसे ॥
जो पंचकल्याणिक सौख्य भोक्ता ॥
तो सर्व उत्कृष्ट हि मुक्ति दाता ॥ ४८ ॥
देवेंद्र हे किंकर होउनी जे ॥
कोन्हाचि सेवा करिती वदी जे ॥
माता वदे किंकर मत्सुताचे ॥
देवेंद्र हे निश्चयि जाण साचे ॥ ४९ ॥
इत्यादि काव्यार्थ सुरांगनानें ॥
माते प्रति ते पुसिले नयाने ॥
तीर्थेश गर्भस्थित तत्प्रभावे ॥
प्रश्नासि सांगे जननी स्वभावे ॥ ५० ॥

॥ पद ॥

छप्पन कुमारी सेवींति ॥ तीर्थंकर माते प्रती ॥ धृ ॥
कोन्ही झाडीती आंगणा ॥ कोन्ही सडासारवण ॥ १ ॥
कोन्ही देती दातवन ॥ कोन्ही न्हानिति जळान ॥ २ ॥
कोन्ही देति त्या तांबूळ ॥ कोन्ही आणीती त्या जळ ॥ ३ ॥
कोन्ही दळति कांडति ॥ कोन्ही भांड वस्त्र धूति ॥ ४ ॥
कोन्हि रांधिति प्रकार ॥ कोन्हि घाली अलंकार ॥ ५ ॥
कोन्हि छत्र धरिती शिरी ॥ कोन्हि ढाळती चवरी ॥ ६ ॥
जिन मातेसि जागवी ॥ कथा सांगुनिया देवी ॥ ७ ॥
कोन्हि मंगळिक गाति ॥ कोन्हि काव्यार्थ पुसति ॥ ८ ॥
महति म्हणे नवमास ॥ पूर्ण जाले त्या गर्भास ॥ ९ ॥

॥ विधि ॥

मग जन्मोत्सवाची अक्षत पडतावेळे डाबल्यातून प्रतिमा काढाडुन डबल्याचे झाकण डबल्यावर उताणे ठेऊन त्यावर प्रतिमा मांडणें सर्व स्त्रियाने त्या प्रतिमावर अक्षता टाकणें, गुलाल उडवणें जयजयकार करणें मग इंद्रानी येऊन जयजयकार करणें

॥ छंद मालिनी ॥

मग सुदशम मासी चैत्र हा वद्य पक्षे ॥
नवमि दिन सुवेळें उत्तराषाढ ऋक्षे ॥
शुभ करण सुयोगें सुष्टु लग्नें मुहूर्तें ॥
प्रसवाली मरुदेवी आदिनाथां प्रती तें ॥ ५१ ॥

जिनराज हा उद्भवला ॥ आनंदे जय जय बोला ॥ १० ॥ जय बोला आदिनाथ स्वामी की जय ॥ अर्हत्परमेष्ठि स्मरणा ॥ जय जय श्री जिनराजा ॥ २ ॥

॥ विधी ॥

प्रतिमा मातेपासून घेऊन त्या हात्तीवर बसवून उत्सवें रचनेस तीन प्रदक्षिणा देऊन मग हात्तीवरून प्रतिमा उचलून रचनेंत मेरुवर जळावटांत प्रतिमा मांडणें अभिषेक करणें ॥

॥ अभिषेक ॥

श्रीमन्मंदरमस्तके शुचिजलैः धौते सदर्भाक्षतैः॥
पीठे मुक्तिवरं निधाय रचितं तत्पादपुष्पस्रजः ॥

इंद्रोऽहं निजभूषणार्थममलं यज्ञोपवीतं दधे ॥
मुद्राककंण शेखराण्यपि तथा जन्माभिषेकोत्सवे॥१॥
पीठस्थापनं ॥ पीठप्रक्षालनं ॥ पीठार्चनं ॥ श्री-
कारलेखनं॥ श्रीयंत्रार्चनं॥श्रीवर्णे प्रतिमानिवेशनं॥
इंद्रस्थापनं ॥ आत्मालंकारणानिच ॥ इत्यादिक
अर्चनफलापर्यंत अभिषेक बोलावा. ॥

॥ अथाष्टक ॥

सिंधुनिर्जरापगादितीर्थजैः सुनिर्मलैः ॥
शीतलैः सुगंधयुक्ततापहारकैर्जलैः ॥
आदिधर्मतीर्थकारकं सुनाभिनंदनं ॥
जन्ममंगले यजामि पापतापकंदनं ॥
ॐ ऱ्हीं मरुदेवी जठरोद्भवाय वृषभदेवाय जलं १
इत्यादिक अष्टक पुष्पांजळि आशिर्वाद बोलावा

॥ जयमाला ॥

श्रीमत्तीर्थकरस्य जन्मसमये शक्राश्च हर्षैर्युता
हस्त्यारूढविराजमान समये पुष्पानकां दापयेत् ॥

इंद्राणी परिवारभृत्यसहिता देवांगना नृत्यता ॥
नानागीतविनोदमंगलबुधा पूजा च मेरौकृता ॥१॥
जन्म जिनराजको जबहि निज जानियो ॥
इंदु धरणेंदु सुर असुर अकुलानियो ॥
देव देवांगना चलिय जयकारति ॥
सचिय सुरपति सहित करत जिन आरती ॥ २ ॥
साजि गजराज हरि लछ जोजन तनो ॥
वदन सत वदन प्रतिदंत वसु सोहने ॥
सजल भरपूर सरदंत सिर धारति ॥
॥ सचिय० ॥ ३ ॥
सरहि सर पाचद्वै एक कमलनी बनी ॥
तासु प्रति कमल पचीस सोभा गिनि ॥
कमलवदन एकसो आठ विस्तारति ॥
॥ सचिय० ॥ ४ ॥
दल दलहि अपसरा नाच हि भावसो ॥
करहि संगित जयजयकार सुररावसो ॥
ताथृक्थइ, ताथृक्थइ, करत, पग धारति ॥
॥ सचिय० ॥५ ॥

तासु करि बैठे हरि सकल परिवारसो ॥
देहीपरदछिना जिनहि जय कारसो ॥
आनकर सचिय जिननाथ उर धारतो ॥
॥ सचिय० ॥ ६॥
आनि पांडुकशिला पूर्वमुख थापी जिम ॥
करहि अभिषेक उत्साहसौ अधिक तन ॥
देखि प्रभुवदन कोडि रविवारति ॥
॥ सचिय० ॥ ७ ॥
जोजनहि आठ गंभीर कलशा बनें ॥
च्यार चौराइ मुख एक जोजन तने ॥
सहस अष्टोत्तर कलस सिर ढारति
॥ सचिय० ॥ ८ ॥
छत्रमणि खचित ईशानकर ताडही ॥
सनतमाहेंद्र दोऊ चमर शिर ढारही ॥
देव देवी सुपुष्पांजली ढारती ॥
॥ सचिय० ॥ ९ ॥
जल सुगंध अक्षत पुष्प चरु लेधरे ॥
दीप अरु धूप फल अर्ध पूजा करे ॥

पांडाका और नीर जना वारती ॥
॥ साचिय० ॥ १० ॥
कियो सिंगार सब अंग समाज को ॥
आनि माता दियो बहुरि जिनराजको ॥
तृपती नही इगरूप नीहारति ॥
॥ साचिय० ॥ ११ ॥
ताल मृदांग धुनी सपत सुरवाज ही ॥
नृत्य तांडव करत इंद्र अतीछाज ही ॥
करत उत्साहसो निजसुपद धारति ॥
॥ साचिय० ॥ १२ ॥
भव्यजन लोय जिन जनम उत्सव करे ॥
आपने जनमके सकल पाति कहरे ॥
भगति जिनराजकी पार उत्तारति ॥
॥ साचिय० ॥ १३ ॥

॥ घत्ता ॥

जिनवरपदपूजा भावपूर्णैः कृतास्मै- ।
स्वपद निजगतासौ भावपूर्णैदुवंद्यो ॥

जिनवर वरमाता माननीयं समर्प्यों ।
स जयति जिनचंद्रो लालचंद्रो विनोदी ॥ १४ ॥
॥ अर्घं इति जयमाला ॥

॥ विधि ॥

यानंतर केवळी गादीस अष्टक देऊन संघपूजा करून मेरुहून प्रतिमा उचलून हात्तीवर बसवून उत्सव रचनेस तीन प्रदक्षिणा देऊन प्रतिमा मातेपासी सिंहासनावर मांडून पुढें इंद्रानें नृत्य करावें मग प्रतिमा रचनेंत मांडुन कथेस उभे राहणें मग पाळणापर्यंत याचकाहाचें सोंग आणावें.

॥ शार्दूल विक्रिड ॥

तेव्हां श्रीजिनजन्म जाणुनि चतुर्नीकाय देवासि हि ।
आनंदे जिनभक्ति आणुनि मनी सौधर्म इंद्रादिही ॥
लक्षें योजन हस्ति जो शतमुखी श्रृंगारुणी स्वस्थळीं ।
आला आरुढ होउनी तदुपरी तीर्थेशजन्मस्थळीं१॥२॥

॥ सव्याएकतिसा ॥

सह सशत इंदुमान जोजन सुनागराज सत है- ।
वदन अति तन छवि सति है ॥
वदन वदन वसु रदन रदन प्रतिसर सरप्रति ।
कंजसिर रवि भांत है ॥
कमलनी प्रतिवान भूज मान पुंडरिक वसु सत ।
दल शुभ शोभा छवि अति है ॥
दल दल प्रती नटी नटत समाज जुत्त सत्तावित ।
कोडि इम अपसरा विदीत है ॥ १ ॥

॥ छंद इंद्रवज्रा ॥

करोनिया जै जय सत्प्रमोदें ।
नंदस्व वर्धस्व वदोनि शद्धें ॥
घेवोनि इंद्राणि सुरेंद्र आज्ञा ।
प्रसून गेही मग गेली सुज्ञा ॥

॥ वसंततिलका ॥

मातंमहीत जिन दर्शुनि इंद्ररामा ।
प्रदक्षिणा करुनि तीन करी प्रमाणा ॥

मायामयी शिशुपुढें धरि मातृकेचे ।
आणोनि बाळा दिधले करि वामवाचें ॥
सौधर्म तो धरुनि अंकिहि बाळकातें ।
जाला गजारुढहि हर्षुनिया मना तें ॥
ईशान छत्र धरि आणि सनत्कुमारें ।
माहेंद्र हें चवरि ढाळिती भक्तिभारें ॥

॥ छंद इंद्रवज्रा ॥

मेरुवरी बाळक नेऊनीयां ।
पांडूक शीळे वरि स्थापुनीयां ॥
सहस्त्र अष्टाधिक कुंभ देवें ।
क्षीराब्धि नीरें भरुनी स्वभावें ॥

॥ छंद वसंततिलका ॥

आणोनि देतिघट हस्तकि वासवाचे ॥
ते ढाळिती सुरपती वरि बाळकाचे ॥
घालेनियां न्हवन बाळक भूषणानें ॥
श्रृंगारुनी पुजियलें वसुधार्चनानें ॥

॥ पद राग खटका ॥

अजि गिरिराजके शिखर सुंदर सखी होत है
अतुल कौतग महामन हरणा ॥ टेक ॥
उपजत जिनंदकु जगतके चंदकु लेगये ॥
इंद्र मिल जनम मंगल करणा ॥
आजि ॥ १ ॥
हाथ हाथ धरें सुरण कंचक घरे क्षीरसागर भरे
नीर निरमल बरण ॥
आजि ॥ २ ॥
सहस अर आठ गिन एक हि वार ॥
जिन ईस केशीस पर करणा लागे ढरण ॥
आजि ॥ ३ ॥
नचत सुरसंदरी सरस रस सुभगी गीत गावे ॥
अरति ताली करणा ॥
आजि ॥ ४ ॥
देव दुंदुभि गजे बीन बंसी बजे ॥
एकसी परत आनंद घनकी भरण ॥

॥ आजि ॥ ५ ॥
नैत्र अंजलि किये इंद्र हर खितहि ॥
यत्र पतन होत पिय रूप अमृत झरण ॥
आजि० ॥ ६ ॥
दास भूधर भने सुदीन देखे बने ॥
कहथके लोक जीभन कर्गी सके वरण ॥
॥ आजि० ॥ ७ ॥

॥ छंद बसंततिलका ॥

हस्ती वरी बसउनी मग बाल सुझें ।
आणोनि मातृजवळीं दिधलें वृषानें ॥
पाहूनियां अधिक रूप जिनेश्वराचें ॥
ते इंद्र नृत्य करितों पुढतीं तयांचें ॥ ५८ ॥

॥ पद ॥

इंद्राचे मुगुट लावले ॥ सिंहासन कंपित जाले ॥
जिन जन्म जाणुनि सर्वे ॥ उत्सवास सुरपति आले ॥
इंद्राचे ॥ धृ. ॥

इंद्राचे आज्ञे करून ॥ शचिने त्या कृत्रिम बाळा ॥
ठेउनी माते पासीं ॥ घेऊनी उत्तम बाळा ॥
आणुनि इंद्राहाती ॥ दिधले ते सुकुमाळ ॥
कुंजरारूढ तो इंद्र ॥ घेउनि अंकित बाळ ॥
इंद्राचे ॥ १ ॥
नेउनि मेरु शिखरी ॥ पांडुका शिले उपरी ॥
बाळक स्थापुनि मग ते जाउनि क्षिरसागरीं ॥
अष्टाधिक सहस्त्र एक ॥ कळशासि भरोनि वारी ॥
आणुनि बाळा वरितें ॥ ढाळितीं इंद्र स्वकरीं ॥
इंद्राचे ॥ २ ॥
विधियुक्त न्हवन करोनि ॥ श्रृंगारुनि बाळक पूजिले ॥
ते अतिशय बाळपनिचे ॥ दशगुण करुनि स्तविले ॥
आणुनी बाळक मग ते ॥ जननीचे जवळी दिधले ॥
नृत्य कला महति करोनि ॥ स्वस्थानि सुरपति गेले ॥
इंद्राचे ॥ ३ ॥

॥ सवया एकतिसा ॥

या विधि सुरेश जिनमज्जन विधान करी-
अंशुक आभूषण सुतन पहिरायि है ॥

लेई दर्व शुचि चरण चढाइ तब बहुविधि थुति करि प्रभु गुण गाईये ॥ फेरी ऐरावत थापिले अभिधान जाप जपत सुर जिनपुर आइये ॥ मात गोद थापी नृत्यकरी निजथानक गयो मन सुख सिंधु प्रभु शिर नायियै ॥ १ ॥

॥ छंद वसंततिलका ॥

क्रीडार्थि ते सुरकुमार हि ठेउनीयां ॥
गेले निजास्पदि सुराधिप वंदुनियां ॥
पुत्रोत्सवासि नृपती करि हर्षुनीयां ॥
वांछीत याचक जना प्रति देउनीयां ॥

॥ विधी ॥

या नंतर माते जवळून सिंहासनातून प्रतिमा उचलून पाळण्यांत निजवणें पाळणा म्हणणें ॥

॥ अथ पाळणा ॥

जो जो जो जो रे जिनपती । निज बाळा निगुती ।

निद्रा लागु दे। स्वरूपी। धरुनी ध्यान स्थिती।
जो जो ॥ धृ. ॥

आदी षण्मास। धनदान। इंद्राचे आज्ञान।
जन्म नगरींते। रचीली। द्वादश योजन।
जो जो ॥ १ ॥

घेउनि इंद्राचा। आदेश। करोनि साहस।
श्र्यादिक षट्देवीं। त्या आल्या। गर्भ शोधायास।
जो जो ॥ २ ॥

आदि गर्भाचे। षण्मास। पुढें नवमास।
रत्नादिक वृष्टी। आंगनी। त्रिकाळि विशेष।
जो जो ॥ ३ ॥

पश्चिम रात्रीतें। मातेसी। सोळा स्वप्न जाले।
तीर्थंकर स्वामी। जननीचें। जठरीं संचरीलें।
जो जो ॥ ४ ॥

छप्पन कूमारी। मातेची। बहुधा सेवा करिती।
जाले नवमास। संपूर्ण। जन्मला जिनपती।
जो जो ॥ ५ ॥

इंद्रादिक देव। जाणोनी ऐरावत घेऊनी।

आले जन्मपुरी । लागोनि शचि घाडिली सदनी ।
जो जो ॥ ६ ॥
मोहनि मातेसी । घालोनी । बालक उचलोनी ।
शचिनें इंद्राचे । जवळीं । दिधलें आणोनी ।
जो जो ॥ ७ ॥
इंद्रें हस्तिवरी । बसऊनी । मेरू शिखरी नेले ।
जन्माभिषेक । करोनि । बालक आणिलें ।
जो जो ॥ ८ ॥
जवळीं जननीचे । बालक । देवोनि कवतुक ।
इंद्र गेलासें । स्वर्गासी । करोनि नाटक ।
जो जो ॥ ९ ॥
पाळणा आनीला । शिल्पांन । कुशळत्व करून ।
सुवर्ण पाटाचा । संपूर्ण । जडिले पंचरत्न ।
जो जो ॥ १० ॥
च्यार्‍ही कळश । माचवे । वैडुर्यांचे बरवे ।
पाळ्यावर मोर । सोडिले । सारस हंस नवे ।
जो जो ॥ ११ ॥
इंद्र नीळाच्या । दांडिया । सुवर्ण साकळिया ।

पाळणा लांबविला । मंदीरी तेजें लोपे सूर्या ।
जो जो ॥ १२ ॥
चंद्रोपक वरतां । जरतारी । मोत्याची झालरी ।
खेळणें बांधिले । साजिरे । पाळण्या उपरी ।
जो जो ॥ १३ ॥
बाळा अंगीते । वसन । नाना परिभूषण ।
तेज फाकलें । विस्तीर्ण । लोपें सूर्य किरण ।
जो जो ॥ १४ ॥
बालक पाळणीं । पहुडलें । यश विस्तारीलें ।
एउनि खगवनिता । देवता । बाळक वंदिलें ।
जो जो ॥ १५ ॥
सुवर्ण सूत्राची । ते दोरी । घेउनियां करी ।
बाळा हलविती । कुमारी । मुग्धा प्रौढा नारी ।
जो जो ॥ १६ ॥
गाउनियां गीत । युवती । आळी पुरवीति ।
पाहुन मातेसी । आनंद । होत असे चित्तीं
जो जो ॥ १७ ॥
जिनवर पाळणा ॥ जे गाती ॥ तया पुत्र प्राप्ती ॥

निश्चयि होईल ॥ मंगळ ॥ वदतो ब्रह्म महति जो जो ॥ १८ ॥ इति पाळणा समाप्त ॥

॥ पद ॥

छकडक बचड कच्च कडवो ।
माझ छकडक बचड छकड ॥ धृ. ॥
मळमुत्र रहित तनु कोमल ज्याची ।
त्रिभुवनि हे बहु सुगडवो ।
माझ छकडक. ॥ १ ॥
अंगुष्ट चोखितो बाळक तान ।
होय उतान उबडवो ।
माझ छकडक. ॥ २ ॥
क्षण रांगे क्षण बसुनी रमतो ।
क्षण एक हर्षित मुखडवो ।
माझ छकडक ॥ ३. ॥
देव कुमारां संगें रमतो ।
क्षण वस्त्र क्षण उघडवो ।
माझ छकडक ॥ ४ ॥
उभे राहतो क्षण एक पडतो ।

पाउल टाके लंगडव्यो ।
माझ छकडक. ॥ ५ ॥
जन वल्लभ हित कारक वचन ।
बाळक बोले बुबडव्यो ।
माझ छकडक ॥ ६ ॥
वज्र वृषभ नाराच शरीरहि ।
समचतुस्र रुपडव्यो ।
माझ छकडक. ॥ ७ ॥
दश अतिशय युत उद्भवताचि
अनंत बळ हें प्रौढव्यों
माझ छकडक ॥ ८ ॥
महति म्हणे जिनमाता बाळक ।
लाडवी घेउनि मुकडव्यो ।
माझ छकडक ॥ ९ ॥

॥ वसंततिलका ॥

सहस्र आठ शुभलक्षण बालकाचें ।
पाहूनि तोष उपजे हृदयीं ।पित्याचे ॥

नानापरीं धरुनि वेषहि देव जेतें ।
बाळा सर्वें स्वमनिं हर्षुनि खेळती तें ।

॥ छंद शार्दूल विक्रीड ॥

चंद्रा तुल्य गुणासहीत जिन जो वृध्दी प्रती पावला ।
सम्यक्त्वान्वित जो दृगातिशययुक् त्रीज्ञानी तो शोभला ॥
लक्षें विंशति पूर्व आयुगत तत्पर्यंत बाळाक्रिडा ।
भोगोनी उपरी कुमार पदिं तो सन्मार्गि लावी मुदा ॥
इंद्रानें अवधीं विलोकुनि महाकल्पाख्य तो कल्पही ।
या दोघा प्रभुच्या यशस्वति सुनंदाख्या सुता दोविहि ॥
दिल्ह्या अदि जिनासि त्या परणुनि सदान मानोत्सवें ।
राजी स्थापुनि नाभिजासि मघवा स्वस्थानि गेला तवें॥

॥ छंद वसंततिलका ॥

आनंद युक्त जन भोगिति सर्व सौख्य
ते लोपले सकलही मग कल्पवृक्ष

लोक क्षुधा करुनि पीडित सर्व झाले ।
सांगावयासि वृषभ प्रभु पासि आले ॥ ६३ ॥
ऐकोनि आदि विभुनें जन बोध केले ।
ते इक्षु वृक्ष रसयंत्र विदीत केले ॥
इक्ष्वाकुवंश अभिधान विभूसि जाले ।
ते इक्षू वृक्ष रस पीउनि लोक धाले ॥ ६४ ॥

॥ छंद मालिनी ॥

कितिक दिन सुखी तो लोकही नांदताहे ।
वृषभ विभु नितीचा मार्ग संस्थापिताहे ।
सकल जन मनाच्या संशयातें निवारी ।
सुगुण हृदय धारी दुष्ट संहारकारी ॥ ६५ ॥

॥ अभंग ॥

नृपाचा हा धर्म । क्षेत्राचें रक्षण ॥
शत्रुचे खंडन । करिजें तें ॥ धृ. ॥
दुष्टाचा निग्रह । सुष्टाचें पाळन ॥
पाप निर्दाळन । करितें जें ॥ १ ॥

संग्रामाचें ठाई । न सरति मागें ॥
वचनाचा भंग । न करिती ॥ २ ॥
ऐसि या नीतीनें । प्रजासि रक्षिती ।
धर्मी तो नृपती । महति म्हणे ॥ ३ ॥

॥ छंद भुजंगप्रयात ॥

अति ते क्षुधा व्यापली संप्रजासी ।
प्रजा ऐउनि सांगिती नाभिजासी ॥
तदा शिल्पि वाणीउयही खड्गधारी ।
कृषी ही मषी स्थापिलें व्येवहारी ॥ ६६ ॥

॥ छंद इंद्रवज्रा ॥

व्यापार ऐसे विविधा परिजें ।
आदी प्रभूनें उपदेशिलें जें ॥
सर्व प्रजा त्या परी आचरीति ।
ते पोट संपूर्ण सुखें भरीति ॥ ६७ ॥

॥ छंद वसंततिलका ॥

यशस्वतीसि रमतां शत पुत्र जाले।
प्रतापवंत भरतादिक वेगळालें ॥
ते ब्राम्ही नाम दुहिता मग एक जाली।
ज्ञानी सरस्वति समान हि औतरीली ॥ ६८ ॥

॥ छंद भुजंगप्रयात ॥

सुनंदेसि बाहूबळी पुत्र जाला।
अती रूपी तो काम औतार जाला ॥
सुता एकची सुंदरी नाम्नि जाली।
अशी संतती आदि नाथासि जाली ॥ ६९ ॥

॥ छंद शार्दूल विक्रीड ॥

कोन्हीं एक दिनीं समग्र दुहिता पुत्रासी पाचारुनी।
पुत्रासी स्वर वर्ण ते शिकउनी शास्त्रादि अध्यापुनी ॥
संख्यासंख्य अंनत अंक गणती कन्यासि सांगीतली।
ऐसी धर्म सुअर्थ काम निति हें लोकामधिं स्थापिली ॥

॥ अभंग ॥

नियम पाळुनी । इंद्रिय दमुनी ।
समता धरुनी । धर्म घडे ॥ धृ ॥
तोचि धर्म सर्व । कल्याण कारक ।
सुगति दायक । हितकारी ॥ १ ॥
मोक्षाचा हा मार्ग । धर्म करि सार ।
त्यागुनि विकार । सकळही ॥ २ ॥
महति सागर । म्हणे ब्रम्हचारी ।
आराधन करी । या धर्माचें ॥ ३ ॥

॥ छंद वसंततिलका ॥

लक्ष त्रिषष्ठि मित पूर्वहि राज्य केलें ॥
ते एक लक्षमित पूर्व हि राहिजेलें ॥
तो हा प्रपंचयुक्त सर्वहि काळ गेला ॥
वैराग्य आझुनि नये मनिं लाभिजाला ॥ ७१ ॥
सौधर्म इंद्र हृदयीं करितोचि चिंता ॥
ते वासवासि सुचलें मग एक चित्ता ॥

निलंजसेचि उरली द्विघडी स्थितीतें ॥
नृत्यार्थि पाठविले नाभिजमंदिरातें ॥ ७२ ॥
ते अप्सरा प्रभु पुढें मग नृत्य दावी ॥
वीणा मृदंग लय संयुत भाव दावी ॥
राग स्वरादि विविधा परि तालमाना ॥
संगीत तानयुत ते करि नृत्य नाना ॥ ७३ ॥

॥ श्रीराग ॥

श्रीराग गावत सारंग धरी।
नाचत नीलंजसा रिषभके आगे।
सारिगम पधनी धप मगरी॥ श्रीराग॥
मूर्छना तानबंधान उडे रवाज़ उडुमान।
ठेया ठेवनके जुतार भान मृदंग करी।
घृनित घुघरी वाजे देखत संवरला जे।
नौसत श्रीराग सोहे सुरसुंदरी ॥ श्री. ॥ २ ॥
संगीत रंगीतरूप । निरखत चल्यो भूप ।
जय जय जयजय जिन आनंद भरी ।

नीलंजसा विघट पेसी करी करुणा ।
रतन किरति प्रभु देखि करी ॥ श्री. ॥ ३ ॥

॥ छंद शार्दूल विक्रीड ॥

नृत्यासी करिता स्थिती उरलिते नीलंजसाची स्वतां ।
तीचें पुद्गल सर्वही विखरलें तें दर्शितां दर्शितां ॥
ऐसें पाहुनि आदिनाथ जिन तो चित्ती विचारी तसें ।
जे वस्तु जगि विद्यमान तितुकी अस्थीर भावितसें ॥

॥ छंद वसंततिलका ॥

ऐसें विचारुनि मनीं वृषभेश्वरानें ।
दिल्हे स्वराज्य भरताप्रति तें नितीनें ॥
बाहुबळीसि मग पौदनपूर दिल्हें ।
अन्यें सुतासि पुरपाटन देश दिल्हें. ॥७५॥

॥ छंद भुजंगप्रयात ॥

अनूचिंतना द्वादश श्रेष्ठ चित्तीं ।
विचारुनी वैराग्य जाला स्वचित्तीं ॥

तदा ब्रम्हनाकाहुनी देव रूपीं ।
स्वतां एउनी ते करीती स्तुतीसी ॥ ७८ ॥

॥ विधी ॥

या नंतर ब्रम्हदेवाचे आठ सोंग आणावेत. त्या आठ जनाहिन आठ श्लोक स्तुतिचे वेग वेगळे म्हणून वंदन करून जावे.

॥ अभंग ॥

धन्य धन्य जिनपती । तुज त्रिलोक वंदीति ॥ धृ.॥
धन्य धन्य वीतरागा । चित्ती धरिले वैरागा ॥१॥
तुझि सेवा जे करीति । त्याचे पाप न रहाती ॥२॥
महति ह्मणे । नाहि त्रिलोकी तारण ॥ ३ ॥

॥ सवया एकतिसा ॥

अहो तुम दिनानाथ शिवपुर पथ साथ
तुम बिन इहकाज करे कोन जगमे ॥
पंच महाव्रत पंचसामिती गुप्ति तिनि

चारित्रको धार तुम ठाढे शिव मगमें ॥
तुमरी दया सों सुखल हत जगत जन-
तुम बिन फिरत चौऱ्यासि लाख भगमें ॥
तुम मन माहि विचार सों इधरे-
कोइमन सुख सिंधु मुक्ति लहे एक डगमें ॥१॥

॥ छंद भुजंगप्रयात ॥

जगत्स्वामि तूं मुक्ति भर्ता विशेषीं।
तुझें वीण कोन्हीं न धर्म प्रकाशी ॥
तुची ध्यान कर्ता महा धैर्य धर्ता ।
मन स्थैर्य कर्ता निजात्मा प्रवेत्ता ॥ ७७ ॥
तुझे वांण नाथा कदा मुक्ति नाहीं ।
तुला सेविना दुःख राहात नाहीं ॥
असा स्वामि तूं धन्य मुक्ती सुखासीं ।
स्वतां साधिसी साधवीसी जनांसी ॥ ७८ ॥

॥ छंद बसंततिलका ॥

ऐसी स्तुती करूनि देव तपास्वि गेले ।

चातुर्निकाय सुर संयुत इंद्र आले ॥
श्रृंगारूनी पुरुहुतें जिन पुंगवातें ।
हर्षांश्रितें बसविले मग पालखींतें ॥ ७९ ॥
भूपादि देव नर मीळुनि उत्सवानें ।
स्कंधक्षणक्षण दिल्हा सकळा जनानें ॥
ऐकोनि मातृ जनकादिक दामिनी त्या ।
वीयोग शोक करिती वपु कंपुनी त्या ॥८०॥

॥ अभंग ॥

जगत्प्रियाचा वियोग । होय दुःखाचा संयोग ॥ ध्रु.॥
कोमाविले जनक मुख । मातेलागीं जालें दुःख ॥१॥
हा हा करुनी युवती । अंग भूवरी टाकितीं ॥ २ ॥
नाना विलाप करून । शोक करिती सज्जन ॥ ३ ॥
महति म्हणे वियोगाचे । दुःख सोसवेना साचे ॥४॥

॥ छंद वसंततिलका ॥

हा शोक पाहुनि तवे जनकादिकासी ।
संबोधिले जिनवरे सकला जनासी ।

ते गाति नृत्य सह मंगळ गीत गाणें ।
आकाशमार्गी खग चालति देवराणे ॥ ८१ ॥
सिध्दार्थ काननिं वटा तळिं एउनीयां ।
आदी जिनेश सिबिकांतुनि ऊठुनीयां ॥
वस्त्रादी भूषण परिग्रह त्यागुनीयां ।
तो बैसला तव शिळेवरि जाउनीयां ॥ ८२॥

॥ छंद भुजंगप्रयात ॥

तदा ॐनमः सिध्द बोलोनि होटीं ।
स्वता लोच केला करें पंचमुष्टी ॥
मुदा जन्म मासादि सम्यक् तिथीला ।
गुणांकीत तीर्थेश दिक्षीत जाला ॥८३॥

जिनराज दिक्षित जाला ।
आनंदे जय जय बोला ॥ १ ॥
जय बोला आदिनाथ स्वामींची जय ।
अर्हत्परमेष्ठिस्मरण ।
जय जय श्री जिनराजा ॥ २ ॥

॥ विधी ॥

या नंतर प्रतिमा पालखींत बसवून महाउत्सवानें रचनेस तीन प्रदक्षिणा देउन मग पालखीतून प्रतिमा हवनयुक्त रचनेत दिक्षा वृक्षाखालीं सिंहासनांत प्र- मांडुन दिक्षा संस्कार करून अभिषेक करावा.

॥ अथाभिषेक ॥

श्रीमत्कक्षतगंरधस्थराचिरे शीलापटे स्वस्यच।
ध्यात्वा सिध्दपदं परिग्रहहतो जग्राह दीक्षां स्वभूः ।
तत्रेंद्रोहमपि स्वभूषणवरान् यज्ञोपवीतं स्त्रजो ।
मुद्राशेखरकंकणंच त्रिदधे तीर्थेशदक्षोत्सवे ॥

पीठस्थापनं । पीठ प्रक्षालनं ।
पीठार्चनं । श्रीकारलेखनं ।
श्रीयंत्रार्चनं ॥ श्रीवर्णे प्रतिमास्थापनं
इंद्रस्थापनं । आत्मालंकरणानिच ।

इत्यादिक अर्चना फलपर्यंत अभिषेक बोलावा ॥

॥ अथाष्टकं ॥

सिंधुनिर्जरापगादितीर्थजैः सुनिर्मलैः।
शीतलैः सुगंधयुक्ततापहारकै जलैः ॥
आदिधर्मतीर्थकारकं सुनाभिनंदनं ।
संयमोत्सवे यजामि पापतापकंदनं ॥
ॐ ऱ्हीं दीक्षाधारकाय श्रीवृषभदेवाय जलं ॥१॥
इत्यादिक अष्टक पुष्पांजली आशिर्वाद बोलावा.

॥ जयमाला ॥

जय अरहंतं जय श्रीकांतं ।
जय नरसुरपशुशरणं ॥
जय जय भगवंतं गुणगणवंतं ।
वंदे संयम गुणधरणं ॥ १ ॥
फणि फणिकामिनी कामिनीगानं ।
किन्नरी किन्नरी वीन निहानं ॥
जोइस सरस णारि वरिणट्टइ ।
कप्पसुरासुरीजिनगुणवट्टइ ॥ २ ॥
दों दों दों दों दों दों मंदल ।

धों धों धों धों धों धों दोंदल ॥
तिमिकि तिमिकि तिम तिम तिम तालं
रणकि रणकि रण रण रण कालं ॥३॥
रुणुकी रुणुकी रुणु रुणु रुणु वीना।
झुणुकि झुणुकि झुणु झुणु हर हरवीना ॥
भों भों भों भों भों भों भेरी ।
टिमिकि टिमिकि टिमि टिमिटिमि टिमकी॥
धमकि धमकि धम धम धम धम कि ॥
दपमप दपमप दपमप पडहं ।
घुरुकि घुरुकि घुरु घुरु घुरु दडह ॥५॥
पिपि मिकि पिपि मिकि पिपि मिकि वंसं।
खिखिनिकि खिखिनिकि खि खि ।
नि कि कंसं ॥
तों तों तों तों तों सिरिमंडल ।
थुंगिनिकि थुंगिनिकि थुंगिनिकि ।
मंडल ॥ ६ ॥
त त थइ त त थइ पद संचार ।
गण गण गण गण किरइ विचार ॥

विज्जाहर महाकिंणारिणड्डइ ।
भूमणारि फणिणारि पइ ड्डइ ॥ ७ ॥
पुव्वपच्छिम विदेहाणारि ।
करइ विलास बहु सुहमारि ।
पदसंचारे वीणावज्जइ ॥
तंति माझि सिरि जिनगुण गज्जइ ॥८।
सव्वामहि आगति उत्तर हि ।
मंडमादक खिरीवित्थारइ ॥
लवणाणंतरि भामण लिज्जइ ।
जिम संसार भमण भंजिज्जइ ॥ ९ ॥
घत्ता । जय संयमवंतं गुणगणमंतं ॥
वंदे लोय शरण ।निलयं ।
अरहंतं । सुमइ जलहि ॥
जिनसुदानिलयं ॥ १० ॥ अर्घं ॥
॥ इति जयमाला. ॥

॥ विधी ॥

या नंतर केवळी गादीस अष्टक देऊन संघपूजा

करून मग रचनेपुढें इंद्र नृत्य करून मग कथा समात्प करून आरति करावी मग दिवस उगवल्या नंतर लोचकेश महाउत्सवानें मिरवत इंद्रादिक सर्व लोकाहाने नदी सरोवरास घेऊन जाणें, तेथें ते केश सिरउन मग मिरवत घरास येणें, मग रात्रीं कथेस उभें राहणें. ॥

॥ छंद चामर ॥

लोचकेस रत्नपात्रि घेऊनी सुभक्तिनें ।
टाकिले क्षिराब्धिमध्यें नेउनी सुराहिनें ॥
दुंदुभी प्रमूख वाद्य गर्जना नभस्थळीं ।
संयमोत्सवा करोनि इंद्र जाति स्वस्थळीं ॥८८

॥ छंद वसंततिलका ॥

षण्मासि मौन धरिलें वृषभेश्वरानें ।
दिक्षीत तत्समयिं चार हजार राणे ॥
होवोनि ते मुढपणें मग भ्रष्ट झालें ।
चारित्रा भंगुनि तदा कुतपस्वि जाले ॥ ८९ ॥

॥ पद ॥ राग-हजुरी ॥

चरण रज वंद श्रीनाभिजिनंद ।
चरण ॥ टेक
कनक वरण सुंदर शोभित ।
शांतिमुरति मुखचंद चंद चंद ॥ चरण.॥१।
गुणसुगनावलिमालाविराजित ।
नितप्रति गति दुति बंद बंद बंद ॥ चर. ॥२॥
उपसम मुगुट सीस अति शोभित ।
दिगंबर मुनिहि यंद यंद यंद ॥ चरण ॥ ३ ॥
किसन दास बलि जाऊं आदि प्रभु ।
काम दहन सुख कंद कंद कंद ॥ चरण. ॥४॥

॥ पद. ॥

शिवरमणी व्याहानकुं मुनिजन दुल्हे है शुभेष
बनाया । शिवरमणी ॥ धृ. ॥
दशदिकरूप बसन तन धरके ।
रत्नत्रय शिरमोर धराया ॥ शिवणी ॥ १ ॥
तपभूषण संयम सुरमना ।

समता गज चढें दुःख नसायां ॥ शिव. ॥२॥
लार बराति धरम दश लछन ।
जिन सो आपका चित हुलसाया ॥ शिव. ॥२॥
रागादिक तस्कर जितनको ।
ज्ञान सुभटकौ लार लगाया ॥ शिव. ॥३॥
हां बटत बधायि दुविध धरमकी ।
याचक भविजनले शिरनाया ॥ शिव. ॥ ४ ॥
परपरणति तजी छींनमें जोधा ।
शुभदिन शिव यह हात गहाया ॥ शिव. ॥५॥

॥ छंद स्रग्धरा. ॥

षण्मास ध्यान जाले उपरि जिनपती उत्तरी भावरीसी ।
चाले शोधीत ईर्यापथ मग विनिता संज्ञिका सत्पुरीसी ॥
आला हा भूप ऐसें म्हणुनि जन तयां भेट रत्नादि देती ।
याला आहार दीजे इतुकिहि न कळें सर्व लोकांसि युक्ति

॥ छंद भुजंगप्रयात ॥

नदां अंतराया प्रती जाणुनीयां ।

फिरोनी मुनी तो वनीं एउनीयां ॥
पुन्हां ध्यानिं षण्णामिं तो राहिजेला ।
तदा क्षेपकश्रेणि आरूढ जाला. ॥ ८७ ॥

॥ पद. ॥

देखोजि जिनेश्वर स्वामी कैसो ध्यान लगायो है.
देखोजि. ॥ धृ. ॥
कर ऊपर कर अधिक बिराजे ।
आसन दृढ जमायो है ॥ देखोजि० ॥ १ ॥
गमना गमन निवार जिनेश्वर ।
मुगति पुरकु ध्यायो है ॥ देखोजी० ॥ २ ॥
तिन लोकमे महिमा ज्याकि ।
चंद्रखुशालने गायो है ॥ देखोजि० ॥ ३ ॥

॥ छंद स्वागता ॥

ध्यान पूर्ण रस मासहि केले ।
एक वर्ष उपवासहि जाले ॥
पारणार्थि वृषभेष निघाला ।
हास्तिनागपुरपत्तनि आला ॥ ८८ ॥

॥ छंद वसंततिलका ॥

सोमप्रभ प्रभु तया गजपत्तनाचा ।
श्रेयांस नाम लघु बंधु तया नृपाचा ॥
तो स्वप्न रात्रिं वसु दर्शुनि जागृतीतें ।
सोमप्रभा प्रति पुसें सुफळश्रुतीतें ॥ ८९ ॥

॥ छंद भुजंगप्रयात ॥

श्रियांसासि सोमप्रभा सांगताहे ।
नरश्रेष्ठ तो आज येईल पाहे ॥
उदार प्रभू कल्पवृक्षापरी तो ।
जसा धीरधी मंदराद्रीपरी तो ॥ ९० ॥

॥ छंद शार्दूल विक्रीड ॥

सिंहातुल्य बळी महंत गजवद् गंभीर सिंधूपरी ।
मार्तंडापरि तो प्रतापि फळ हें तेजस्वि चंद्रापरी ॥
नंदीचें फळ धर्मवंत नर तो येईल तूझे घरीं ।
ऐसी सांगितली तुला फळश्रुती स्वप्नाचीं अष्टापरी ९१

॥ छंद वसंततिलका ॥

श्रेयांस ऐकुनि फळश्रुति हर्षिलाहे ।
सौधावरी चढुन सर्व दिशांसि पाहे ॥
तेव्हां मुनी स्वरूप पाहुनि तोषलाहे ।
हा आपुला सफळ जन्म हि मानिलाहे ॥ १२ ॥

॥ पद ॥

जिन तेरे दरशनकुं मैं तो आयो रे ।
आयो रे सुख पायो रे ॥ जिन तेरे ॥ धृ ॥
जगत वंदनिक जगत पुजनिक ।
धन जननी तूं जायो रे ॥ जिन तेरे ॥ १ ॥
तरण तारण तूं साची जायो ।
भक्तिभाव चित्त लायो रे ॥ जिन तेरे ॥ २ ॥
चरमचक्षु अवलोकन करिने ।
ज्ञानदृष्टि आराधोरे ॥ जिन तेरे ॥ ३ ॥
मन वच काय करिने देखी ।
ब्रह्मदया गुण गायोरे ॥ जिन तेरे ॥ दृ० ४ ॥

॥ छंद शार्दूल विक्रीड ॥

पाहातांचि जिनेश्वराप्रति भवस्मृती श्रियांसाप्रती ।
जाली तत्समयीं विचार करितां जाला असे भूपती॥
पूर्वी जो नृप वज्रजंघ चर तो हा जीव सन्मूनिचा ।
राणी श्रीमति वज्रजंघ विभुची मी जीव होये तिचा॥९३॥
तेथें सर्प सरोवरीं उतरिलें ते चारणर्द्धी मुनी ।
दिल्हे अन्न सुदान आम्हि मुनिसीं सद्भक्तिभावें वनीं ॥
त्या सद्दान फलें सुभोग धरणीं स्वर्गादि मर्त्याप्रती ।
सौख्याचा गण भोगुनी वृषभ हा या लोकिं झाला यति॥

॥ छंद वसंततिलका ॥

ऐसें भव स्मरण आठविलें मनासी ॥
आहार दान विधि तो कळला मनासीं ॥
सौधाहुनि उतरुनी मुनिपासि आला ।
भावें त्रिशुद्धि मुनि लागिं नमोस्तु केला ॥९५॥

॥ चमरबंध ॥

जगत जीवन हितकार ।
जगत जीवन शिव सुख करो ॥
जगत जीवन सुविचार ।
जगत जीवन जलनिधी तऱ्यो ॥ १ ॥

॥ अडिला ॥

देखी नृपति रिषि राय अग्र व्है भक्तिसो ।
तिष्ट तिष्ट मुख तबे करे श्रुति शक्तिसो ॥
धन्य तपोधन धीर वीर तुमहो सही ॥
जे तुमसेवे चरण मुक्ति तिनही लही ॥ १ ॥

॥ छंद भुजंगप्रयात ॥

करोनी प्रणामा मुखें तिष्ट तिष्ट ।
वदोनी प्रती ग्राहिला योगि सुष्ट ॥
नवा भक्तिनें दातृ ससागुणानें ।
दिल्हे दान इक्षूरसाचें नृपानें ॥ ९६ ॥

॥ छंद वसंततिलका ॥

आहार घेउनि सुअक्षय बोलिलासे ॥
ईर्यापथासि मग शोधुनि चालिलासे ॥
तो ध्यान जाउनि करी जिन काननातें ॥
रत्नादि वृष्टि नृपमंदिरिं वर्षलीते ॥ ९७ ॥

॥ अभंग ॥

धन्य धन्य ते सुपात्र । धन्य दाता तो पवित्र ॥ ध्रु ॥
अठाविस मूळगुण । तप धर्म रत्न तीन ॥ १ ॥
याचे करी जो पाळन । तेचि सत्पात्र पावन ॥२॥
अलुब्धता श्रद्धा भक्ति । ज्ञान दया शांति शक्ती ॥३॥
सप्त गुण हे ज्याचे अंगीं । तोचि सुष्ट दाता जगीं॥४॥
ऐसे दातृ पात्र दान । पंचाश्चर्याचें कारण ॥५॥
महति ह्मणे सत्पात्राचि । धन्य धन्य महिमा साची॥६॥

॥ छंद शालिनी ॥

साढे बारा कोटि रत्नप्रमाण ॥
भूपागारी वर्षिले सत्य जाण ।

त्या पुण्याचे लोकिं माहात्म्य जाले ।
लोकाहीनें दानतें भावि केले ॥ ९९ ॥

॥ छंद स्वागता ॥

हे माहात्म्य कळतां भरतानें ।
जाउनी गजपुरासि मनानें ॥
श्रेयसासि नमुनी स्तवियेलें ।
दान एउनि गृहीं मग केले ॥ १०० ॥

॥ विधी ॥

रचने भोवतें पडदे बांधून मग रचनेंत चहू दिशे-कडुन सर्व दीप उजळणें मग ज्ञानकल्याणिकाचि अक्षत पडता वेळेस पडदे उघडुन जयजयकार करू-न अक्षत टाकणें मग सर्व लोकानें दीपाहामध्यें जग जग कापूर टाकून तीन प्रदक्षणा देऊन वंदना करणें.

॥ छंद वसंततिलका ॥

सहस्त्र वर्ष छद्मस्थ जिनेश्वरानें ।
केलें तप प्रबळ धर्म सुचिंतनानें ॥

त्या मोहनी प्रकृति सप्तहि दूर केल्या ।
तपोबळें सुगुणागिद्धिहि इष्ट जाल्या ॥१०१॥

॥ छंद शार्दूल विक्रिड० ॥

आयूष्या तिनि सातवे प्रकृतिहीं छत्तीस त्या नववे ।
दाहावे गुणिं सूक्ष्म लोभ हरुनी सोळाहि त्या बारवे ॥
ऐशा ह्या प्रकृती त्रिषष्टी हनुनी आरूढला तेरवे ॥
दोषाष्टादश वगळा जिनपती जाला तदा वैभवें॥१०२॥

॥ अथ घाति प्रकृति ६३ क्षपना ॥

चवथे गुणस्थानीं अनंतानुबंधी क्रोध, मान, माया, लोभ मिथ्यात्व, सम्यग्मिथ्यात्व, सम्यक् प्रकृति, ३॥ एवं ७ प्रकृति भवांतराचे ठायीं क्षपिल्यात "आयूष्या तिनि सातवे प्रकृतीही" सातवे गुणस्थानीं (नरकायुः तिर्यंचायु देवायुः) क्षपिल्यात छत्तीस नववे. ३६ नववे गुणस्थानीं नव्हा अंशाचे ठाईं छत्तीस प्रकृति क्षपिल्यात, त्या कैशा २ प्रथमांशे साधरण आताप

४ द्वितीयांशे एकेंद्रिय, द्वींद्रिय, त्रींद्रिय, चतुरिंद्रिय.

३ तृतीयांशे निद्रानिद्रा, प्रचलाप्रचला, स्त्यानगृद्धी

२ चतुर्थांशे स्थावर, सूक्ष्म.

५ पंचमांशे नरकगति, नरकगत्यानुपूर्वी, तिर्यंचगति, तिर्यंचगत्यानुपूर्वी, उद्योत.

८ षष्ठांशे अप्रत्याख्यान क्रोध, मान, माया, लोभ, प्रत्याख्यान क्रोध, मान, माया, लोभ.

२ सप्तमांशे नपुंसक, स्त्रीवेद.

६ अष्टमांशे हास्य, रति, अरति, भय, शोक, जुगुप्सा.

४ नवमांशे पुंवेद, संज्वलन क्रोध, मान, माया.

ऐशा छत्तीस प्रकृती नवबे गुणस्थानीं नवा अंशाचे ठाई क्षपिल्यात.

दाहा गुणि सूक्ष्म लोभ हरुनी ।

दहावे गुणस्थानीं सूक्ष्म लोभ हरिला ।.१६॥

सोळा हि त्या बारवें ।

बारवें गुणस्थानीं सोळा प्रकृति क्षेपिल्या त्या कैशा

निद्रा, प्रचला, चक्षुः, अचक्षुः, अवधि केवळ दर्शनावरणी, मतिश्रुति अवधि मनः पर्यय केवळ ज्ञानावरणी दान, लाभ, भोग, उपभोग, वीर्यांतराय ऐशा सोळा प्रकृति बारावे गुणस्थानीं क्षपिल्यात ऐशा सर्व तिरुसट घातिप्रकृतीचा क्षय जाल्यावर तेराव्या गुणस्थानावर चहडताच केवल ज्ञान उपजलें.

॥ छंद इंद्रवज्रा ॥

फाल्गुण एकादशि शुक्लपक्षे ।
तद्दीनि आद्ये प्रहरीं सुऋक्षे ॥
ते घाति कर्मक्षय सर्व जाले ।
सत्केवलज्ञान समुद्भवलें ॥ १०३ ॥
जिनराज केवळि जाला । आनंदें जय जय बोला ॥१०॥
जय बोला आदिनाथ स्वामीची जय ।
अर्हत्परमेष्ठिस्मरण ॥ जय जय श्रीजिनराज ॥

॥ विधी ॥

यानंतर वातकुमार कुबेरादिक चंद्र, सूर्य, धरणेंद्र,

गंधर्व, किन्नर, राक्षस, नृप, व्याघ्र, वृषभीपर्यंत सोंग आणावेत. समवशरण रचना करावी.

॥ छंद स्वागता ॥

त्या अनंत चतुष्टय लब्धिनें ।
दार्शिले मग चराचरही जिने ॥
जणुनी पुरुहुतें धनदाप्रती ।
सांगुनी रचियली समवशृति ॥ १०४ ॥

॥ छंद शार्दूल विक्रीड ॥

चार योजन ते क्षिती गणुनिया कोटत्रयाते भले ।
चाऱ्ही द्वार सुगोपुगसहित ते दीशाप्रती शोभले ॥
मानस्तंभ विराजती चहु दिशी मानासि निर्दाळिती ।
वापीका जलपूर्ण पद्मदळितें षट्पाद झंकारिती ॥१०५

॥ छंद द्रुतविलंबित ॥

कमलयुक्त सरोवर शोभले ।
अमृततुल्य जले भरले भले ॥

शुचि जलें भरल्या शुभ खातिका ।
विकसती कुसुमाश्रित वाटिका ।। १०५ ।।

।। छंद उपस्थागता ।।

तें वनोपवने अति शोभति ।
धूप कुंभ सुगंध विकासति ।।
तीर्थराज गुण गावुनि सुंदरा ।
नाट्य शाळिहि नाचति अप्सरा ।। १०६ ।।

।। छंद चामर ।।

त्या ध्वजा चतुर्दिशी चतुःसहस्र मानणें ।
तीनशें त्रिस प्रमा चलायमान वायुनें ।।
स्तूप हर्म्य वेदि शाल चैत्यवृक्ष शोभती ।
तो अशोक वृक्ष सर्व शोक दूर टाळिती ।।१०७।।

।। छंद स्रग्धरा ।।

कल्पीतार्थासि देती सकळ सुरतरू याचका लागुनी हे ।
शोभा इत्यादि नाना परिचिहि असतां संक्षेपे वर्णिली हे।

स्फाटिक प्राकारमध्यें नरसुर पशुच्या त्या सभा सर्व चारा
त्यामध्यें पीठिकाग्रे जिनपति बसला त्रिष्टर्गी, व्योमथारा।

॥ छंद उपेंद्रवज्रा ॥

अशोकवृक्षाश्रित तीर्थराजा ।
शोभे सुभामंडळि सूर्य तेजा ॥
गणेंद्र दिव्यध्वनि झेलतीते ।
सुपुष्पवृष्टी सुर वर्षतीतें ॥ १०९ ॥

॥ छंद चामर ॥

छत्र तीन मस्तकीं हिमांशुतुल्य शोभती ।
शुभ्र चामरे सुरेश दोहि भागि ढाळिती ।
धर्म चक्र शोभते सुदुंदुभि हि वाजतो ।
प्रातिहार्य अष्टयुक्त तीर्थराज राजतो ॥ ११० ॥

॥ पद ॥

चउ ओर बजन लगे इंद्र के नगारे ॥ चउ ओर ॥
सिंघासन मणिवीचित्र कमलासन धारे

सकल रिद्धि अंतरीक आसन विसतारे॥ चउ०१ ॥
सुर नर मुनि फणिपति करि जयजय जयकारे ।
दुंदुभी गहरान लागी अनहत सुरवारे ॥चउ० २॥
मेरा मन चातक सुनि गर्जत धुनि घटारे ।
केवल जिनवाणी झर लागी बरखारे ॥ चऊ०३ ॥
भवको आताप मिटे पाव सरति पारे ।
प्रेम अमी चाष्टतनत विगत भव विकारे ॥चउ०४॥

॥ अडिल्ला ॥

तहा सुरासुर आय विद्याधर नरतबै ।
करै महा उत्सव हरखे हियमें सबै ॥
स्थानदेखि मन सुख सिंधु ऐसे कह्यो ।
जय जय जय शद्ब दशौ दिश व्हय रह्यो ॥

॥ विधी ॥

या अडिल्ला पावेतों वातकुमारादि वृषभीपर्यंत सोंग आणावेत व.रा सभा विराजमान करून मग अभिषेक करावा.

॥ अथाभिषेक ॥

श्रीमत्केवलबोधलब्धिसमये सत्पीठिकाग्रे जिनो ।
वृक्षाधो हरिविष्टरेऽपि गगने भामंडलाढ्यः स्थितः ॥
तत्रेंद्रोहमपि स्रजं च मुकुटं यज्ञोपवीतं दधे ।
मुद्रां स्वाभरणाय कंकणमिदं ज्ञानाभिषेकोत्सवे ॥१॥

पीठस्थापनं । पीठप्रक्षालनं ॥
पीठार्चनं । श्रीकारलेखनं ॥
श्रीयंत्रार्चनं । श्रीवर्णप्रतिमानिवेशनं ॥
इंद्रस्थापनं । आत्मालंकरणानिच ॥

इत्यादि अर्चनाफलपर्यंत अभिषेक बोलावा

॥ अथाष्टकं ॥

सिंधुनिर्जरापगादितीर्थजैः सुनिर्मलैः ।
शीतलैः सुगंधयुक्ततापहारकैर्जलैः ॥
आदिधर्मतीर्थकारकं सुनाभिनंदनं ।
ज्ञानमंगले यजामि पापतापकंदनं ॥

॥ अथ जयमाला ॥

जय वोहसमुद्दा । तिहुयणचंदा ॥
जिणगुणविंदा मुनिसरणा । जय जय त्रिणिंदा ॥
लोयसुभद्दा । देव जिणिंदामयसरणा ॥ १ ॥

पराणाण धीराजणाणंदकारा ।
सुदेसे विहारा महारुव्वभारा ॥
तिलोये सुसाग महासोहयारा ।
जिणा निम्मलाजादकम्मारिहारा ॥ २ ॥
परामाणथंभेण पावोहिणासं ।
सुकासारमोपोदसोहापभासं ॥
महाखातियो पातियोभासमाणं ।
महापुप्फवाटी सुरासेव्वमाणं ॥ ३ ॥
सुपाया रतएण सोहापमाणं ।
परा णट्टसाला सुराणट्टमाणं ॥
परे काणणे देवदेवीविमाणं ।
महादेविया सोपताया सुमाणं ॥ ४ ॥
महासालसोहापराविज्जमाणं ।
महाकप्पादित्थावली सोहमाणं ॥

तहा झाणणे थुप्पसोहावलीणं ।
सुपायारतेएण चिंतामणीणं ॥ ५ ॥
मुणीणं सहा इंदराणी सुसारं ।
णरी अज्जियारूवसोहग्गभारं ॥
परा किण्णरीणं महाभावधारं ।
वराणागिणीणं महारूवतारं ॥ ६ ॥
वराजोयिसी भामिनी भावरत्ता ।
तहा कप्पवासी सुराधम्मसत्ता ।
तहा सुद्धधम्मेण णायेरदत्ता ।।
तहा जोयिसी देवपूजासुरत्ता ॥ ७ ॥
तहा वंतरा देव सेवा सुलद्धा ।
तहा भूमिवासायणाणेण बुद्धा ॥
तहा सिंहसप्पा सुधम्मेण सुद्धा ।
तहावेरमुत्ता वराधम्मसद्धा ॥ ८ ॥
तहा मज्झदेसे जिणिंदस्स ठाणं॥
तहा पीठ मज्झे सुवामेरुठाणं ॥
वरा अंगुला चारिमुक्कासुमाणं ।
वरा देवदेवी जणागायमाणं ॥

॥ घत्ता ॥

अरुहाजीणिंदा । पावानिकंदा ।
सिरिजिणविंदा णाणींदा । देवमहिंदा ॥
सामयणिंदा । सुमई सायर जयचंदा ॥१॥

अर्घ ॥ इति जयमाला ॥

॥ विधि ॥

या नंतर केवळी गादीस अष्टक देऊन संघपूजा करून मग रचनेपुढें इंद्र नृत्य करून कथेस उभे राहणें.

॥ छंद द्रुतविलंबित ॥

अतिशये चवतीसहि वर्तले ।
शुभ अनंत चतुष्टय लाधले ॥
युत षडुत्तर चाळिस सद्गुणें ।
जिन विराजित आत्मविभूतिनें ॥ १११ ॥

॥ पद. ॥

जिनवाणी प्यारी लागेजी जिनवाणी॥ धृ ॥
समवसरणकी अजब महिमा देखत मनहर खायोजी॥
॥ जिनवाणी० ॥१॥
इंद्र चंद्र धरणेंद्र जुआवे। प्रभुजिकु चमर ढुलावेजी ॥
॥ जिनवाणी० ॥ २ ॥
प्रभुजिके मुखसो निकसी वाणी। गणधर अर्थ लगायोजी
॥ जिनवाणी० ॥ ३ ॥
राजाराम भजत निसिवासर। विमल विमल गुणगावेजी
॥ जिनवाणी० ॥ ४ ॥

॥ पद ॥

बाणी यह मन मानी ॥ प्रभुकी ॥ धृ ॥
तीर्थंकरादिमहापुरुषनकी ।
ज्यामे कथा सुहानी ॥
प्रथम बेद इह भेद ज्यासको ।
सुनत होय अघ हानी ॥ प्रभुकी १ ॥
लोकालोक तिनकाल जुत है ।
ज्यारो गतिसे धानी ॥

द्वितिय वेद इह भेद सुनतही ।
मुरख होय सरधानी ॥ जिनकी २ ॥
मुनिश्रावक आचार बतावत ।
तृतिय वेद यह ठानी ॥
जीव अजीवादिक तत्वनकी ।
चतुर्थ वेद कहानी । जिनकी ३ ॥
ग्रंथ बंध करि राखि जिनते ।
धन्न धन्न गुरु ग्यानी ।
ज्याके सुनत पढत कछु समजत ॥
जगत रामसे धानी ॥ जिनकी ४ ॥

॥ त्रिथि ॥

हें पद ऐकिल्यानंतर व्रातकुमारादिक सर्व सोंगा-
हिनें उठून वंदना करून जाणें.

॥ छंद चामर ॥

त्राणि सर्व भाषयुक्त चतुष्ककाळें खीरली ।
ऐकुनि नरें सुरें खगें स्वचिाधि ठेविली ॥

इंद्र ते गुण स्तुती करोनि वंदुनी पदा ।
उत्सवा करोनि जाति आपुलालि आस्पदा॥११२॥

॥ छंद स्वागता ॥

भूपती भरत तो त्रिमिताचा ।
मार्ग साधित असे सुकृताचा ॥
एक वेळि नर तीन्हि सभेसी ।
एउनी वदति ते भरतासी ॥ ११३ ॥
एक तो नर वदे भरतासी ।
जो पिताचि तुज त्या वृषभासी ।
ज्ञान केवळ समुद्भवलें हें ।
वर्तमान तुज सांगितलें हे ॥ ११४ ॥

॥ छंद शार्दुल विक्रिड ॥

भूपासी वदतो दुजा नर तुझे आयूध शाळांतरी ।
तें सद्रत्न सुदर्शन प्रगटले मी सांगतो सत्वरी ॥
बोले दूत तिजा नृपा प्रति तुला सत्पुत्र जाला असे ।
तीघाचे वचनासि ऐकुनि विभू चित्ती विचारीतसे ।११५।

॥ अभंग ॥

द्रव्य उपार्जुनी । कुटुंब पोसिति ॥
धर्म न करिती । कांहीं एक ॥ धृ ॥
जैसे वनिं पशु । चारा उपार्जिति ॥
पाडस पाळिति मोहबळें ॥ १ ॥
धर्म नाहिं जेथें । पशु ह्मणवीला ॥
तैसा नर जाला धर्माविन ॥ २ ॥
धर्म अर्थ काम । तिन्हि हि साधिजे ॥
सफळ करिजे । नर जन्म ॥ ३ ॥
कणाविण भूस । धर्माविन तैसे ॥
निष्फळ हें तैसें अर्थ काम ॥ ४ ॥
धर्म करोनियां तरि जे संसारा ॥
महति सागरा धर्म तारु ॥ ५ ॥

॥ छंद स्वागता ॥

धर्म कार्य करिजे पहिल्यानें ।
सर्व उत्तमचि वांछित ज्यान्हें ॥

हे विचारुनि विभू मन संगी ।
एउनि सुसमवश्रृतिलागी ॥ ११६ ॥
वंदिला मग नृपें जिनराजा ।
केलि ते स्तवुनिया मग पूजा ॥
धर्म ऐकुनि निजास्पदिं आला ।
पुत्र उत्सव नृपें मग केला ॥ ११७ ॥

॥ छंद शार्दूल विक्रिड ॥

एके दीवसि चक्र जें उपजलें आयूध शाळांतरी ॥
पूजोनि मग चक्रवश्य करुनी चक्रेश तो सत्वरीं ॥
जावोनी नवधा निधिसि चवदा रत्नासि लाधोनिया ॥
आल तो स्वपुराप्रती निजबळें षट्खड साधोनिया ॥

॥ छंद अभंग ॥

पृथ्वी साधोनिया ॥ प्रभु आला जेव्हां ॥
आनंदीला तेव्हां नगरलोक ॥ धृ ॥
गुढ्या उभारिल्या सर्व घरोघरीं
तोरण ते द्वारीं ॥ बांधियेलें ॥ १ ॥

आनंदाचीं वाद्यें ॥ बहूत वाजती ॥
वस्त्रादिक देती ॥ याचकासी ॥ २ ॥
महति ह्मणतो ॥ सकळ जनाची ॥
धर्मावरी रुची ॥ जाली असे ॥ ३ ॥

॥ छंद द्रुतविलंबित ॥

तें चक्ररत्न नगरी मधिं न प्रवेशे ॥
तो प्रोहितासि भरतेश्वर भूप पूंसे ॥
बोले पुरोध मग त्या भरतासि वाणी ॥
तुझ्याहुनी नृप बळिष्ट असेल कोन्ही ॥११९॥
तो भूप तूज शरणांगत ऐत नाहीं ॥
या अर्थि चक्र नगरामधिं जात नाहीं ॥
हे ऐकुनि भरत शोधुनि पाहताहे ॥
बाहूबळी अनुज तो, बळि दीसताहे ॥१२०॥
हे जाणुनी सकळ सैन्य समूह केला ॥
तो चक्रि पोदनपुरासि चढोनि आला ॥
दोघेहि सैन्य मिळुनी मग युद्ध जाले ॥
मंत्रीहिनें उभयतांहि विचारिजेलं ॥१२१॥

हे दोन बंधु चरमांगिहि मोक्षगामी ॥
याहासि घात न घडे कधिं युद्धकार्मी ॥
हें सर्व सैन्य मरणासि वृथाचि पात्रे ॥
या कारणें चमुविना स्वयुधा करावें ॥१२२॥
मंत्री विचारुनि असे वदती द्वयासी ॥
दोघे तुम्हीच जलयुद्ध करा विशेषी ॥
तैसेंच मल्लयुध नेत्रयुधा करावें ॥
जिंकील त्यासि शरणांगतची असावें ॥
हें ऐकुनि द्वि अनुजें त्रिणि युद्ध केलें ॥
त्यामध्य बाहुबलिसी यश थोर आलें ॥
ते कालदोष करुनी वडिलासि हारी ॥
हें जाणुनी भुजबळी हृदयीं विचारि ॥
राज्यार्थि म्यां वडिल हा अपमानिलाहे ॥
धिग्राज्यलक्ष्मि वय संसृतिची लिलाहे ॥
रत्नत्रयादि शिवमार्गचि सारकीजे ॥
देवेंद्रवंद्य जिनदेव सदा भजी जे ॥ १२५ ॥

॥ पद चाल ( उद्धवा शांतवनकर ) ॥

तूं भजरे निशि दिनि हृदयीं ।
मानवा श्री जिनराया ॥
दिन दिन घडि घडि पल पल हा ॥
नर भव जातो वाया ॥ तू भजरे० ॥ धृ ॥
घर धन सुत सज्जन तनया ॥
जनकादिक जननी जाया ॥
रथ माल मुलुक गज हया ॥
हे सर्वहि जातिल विलया ॥
॥ चाल ॥ त्यज राग द्वेष मदमाया ॥
त्या विन हे न घडे ठाया ॥
जिन चरणीं मन वच काया ॥
हे नौका भवजलधि तराया ॥ तूं भजरे० ॥१॥
अभिमान न धरी पोटीं ॥
विषयादिक आशा खोटी ॥
करि तप चारित्रासाठीं ॥
भावना आत्मिक ताटी ॥

॥ चाल ॥ मिथ्यात्वी नलगे दृष्टी ॥
पापाविषयीं मन सूटी ॥
शील संयम समता गाठी ॥
शिवपदासि होईल भेटी ॥ तूं भजरे० ॥ २ ॥
तीर्थंकर केवळ ज्ञानी ॥
गणधरादि मुनि सम्मानी ॥
परमार्थी आत्मध्यानी ॥
स चराचर हेची करणी ॥
॥ चाल ॥ गणती न कळे या धरणी ॥
हे अनंत कर्म हरोनी ॥
मुक्ति पद होय निर्वाणी ॥
भुवनत्रय जाले पुजनीं ॥ तूं भजरे० ॥ ३ ॥
जे त्रिशुद्ध भजती प्राणी ॥
निश्चय मानि प्रमाणी ॥
त्या पावन हो सुख खानी ॥
ते होतिल निश्चळ ठानी ॥
॥ चाल ॥ मुनि विजय कीर्तीच्या चरणीं ॥
नेमिचंद्र ह्मणे अज्ञानी ॥

रत्नत्रय हे आचरुनी ॥
दूर करि तूं जन्ममरणीं ॥ तूं भजेरे० ॥ ४ ॥

॥ वसंत तिलका ॥

अनित्य वस्तु जगि सर्वहि पाहाताची ॥
अर्हंत सिद्ध गुरु धर्म शरण्य हेची ॥
संसार पंचविध दुःख सुखासि दाता ॥
हा एकलाचि जिव दुःख सुखासि भोक्ता ॥ १२६ ॥
हे अन्य सर्व शरिरादि कुटुंब आहे ॥
हा देह सर्व अशुची अपवित्र आहे ॥
मिथ्यात्व आदि अघ आस्रव बंधकारी ॥
यांचा निरोध शुभ संवर हीतकारी ॥ १२७ ॥
चारित्र सत्तपबळें अघ निर्जराहे ॥
लोकत्रयांत सुख दुःखचि दीसताहे ॥
रत्नत्रयप्रविणता अतिदुर्लभाहे ॥
हा धर्म सर्व हितकारक तारिताहे ॥ १२८ ॥
हे द्वादश स्वरूप चिंतुनि तो विरागी ॥
जाला तपस्वि यति संयमि बाहु योगी ॥

अठ्ठाविसा मुळगुणा प्रति अदरोनी ॥
ध्यानस्थ काननि असे ममता हरोनी ॥ १२९ ॥

॥ राग सामेरी ॥

हो गयोरे बेरागी बलि होगयोरे बेरागी ॥ बली० ॥ धृ ॥
जिनावाणी रसकुपी भरिरे ज्ञानप्यालौ पीगयोरे बेरागी ॥ बली० ॥ १ ॥
रागद्वेष छांडी प्रमादमूकी सकल कथा गली हो गयोरे बेरागी ॥ बली० ॥ २ ॥
त्रयकाल सब परिसा सहकरी ॥ कर्म बभूति धुनिहो गयोरे बेरागी ॥ बली० ॥ ३ ॥
ब्रह्मदया माया करि मागे ॥ पंचमि गती मठ हो गयोरे बेरागी ॥ बली० ॥ ४ ॥

॥ छंद वसंत तिलका ॥

चक्रेश बाहुबलिचे तनुजा प्रतीतो ॥
देखोनि पौदनपुरी स्वपुरी प्रती तो ॥
एखोनि षट्शकालितो फिरवी निजाज्ञा ॥

राज्यावरी बसुनि पाळितसे जिनाज्ञा ॥ १३० ॥

॥ छंद भुजंग प्रयात ॥

नृपें एकदीनी विचारोनि चित्ती ॥
दयावंत जे मर्त्य पाहून युक्ती ॥
तया लागि ते ब्राह्मणा स्थापि केले ॥
तया दान पात्रासि ते दान दिल्हे ॥ १३१ ॥

॥ छंद मालीनी ॥

मग समवसृतीसी एउनी वैभवासी ॥
स्तउनि नमुनि राजा पूजुनी नाभिजासी ॥
विदित करि सुवार्ता ब्राह्मण स्थापनेची ॥
जिन वदत नृपासी ऐक वार्ता तु याची ॥ १३२ ॥
पुढति पुढति हेची ब्राह्मण भ्रष्ट होती ॥
कुमति कुश्रुतिने हे थोर मिथ्यात्वि होती ॥
श्रवण करुनि ऐसे भूप कंपित जाला ॥
स्वपुरिसि मग गेला नीति सांगे जनाला ॥ १३३ ॥

॥ पद राग सोरट ॥

भरतजी घरही में वैरागी ॥ भरतजी० ॥ ध्रु ॥
सहस बतिस मुकुटबंधराजा ॥ सेव करे बडभागी ॥
छिनवे सहस्र अंते उर ज्याके ॥ नही भयो अनुरागी॥
भरतजी० ॥ १ ॥
कोडि अठरा तुरगम राजे ॥ कोडि चौऱ्यासी पागी ॥
लख चौऱ्यासी रथ गज शोभे ॥ सुरति धर्म सुलागी॥
भरतजी० ॥ २ ॥
नवनिधि रतन चौदा घरि छाजे ॥
मनाचिंता सब भागी ॥
छिनवे कोडिवर गाव अधिपती ॥
सहस बतिस देश भागी ॥ भरजी० ॥ ३ ॥
च्यारि कोडि मन अनाज नित उठे ॥
लूण दशलाख मनलागी ॥
तीन कोडिमो कालि घर दुजे ॥
कोडिलाख हल त्यागी ॥ भरतजी० ॥ ४ ॥
लख चौऱ्यासी पूर्व आवभायि ॥

गही दीक्षावर भागी ॥ अंतर मुहुर्त एक माहि ॥
लेल्या मुक्ति सुलागी ॥ भरतजी० ॥ ५ ॥
जो जलमाहि कमलन तिहिरदे ॥
कबहुनभयो सरागी ॥ कनक कीर्ति मुनिवर वदत ॥
दीज्यौ मुगति मै भागी ॥ भरतजी० ॥ ६ ॥

॥ अभंग ॥

वृषभ जिनाचे समवशरणीं ॥
गणधरज्ञानी ॥ चवऱ्यासी ॥ धृ. ॥
पन्नासाधिक सते ताळीशत ॥
इतुके प्रमित पूर्वधर ॥ १ ॥
पन्नासाधिक एके ताळीशत शिक्षक गनित ॥
जानिजे हे ॥ २ ॥
अवधि ज्ञानी, ते ॥ नवचि हजार ॥
विंशति हजार ॥ केवळि ते ॥ ३ ॥
षट्शत आगळे ॥ विंशति हजार ॥
वैक्रियकसार ॥ मुनिजन ॥ ४ ॥
द्वादश सहस्र सातशें पन्नास ॥

मनःपर्यायास ॥ गणि जे ते ॥ ५ ॥
इतुकेची जाणा ॥ वादीहि केवळी ॥
अंतकृत्केवळी ॥ शत असति ॥ ६ ॥
संतत केवळी ॥ जाणा चवऱ्यासी ॥
मेळ चवऱ्यासी ॥ सहस्त्र हा ॥ ७ ॥
आर्जिकाची संख्या ॥ साढे तीन लक्ष ॥
जानावि प्रतक्ष ॥ सर्व मेळी ॥ ८ ॥
श्रावकाचि संख्या ॥ आहे तीन लक्ष ॥
जाणा पंचलक्ष ॥ श्राविका त्या ॥ ९ ॥
समवशरणीं ॥ ऐसी हे विभूति ॥
वांछितो महती ॥ ब्रह्मचारी ॥ १० ॥

॥ छंद वसंत तिलका ॥

लक्षैक पूर्व वरि देश विहारिताची ॥
ते एकमास उरली स्थिति आयुष्याची ॥
केले विसर्जन तदा समवसृतीला ॥
कैलासद्रिरिवरी वृषभेश गेला ॥ १३४ ॥

॥ छंद भुजंगप्रयात ॥

तनुत्सर्ग योगासनीं एकमासी ॥
धरी ध्यानतो स्वात्मरूपी मनासी ॥
जिनाधीश ऐशापरी निश्चयानें ॥
करी शेष कर्मांचि हानी बळानें ॥ १३५ ॥

॥ छंद शार्दूल विक्रिड ॥

तेरावे गुणि त्या शुभ प्रकृति ही बाहत्तरी क्षेपिल्या ॥
चौदावे गुणि शेष त्या प्रकृति ही तेराहि संहारिल्या ॥
ऐशा ह्या प्रकृती समग्र मिळुनी पंच्यांशि वारुनी ॥
गेला माघवदी चतुर्दशदिनी मुक्तिपदा लागुनी ॥१३६॥

॥ गद्य ॥ अथ तेरावे चौदावे गुणस्थानि अघाति पंचमी प्रकृती क्षपणा लिख्यते ॥

तेरावे गुणित्या शुभ प्रकृति ही बाहात्तरी क्षेपिल्या

७२ तेरावे गुणस्थानी बाहात्तर शुभ प्रकृती क्षेपिल्या कैशा:—

१ असाता वेदनी, देवगती, देवगत्यानुपूर्वी॰

४ वैक्रियक, आहरकं, तैजस, कार्माण शरीर, वैक्रियक, आहारकांगोपांग

२ स्थान, प्रमाण--निर्माण॰
४ वैक्रियक, आहारक, तैजस, कार्माण, बंधन
४ वैक्रियक, आहारक, तैजस, कार्माण, संघात
६ समचतुस्त्र, न्यग्रोधपारिमंडळ, वामन, कुब्जक
अं (हुं) डक संस्थान॰
६ वज्रवृषभनाराच, वज्रनाराच, नाराच, अर्धनाराच, किलिक, असंप्राप्तिकासंस्थान ॥
८ हलके, भारी, मृदु, कठिन, चिक्कन, खरखड शीत, उष्ण स्पर्श
५ मधुर, कटुक, तिक्त, आमल, कषाय, रस
२ सुगंध, दुर्गंध॰
५ श्वेत, कृष्ण, हरित, पीत, रक्त, वर्ण एवं पिंडप्रकृति
५१ पिंडप्रकृति ५० असाता वेदनी १ ऐशा ५१
२० अपिंडप्रकृति वीस, त्या कैशाः—

अगुरुलघु, उपघात, परघात, उश्वास, विहायोगति, प्रत्येकशरीर, सुभग, दुर्भग, सुस्वर, दुःस्वर, शुभ, अशुभ, पर्याप्ति, अपर्याप्ति,

स्थिर, अस्थिर, आदेय, अनादेय, यशःकीर्ती, अयशःकीर्ती, एवं अपिंड २० पिंड ५० ऐशा नामप्रकृति ७० असातावेदनी १ नीचगोत्र १ ऐशा बहात्तर प्रकृती तेरावे गुणस्थानीं क्षेपिल्यात.

चौदावे गुणि शेषत्या प्रकृतिही तेराहि संहारिल्या ॥

चौदावे गुणस्थानी तेरा प्रकृतीचा संहारकेला त्याकैशा सातावेदनी, मनुष्यायु, मनुष्यगति, मनुष्यगत्यानुपूर्वी, पंचेंद्रियजाति, औदारिकशरीर, औदारिकांगोपांग, औदारिकबंधन, औदारिकसंघात, त्रस, बादर, तीर्थंकर, उच्चगोत्र, ऐशा ह्या तेरा प्रकृती चौदाव्या गुणस्थानी क्षेपिल्यात. ऐशा सर्व मिळुन पंचासी प्रकृति निवारुन मुक्तिपदास जिनेश्वर माघवद्य चतुर्दशीचे दिवसी गेला ॥

जिनराज शिवपदि गेला आनंदें जय जय बोला ॥ १० ॥

जय बोला वृषभनाथस्वामीची जय ॥

अर्हत्परमेष्ठिस्मरण ॥ जय जय श्रीजिनराज ॥

॥ विधी ॥

निर्वाणकल्याणिकाची अक्षत पडल्यानंतर इंद्रानें एउन वंदना करुन अभिषेक करावयास बसणें, तिचुक्यामध्यें, इंद्रतुल्य अग्निकुमारचें सोंग आणणें.

॥ अथ अभिषेक ॥

श्रीमान्निर्वृतिकूटके स्फटिकवत्तद्धातुशिलामर्हतः ॥
पीठे स्नानविधौ निधाय वपुषं तत्राहमिंद्रोपि च ॥
स्वात्मालंकरणार्थमेव विमलं स्रग्यज्ञसूत्रं दधे ॥
मुद्रा कंकणमेखलादि मुकुटान् निर्वाणकालोत्सवे ॥१॥

पीठस्थापनं ॥ पीठप्रक्षालनं ॥ पीठार्चनं ॥
श्रीकारलेखनं ॥ श्रीयंत्रार्चनं ॥
श्रीवर्णे प्रतिमानिवेशनं ॥ इंद्रस्थापमं ॥
आत्मालंकरणानिच ॥ इत्यादिक अर्चना फल-
पर्यंत अभिषेक बोलावा ॥

॥ अथाष्टक ॥

सिंधुनिर्जरापगादितीर्थजैःसुनिर्मलैः ॥

शीतलैःसुगंधयुक्ततापहारकैर्जलैः ॥
आदिधर्मतीर्थकारकं सुनाभिनंदनं ॥
मोक्षमंगले यजामि पापतापकंदनं ॥
ॐ ऱ्हीं शिवपदसंप्रप्ताय श्रीवृषभदेवाय
जलं ॥ १ ॥

॥ अथ जयमाला ॥

जय जय भव हर जगि केवल भर ॥
कालु अनंतानंत थिरो ॥
वंदइ जिनवरगणहर मुनिवर ॥
इंद्रसुरासुर चक्कहरो ॥ १ ॥
मोहणीय खयदो समत्तसार ॥
ध्वंसितणाणावरण विचार ॥
जावो परबोधानंतधार ॥
दंसणवरणी खयदो विपार ॥ २ ॥
सिरि दंसण जाउ अनंत संत ॥
विरि अंतराउ खयदो भजंत ॥
सिरि सिद्धाणंत विरियवंत ॥

वेयाणीय खयदो भवहरंत ॥ ३ ॥
गुण अव्वाबाह हणंति मेरणं ॥
हउ इंदिय सुह मह जीवसुसरणं ॥
आऊ खयदो वहु सुह धरणं ॥
उपत्ति कयाणति नहो मरणं ॥ ४ ॥
अवगण सारि अमुत्तियोय ॥
णाम खयदो गुण सुहम सोय ॥
गोत्तखयदो गय रोग भोग ॥
गुण गुरुलघु सहिउ सिद्धलोग ॥ ५ ॥
जय उह उकलंकण हवंति तासु ॥
जय जय जय भवइ सुरपाय जासु ॥
असरीर सरारावंत धीर ॥
अजरामर वोह समूहवीर ॥ ६ ॥
गय राग विराग विगय कुडंभ ॥
गय वनय विगय मन विदंभ ॥
गय राय दोस गय मन विभंग ॥
गय चउगयि गमन विसंघलिंग ॥ ७ ॥
गय जम्म सव्व जोयिनि वियोग ॥

गय सव्व जरा संजोग रोग ॥
गय मरण सव्वदुःख हनिहान ॥
लहि बाराणता सव्वज्ञाण ॥ ८ ॥
तेवि जाणंता सुह भजंत ॥
दंसणंत णाणंत संत ॥
ते सुख अणंताणंत विमलधार ॥
त काउ अणंताणंत सार ॥ ९ ॥
णहि तच्छणारि संयोगे मरणा ॥
णहि तच्छ गोत्तकलकल विकरणा ॥
णहि तच्छछुहात एहा विशाल ॥
णहि तच्छ रिद्धि दारिद्द जाल ॥ १० ॥
णहि तच्छणा परणाहितच्छगाम ॥
णहि तच्छ विमलजलभरिय ठाम ॥
णहि तच्छसीत बहुदुःख धाम ॥
णहि तच्छथवणरोगह विभाम ॥ ११ ॥
णहितच्छ तव असुहाणवंत ॥
णहि तच्छ कुडंबहुकंडवंत ॥
णहि तच्छ चोरपरलाछिहार ॥

एहि तच्छ भुयंगह पापभार ॥ १२ ॥
झ्यायंति मुनिवर कम्म विरहियं ॥
अमल विमल सिरि परमं सहियं ॥
रोगी हवइ वररोग विरहियं ॥
गहभूय पिसाच समूह गलीयं ॥ १३ ॥

॥ घत्ता ॥

सिरि विज्जानंदी समंतभद्दं ॥
पूयपाय अकलंकपरं ॥
अंचमि गुणवंतं सिद्धाणंतं ॥
सुमह जलहि वर अभयकरं ॥ १४ ॥

॥ इति जयमाला ॥

॥ विधी ॥

या नंतर रचनेंत समया चांदन्या धूपारते मांडून त्यांमध्यें दशांग घालून वरता जराजरा कापुर ठेऊन अग्निकुमाराने मुकुटाचे अग्निज्वाळाचा चहुदिशा कडोन कर्पुरासी स्पर्श करुन करुन दिव्याचे

जोतिने कापुर उजाळुन मग सकल जनाहिने स्तव्र नयुक्त तिन प्रदक्षणा देउन वंदना करावी ॥ मग इंद्रानें नृत्य करुन भस्म वंदुन जाणें मग कथेस उभे राहणें ॥

॥ छंद भुजंप्रयात ॥

लघु पंचवर्ण स्थितीमध्य मुक्ति ॥
जिनेंद्रासि जाली निराकार मूर्ती ॥
वसूकर्म हाणोनि अष्टागुणासी ॥
तदा पावला केवळी सिद्धवासी ॥ १३७ ॥

॥ छंद वसंत तिलका ॥

दाहा सहस्त्र मुनिराज जिनेश्वराचे ॥
गेले समागमि सुमुक्ति पदासि साचे ॥
सिद्धालयी अनिश सौख्य अनंत खानी ॥
भोगीतसे जनन मृत्यु जरा हरोनी ॥ १३८ ॥

॥ राग कांगिग ॥

गाउ मे जिनराज ॥ श्रीजिनचरण कमल चित--
लाय गाउ मे जिनराज ॥ ध्रु. ॥
दोष अष्टदश दूर कीन्हो ॥ पायो केवल राज ॥
समवशरण जाको देव कीन्हो ॥ लीन्हो सुखह समाज ॥
गउ मे० ॥ १ ॥
बारा सभा प्रतिबोधनप्राणी ॥ दिव्यध्यानिप्रविकाश ।
ज्याके सुनत सुरनरपशुको ॥ मनमें होय उल्हास ॥
गाउ मे० ॥ २ ॥
अनंतचतुष्टय सुगुण सारा ॥ कोइन पावे पार ॥
अष्टकर्म इंधन परजाले ॥ शिवपुरि पायो यार ॥
गाउ मे० ॥ ३ ॥
मूलसंघ उदयाचलभास्कर ॥ मेरुचंदनमिपाय ॥
जिनचंद्रयतीश्वरा सेवाई छे ॥ निन नित तुझी गुण गाय॥
गाउ मे० ॥ ४ ॥

॥ छंद इंद्रवज्रा ॥

हे जाणुनीया मग इंद्र आले ॥
क्षीराब्धि नीरे घट ते भरीले ॥
जिनेश्वराचे शरीरावरी ते ॥
ढाळोनि केला अभिषेक हस्ते ॥ १३९ ॥

अष्ट प्रकारे सुपूजा करोनी ॥
द्रव्यें सुगंधी मग मेळऊनी ॥
श्रीखंड कृष्णागरु चदंनादि ॥
आणोनि देवें रचिलें धुपादि ॥ १४० ॥
अग्नीकुमारें मुकुटा करोनी ॥
प्रोज्वाळिला तो दहनार्थि वन्ही ॥
देवाहिनें जैयजयकार केला ॥
कर्पूरवद्देह जळोनि गेला ॥ १४१ ॥

॥ अडील्ला ॥

रहे शेष नख चक्ररचीत नतह्रा ॥
मलयगिरि श्रीखंड प्रमुख सरीसीतह्रा ॥
प्रणम्यो अगनिकुमार मुकुटमणक्रांतिसौ ॥
प्रकटी अगनी महंत भस्मकरि सांतिसौ ॥

॥ अभंग ॥

वीतरागा तुझे स्तवन ॥ जगि निर्दोष पावन ॥ धृ. ॥
तुझि कथा ही तारक ॥ जगीं पाप निवारक ॥ १ ॥

जैसा सूर्य असता दूरी ॥ त्याची प्रभा पृथ्वीवरी ॥२॥
तेन्हे पद्माकरी सकळ ॥ विकसित होति कमळ ॥३॥
दूरी तैसा तू शिवलोकीं॥ तुझी कथा तिहिलोकीं ॥४॥
॥ तुझे कथेनें महति ॥ विकाशित जाला चित्तीं ॥ ५॥

हें पद ह्मणून इंद्रानें नृत्य करणें ॥

॥ कवीत ॥

अहो नाथ तुम विन इह कोन काजकरे, दुर्धरव्रत तुम विन कोन राहिहै ॥

वसुविध रूपधरी जीवगुण नासी कीनो कैसे सो कर्म वैरी, विनु ध्यानु दहीहै ॥

जिन गुण पायी लोक अलोकको प्रकाशकरी शिवथान जाइजी उथीर होइ रहिहै ॥

मन वच काय मन सुख सिंधु सेवे तुम, ते ऊभ वदधि तरि शिवपुरी लहिहै ॥ १ ॥

इंद्रानें नृत्य करुन तिन प्रदक्षिणा देउन मग कविता ह्मणून भस्म वंदून जाणें ॥

॥ छंद उपेंद्रवज्रा ॥

प्रदक्षणा देउनि संस्तुतीतें ॥
करोनिया भस्महि वंदिली ते ॥
महोत्सवा लागि करोनिया ते ॥
सुरेंद्र गेले सुनिजास्पदा ते ॥

॥ छंद द्रुतविलंबित ॥

मलयखेड सुकेशरि विष्टरीं ॥
अधिप भारति गच्छपति सुरी ॥
सुगुरु जो मज वासव किर्तिहि ॥
वद विभारति देउन उक्ति, ही ॥ १४३ ॥
प्रथम ते दशलाक्षणीची कथा ॥
वदविली बहु आग्रहि सत्कथा ॥
व्रतकथा मग षोडश कारणी ॥
वदविली गुरुनें मज तारणी ॥ १४४ ॥

॥ छंद वसंत तिलका ॥

जाणोनि सद्गुरुचिहें मज जालि आज्ञा ॥
कल्याणिकोत्सव कथा करिजे ममाज्ञा ॥

वांछा धरोनि मनि आयु समाप्त केला ॥
कल्याणिकोत्सव तहा मग म्या रचीला ॥ १४५ ॥

॥ छंद इंद्रवज्रा ॥

बाळापुरी नाभिज मंदिरा ते ॥
यमाग्निसप्तेंदु शकाब्द धाते ॥
माघांधचातुर्दशि जीववारी ॥
केली कथा हे परिपूर्ण सारी ॥ १४७ ॥
व्दाषष्टि संस्थान विलाकुनी हे ॥
तीर्थंकराची रचिली कथा हे ॥
संक्षेप संदीग्ध हि वर्णिली जे ॥
श्रोतें तुझी क्षांति समग्र कीजे ॥ १४८ ॥

॥ पद ॥

वीतराग तेरी मोहनमूरत देखत मन हुलसाना-
वे ॥ वीतरागा० ॥ धृ. ॥

गर्भजन्मतपज्ञान परमपद ॥ निरखित चित्त-
सुहानावे ॥ पंचकल्यानिक महिमा सुमिकरी ॥ भ-

व्यजाँव भिद्धा नावें ॥ वीतराग० ॥ १ ॥

मै मतिहींन सुन्यो जस तेरो ॥ हिरदय नाहीं-ग्वुबानाचे ॥ अंतरंग रंगराचो विषयन ॥ रागद्वेष सुख मानावे ॥ वीतराग० ॥ २ ॥

अब मै प्रभु तुम भेद पिछाना ॥ इनमव अवरण जानावे ॥ दीन ज्यान प्रभु मोहे निवाजो ॥ अपन बिरद निभानावे ॥ वीतराग ॥ ३ ॥

तुम प्रभु दीन अनेक उधारे ॥ आप समान कर णावे ॥ सूवर सिंघनेवल मृगव नर ॥ गणिका भिल्ल तारिणावे ॥ वीतराग० ॥ ४ ॥

मैडुक सांप शीयाल मतंगजु हस्ति हंस सचा न व ॥ गृधृ वृषभसेपार उतारे ॥ सुरपुरि बासबसा-नावें ॥ वीतराग० ॥ ५ ॥

तुम गुणगणको पारनपामे ॥ भीम कोटि जस गानावे ॥ विजयकीर्ति प्रभु सेवत नित प्रति ॥ तुम चरण नाचितलानावे ॥ वीतराग० ॥ ६ ॥

तुमकहियो त्रिभुवनके नायक अबरकित्रर मोहता-
रोजी ॥ तुमकहियो० ॥ घृ. ॥
लखचौऱ्यासी जो नर भटके॥ साहे दुःख थनेरजी।
तुम्कहियो० ॥ १ ॥
तुम देवनके देव कहीयो॥ मै आधनि तुमारे जी ॥
तुमकहियो० ॥ २ ॥
आबभै शरण हुवो प्रभु तुमकु॥तुम परलोक सुधारोजी॥
तुमकहियो० ॥ ३ ॥
श्रीसकलकीर्ति प्रभुदास बिहारी ॥ भवदधिपार—
उतारोजी ॥ तुम कहियो० ॥ ४ ॥

॥ अथ कथाबसानश्लोक ओवित्रद्ध ॥

आजची इतुकी कथा स्थिती ॥
तुज प्रति पावोगा जिनपती ॥
आता उजळावी आरती ॥
पंचज्योती लावोनीया ॥ १ ॥
आता उभे व्हावे सर्वे जन ॥
जय जय शब्द उच्चारुन ॥

दोही करि टाळी वाजउन ॥
जिनगुणस्तवन ऐकावें ॥ २ ॥

॥ अथ आरति अर्हंताची ॥

जयदेव जयदेव जयजिन अरहंता ॥
भवजल तारक हारक मुनि मानसचिंता ॥
छेचाळिस गुणवंता मुक्तीश्रीकांता ॥
आरति वोवाळिन मी भावे वोवाळिन मी तुजल
भगवंता ॥ धृ. ॥
वपु निर्मळरुधिरोज्वळ प्रस्वेदरहिता ॥
संहनन संस्थान प्रथमोत्तम सहिता ॥
अद्वयरूपक तारक वल्लभ वचनोक्ता ॥
सौरभ सौलक्षणता अनंत बळयुक्ता ॥
जय देव जयदेव० ॥ १ ॥
उपसर्गप्राणीवधभुक्तिप्रविहीना ॥
योजनशत सौभिक्षित सुरवर्त्मगमना ॥
चतुराननविद्याधिपअछायधरणा ॥
विगतोन्मेषवर्जितनखकचविस्तरणा ॥

जयदेव जयदेव ॥ २ ॥

तूझे समवशरणी मागधि भाषोक्ति ॥

सर्व ऋतुचे वृक्षे फल फुलित होति ॥

सर्व जिवासी मैत्री रत्नमय जगति ॥

सुगंधवायु महके जन आनंदीति ॥

जयदेव जयदेव० ॥ ३ ॥

एक योजनभूमी सुर सम्मार्जिती ॥

गंधोदकवृष्टीते धाराधर करिती ॥

तूझे पादन्यासी सुरपद्म धरिती ॥

दिग्नभ निर्मल सकळ धान्यान्वित जगति ॥

जयदेव जयदेव० ॥ ४ ।

पाचारण करिती सुर सकळहि देवासि ।

धर्म सुचक्र जेथे गमन स्थिरतासि ॥

पाहुनि तथे रचिति समवशरणासी ॥

हे अतिशय चौतीस शोभति तुजपाशी ॥

जयदेव जयदेव० ॥ ५ ॥

अशोकवृक्षाखाली सिंहासन तीन्ही ॥

त्यावर शोभसि अधर चतुरंगुळ गगनी ॥

चउसट चामर ढळति वरछत्र तीन्ही ॥
भामंडळ विराजे तमहारक तरणी ॥
जयदेव जयदेव० ॥ ६ ॥
प्रकाशकारक तूझी दिव्यध्वनि गर्जे ॥
पुष्पसुवृष्टी करिती सुरदुंदुभि वाजे ॥
ज्ञान दर्शन सौख्ये वीर्यामित साजे
महति सागर नित्य रत भजनी तूजे
जय देव जयदेव० ॥ ७ ॥

॥ अथ वीतराग आरती ॥

जयदेवा वीतरागा । दोषविवर्जितांगा । आरति वोवाळीन तुज निःसंगसंगा । जयदेवा. ॥ धृ. ॥
अक्षया जन्महीना । नाहि तुजला । स्वेद विस्मया वेगळा तूं । नाहि विषाद खेद । जयदेवा. ॥ १ ॥
जरा रति रोष नाहीं । नाहि चिंतानुराग । निद्रा प्रमोह नाहीं । नाहि शरीरी रोग । जयदेवा० ॥ २ ॥
उन्माद भय नाहीं । नाही क्षुधा पिपास । दूर

तुज पासूनी हे । गेले अठरा दोष । जयदेवा० ॥ ३

देवेंद्रकीर्तिचे । कृपें तुझीहि भक्ती । महती सागराचे । दृढ लाधली चित्तीं । जयदेवा० ॥ ४ ॥

॥ अथ मंगलारति ॥

अर्हतो नामधेयं जगन्मंगलं । कापि किंचिद् भयं नास्ति यच्चिंतनात् । क्षुद्रदेवोपसर्गापहं कामदं । तत्सुख ग्रामदं विघ्नशांत्यै भजे ॥ १ ॥

नाभिजं चाजितं श्रीजिनं संभवं, कीशचिन्हं तथा मंगलादेहजं ।

पद्मचिन्हं सुपार्श्वं महासेनजं पुष्पदंतं सुनंदांगभूतं भजे ॥ २ ॥

विष्टभुजं वासुपूज्यं सुरामांगजं सिंहसेनात्मजं धर्मनाथं जिनं ॥

शांतिनाथं च कुंथुं सुमित्रांगजं कुंभराजात्मजं कच्छ पाकं भजे ॥ ३ ॥

श्रीनामिं नमिनाथं च वामासुतं चांतिमं सन्मतिं वर्ध--

मानाभिधं ॥
वीरनाथं महावीरसंज्ञं महत्याव्हयं पंचनामान्वितं तं भजे ॥ ४ ॥

(मराठी.)

घेउनि धवलाक्षतपुष्पा ।
पात्री उजळुनिया दीपा ॥
मंगलआरति जगदीशा ।
वोवाळिन तुझ परमेशा ॥ १ ॥

जनक तूचि मज जननी तू ।
मम चित्तांबुजतरणी तू ॥
मित्र तूची मज बंधू तू ।
ज्ञानदयाचा सिंधू तू ॥ २ ॥

सग्दुरु तूचि मज विद्या तू ।
दुर कार माझी अविद्या तू ॥
विघ्न निवारक देव हि तू ।
दाता त्राता सर्व हि तु ॥ ३ ॥

नाथाहो जिन नाथाहो ।
तव चरणि मम माथाहो ॥
देवाहो जिन देवाहो ।
आटवि भवजळ ठेवाहो ॥ ४ ॥

राजाहो जिन राजाहो ।
हरवी दुर्गति भाजाहो ॥
स्वामी हो जिन स्वामी हो ।
चित्त असो तव नामी हो ॥ ५ ॥

तुजविण तारक मज कोणी ।
न दिसे पाहता जग तिन्ही ॥
महति विनवी तुजलागी ।
देई सग्दति मजलागी ॥ ६ ॥

देई सग्दति मजलागी ।
देई सग्दति मजलागी ॥
देई सग्दति मजलागी ।
देई सग्दति मजलागी ॥ ७ ॥

जिन राजा जय जिन राजा ।
प्राणसख्या श्रीजिनराजा ॥
जिन राजा जय जिन राजा ।
प्राणसख्या श्रीजिनराजा ॥ ८ ॥
देई सग्दति मजलागी ।
देई सग्दति मजलागी ॥
देई सग्दति मजलागी ।
देई सग्दति मजलागी ॥ ९ ॥
जिन जिन जिन जिन तीर्थेशा ।
वीतरागा परमेशा ॥
जिन जिन जिन जिनतीर्थेशा ।
वीतरागा परमेशा ॥ १० ॥
देई सद्गति मजलागी ।
देई सद्गति मजलागी ॥
देई सद्गति मजलागी ।
देई सद्गति मजलागी ॥ ११ ॥
अर्हत् परमेष्टि स्मरण ॥

जयजय श्रीजिनराजा ॥
तुभ्यं नमोस्तु । तुभ्भं नमोस्तु । तुभ्यं नमोस्तु. ॥

॥ अथ शांतिधारा. ॥

ततो जिनेंद्र पादांते वारिधारा निपातयेत् ।
भृंगारमालिकोद्भ्रांताज्जनि मल्लोकशांतये ॥ १ ॥
॥ शांतिधारा त्रयं दद्यात् ॥

अथ विसर्जनं. ॥

संपूज्यकानां प्रतिपालकानां ।
यतींद्रसामान्यतपोधनानां ॥
देशस्य राष्ट्रस्य पुरस्य राज्ञः ।
करोतु शांतिं भगवान् जिनेंद्रः ॥ १ ॥
अशोक वृक्षःसुर पुष्पवृष्टी ।
दिव्यध्वनी चामरमासनं च ॥
भामंडलं दुंदुभिरातपत्रं ।
सत्प्रातिहार्याणि जिनेश्वराणां ॥ २॥

॥ छंद स्रग्धरा. ॥

क्षेमं सर्वप्रजानां प्रभवतु बलवान् धार्मिको
भूमिपाल: काले कालेच सम्यक्वर्षतु मघवा
व्याधयो यांतु नाशं ।
दुर्भिक्षं चौरमारी क्षणमपि जगतामात्मभूज्जीव-
लोके जिनेंद्रं धर्मचक्रं प्रभुवतु सततं सर्वसौख्य-
प्रदायी. ॥ ३ ॥

प्रध्वस्तघातिकर्माण: केवलज्ञानभास्करा: ।
कर्वंतु जगत: शांतिं वृषभद्या जिनेश्वरा: ॥ ४ ॥
आहुताये पुरादेवा लब्धभागा यथाक्रमात् ।
ते जिनाभ्यर्चनं कृत्वा सर्वे यांतु यथास्थितिं ॥५॥
अव्हाननं न जानामि नैव जानामि पूजनं ।
विसर्जनं जानामि त्वं सिद्धपरमेश्वर ॥ ६ ॥
मंत्रहीनं क्रियाहीनं द्रव्यहीनं कृतं मया ।
तत्सर्वं पूर्णतामेतु त्वत्प्रसादाज्जिन प्रभो ॥ ७ ॥
अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम ।
तस्मात् कारुण्यभावेन रक्ष रक्ष जिनेश्वर ॥ ८ ॥

रक्ष रक्ष परमेश्वर । तुभ्यं नमोस्तु । तुभ्यं नमोस्तु ॥
तुभ्यं नमोस्तु. ॥

॥ इति विसर्जनं ॥

श्रीमभ्दट्टारकदेवेंद्रकीर्तिप्रियशिष्यब्रह्ममहतिसागर
विरचितावृषभनाथपंचकल्यानिकोत्सव
॥ कथा समाप्तः ॥ ६ ॥

